म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वा.ना.
दा. क्र. २८०९५

IPBK-0102795
IRBK-0102795

४५७ - १९४८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

26 JUL 1974

# अनुक्रमणिका


| प्रकरण | | पानें |
|---|---|---|
| १ | नैनिताल | १–२० |
| २ | ग्वालेर | २१–३८ |
| ३ | आजचें ग्वालेर | ३९–५२ |
| ४ | आग्रा व फत्तेपूर शिक्री | ५३–७७ |
| ५ | नवींजुनीं दिल्ली शहरें | ७८–१०७ |
| ६ | हरिद्वार किंवा गंगाद्वार | १०८–१२३ |
| ७ | गुरुकुल | १२४–१४४ |
| ८ | मथुरावृंदावन | १४५–१६३ |
| ९ | द्वारका | १६४–१७९ |
| १० | कृष्णकथा व वैष्णवपंथ | १८०–१९९ |
| | सूचि | १–३ |




IRBK-0102795

IRBK-0102795

# चित्रांची अनुक्रमणिका.


| | | पान |
|---|---|---|
| | श्रीमंत मेजर मालोजीराव नरसिंगराव शितोळे (ग्वाल्हेर संस्थानचे श्रेष्ठ सरदार) ... ... | ारंभी |
| | उत्तर हिंदुस्थानचा नकाशा ... ... | १ |
| १ | नैनीताल : नैनादेवीचें देवालय ... ... | ८ |
| २ | ,, तलावाचा देखावा ... ... | १० |
| ३ | ग्वाल्हेर : हत्तीदरवाजा ... ... | ३६ |
| ४ | ,, मानमंदिर, पूर्वीय दृश्य ... ... | ३७ |
| ५ | ,, मोठें सासबाहु मंदिर ... ... | ३ |
| ६ | ,, किंग जॉर्ज पब्लिक पार्क ... | ४० |
| ७ | ,, कौन्सिल हॉल ... ... | ४२ |
| ८ | ,, जयाजीराव स्मारक व टाउन हॉल ... | ४२ |
| ९ | फ्लारेन्समधील कै. राजाराम महाराज छत्रपति कोल्हापूर यांची छत्री ... ... ... | ५ |
| १० | आग्रा : ताजमहाल व पुढील बाग ... | ६ |
| ११ | ,, ताजमहालाचें प्रवेशद्वार ... ... | ६ |
| १२ | ,, किल्ल्याचा हत्तीदरवाजा ... | ७ |
| १३ | ,, दिवाणी आम व मोती मशीद ... | ७ |
| १४ | फत्तेपूर शिक्री : बुलंद दरवाजा ... ... | ७ |
| १५ | ,, ,, जोधबाई व बीरबल यांचे वाडे ... | ७ |
| १६ | ,, ,, जुम्मा मशीद व सालीमची कबर ... | ७ |
| १७ | ,, ,, पंचमहाल ... ... | |
| १८ | ,, ,, बिरबलाचा वाडा ... ... | |
| १९ | ,, ,, हिरणमिनार ... ... | |
| २० | आग्रा : दयाळबागेचें 'प्रेमविद्यालय' ... | |
| २१ | ,, दयाळबाग औद्योगिक कारखाने ... | |

| नं. | | पान |
|---|---|---|
| २२ | जुनी दिल्ली कुतबमिनार ... ... | ८४ |
| २३ | ,, ,, हिंदु देवालय ... ... | ८३ |
| २४ | ,, ,, मशीद व लोहस्तंभ ... ... | ८२ |
| २५ | इन्द्रप्रस्थ : पुराणा किल्ला ... ... | ८७ |
| २६ | दिल्ली : हुमायुनाची कबर ... ... | ९१ |
| २७ | फिरोजाबाद : अशोकस्तंभ ... ... | ८७ |
| २८ | दिल्ली शहराचा काश्मीर दरवाजा ... ... | ९९ |
| २९ | ,, किल्ल्याचा दिल्ली दरवाजा ... ... | ९४ |
| ३० | ,, किल्ल्यांतील मोती मशीद ... ... | ९३ |
| ३१ | ,, किल्ल्यांतील दिवाणी आम... ... | ९५ |
| ३२ | नवी दिल्ली : सेक्रेटारिएट इमारत ( उत्तर भाग ) ... | ९८ |
| ३३ | ,, ,, व्हाइसरॉयचें गृह ... ... | ९८ |
| ३४ | ,, ,, हिंदुस्थानचें पार्लमेंटगृह ... | १०५ |
| ३५ | ,, ,, जंतर मंतर ( वेधशाळा ) ... | १०४ |
| ३६ | हरिद्वार : हरीची पायरी ... ... | ११७ |
| ३७ | मथुरा : गोपीनाथाचें देऊळ ... ... | १५५ |
| ३८ | ,, भूज ... ... | १५५ |
| ३९ | ,, विश्रामघाट ... ... | १५७ |
| ४० | वृंदावन : जुनें देवालय ... ... | १५८ |
| ४१ | ओखाबंदर : कांक्रीटचा सयाजी धक्का ... | १६८ |
| ४२ | बेट ( शंखोदर ) : श्रीकृष्णाचें देऊळ ... | १७० |
| ४३ | द्वारका : गोमती कांठचे घांट व देवळें ... | १७५ |
| ४४ | ,, द्वारकाधीशाचें देऊळ ... | १७४ |



पं जा ब
मा व ल पूर
रा ज पु
जोधपूर
अजमेर
हैदराबाद
कराची
सिं
ध
क च्छ
अबू
उदेपूर
रतलाम
अहमदाबाद
विरमगांव
बडोदा
ओखाबंदर
जामनगर
का ठे वा ड
सुरत
चालिसगांव
नाशिक
मनमाड
देवळाली
इगतपुरी
कल्याण
मुंबई

ता.

# माझा उत्तर हिंदुस्थानचा प्रवास.

## प्रकरण १ लें.

### नैनिताल.

कविकुलगुरु कालिदास यानें आपल्या कुमारसंभव व मेघदूत या काव्यांत हिमालय पर्वत आणि त्याच्या आसपासचा व अलीकडलापलीकडला प्रदेश यांच्या वर्णनाचे प्रसंग आणिले आहेत, व त्याचीं हीं वर्णनें मोठीं मनोहर व बहारीचीं आहेत हें त्या काव्यांचा परिचय असलेल्यांना नव्यानें सांगण्याची जरूरी नाहीं. शिवाय तीं वर्णनें बरींच हुबेहूबही आहेत. यावरून कालिदासानें हिमालय पर्वत प्रत्यक्ष पाहिला होता किंवा नाहीं हें जरी खात्रीनें सांगतां येणार नाहीं तरी इतकें खास, कीं, कालिदासानें हीं वर्णनें रचण्यापूर्वीं हिमालयाबद्दल उपलब्ध माहिती मिळविली असली पाहिजे. हिमालय पर्वताच्या प्रचंडतेची, त्याच्या भव्यतेची व तेथील एकंदर सृष्टिसौंदर्याची कालिदासास बरोबर कल्पना झालेली होती हें त्यानें कुमारसंभवाच्या प्रारंभींच केलेल्या हिमाचलाबद्दलच्या एका विधानावरून स्पष्ट होतें. " **पूर्वापरौ तोयनिधीवगाह्य स्थितः पृथिव्या इव मानदण्डः** " हिमालयाचें हें वर्णन खरोखरीच यथार्थ आहे. हिमालय हा हिंदुस्थानचाच नव्हे तर सर्व पृथ्वीचाच मानदण्ड होय. हा पर्वत ही एक अद्वितीय चीज आहे यांत शंका नाहीं. आर्यलोक उत्तरध्रुवाकडून म्हणा, किंवा कास्पीयन समुद्राच्या किनाऱ्यावरून म्हणा, खालीं दक्षिणेकडे आले. त्यांना या पर्वताची सर्व शोभा व तेथील सृष्टिसौंदर्य हें प्रत्यक्ष डोळ्यांनीं पहावयास

सांपडलें. या पर्वताच्या बाजूनेंच ते प्रथमतः उत्तर हिंदुस्थानांत आले व तेथल्या सपाट प्रदेशावर त्यांनीं कायमच्या वसाहती केल्या. तरी पण उत्तरप्रदेशाबद्दल व हिमालयाबद्दल त्यांचें प्रेम व आदर कायम राहिला. म्हणूनच त्यांनीं हिमालयाला सृष्टिसौंदर्यप्रिय शिवाचें वसतिस्थान बनविलें; हिमालयाच्या पलीकडे देवगंधर्वयक्षादिक मनुष्यापेक्षां श्रेष्ठ जीवकोटींचें वसतिस्थान आहे अशी त्यांनीं कल्पना केली; हिमालयाच्या पलीकडे असलेलें मानस सरोवर, हें सर्व सौंदर्याचें, सर्व सुखविलासांचें, सर्व प्रेक्षणीय वस्तूंचें आगर आहे असें त्यांनीं वर्णन केलें; व हिमालयावर जाऊन तेथें तपश्चर्या करून ब्रह्मानंदीं विलीन होणें हेंच सर्व आयुष्याचें इतिकर्तव्य आहे असें त्यांनीं प्रतिपादन केलें.

अशा या अद्वितीय व अपूर्व पर्वताचें व त्याच्या आसपासच्या प्रदेशाचें प्रत्यक्ष दर्शन घडणें हें पूर्वकाळीं फारच दुर्घट काम होतें व म्हणूनच त्या दर्शनाला इतकें धार्मिक पावित्र्य आलें होतें. परंतु अर्वाचीन काळीं आगगाड्यांच्या प्रसारानें सर्व हिंदुस्थानवासीयांना हा दर्शनलाभ सुलभ झालेला आहे. हिमालयाच्या दक्षिणेकडील पायथ्याच्या बाजूच्या पर्वतराजीवर इंग्रज सरकारनें या गेल्या शंभर वर्षांत निरनिराळीं थंड हवेचीं ठिकाणें शोधून काढून तेथें वस्ति वसविली आहे. अशीं ठिकाणें म्हणजे सिमला, मसूरी, नैनिताल व दार्जिलिंग हीं होत हें सर्वश्रुतच आहे. जरी हीं सर्व ठिकाणें हिमालयाच्या मानानें त्याच्या पायथ्याशींच आहेत तरी तीं समुद्रसपाटीपासून फारच उंच आहेत. सिमला समुद्रसपाटीपासून सात हजार फूट उंच आहे. मसूरी व नैनिताल सहा हजार फूट उंच आहेत. यावरून हीं हवेचीं ठिकाणें महाराष्ट्रांतील हवेच्या ठिकाणांपेक्षां अधिक उंच आहेत, असें दिसून येईल. कारण मुंबई प्रांतांतील सर्वांत उंच ठिकाण म्हणजे महाबळेश्वर हें होय, परंतु त्याची उंची फार तर पांच हजार फूट असेल. या उत्तर हिंदुस्थानांतील चार प्रसिद्ध ठिकाणांपैकीं नैनिताल हें ठिकाण एका मे महिन्यांत पाहण्याचा आम्हांस सुदैवानें योग आला. तेव्हां या सुंदर ठिकाणाची माहिति

वाचकांना या माझ्या **उत्तर हिंदुस्थानच्या प्रवासवर्णनांत** प्रथमतः देण्याचें योजिलें आहे.

मुंबई इलाख्यांतील लोकांना हिमालयांतील हवाशीर ठिकाणांपैकीं **नैनिताल** हेंच सर्वांत जवळचें ठिकाण आहे. हल्लीं मुंबईहून नैनितालला दोन मार्गांनीं जातां येतें. सर्वांत जवळचा मार्ग म्हणजे बांबे-बडोदा लाईननें आहे. ह्या लाईननें कुलाब्याहून* निघालें म्हणजे पंजाबएक्सप्रेस गाडीनें मुंबई, बडोदा, गोधा, रतलाम, नागडा या ठिकाणांवरून थेट मथुरेस गाडी येते. मुंबईहून मथुरा या लाईननें सातशें सत्याहत्तर मैल आहे. येथून पुढें नॅरोगेज लाईन आहे. ती हथरस, कासगंज बरेलीवरून कट-गोडमपर्यंत जाते. मथुरेपासून कटगोडम १९३ मैल आहे. नैनितालाचें रेल्वेस्टेशन हेंच होय. तेथून नैनिताल २२ मैल आहे. म्हणजे या मार्गानें मुंबईहून नैनिताल ९९२ मैल होतें. दुसरा मार्ग जी. आय. पी. रेल्वेकडून आहे. या मार्गानें आग्र्यास पंजाबमेलनें जावयाचें. मुंबईहून आग्रा ८३५ मैल आहे. व तेथून आग्रा--कटगोडम पॅसेंजर निघते. आग्र्यापासून कटगोडम सुमारें अडीचशें मैल आहे. अर्थात् या मार्गानें नैनिताल हें सुमारें शंभर मैल जास्त लांब आहे. मेलच्या तिसऱ्या वर्गानें सर्व प्रवास केल्यास जी. आय्. पी. मार्गानें सुमारें वीस रुपये पडतात. साध्या तिसऱ्या वर्गानें बारा रुपये पडतात. बॉंबे-बडोदा मार्गानें आल्यास मेलनेंच जी. आय. पी. च्या साध्या तिसऱ्या वर्गाइतक्या खर्चानें कट-गोडमला पोंचतां येतें.

आम्हीं मुंबई-बडोद्याकडून नागडा--मथुरा--मार्गानें **मुरादाबादेस** आलों. मुरादाबादेहून नैनितालला दोन मार्गांनीं जातां येतें. मुरादाबादेहून **बरेलीला** जावयाचें व बरेलीहून कटगोडमला यावयाचें. या प्रवासाला तिसऱ्या क्लासानें २। रुपये पडतात. दुसरा मार्ग यापेक्षां जवळ आहे. परंतु गाडी दोन ठिकाणीं बदलावी लागते. मुरादाबादेहून रामपूरपर्यंत

*आतां बॉंबे सेंट्रलहून; हंशीलांतही थोडा फरक झाला आहे.

एक फांटा आहे. रामपूरचे आधीं काशीपूर म्हणून एक गांव लागतें. मुरादाबादेहून काशीपूर हें थेट उत्तरेला आहे. काशीपुराहून थेट पूर्वेकडे एक फांटा जातो. त्यानें **लालकुवा** जंक्शनला जावयाचें व लालकुव्या-पासून कटगोडमला पोहोंचावयाचें. या मार्गानें तिसऱ्या क्लासचें भाडें सुमारें एक रुपया चार आणे पडतें. आम्ही जातांना **काशीपुराकडून** गेलों व परत येतांना **बरेलीच्या** मार्गानें आलों.

ज्यांनीं उत्तरहिंदुस्थानचा कांहीं भाग तरी पाहिला असेल त्यांना त्या प्रदेशाची सामान्य कल्पना असेलच. हा प्रदेश फार सपाट आहे. चारी बाजूंच्या क्षितिजांवर कोठेंही उंचवठा किंवा टेंकाड दृष्टीस पडाव-याचें नाहीं. अशा तऱ्हेचा देखावा महाराष्ट्रांतही देशावर दिसतो. परंतु खानदेश, वऱ्हाड किंवा दक्षिण महाराष्ट्र इकडील सपाट प्रदेश काळया मातीचा आहे, तर गंगा व यमुना या नद्यांच्या कांठचा हा प्रदेश पांढु-रक्या मातीचा आहे. इकडील दगडही पांढऱ्या मातीचे आहेत. मधून-मधून कालवे दृष्टीस पडतात व त्या ठिकाणचीं शेतें भर उन्हाळ्याच्या दिवसांतही हिरवीं गार दिसतात. काशीपुरापर्यंत अशा तऱ्हेचा देखावा दिसतो. परंतु काशीपूर सोडून पूर्वेकडे लालकुव्याच्या मार्गाला वळलें म्हणजे तेव्हांपासून सर्व देखावा बदललेला दिसतो. आधीं झाडी फारच गर्द होते. आगगाडी अत्यंत गर्द अशा रानांतून जाते व त्यांतील झाडांचा विशेष म्हणजे त्यांच्या पानांची टवटवी व सतेजपणा हा होय. लाल-कुव्यापासून डोंगरांची रांग दूर दिसूं लागते. लालकुव्यापासून निघालें म्हणजे **हल्डवानी** म्हणून एक स्टेशन लागतें. या ठिकाणचा व्यापार बराच मोठा आहे. हल्डवानीहून कटगोडमपर्यंतचा देखावा फारच मनो-हर आहे. आधीं जंगल खूब दाट व उंच असलेलें दिसतें व जमिनीचा रंग व विशेषतः दगडाचा रंग तर फारच बहारीचा दिसतो; येथें काळा दगड औषधाला सुद्धां मिळावयाचा नाहीं. येथील बहुतेक दगड पांढरे, कांहीं निळसर पांढरे, व कांहीं तर तांबडे असतात. अशा तीन मिश्र रंगाच्या दगडांचे ढीगचे ढीग व रासचे रास आगगाडीच्या बाजूनें

घातलेले दृष्टीस पडतात व ते दुरून फारच चांगले दिसतात. इकडील इमारतीही याच त्रिरंगी दगडांच्या केलेल्या असतात व यामुळें त्यांना कोणताही कृत्रिम रंग दिलेला नसतांना या छोट्या इमारती शहरांतील मोठमोठ्या सुंदर इमारतींपेक्षांही मनोहर दिसतात.

हें आपण पहाण्यांत गर्क झालेले असतांनाच आपल्याला आश्चर्यानें चकित करून सोडण्यासारखा देखावा दिसूं लागतो. हिमालयाच्या पाय-थ्याच्या पहिल्या हिरव्यागार टेंकड्या आपल्या अगदीं समोर दिसूं लाग-तात व त्या टेंकड्यांना लागून एक स्फटिकाप्रमाणें शुभ्र अशा नदीचें रुंद पात्र दिसूं लागतें. वरच्या बाजूस हिरवेंगार रान, त्याच्या पाय-थ्याशीं पांढऱ्या शुभ्र दगडांनीं भरलेलीं नदी, हा देखावा फारच आश्चर्य-कारक भासतो. दुरून पाहणाराला तर प्रथमतः हा एक मोठा समुद्रच आहे कीं काय, असा भास होतो. ही नदी फार उथळ परंतु अत्यंत रुंद आहे. हिचें नांव गोला नदी. कटगोडम याच नदीच्या किनाऱ्याला आहे. ही नदी म्हणजे या पांढऱ्या, निळ्या व तांबुस रंगाच्या दगडांची मोठी खाणच आहे. उन्हाळ्याचे दिवसांत नदीमध्यें पाणी मुळींच नसतें. परंतु सर्व नदी अशा चित्रविचित्र रंगाच्या गोट्यांनीं भरलेली असते. हा देखावा म्हणजे नैनिताल व हिमालय या सृष्टिसौंदर्याच्या आगरांचें प्रसादचिन्हच वाटतें व कटगोडमचा हा देखावा पाहून मनुष्याचें मन फार प्रसन्न होतें व लवकरच आपल्याला सृष्टिसौंदर्याचें मूलस्थानच पहावयास सांपडणार आहे हें पाहून मन जास्त उल्लसित होतें.

आम्ही कटगोडम येथें सायंकाळीं ७ वाजतां पोंचलों. इकडल्या भागाला आल्यावर आपल्याला दिवस किती तरी मोठा झाला आहे असें दिसून येतें. येथें हल्लींच्या दिवसांत पहांटेस ४॥ वाजल्यापासून संधि-प्रकाश पडतो व पांच साडेपांच वाजतां तर अगदीं फटफटीत उजाडतें. तसेंच सायंकाळीं सुमारें ८ वाजेपर्यंत संधिप्रकाश रहातो. कटगोड-हून नैनिताल २२ मैल आहे हें मागें सांगितलेंच आहे. टांगे व एक्के हे रात्रीचे प्रवास करीत नाहींत. म्हणून आह्माला रात्रभर कटगोडमच्या

धर्मशाळेंत रहावें लागलें. परंतु या प्रांताला धर्मशाळांची सोय फार चांगली असते. आधीं प्रत्येकाला स्वतंत्र खोली मिळूं शकते. यामुळें सामान ठेवून खोलीला कुलूप लावून बाहेर जातां येतें. तसेंच प्रत्येक धर्मशाळेला एक रखवालदार असतो. म्हणून धर्मशाळाहि स्वच्छ राहतात. तसेंच या प्रांतांत पुरी व भाजी हीं सर्व ठिकाणीं व बहुतेक सर्व स्टेशनांवर मिळतात व हे पदार्थ एकंदरींत चांगलेही असतात. अतएव इकडे प्रवास करणें सोईचें होतें. मात्र पुरी व भाजी या पदार्थांवर राहण्याची संवय पाहिजे.

कटगोडमहून आम्हीं घोड्याचा एक्का केला. टांग्याला इकडे फार पैसे पडतात. सबंध तीन माणसांच्या टांग्याला १२ रुपये पडतात, तर दोन माणसांच्या एक्याला फक्त ३॥ रुपये पडतात. एक्याचें वाहन इकडे फार स्वस्त दिसतें. हा एक्का फारच हलका असतो व त्याला पूर्वींच्या रथासारखे चार बारीक खांब व त्यावर एक घुमट असतो व पाहिजे तर बाजूनें पडदे टाकतां येतात. हे एक्के एका तासांत पांच सहा मैल जाऊं शकतात. कटगोडमपासून बीरभट्टी ( ब्रुअरीपर्यंत ) टांगे व एक्के जातात. ही बीरभट्टी कटगोडमपासून तेरा मैल आहे. पुढें सामानाच्या गाड्या जाण्यासारखा ९ मैलांचा रस्ता आहे. परंतु त्यानें माणसें जात नाहींत. माणसें जवळच्या रस्त्यानें पायीं, घोड्यावर किंवा डांडीनें जातात. बीरभट्टीपासून नैनिताल या पायवाटेनें सुमारें तीन मैल आहे. दांडी हें एक इकडील विशेष प्रकारचें माणसांनीं नेण्याचें वाहन आहे. मुंबईच्या बाजूला ज्याप्रमाणें सिंहगडास किंवा माथेरानला जावयाला खुर्च्या असतात त्याप्रमाणें या दांड्या असतात. परंतु त्यापेक्षां या बसावयास सोईच्या असतात, व त्यायोगें माणसांनाही उचलून नेण्यास फार सुलभ जातें. या दांडीचें भाडें, दांडी उचलणारांची मजुरी व म्युनिसिपल टॅक्स मिळून दर माणशीं २॥ रुपये पडतात. आम्ही कटगोडमहून साडेपांच वाजतां निघालों ते बीरभट्टीला ८॥ वाजतां आलों. तेथून पायींच वर गेलों. वर जाण्यास सुमारें १॥ तास लागतो. नैनितालास नैनिहाटेल आणि


रेसहाटेल या नांवाचीं हिंदूंकरितां दोन हाटेलें आहेत. येथें फक्त उतरण्यास जागा मिळते. जेवण्याखाण्याची व्यवस्था स्वतः स्वयंपाक करून किंवा बाजारांतील पुऱ्या व भाजी आणून करावी लागते. येथें दूधही चांगलें मिळतें. प्रत्येक खोलीस आठ आण्यांपासून दीड दोन रुपयेपर्यंत रोजचें भाडें पडतें.

**नैनिताल** व इतर थंड हवेचीं ठिकाणें यांमध्यें पुष्कळ बाबतींत फरक आहे. आपल्याइकडील महाबळेश्वर घ्या, माथेरान घ्या किंवा तिकडील मसुरी घ्या किंवा सिमला घ्या, हीं ठिकाणें फक्त उन्हाळ्यांत गजबजलेलीं असावयाचीं. पावसाळ्यांत किंवा हिंवाळ्यांत तीं बहुतेक शुकच असतात, कारण तीं वास्तविक खेडींच असतात. नेहमींच्या राज्यव्यवस्थेचा महत्त्वाचा कार्यभाग तेथें घडत नसतो. परंतु नैनितालची गोष्ट तशी नाहीं. नैनिताल हें नैनिताल जिल्ह्याचें मुख्य ठिकाण आहे व शिवाय संयुक्त प्रांताच्या सरकारचें उन्हाळ्यांतील थंड वसतिस्थानही आहे. यामुळें येथें बाराही महिने वस्ती असते. जिल्ह्याच्या पोलिसचें तें मुख्य ठाणें आहे. तसेंच येथें गुरख्या शिपायांची एक, इतर हिंदी शिपायांची एक व युरोपियन शिपायांची एक अशा तीन पलटणी कायमच्या रहतात. आणखी येथें फॉरेस्टच्या डिव्हिजनचें कायमचेंच ऑफिस असतें. यामुळें नैनिताल हें एका लहानशा जिल्ह्याच्या शहराप्रमाणें दिसतें व वस्तीही शहराप्रमाणेंच बसलेली आहे.

इतर थंड हवेचीं ठिकाणें व नैनिताल यांमधील दुसरा फरक म्हणजे त्याची रचना. मुंबईकडील दोन्ही थंड हवेचीं ठिकाणें हीं पर्वताच्या पठारावर वसलेलीं आहेत. आपण वाईकडून महाबळेश्वराकडे चढूं लागलों म्हणजे पर्वताच्या राजीच्या राजी चढून आपण अगदीं वर वर जातों व महाबळेश्वर अगदीं वर चढून जाईपर्यंत मुळींच दिसत नाहीं. माथेरानचीही तीच स्थिति आहे. एकाद्या माणसाला डोळे बांधून किंवा पूर्वींच्या कादंबऱ्यांत वर्णन केल्याप्रमाणें नकळत एकदम महाबळेश्वरीं मालकम पेठेंत नेऊन उभें केलें तर आपण एखाद्या सपाट प्रदेशावर आहों

असें त्याला वाटेल. त्याच्या सभोंवार त्याला तांबड्या मातीची सपाट जमीनच जमीन दृष्टीस पडेल, व आपण सह्याद्रिपर्वताच्या एका प्रचंड टेकाडाच्या माथ्यावर आहों अशी शंकासुद्धां त्याला येणार नाहीं. परंतु त्या मनुष्याला मालकम पेठेपासून दूर असलेल्या एखाद्या पाईंटाच्या टोंकाशीं आणिलें म्हणजे त्याला सह्याद्रिपर्वताची शोभा व आपण उभें असलेल्या पर्वतराजीची उंची व भव्यता दृष्टिगोचर होईल. परंतु नैनितालची तशी गोष्ट नाहीं. नैनिताल हें शहर दोन टेकड्यांच्या उतारावर वसलेलें आहे यामुळें नैनितालच्या कोणत्याहि ठिकाणीं उभें राहिलें तरी तेथून सर्व पर्वताची व शहराची शोभा दिसल्यावांचून रहात नाहीं. या वसतिस्थानाला म्हणण्यासारखी सपाट जागा मुळींच नाहीं. येथें घरें व बंगले हे एकाच्या डोकीवर दुसरा अशा तऱ्हेनें बांधलेले आहेत. यामुळें शहरांत या बंगल्यावरून त्या बंगल्यावर जाण्याचें वाहन म्हणजे दांडी हेंच होय. तेथें एकहि गाडी किंवा बायसिकल दृष्टीस पडावयाची नाहीं व येथें सपाट रस्तेही नाहींत.

नैनितालच्या रचनेचा तिसरा विशेष म्हणजे येथील तलाव किंवा सरोवर हें होय. या तलावावरूनच या ठिकाणाला हें नांव मिळालेलें आहे. नैनादेवीचा तलाव हा नैनिताल या शब्दाचा अर्थ आहे. हा तलाव पूर्वपश्चिम जाणाऱ्या दोन समांतर टेकड्यांच्या मिलाफानें झालेला आहे. या दोन टेकड्या पश्चिमेस अगदीं एकमेकांना भिडलेल्या आहेत व पूर्व बाजूला त्या दोन रांगा सारख्या कटगोडमपर्यंत गेल्या आहेत असें म्हटलें तरी चालेल व या दोन दरींमधूनच तलावांतील फाजील पाणी वाहत जाऊन त्याची **बलिया** नदी बनून ती कटगोडमच्या किंचित् वर **गोला** नदीला मिळालेली आहे. नैनितालची सर्व वस्ती या तलावासभोंवार टेकड्यांच्या उतारावर दक्षिणोत्तर आहे व पश्चिमेकडच्या टोंकाला बडा बझार, युरोपियन लोकांची वस्ति, त्यांची दुकानें व त्यांच्या खेळण्याच्या जागा आहेत. खेळण्याची जागा तर तलावाचा थोडासा भाग बुजवून कृत्रिम तऱ्हेनें बनविलेली आहे. नैना-



नं. २ ]    नैनीताल : तलावाचा देखावा.    [ पान १०



नं. ३ ] ग्वाल्हेर : हत्तीदरवाजा [ पान ३६



नं. १ ] नैनीताल : नैनादेवीचें देवालय. [ पान ८

देवींचें लहानसें देऊळ तलावाच्या याच कांठावर आहे. पूर्वेच्या बाजूला हिंदु लोकांची वस्ति व बाजार आहे. याच टोंकाला गंधकाचा पाचक पाण्याचा एक चांगला स्वच्छ झरा आहे. या झऱ्याचें पाणी फार गार आहे. बहुधा गंधकाच्या पाण्याचे झरे हे ऊष्ण पाण्याचे झरे असून त्यांना उन्हाळीं म्हणतात. परंतु हा अत्यंत गार पाण्याचा असून हें पाणी पिण्यास फार चांगलें लागतें. पहिल्यांदाच पिणाराला थोडा गंधकाचा वास येतो; परंतु एकदोन दिवसांच्या संवईनें सुद्धां तो वास भासत नाहींसा होतो.

नैनितालच्या तलावाचा पृष्ठभाग समुद्रसपाटीपासून ६३५० फूट आहे व सभोंवारच्या टेंकड्यांची सरासरी उंची १००० फूट आहे. यावरून येथले बंगले ६५०० पासून ७००० फूट उंचीवर आहेत असें दिसून येईल. तलाव लंबवर्तुळाकार आहे. परंतु तलावाच्या मधोमध एका टेंकडीचा भाग जरा पुढें आला आहे व या ठिकाणीं तलावाची रुंदी बरीच कमी आहे. यामुळें या तलावाला कांहींसा दोन डोळ्यांचा किंवा त्यावर घालण्याच्या आरशीचा आकार आला आहे असें म्हणणें शोभेल. या तलावाची सर्वांत जास्त लांबी १५६७ यार्ड आहे व सर्वांत जास्त रुंदी ५०६ यार्ड आहे. या तलावाचा परिघ दोन मैल आहे व यानें व्यापिलेली जागा १२० एकर आहे. सर्व तलावासभोंवतीं एक सुंदर रस्ता आहे. दक्षिणेच्या बाजूला टेकडी अगदीं तलावाला लागलेली आहे व रस्ता टेकडीचीं टोंकें फोडून करावा लागलेला आहे. उत्तरेच्या बाजूला टेकडी किंचित् कमी भिडलेली आहे व यामुळें या बाजूनें एकाखालीं एक असे दोन समांतर रस्ते नेलेले आहेत. या तलावाची सर्वांत जास्त खोली ९३ फुटांची आहे तर सर्वांत उथळ भागीं २० फूट पाणी आहे. तलावामध्येंसुद्धां एक गंधकाच्या पाण्याचा झरा आहे. या तलावाला पाण्याचा पुरवठा करणारा मोठा पाट पश्चिमेला आहे. परंतु दोन्ही समांतर टेकड्यांचें सर्व पाणी लहान लहान पाटांनीं याच तलावांत सोडण्याची व्यवस्था केली आहे.

खरोखरीं हा तलाव म्हणजे या ठिकाणचें एक अद्वितीय भूषण होय यांत शंका नाहीं. या तलावाच्या सभोंवतीं हिंडलें म्हणजे सर्व शहराची निरनिराळ्या ठिकाणांहून निरनिराळी शोभा दिसते. लोकांचा सहल करण्याचा हाच एक रस्ता होय. यामुळें संध्याकाळीं या रस्त्यानें बरीच गर्दी दिसते व त्या वेळचा देखावा फारच प्रेक्षणीय असतो. बाकी शहरांत कोठेंहि चार पावलेंसुद्धां सपाट रस्ता नाहीं. सारखी चढउतर आहे.

या सुंदर तलावाचा व्यायामप्रिय युरोपियन लोकांनीं व्यायामाकडेही उपयोग करून घ्यावा हें उचितच आहे. येथें पुष्कळ बोटक्लब आहेत. एक खुद्द लेफ्टेनंट गव्हर्नरचें बोटहौस आहे. दोन युरोपियन लोकांचे बोट क्लब आहेत. शिवाय यंग मेन्स क्रिश्चन असोसिएशनचाही एक बोटक्लब आहे. युरोपियन ऑफिसरांच्याही सहल करावयाच्या व व्यायामाच्या होड्या आहेत. रामपूरच्या नबाबाचें एक बोट-हौस आहे. सकाळीं व सायंकाळीं बोटी वल्हवीत जातांना पुष्कळ लोक दृष्टीस पडतात. या तलावांत संध्याकाळीं मासेमारी करण्यामध्येंही पुष्कळ लोक गुंतलेले दिसतात. शिडें लावून वाऱ्याच्या जोरानें चालणाऱ्या बोटीही पुष्कळ असतात. अशी व्यायामाची व सहल करावयाची सोय थोड्याच ठिकाणीं असते व त्यांतल्या त्यांत उंच थंड ठिकाणीं तर बहुतेक अशक्यच आहे. आपल्या इकडे मुंबईस व डेक्कन कॉलेजांतच फक्त बोटींच्या व्यायामाची सोय आहे. ज्यांना त्या व्यायामाची मौज व आनंद ठाऊक असेल त्यांना नैनितालच्या या विशेषाचें महत्त्व कळून येईल. माझें शिक्षण चार वर्षें डेक्कन कॉलेजांत झाल्यामुळें व त्या सर्व काळांत दररोज बोटीचा व्यायाम घेण्याचा मला सराव असल्यामुळें या ठिकाणची ही व्यवस्था पाहून मनाला फारच आनंद झाला व या सरोवरांत बोटींत बसून सहल करण्यास सांपडेल तर काय बहार होईल असें वाटलें. परंतु येथले सर्व क्लब सभासदांकरितां असून बोटी भाड्यानें मिळण्याची येथें मुळींच सोय नाहीं, असें समजलें. यामुळें बोटींत बसून वल्हविण्याची प्रबल इच्छा मनांतल्या मनांत दाबावी लागली.

वरील वर्णनांवरून नैनितालच्या रचनेची साधारण कल्पना वाचकांस येईल. हें ठिकाण वस्तीनें वाढणें शक्य नाहीं. कारण, आणखी घरें किंवा बंगले बांधावयास येथें सोय नाहीं. एकंदर ठिकाण स्वाभाविक चतुःसीमांनीं मर्यादित झालेलें आहे. तसेंच येथें दूर दूर जाऊन सृष्टिसौंदर्य पहाण्यासारखे पाइंट्सही ह्मणण्यासारखे नाहींत. कारण, वर लिहिल्याप्रमाणें शहराची रचना या ठिकाणचें सर्व सौंदर्य एकदम दृग्गोचर करणारी अशीच आहे. तरीपण येथील कांहीं थोड्या प्रेक्षणीय स्थळांची माहिती देणें आवश्यक आहे.

हें ठिकाण पूर्वपश्चिम जाणाऱ्या समांतर अशा दोन टेकड्यांच्या रांगांनीं झालेलें आहे. टेकड्यांपैकीं दक्षिणेकडील टेकडीवरून हल्लीं कटगोडमपासूनचा रस्ता आहे. हा रस्ता पूर्वीं उत्तरेकडील टेकडीवरून होता. उत्तरेकडील टेकडीकडून हल्लीं **आलमोऱ्याला** जाण्याचा रस्ता आहे व या रस्त्यानें जरा पुढें गेलें म्हणजे कटगोडमपर्यंतची अवर्णनीय शोभा दिसते. डोंगरांच्या सारख्या रांगा अगदीं सपाटीपर्यंत गेलेल्या दिसतात व त्यांवरून आपण किती उंच ठिकाणावर उभे आहों याची चांगली कल्पना येते. नागमोडीसारखा वांकणें वांकणें घेऊन गेलेला शुभ्र रस्ताही फार रमणीय दिसतो.

येथील दुसरी प्रेक्षणीय गोष्ट म्हणजे **शिपाईधारा** ही होय. हा एक उत्तम पाण्याचा झरा आहे. तो दक्षिणेकडील टेकडीच्या टोंकाला बैलगाडीच्या रस्त्यावर शहरापासून थोड्याच अंतरावर आहे. या ठिकाणीं मनुष्य गेला म्हणजे त्याला कल्पनातीत आनंद होतो. या झऱ्याच्या पाण्याच्या मुसळधारा सारख्या वाहतांना दृष्टीस पडतात. पाणी स्फटिकाप्रमाणें स्वच्छ व निर्मळ आहे व तें इतकें थंड आहे, कीं, आपण बर्फाचेंच पाणी पितों आहों कीं काय, असा भास होतो. पाणी मधुरही फार आहे. हें पाणी बारा महिने तेरा काळ सारखें वहात असतें. हें पाणीच या ठिकाणच्या सर्व पाण्यांत उत्तम होय. पुष्कळ लोक प्यावयास हेंच पाणी वापरतात. या झऱ्याचें पाणी खालीं सर्व रस्त्यांच्या बाजूनें

खेळविलेलें आहे व यामुळें घाटाच्या सर्व रस्त्यावर फारच कमी खर्चानें पाणी शिंपडतां येतें. बीरभट्टीपासून दीड मैल चढत आल्यावर या मोठ्या वाहत्या झऱ्याचें प्रथम दर्शन होतें. येथें झाडी फार आहे व येथें एक संगमरवरी गायमुख बांधलें आहे. बीरभट्टीहून चढून दमून मनुष्य वर येत असतांनाच या झऱ्याचें एकदम त्याला दर्शन घडतें व गायमुखांतलें तें अमृततुल्य पाणी पिऊन मनुष्याचा सर्व थकवा नाहींसा होऊन त्याला वर चढण्यास जास्त उमेद व हुशारी वाटते व नैनितालच्या सौंदर्याची व सुखदायकत्वाची चांगली कल्पना येते.

परंतु नैनितालमधील सर्वांत अत्यंत प्रेक्षणीय स्थळ म्हटलें म्हणजे **चायनापीक** हें होय. हें नैनितालच्या उत्तरेस आहे व त्याची उंची समुद्रसपाटीपासून ८५६८ फूट आहे. म्हणजे नुसत्या तलावाच्या सपाटीपासूनच तें २२ शें फुटांच्या वर आहे. आजूबाजूच्या सर्व डोंगरांत हेंच सर्वांत उंच ठिकाण होय. येथें जाऊन परत येण्यास सुमारें पांच तास लागतात. दांडीवाले जाण्यायेण्याचे अडीच रुपये घेतात. या टोंकावर सकाळचें जाणें सोईचें असें आम्हाला कळलें होतें. म्हणून आम्हीं एका सकाळीं जाण्याचा विचार केला होता. परंतु आदल्या दिवशीं सायंकाळीं फार मोठें वादळ झालें. मृच्छकटिक नाटकांत वर्णन केल्याप्रमाणें '**जलधरसंघें नभ भरलें तें !**' अशी आकाशाची स्थिति झाली. विजाही लवूं लागल्या. यामुळें आमचा चायनापीकवर जाण्याचा बेत रहित करावा लागतो कीं काय अशी भीति पडली. परंतु सुदैवानें कांहीं तासांनीं आकाश निरभ्र झालें व ठरल्या बेताप्रमाणें आम्हांला पहाटेस चायनापीकला जाण्यास सांपडलें.

चायनापीकला जाण्याचा रस्ता तलावाच्या पूर्वेकडील टोंकापासूनच निघतो व तो सारखा चढत चढत जातो व जसजसें आपण वरवर जावें तसतसा त्याच तलावाचा व शहराचा देखावा '**नवोनवोऽयमक्ष्णोः**' याप्रमाणें प्रत्येक उंचीच्या रस्त्यावरून निरनिराळा दिसतो. चायनापी-

पीकचा रस्ता जुन्या गव्हर्मेंट हौसच्या बाजूनें जातो व पुढें अलाहाबादचे ऑनरेबल मुनशी माधवलाल यांचा बंगला लागतो. हा बंगला बहुतेक नैनितालमध्यें सर्वांत उंच जागीं आहे. बंगला छोटासा असून टुमदार आहे. चायनापीकचा रस्ता थेट या बंगल्यावरून जातो व येथें तो टेकडीच्या मागें वळल्यामुळें नैनिताल दिसेनासें होतें. येथपासून चढ बराच कठीण व बिकट आहे. कांहीं ठिकाणीं रस्ता सरासरी दोन मनुष्यें जाण्याइतकाच आहे. एका बाजूला उंच सुळक्यासारखें टेकाड, तर दुसऱ्या बाजूला भयंकर खोल दरी, असाच बहुतेक हा मार्ग आहे. यामुळें चालतांनासुद्धां मनुष्याला पडण्याची भीति वाटते. इकडे रानही फार दाट आहे व वृक्ष खरोखरीच गगनचुंबी आहेत कीं काय असें वाटतें. या ठिकाणीं इंग्लंडच्या थंड प्रदेशांत होणारे सायप्रस वृक्ष पुष्कळ आहेत. आम्हीं नैनितालहून निघाल्यापासून बरोबर दीड तासानें चायनापीकवर आलों. वर जाऊन पोहोंचतों तों विलक्षण थंडी वाजूं लागली. वाराहि फार सुटला होता. तास दीड तासाच्या पूर्वींच्या हवेंतील व येथें येतांच लागणाऱ्या हवेंतील फरक आश्चर्यजनक होता. पुण्यांत गुदस्तसालीं ज्या दिवशीं बर्फ पडलें होतें त्या दिवशीं जितकी थंडी वाजली तितकी थंडी वर वाजूं लागली. अगदीं हुडहुडी भरल्यासारखी झाली. आवाज कांपरा कांपरा येऊं लागला म्हणून तेथें वाळलेल्या पानांची शेकोटी करण्याचा प्रयत्न केला परंतु पानांवर दंव पडलेलें असल्यामुळें पानें लवकर पेट घेईनात व शिवाय येथें विस्तव पेटविण्याची मनाई आहे असें दांडीवाल्याकडून कळल्यामुळें शेकोटी करण्याचा प्रयत्न आम्हीं सोडून दिला. इतक्यांत सूर्यनारायणही क्षितिजाच्या बराच वर आला व वाराही कमी झाला. यामुळें थंडी कमी झाली व आमचें लक्ष येथील सृष्टिसौंदर्याकडे वेधूं लागलें. आम्हीं गेलेल्या दिवशीं धुकें फारच पसरलेलें होतें व म्हणून आमच्या सभोंवतीं सर्व समुद्र असून आम्हीं एखाद्या लहानशा बेटावर उभे आहों कीं काय असा भास होत होता. परंतु सूर्यकिरणांनीं धुकें वितळूं लागलें; आम्ही फारच उंचावर उभे असल्यामुळें

धुकें व ढग आमच्याखालीं आहेत असे दिसत व धुक्याचे लोटचे लोट दरींतून बाहेर पडतांना अवर्णनीय शोभा दिसे. चायनापीक हें एक अगदीं अरुंद पण थोडें लांबट असें पर्वताचें टोंक आहे व तें दक्षिणोत्तर आहे. आम्हीं प्रथमतः दक्षिणेच्या टोकाला आलों व तेथून नैनितालची सर्व शोभा दिसते. परंतु वर लिहिल्याप्रमाणें धुक्याचे सारखे लोटच्या लोट वर येत असल्यामुळें क्षणार्धांत सर्व नैनिताल स्पष्ट दिसत असे तर पुन्हां क्षणार्धांत तें अदृश्य होऊन जाई. जणूं कांहीं एकादा जादूगार आपल्या भारलेल्या कांडीनें तें शहर गुप्त करीत आहे व पुन्हां ते प्रगट करीत आहे! आम्हीं या चायनापीकवर पुरे दोन तास घालविले. त्या दिवशीं सर्वत्र धुकें फार पसरलेलें असल्यामुळें सभोंवारचा प्रदेश जितका स्पष्टपणें दिसावयास पाहिजे तितका दिसला नाहीं. तरीपण येथून आलमोरा, राणीखेट, भीमतलाव वगैरे उत्तरेकडील ठिकाणें किंचित् दृग्गोचर झालीं व प्रत्यक्ष हिमालयाचा बर्फाच्छादित भागहि एक दोनदां स्पष्टपणें दिसला. या टेकाडावर उभें राहिलें म्हणजे चारी बाजूला पहाडचे पहाड व पर्वतांच्या राजीच्या राजी यांखेरीज कांहींही दृष्टीस पडत नाहीं. येथून प्रत्यक्ष हिमालयाच्या प्रचंड-तेची, त्याच्या भव्यतेची व त्यावरील सृष्टिसौंदर्याची बरीच चांगली कल्पना मनांत येते व विश्वकर्त्या परमेश्वराच्या अगाध सामर्थ्याचें स्मरण झाल्याखेरीज रहात नाहीं. एकीकडे दृष्टि फेंकावी तों स्फटिका-सारख्या शुभ्र बर्फमय हिमालयाची रांगच्या रांग दृग्गोचर होते, तर दुसरी-कडे हिरव्या हिरव्या गर्द झाडींनें आच्छादित पर्वत दृष्टीस पडतात. एकी-कडे भयंकर खोल अशी दरी दिसते तर दुसरीकडे उघडा बोडका एकच सुळका नजरेस येतो. एकीकडे पहाडापहाडामधून नागमोडीप्रमाणें जाणारी नदी नजरेस येते, तर दुसरीकडे अगदीं दूर सपाट मैदान दृग्गोचर होतें. या ठिकाणावरून दृष्टीस पडणारा देखावा खरोखरींच अद्वितीय आहे. कारण येथून निकटच्या हिमालयाची नैसर्गिक शोभा व शेजारच्या शहराची कृत्रिम शोभा या दोन्ही एकसमयावच्छेदेंकरून दृग्गोचर होतात. "बाह्य

सृष्टींतील तारकायुक्त आकाश व मनःसृष्टींतील सदसद्विवेकबुद्धि यांनीं माझें मन सदोदित आनंदित होऊन जातें." प्रसिद्ध जर्मन तत्त्ववेत्ता कँट याच्या वरील उद्गारांतील भावनेसारखी भावना येथल्या देखाव्यानें मनांत उद्भवते. येथील अलौकिक सृष्टिशोभा पाहून ईश्वराचें अचाट कर्तृत्व मनांत येऊन त्याच्याबद्दल आदर व पूज्यबुद्धि उत्पन्न होते, तोंच मनुष्याच्या कर्तृत्वाबद्दलहि कौतुक वाटतें. कोठें पुणें अगर मुंबई, व कोठें बर्फाच्छादित हिमालय ! परंतु हा बर्फाच्छादित हिमालय मुंबईहून दोन-अडीच दिवसांच्या प्रवासानें प्रत्यक्ष दृग्गोचर होतो हें पाहून मनुष्याच्या कर्तृत्वाबद्दल साभिमान आश्चर्य वाटतें. या पीकवरून नैनिताल पाहिलें म्हणजेही असाच विचार मनांत येतो. ज्या ठिकाणीं थोड्या काळापूर्वी किर्र रान होतें, जें ठिकाण व्याघ्रादि हिंस्र पशूंचें वसतिस्थान होतें, जेथें मनुष्यें दिवसासुद्धां यायला भीत होतीं, जेथें एक झोंपडीही नव्हती, अशा निर्जन ठिकाणीं एक मनुष्यांनीं गजबजलेलें शहर दृष्टीस पडलें म्हणजे मनुष्याच्या कृतीचें कौतुक वाटल्याखेरीज रहात नाहीं व ज्या राज्यपद्धतीमुळें, ज्या सुधारणेमुळें व ज्या शास्त्रीय ज्ञानामुळें हें सर्व शक्य झालें त्या राज्यव्यवस्थेबद्दल, त्या सुधारणेबद्दल व त्या ज्ञानसामर्थ्याबद्दल निःपक्षपाती माणसाच्या मनांत अभिमान जागृत होतो. अशा प्रकारचे विचार मनांत येत असतांना आम्ही मोठ्या कष्टानें उशीर झाला म्हणून चायनापीक उतरूं लागलों व सुमारें एका तासानें आमच्या ठाण्याला आलों.

नैनिताल हा जिल्हा कोमान डिव्हिजनमधील आहे. पुष्कळ काळपर्यंत हा प्रांत हिंदु राजांकडे होता. कांहीं काळ तो रोहिले लोकांच्या ताब्यांत होता व १७९१ पासून १८१५ पर्यंत नेपाळी लोकांच्या ताब्यांत होता. १८१५ च्या नेपाळी लढाईनंतर हा प्रांत इंग्रजांच्या ताब्यांत आला. पूर्वी आलमोरा व नैनिताल मिळून एकच जिल्हा होता. परंतु १८९१ पासून हा स्वतंत्र जिल्हा केला गेला व तेव्हांपासूनच या शहराला जास्त महत्त्व आलें.

नैनिताल हा तलाव फार प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे असें दिसतें. स्कंदपुराणांत याला त्रिरिखि सरोवर अथवा त्रिसेश्वर असें नांव दिलेलें आहे. याचा अर्थ तीन ऋषींचा तलाव असा आहे. दंतकथा अशी आहे, कीं, अत्रि, पुलस्त्य व पुलह हे तीन ऋषि यात्रेस जात असतां चायना टेकडीवर आले व तेथें पाणी मुळींच नाहीं असें त्यांना आढळून आलें. म्हणून त्यांनीं तेथें मोठा खाडा खणला व तो. लागलाच पाण्यानें भरून गेला व तेव्हांपासून त्या तलावाला त्रिरिखि सरोवर हें नांव मिळालें. नैनिताल हें सध्याचें नांव नैना नांवाच्या या तळ्याच्या कांठावर असलेल्या देवीच्या देवळावरून मिळालेलें आहे. हें देऊळ १८८० च्या धरकोसळी मध्यें ( Landslip ) नाहींसें झालें. हल्लीं तळ्याच्या कांठावर असलेलें देऊळ नवीन बांधलेलें आहे. १८३९ पर्यंत नैनिताल हें ठिकाण दाट झाडीनें आच्छादिलें असून हिंस्र पशूंचें निवासस्थान असे. शेजारच्या खेड्यापाड्यांतील धनगर व शेतकरी उन्हाळ्यांत व पावसाळ्यांत आपलीं गुरेढोरें चारण्याकरितां येथें येत असत. परंतु या ठिकाणाबद्दल या खेडवळांच्या मनांत फार भीति असे. कारण, हें ठिकाण भुताखेतांचें ठिकाण आहे अशी समजूत होती. यामुळें शेतकरी एका ठरलेल्या दिवशीं त्या ठिकाणीं आपल्या कळपासकट जमत. कारण, एकट्याला तेथें जाण्याची छाती नसे. मध्यें आपली झोंपडी व सभोंवर गुरांचा गोठा अशा तऱ्हेनें हे रहात. तरी सुद्धां पुष्कळ गुरें व केव्हां केव्हां माणसेंहि व्याघ्रमुखीं पडत असत. तेथें आल्यावर शेतकरी पहिल्या प्रथम नैना देवीला संतुष्ट करीत असत. वर्षांतून पर्वणीच्या दिवशीं या तलावांत लोक स्नानास येत. परंतु यापलीकडे या ठिकाणची मुळींच माहिती नव्हती. १८३९ च्या मार्च महिन्यांत आपले मेहुणे बॅरन यांच्याबरोबर मिस्टर बॅटन नांवाचे साहेब हल्दवानी येथें शिकार करीत होते. ते वाटाड्यांना घेऊन भीमतालला गेले व तेथून नैनितालला आले व रामनगरच्या बाजूनें परत आले. १८४१ मध्यें नैनिताल या तलावाच्या शोधाबद्दल व त्याच्या सौंदर्याबद्दल व त्याच्या भावी वसतिस्थानक्षमतेबद्दल वर्तमा

पत्रांत एक पत्र प्रसिद्ध झालें. त्या म्हणण्याची पुष्टी मिस्टर बॅरन यांनीं केली. लगेच बारा बंगल्यांबद्दल कॉन्ट्रॅक्टरला कंत्राट दिलें गेलें. १८४२ मध्यें लोकांना वार्षिक कर घेऊन जमिनीवर घरें बांधण्यासंबंधाचे सर्कारी नियम प्रसिद्ध झाले. कमिशनरनें एक बंगला आपल्याकरितां बांधला. बाजार व इतर सार्वजनिक इमारती यांची जागा आंखण्यांत आली. बंगल्यांचें काम पुरें होतांच त्यांत लोक राहूं लागले. पहिले पहिले बंगले तलावाच्या पूर्व बाजूस बांधले गेले. १८४९ पर्यंत हल्लींच्या बड्या बाजाराच्या ठिकाणीं अजून जंगलच होतें. या तलावांत पहिली होडी मिस्टर बॅरन यांनीं वल्हविली. १८४६ मध्यें १५ हजार रुपये वर्गणी करून युरोपियन रहिवाशांनीं पहिलें ख्रिस्ति देऊळ बांधलें व त्याचें ' जंगलांतील सेंटज़ॉन ' असें अन्वर्थक नांव ठेविलें. १८५७ सालच्या बंडाच्या वर्षीं नैनितालची थंड हवेचें ठिकाण म्हणून ख्याति झाली होती व त्या धामधुमींत बरेली व त्याच्या आसपासचे भाग येथील पुष्कळ लोक आश्रयाकरितां नैनितालाला जाऊन राहिले होते. नंतर लौकरच नैनिताल हें संयुक्त प्रांताच्या सरकारचें उन्हाळ्यांतील विश्रांतिस्थान बनलें. १८६५ मध्यें त्या वेळच्या लेफ्टेनंट गव्हरनरनें आपल्याकरितां उत्तरेच्या टेकडीच्या पूर्वटोंकाला एक बंगला बांधविला. पण पेन्शन घेतल्यावर तो बंगला त्यानें एका मनुष्यास विकला व तेव्हांपासून पुढें झालेले लेफ्टेनंट गव्हरनर हे तो बंगला दरवर्षास ३६०० रुपये भाड्यानें घेत असत. १८९५ पर्यंत लेफ्टेनंट गव्हरनरचें राहण्याचें ठिकाण याच टेकडीवर होतें. परंतु १८८० च्या धरकोसळीनंतर ही टेकडी धोक्याची आहे असें ठरलें म्हणून सरकारनें समोरच्या टेकडीवर मोठी जागा घेतली व तेथें हल्लींचा भव्य व सुंदर राजवाडा बांधला. हा वाडा १९०० मध्यें पुरा झाला. या सर्व काळांत नैनितालची सारखी भरभराट होत होती व जिकडे तिकडे वस्ति वाढत होती. यामुळें शाळा, दुकानें, खाणावळी, घरें, बंगले सारखे वाढत चालले. प्रथमतः या ठिकाणाला येण्यास चांगले रस्ते नसून मुरादाबादेवरूनच्या लांबच्या रस्त्यानें यावें

लागे. परंतु पुढें बरेलीहून एक सरळ रस्ता झाला. १८८२ मध्यें कटगोडमपर्यंत रेलवे झाली. तेव्हांपासून तर हें ठिकाण जास्त महत्त्वाचें झालें व त्याला शहराचें स्वरूप आलें. मागें सांगितलेंच आहे कीं, १८९१ मध्यें हें जिल्ह्याचें ठिकाण बनलें. तेव्हां तेथील वस्ति हंगामी न राहतां कायमचीच झाली. या शहराची वस्ति कमजास्त होणारी आहे. परंतु येथें कायमची वस्ति १० हजारां जवळ जवळ आहे व उन्हाळ्यांत तर ती [illegible] हजारपर्यंत वाढते

नैनितालबद्दलची सांगण्यासारखी सर्व हकीकत आतां सांगून झालीच. परंतु इकडील पर्वताच्या भूगर्भविषयक स्थितीचा व त्यापासून घडलेल्या अनर्थाचा उल्लेख केल्यावांचून हें वर्णन अपुरें राहील म्हणून तेवढें देणें [illegible]

इकडील पर्वतांच्या टेकड्या या फार ढिसूळ अशा दगडाच्या झालेल्या आहेत. सह्याद्रि पर्वताचा कणखर काळाभोर खडक इकडे मुळींच नाहीं. येथला खडक पांढऱ्या रंगाचा मुरमासारखा भुसभुशीत आहे व कांहीं ठिकाणीं स्लेटीच्या दगडासारखा पत्र्यापत्र्याचा झालेला आहे व थराथरामधून माती आहे. या कारणानें येथें पावसाळ्यांत पाणी खडकांत मुरतें व असें पुष्कळ पाणी मुरलें म्हणजे कडेच्या कडे कोसळून पडतात. अशा प्रकारची कडेकोसळ अगर धरकोसळ या टेकड्यांवरून पुष्कळ वेळां झालेली आहे. १८६६ मध्यें एक मोठा कडा कोसळला होता. पुढें १८६९ मध्यें एक धरकोसळ जास्त मोठी झाली. परंतु सर्वांत भयंकर व हानिकर धरकोसळ १८८० मध्यें झाली. ही धरकोसळ प्रत्यक्ष पाहिलेल्या माणसानें तिचें खालीलप्रमाणें वर्णन केलें आहे.

" १६ सप्टेंबर गुरुवार १८८० या दिवशीं सारखा अहोरात्र मुसळधार पाऊस पडूं लागला. शुक्रवार व शनिवार या दोन दिवसांतच ३३ इंचांवर पाऊस पडला. पाणी जाण्याचे सर्व मार्ग बंद झाले. सर्व टेकडी पाण्यानें डुबडुबून गेली व पाणी टेकड्यांच्या भेगांतून शिरून

टेकडीच्या कांहीं भागाचा धर सुटला. शनिवारीं दुहां वाजतां पहिली धरकोसळ झाली व तिनें व्हिक्टोरिया हॉटेलचीं बाहेरचीं घरें व हॉटेलच्या पश्चिमेचा भाग ढांसळून खालीं आला. त्यानंतर यापेक्षां फारच मोठ्या भागाचा धर कोसळला व त्यायोगें सर्व हॉटेल, असेंब्ली रूम्स व इतर आणखी पुष्कळ घरें यांसकट सर्व टेकडी धाडकन् तलावांत येऊन कोसळली. या धरकोसळींत एकंदर १५१ मनुष्यें दगावलीं व कित्येक इमारती आजिबात नाहींशा झाल्या."

ही धरकोसळ झाल्यावर सरकारनें हजारों रुपये खर्च करून संरक्षक कामें बांधिलीं. जागोजाग पावसाचें पाणी टेकडींत न मुरतां खालीं निघून जाण्याकरितां मोऱ्या बांधल्या व कोसळलेल्या भागाचा फायदा घेऊन त्या ठिकाणीं खेळाची मोठी जागा तयार केली. या धरकोसळींत जुन्या नैनादेवीच्या देवालयालाही जलसमाधि मिळाली होती. हल्लींचें देवालय हें त्यानंतर बांधलेलें आहे. १८९८ सालीं पूर्वेकडील टेकड्यांची बीर-भट्टीच्या बाजूला धरकोसळ झाली व त्यानें जुना रस्ता बहुतेक वाहून गेला. म्हणून हल्लींचा रस्ता दक्षिण बाजूच्या टेकडीवरून नेलेला आहे. उत्तरेकडील टेकड्यांपेक्षां दक्षिणेकडील टेकड्या कमी धोक्याच्या आहेत असा तज्ज्ञांनीं अंदाज केलेला आहे. यामुळें हल्लीं लोकवस्ती व बंगले वगैरे दक्षिणेच्या बाजूला जास्त होत आहेत.

परंतु सरकारनें या थंड हवेच्या ठिकाणाच्या महत्त्वाच्या मानानें अतोनात पैसा खर्च करून या ठिकाणाला मानवी प्रयत्नानें जितकी सुरक्षितता आणणें शक्य आहे तितकी सुरक्षितता आणिली आहे व याचें निदर्शन कटगोडम स्टेशन सोडल्यापासून वाटोवाट दृष्टीस पडतें. जेथें तेथें बांधकाम केलेलें आहे. पावसाचें पाणी भरकन् निघून जाण्याच्या सोयी जागोजाग केल्या आहेत. सर्व रस्त्यांवर नेहमीं देखरेखीला माणसें ठेविलीं आहेत. तीं रस्ते साफ ठेवितात व रस्त्यावर पाणी शिंपडतात. यामुळें कटगोडमपासूनच आपण एखाद्या सुंदर शहराच्या रस्त्यावरून जात आहों असा भास होतो.

नैनितालच्या हवेबद्दल व पाण्याबद्दल फार प्रख्याति आहे. नैनितालच्या विशेष रचनेमुळें शहरांत व तळयाच्या बाजूनें फारसा वारा नसतो; परंतु एकंदर हवा फारच थंड आहे व त्या ठिकाणीं केव्हांहि उन्हाळा भासत नाहीं किंवा घाम सुटत नाहीं. सकाळीं किंवा सायंकाळीं तर चांगली थंडी वाजते. येथील पाणी फार पाचक आहे असें आमच्या चारपांच दिवसांच्या अनुभवावरून आम्हांला आढळून आलें. आम्हांला जास्त दिवस रहाण्यास सवड नव्हती यामुळें आम्हीं मोठ्या कष्टानें या सुंदर ठिकाणाची रजा घेऊन परत येतांना बरेलीहून मुरादाबादेस आलों.

# प्रकरण २ रें

## ग्वालेर

> " तुझ्या मधुर गानाच्या नादें वेडावुनि हा गेला
> पहा भूप दुष्यंत कसा हा हरिणें ओढुनि अणिला!"

आमच्या संगीत कविकुलगुरु किर्लोस्करांनीं वरील पद्यांत वर्णिलेल्या दुष्यंताच्या स्थितीप्रमाणे, माझी उत्तर हिंदुस्थानांतील प्रवासानें स्थिति करून टाकिली, हें कबूल केलें पाहिजे. मी या प्रांतांत प्रथमतः पंधरा वर्षी-पूर्वी आलों, पण येथील सृष्टिसौंदर्यानें, येथील प्रेक्षणीय स्थळांनीं, येथील हवापाण्यानें, इकडील शहरें व इमारती आणि इतर देखावे यांनीं मला इतकें वेडावून सोडिलें कीं पुढील अवघ्या दीड वर्षांत मी इकडे हा तिसऱ्यांदा आलों ! यंदा माझ्याबरोबर माझे बंधूही आल्यानें या प्रवासाच्या आनंदांत ज्यास्तच भर पडली. माझ्या पहिल्या प्रवासांत हा प्रदेश मला अगदीं अदृश्यपूर्व होता; व येथील सृष्टिकृत व मनुष्यकृत सौंदर्यांत माझें मन इतकें रमलें कीं, मला दुसऱ्या कशाचेंही भान राहिलें नाहीं, व '**ब्रह्मानंदीं लागली टाळी, कोण देहातें सांभाळी**' अशी माझी स्थिति झाली. दुसऱ्यांदा जेव्हां मी ह्या प्रांतीं आलों तेव्हां सृष्टिसौंदर्याचा शांतमनानें आस्वाद घेण्यास सवड सांपडली व माझी चित्तवृत्ति अगदींच बावरून गेली नाहीं. म्हणून आपण अनुभविलेल्या अपूर्व आनंदाचा थोडासा वांटा वाचकांस द्यावा अशी इच्छा होऊन मीं नैनितालची माहिती एका लेखांत त्यांना सादर केली, व आमच्या वाचकांस तो लेख आवडला असें समजल्यामुळें यंदा मला जास्त धीर आला, व या माझ्या तिसऱ्या प्रवासाचा वाचकांस थोड्या

विस्तृत प्रमाणावर परिचय करून देण्याचें मीं मनांत आणिलें व त्या मनोदयानुरूप पुढील वर्णनें देत आहें.

मी प्रथमतः उत्तर हिंदुस्थानांत आलों होतों तो पंजाबमेलनें आलों होतों. यंदाही त्याच गाडीनें येण्याचा माझा मानस होता; परंतु मे महिन्यापासून जी. आय्. पी. रेलवेच्या अधिकाऱ्यांनीं पंजाबमेलचा तिसरा क्लासच काढून टाकिला. ही त्यांनीं सुधारणा म्हणून केली असें म्हणतात, व युरोपीयन लोकांच्या दृष्टीनें कदाचित् ही सुधारणाही असेल; परंतु या सुधारणेनें अत्यंत जलद जाणाऱ्या व फार सोईच्या अशा एका गाडीला गरीब व मध्यम स्थितींतील लोक मुकले; इतकेंच नव्हे, तर उत्तर हिंदुस्थानांत प्रवास करण्यास आमच्यासारख्या लोकांना सोईची जलद जाणारी अशी एकच गाडी--दिल्ली एक्सप्रेस--राहिल्यामुळें ती गाडी प्रवाशांनीं चिकार भरूं लागली. आम्ही ज्या दिवशीं निघालों त्या दिवशीं ज्या डब्यांत १८ मनुष्यांच्या जागेची पाटी लावलेली होती तेथें त्याच्या दुपटीच्यावर माणसें कोंबून भरलीं होतीं! यामुळें या वेळीं आम्हांला जी. आय्. पी. रेलवेनें एस्. एम्. ( स्लो मोशन ) रेलवेचीच आठवण करून दिली! त्या रेलवेमध्यें जशीं मेंढरांप्रमाणें माणसें डब्यांत कोंबतात तशीच आज आमची स्थिति झाली. आधींच उन्हाळ्याचे दिवस; त्यांतल्या त्यांत तो दिवस तर अभ्राच्छादित होता आणि गाडींत अशी चिकार गर्दी! मग त्या त्रासाला व हालाला काय विचारतां! तरी तो प्रवास बराच काळपर्यंत दिवसाचाच होता व सभोंवतालची सृष्टिशोभा मधून मधून मन वेधीत होती; यामुळें गाडींतील त्रासाकडे व गर्दीकडे एकसारखें लक्ष लागून राहिलें नाहीं.

तरी पण आजच्या या त्रासामुळें मला या आगगाड्या होण्यापूर्वींच्या काळच्या प्रवासाची गोष्ट मनांत येऊन, त्या वेळचा प्रवास किती तरी त्रासाचा, हालाचा व धोक्याचा असला पाहिजे असें वाटलें. त्या मानानें आमचा हल्लींचा त्रास, हाल, धोका हीं कांहींच नसावींत! माझी एक

वा. नं

वृद्ध मावशी आगगाडी होण्यापूर्वीच्या कोठीं उत्तर हिंदुस्थानांतील यात्रा करून आलेली होती. ती आपल्या प्रवासाची हकीकत सांगे, त्याची मला आतां आठवण झाली. त्या वेळीं उत्तर हिंदुस्थानांत जाणाऱ्या यात्रेकरूंचें सदर स्टेशन पुणें हें होतें. येथें काशीचे गंगावळ व पंड्ये येत असत. प्रवास बैलगाडीनें होत असे. प्रत्येक गाडींत चार माणसें घेत. प्रत्येकाला खुंट म्हणत. प्रत्येक खुंटाचें भाडें पुण्याहून काशीपर्यंत २५ रुपये असे. दहावीस गाड्यांचा तांडा जमवून मग यात्रेस निघत असत. त्या वेळीं वाटेनें चोरांदरोडेखोरांची फार भीति असे. यामुळें हत्यारबंद शिपाईप्यादे जवळ असलेला एखादा इनामदार किंवा जहागिरदार अगर जमीनदार याची सोबत पाहून हा गाड्यांचा तांडा निघे व दरकूच दरमजल करीत प्रवास होई. रात्रीचा प्रवास बहुधा करीत नसत. सायंकाळीं कोठें तरी एखाद्या गांवांतल्या धर्मशाळेंत मुक्काम करावयाचा, पहांटेस निघून पुढें कूच करावयाचें व पुनः सायंकाळ झाली म्हणजे मुक्काम करावयाचा. दररोज पंचवीस तीस मैल प्रवास झाला म्हणजे फार प्रवास झाला! अशा तऱ्हेनें आमची मावशी काशीप्रयाग, मथुरावृंदावन, व द्वारका वगैरे तीर्थें करून एका वर्षानें परत आलेली होती. वाटेंत खाण्यापिण्याचे हाल होत, माणसें आजारी पडत, कांहीं तर मृत्युमुखीं पडत! कारण, निरनिराळ्या ठिकाणचें हवापाणी सर्वांना मानवत नसे. तो त्या काळचा प्रवास कोणीकडे आणि हल्लींचा वायुवेगाचा आगगाडीचा प्रवास कोणीकडे! ज्या प्रवासास त्या काळीं एक दिवस लागे तो प्रवास आतां आम्ही एका तासांत करूं शकतों व ज्या प्रवासास पूर्वीं एक एक महिना लागे तो प्रवास आतां एका दिवसांत करतां येतो. तेव्हां एका दृष्टीनें पूर्वींच्यापेक्षां आमचें आयुष्य वीसपटीनें वाढलें, असेंच नव्हे तर काय?

त्याप्रमाणेंच मराठी साम्राज्याच्या अभ्युदय काळांत व भरभराटीच्या काळांत मराठ्यांनीं ज्या उत्तरहिंदुस्थानांत वारंवार मोहिमा केल्या, त्या मोहिमांच्या मल्हारराव चिटणीस कृत शाहूमहाराजांची बखर, पेशव्यांची

बखर इत्यादि बखरींत आलेल्या हकीकतीच्या गोष्टी माझ्या मनांत उभ्या राहिल्या. त्या वेळच्या त्यांच्या बिकट, दीर्घकाली व त्रासाच्या प्रवासाच्या वर्णनाची स्मृति होऊन आम्हांला त्या काळच्या लोकांच्या हिंमतीचें, धैर्याचें व त्यांच्या कंटकपणाचें मोठें कौतुक वाटलें आणि आम्हांला, थोडी जास्त गर्दी व खेंचाखेंची झाल्यामुळें भासलेल्या त्रासाबद्दल, थोडीशी शरम वाटून उलट आगगाडीच्या सुखाच्या, जलदीच्या व सुरक्षिततेच्या प्रवासाच्या साधनाचें आम्ही अभिनंदन करूं लागलों व आमचा त्रास आम्ही पार विसरून गेलों. इतक्यांत, या काळांतही प्रवास सर्वस्वी सुरक्षित नाहीं व सुधारलेल्या प्रवाससाधनांतही मनुष्य-जीवितास धोका आहे, हें आमच्या दृष्टीसमोर हुबेहुब आणण्याकरितांच कीं काय आमच्या गाडीनें एक अपघात घडवून आणला ! आम्ही चारपांच तासांत कल्याणहून सर्व सह्याद्रि ओलांडून थळघाटानें गोदातटाकाजवळ आलों, याचें आम्ही मोठें कौतुक करीत होतों. आमची गाडी देवळाली स्टेशन सोडून मोठ्या वेगानें चालली होती, व आम्ही सभोंवारची सृष्टिशोभा पाहण्यांत गुंग झालों होतों. इतक्यांत एकाएकीं गाडी एकदम अगदीं सबूर झाली व आम्हांला एक मोठा थोरला धक्का बसला ! काय झालें म्हणून चवकशी करितां, गाडीखालीं एक मनुष्य सांपडला, असें समजलें. जो तो प्रवाशी खिडकींतून पाहूं लागला. आमची गाडी हळूहळू चालूं लागली व आमचा डबा तो मनुष्य निपचित पडला होता तेथें येतांच तो भयंकर देखावा आमच्या दृष्टीस पडला ! त्या मनुष्याच्या डोक्याची अर्धी कवचीच निघून गेली होती. डोक्यांतून सारखें रक्त वहात होतें. तो मनुष्य अजून जिवंत होता. त्याला ब्रेकमध्यें उचलून घेतलें व गाडी नाशकाच्या स्टेशनांत आली. इतक्या वेळांत तो सर्व ब्रेक रक्तानें नाहून निघाला. तो मनुष्य दरम्यान गतप्राण झाला. रीतीप्रमाणें नाशिकच्या स्टेशनवर पोलिसचा तपास होऊन गाडी पुढें चालूं झाली. परंतु आमच्या डोळ्यांसमोरून तो भयंकर देखावा दूर होईना ! आम्हीं वर्तमानपत्रांतून असल्या अपघातांच्या पुष्कळ बातम्या वाचल्या होत्या; परंतु

कानांत व डोळ्यांत किती अंतर असतें, हें आज आमच्या ध्यानांत आलें. आतां प्रत्यक्ष पाहिलेल्या भयंकर देखाव्यानें मानवी आयुष्याची क्षण-भंगुरता आमच्यापुढें मूर्तिमंत उभी राहिली. आगगाडीसारखें सुखाचें, सोईचें व जलद जाणारें प्रवाससाधन उपलब्ध झालें आहे खरें, तरी पण त्या साधनानें त्याच्या प्रचंड वेगानें किती तरी प्राणी मृत्युमुखीं पडत असतील कोण जाणे. हे अपघात एका पक्षीं मनुष्याच्या अज्ञानानें, तर दुसऱ्या पक्षीं रेलवे नोकरांच्या बेपर्वाईनें होत असले पाहिजेत, हें उघड आहे. मनुष्यें थोडासा त्रास वांचविण्याकरितां किंवा जवळची वाट म्हणून रेलवेच्या बाजूनें किंवा रेलवेचा रस्ता ओलांडून जातात, व अकस्मात् गाडी आली म्हणजे अपघात होतो. गाडी हांकणाराचें सर्व लक्ष जर रस्त्या-कडे असेल तर असले अपघात पुष्कळ वेळां टळतात हें खरें आहे. आमच्या गाडीचा अपघात भर दिवसां बारा वाजतां झाला ! असो.

या भयंकर अपघातानें उद्भवलेला विषाद फार वेळ टिकला नाहीं. कारण, आमची वायुवेगानें जाणारी गाडी आमच्या दृष्टीसमोर निरनिराळे देखावे आणीत होती व त्यांत पुनः आमचें मन गढूं लागलें. गोदातटाक सोडून चारपांच तास झाले नाहींत तोंच आम्ही **तापीतटाकीं** भुसावळेस आलों व तापीवरील तो लांबच लांब पूल पाहिला. तापीचें पात्र फार उथळ आहे, परंतु तें अत्यंत रुंद आहे. येथें आम्ही सायंकाळीं साडे-पांचच्या समारास आलों. आणखी दोन तासांनीं पूर्वीच्या काळीं फार प्रसिद्ध अशा बऱ्हाणपूर शहरास आलों. येथून पुढें काळोख पडला. पण पुढील प्रांत परत येतांना आम्हांला दिवसां लागला. बऱ्हाणपुराहून पांच तासांनीं मनुष्य **नर्मदातटाकीं** हुशंगाबादेस येतें. नर्मदा नदीचें पात्र तापी पेक्षां खोल आहे. या पुलाचाही देखावा प्रेक्षणीय आहे. हुशंगाबाद सोडलें कीं, लागलींच विंध्य पर्वताच्या डोंगराळ प्रदेशांत आपण येतों. हा प्रांत जंगलानें व्याप्त असा आहे. बाराखेड्याचा लहानसा घाट आहे तो प्रेक्ष-णीय आहे. येथून माळवा प्रांत लागतो. तो सर्व रात्रीं ओलांडून प्रातः-काळीं प्रवाशी **बीना** स्टेशनवर येतो.

बऱ्हाणपुरापर्यंत मराठीचा थोडाफार प्रचार दिसतो व हा भूमिभाग महाराष्ट्राप्रमाणेंच भासतो; परंतु बीनापासून पुढें मात्र सर्व निराळाच देखावा दिसूं लागतो. येथील जमीन निराळी, येथील दगड निराळे, येथील रान निराळें, येथील लोक निराळे व येथील भाषाही निराळी.सकाळच्या दहाच्या सुमारास आम्ही झांशीस येऊन पोंचलों व तेथून दोन तासांनीं ग्वालेरीस आलों. ग्वालेर हें खरोखरीं उत्तर हिंदुस्थानचें नाकेंच आहे, असें म्हटलें तरी चालेल. तेव्हां या खेपेच्या माझ्या उत्तर हिंदुस्थानांतील प्रवासवर्णनास ग्वालेरपासून सुरवात व्हावी, हें अगदीं स्वाभाविक आहे.

हल्लींच्या काळीं ग्वालेर हा शब्द उच्चारल्याबरोबर शिंदेसरकार व शिंद्यांचें घराणें, हीं मनांत उभीं राहतात. परंतु शिंद्यांचा ग्वालेरशीं संबंध नवा आहे. वास्तविक ग्वालेर हें शहर फारच जुनें आहे. पेशव्यांच्या अमदानींत उदयास आलेले शिंदे, होळकर यांनीं प्रथमतः माळव्यांत आपलें ठाणें वसविलें. होळकर इंदुरास राहिले व सभोंवारचा मुलूख त्यांनीं आपल्या ताब्यांत घेतला. शिंद्यांनीं फार जुन्या काळापासून प्रसिद्ध असलेलें उज्जेन शहर आपलें ठाणें केलें व त्या सभोंवतालच्या मुलुखावर आपला अंमल बसविला. अजूनही शिंद्यांच्या संस्थानचा एक मोटा भाग म्हणजे उज्जेन प्रांतच होय. या घराण्याचा मूळ पुरुष राणोजी. त्याचे काळीं ग्वालेरीकडे शिंद्यांचें मुळींच वर्चस्व नव्हतें. महादजी शिंद्यांच्या कारकीर्दींत त्यांनीं उत्तर हिंदुस्थानांत आपलें वर्चस्व स्थापन केलें. महादजींनीं खुद्द दिल्ली व आग्रा हे प्रांत काबीज करून दिल्लीच्या बादशहाला आपल्या अंकित करून घेऊन पेशव्यांना व आपल्याला वकीलीचा किताब व मौल्यवान् नजराणे मिळविले. हे नजराणे अजूनही या घराण्यापाशीं आहेत व ते जयविलास राजवाड्यांत मोठ्या श्रद्धेनें जपून ठेविलेले आहेत. याप्रमाणें महादजींच्या कारकीर्दींत ग्वालेरकडील प्रांत जरी शिंद्यांच्या ताब्यांत आला, तरी पण महादजींच्या हयातींत शिंद्यांची राजधानी उज्जयनी हेंच शहर होतें. महादजींच्या पश्चात् दौलतराव शिंदे यांनीं उज्जयनींत

राहण्याचें सोडलें व त्यांनीं ग्वालेरीकडेच आपलें कायमचें ठाणें केलें, व तेव्हांपासून ग्वालेर व शिंदेसरकार यांचा निकट संबंध जडला.

महाराष्ट्रांतील लोक ज्या ग्वालेरला शिंदेसरकारची राजधानी समजतात, तें खरोखरीं एक शहर नाहीं; तर तो नगरत्रयाचा समूह आहे. पहिलें **ग्वालेर** शहर व त्या नजीकचा त्याच नांवाचा किल्ला. हीं फार पुरातन ठिकाणें आहेत. दुसरें **लष्कर** हें ग्वालेरच्या किल्ल्याखालीं दुसऱ्या बाजूस वसलेलें नवें शहर आहे. हेंच शहर सध्यांची शिंद्यांची राजधानी होय. हें ठिकाण प्रथमतः दौलतराव शिंद्यांनीं सैन्याला योग्य ठाणें म्हणून कँपाप्रमाणें वसाविलें. कारण, या भागांत पाणी व गवत विपुल आहे [illegible] विहीर खणण्यास लागलें तर येथें संध्याकाळला विहीर तयार होते. या प्रांतांत विहिरी फार आहेत. एक एकर जमिनींत पांच-पांच सहासहा विहिरीसुद्धां असतात. येथें शेताला पाणी घालण्याचें यंत्रही फारच सोपें व सोईस्कर असतें. कोंकणांत त्याला **उक्ती** म्हणतात. विहिरीच्या कांठावर एक पुरुषभर उंचीचा वांसा किंवा खांब पुरतात व त्या वांशाला भोंक पाडून त्यांतून एक लोखंडाची सळई घालतात व त्या सळईच्या दोन टोंकांस दोन लांब वांसे बांधतात. वांशाच्या एका टोकास एक जड दगड बांधतात व दुसऱ्या वांशाच्या टोंकास एक पोहऱ्या किंवा मडकें बांधतात. तो जोड-वासा त्या सळईसभोंवार फिरतो. ही उक्ती एक मनुष्य सहज चालवूं शकतो. कारण या उक्तींत गुरुत्वाकर्षणाच्या शक्तीचा उपयोग केलेला असतो. अशा साध्या यंत्रानें शेतास पाणी देण्याचा प्रघात इकडे फार आहे. प्रथमतः मी जेव्हां या प्रांतांत आलों तव्हां मला या उक्त्या सर्व शेतभर दिसून आल्या. दुरून पाहणारास त्या समुद्रावरील गलबताच्या डोलकाठ्या व शिडाच्या काठ्या यांप्रमाणें हुबेहूब दिसतात व येथें गलबतें कोठून आलीं म्हणून मनुष्य चकित होतो. या उक्तीच्या साधनानें पाणी काढण्याच्या पद्धतीवरून या भागांत पाणी किती उथळ आहे हें सहज समजून येईल. तसेंच हा प्रांत माळरानाप्रमाणें असल्यामुळें इकडे गवतही विपुल आहे.

शिंद्यांच्या घराण्याची बलवान् घोडदळाबद्दल प्रसिद्धी आहे, तेव्हां दौलतराव शिंद्यांनीं असें विपुल पाण्याचें व गवताचें ठिकाण आपल्या लष्कराकरितां पसंत करावें, हें योग्य दिसतें. पुढें येथें हळू हळू वस्ती झाली व हेंच राजधानीचें शहर बनलें. तेव्हां लष्कर हें शहर अगदीं अलीकडील म्हणजे गेल्या शंभर वर्षांत वाढलेलें शहर आहे. पहिलीं ५०।६० वर्षें त्याची वस्ती वाढली; परंतु पुढें या शहराची लोकसंख्या फारशी वाढली नाहीं. या शहरींच महाराज शिंद्यांचे राजवाडे व त्यांच्या वंशांतील पुरुषांच्या छत्र्या आहेत. तिसरें मोरार हें लष्करापासून दोन अडीच मैलांवर आहे. याप्रमाणें ग्वालेर, लष्कर व मोरार अशा तीन नगरांचें जोड शहर म्हणजे शिंदेसरकारचें ग्वालेर होय. आतां उलट क्रमानें त्यांचें वर्णन करूं.

ग्वालेरच्या महाराजांनीं आपली जी खास फौज ब्रिटिश सरकारच्या तैनातीस दिली आहे तिचें ठाणें मोरार येथें आहे. लष्कर व मोरार यांना जोडणारा एक राजरस्ता आहे. मध्यें वाटेंत मोरार नांवाची नदी लागते. तिला एक कॉझवे ( फरसबंदी रस्ता, पुरा पूल नव्हे, ) केलेला आहे. हा रस्ता प्रशस्त असून सुंदर दिसतो. रस्त्याच्या दुतर्फा शिशव्याच्या झाडांची रांग लागलेली आहे. हीं झाडें कांहींशीं लिंबाच्या झाडासारखीं दिसतात. तिकडे लिंबाची झाडीही फार दिसते. मोरारची लोकवस्ती सुमारें वीस हजार आहे. शिंद्यांच्या राजधानींत व्यापार किंवा नौकरी या निमित्तानें जे युरोपियन लोक आहेत ते बहुतेक मोरारमध्येंच राहतात. यावरून मोरार हें महाराष्ट्रांतील शहरांच्या कँपाच्या वस्तीप्रमाणें युरोपियन वस्तीचें शहर आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. यामुळें स्वाभाविकपणेंच येथें बंगलेवजा घरें आहेत. या गांवांत म्हणण्यासारखीं नवीं जुनीं प्रेक्षणीय स्थळें नसल्यामुळें आम्ही या ठिकाणीं एकदांच गेलों व तेथें एका मित्राला भेटलों व थोडासा वेळ इकडे तिकडे फिरून परत आलों.

लष्कर शहर घोड्याच्या नालासारख्या जागेमध्यें वसलेलें आहे. त्याच्या उत्तरेस ग्वालेरचा प्रसिद्ध किल्ला आहे. जुन्या किल्ल्याच्या

खालींच महाराजांची फुलबाग म्हणून पांच मैल घेराची प्रचंड बाग आहे. यांतच महाराजांचा राजवाडा आहे व सरकारी कचेऱ्या मोती-महाल नांवाच्या जुन्या राजवाड्यांत आहेत. फुलबागेच्या दक्षिणेस सरदारांचा एलाजिन् क्लब आहे, तसेंच जयाजीराव हॉस्पिटल व व्हिक्टो-रिया कॉलेज आहे. शहरांतील बहुतेक घरें दगडी आहेत. शहरांतील **सराफा** म्हणून जो रस्ता आहे तो सर्वांत चांगला आहे. तो दिल्लीच्या चांदणी चौकाच्या धर्तीवर बांधलेला आहे. रस्ता प्रशस्त असून दुतर्फा दगडी घरें असल्यामुळें सुंदर दिसतो. बहुतेक सर्व घरांना गच्च्या आहेत. तसेंच समोर सुंदर दगडाच्या धीऱ्यांनीं केलेले सज्जेही दिसतात. ही सज्जाची पद्धति आम्हीं दिल्ली, आग्रा व दुसऱ्याही शहरांत पाहिली. या प्रांतांत तांबुस पांढरा दगड फारच विपुल आहे. आपल्या इकडील शहा-बादी दगडाप्रमाणें हा असतो. मात्र शहाबादी दगड एक, दोन, तीन किंवा जास्त इंच जाडीचा पण पत्र्यावजा असून तो फार ठिसूळ असतो आणि त्यावर टाकीचें काम करतां येत नाहीं. इकडील दगड हव्या त्या जाडीचे व हवे तितके लांब रुंद व जाडे पाडतां येतात. या दगडांचा इमारतींत केलेला उपयोग पाहून आम्हांला वेदांत्यांच्या अद्वैत तत्त्वाची आठवण झाली. वेदांती सर्व भिन्नस्वरूप जग एका ब्रह्माचेंच बनलेलें आहे असें प्रतिपादन करतात, त्या तत्वाचें मूर्तिमंत विवेचन इकडील दगडानें करतां येण्यासारखें आहे.

इकडील घरांना भिन्न भिन्न जातीचें सामान लागत नाहीं. येथील घराचें जोतें याच तांबुस दगडाचें करतात; फरशी याच दगडाची; घराचे खांब याच दगडाचे; तुळया याच दगडाच्या, कडीपाट याच दगडाचा, जाळीच्या खिडक्या याच दगडाच्या, खांबावरील लगी याच दगडाच्या; वासिक याच दगडाचें व शेवटीं घराचें पासेंही याच दगडाचें! सारांश, इकडील घरांना लांकूडकाम दारांच्या फळ्यांखेरीज कशालाच लागत नाहीं. पंधरा फूट लांबीच्या दगडाच्या तुळया आम्हीं येथें पाहिल्या. दहा

दहा फूट लांबीचे तक्तपोशीचे तक्ते याच दगडाचे पाहिले. प्रथमतः या सर्वव्यापी दगडाच्या उपयोगाकडे पाहिलें म्हणजे कौतुक वाटतें व हा केवढा उपयोगी खनिज पदार्थ या प्रांताला लाभला आहे, असें पाहून आश्चर्य वाटतें. या दगडावर नक्षी व कोरीव कामही फार उत्तम होतें. ग्वालेर संस्थानांत हा शिल्पकाराचा धंदा फार प्राचीनकाळपासून प्रसिद्ध आहे.

सराफा बझार या रस्त्याशिवाय आणखीही एकदोन रस्ते बरे आहेत. या शहराची लोकवस्ती जवळ जवळ नव्वद हजार आहे. शहरांतील प्रेक्षणीय स्थळें म्हणजे फुलबाग व त्यांतील राजवाडे मोतीमहाल व जयविलास हींच होत. कै. माधवराव महाराजांचे वडील जयाजीराव हे मोठे विलासी पुरुष होते व अशा विलासी पुरुषास शोभेल असाच हा फुलबाग आहे. या सर्व बागेसभोंवतीं भिंतीचा तट आहे. सर्व बागेंत गाडींतून जाण्यासारखे प्रशस्त रस्ते ठेविले आहेत. लाईट रेलवेचा एक फांटाही बागेंतून इकडे तिकडे नेला आहे. बागेची रचना फार चांगली आहे. कोठें गगनचुंबी वृक्षांची मोठी राई आहे, तर कोठें अर्वाचीन पद्धतीची कुंडयांची बाग आहे; कोठें सुगंधी फुलझाडांचे ताटवे आहेत, तर कोठें वेलींनीं व कमलांनीं शोभायमान होणारे तलाव आहेत; कोठें सुंदर लता-मंडप आहेत, तर कोठें झाडांच्या फांद्या वळवून बनविलेले वृक्षमंडप आहेत; कोठें विश्रांति घेण्याकरितां सुखासनें आहेत, तर कोठें प्रस्तर पसरलेले आहेत; कोठें अगदीं जंगलाचा देखावा आहे, तर कोठें बंगल्यापुढील छोट्या बागेचा देखावा आहे; कोठें पक्षिगृह आहे, तर कोठें पशुगृह आहे; सारांश, बाग फारच मोठा व विलासाच्या, हौसेच्या, शोभेच्या व सौंदर्याच्या निरानिराळ्या वस्तूंनीं खचून भरलेला आहे. जयाजीराव महाराज यांचे कारकीर्दींत या बागेवर फारच खर्च होत असे. हजार-बाराशें माणसें कामावर असत. श्रीमंत कै. माधवराव महाराजांना या गोष्टीचा तितका शोक नव्हता असें नाहीं व ते कारभारांतच फार लक्ष घालीत असत यामुळें या बागेवर पहिल्याइतका खर्च होत नसावा. या

बागेंत सर्व ठिकाणीं पाटाचें पाणी खेळविलें आहे व एक मोठा तलाव केला असून त्यांत एक फारच सुंदर व टुमदार असा बंगला बांधलेला आहे. हल्लीं तलावांत पाणी नसल्यामुळें या बंगल्याची शोभा किंचित् कमी झाली आहे. तरी पण बंगल्याचें काम फारच सुबक आहे.

या बागेंतील पहिला मोठा राजवाडा म्हणजे मोतीमहाल होय. हा राजवाडा फार प्रचंड आणि भव्य आहे. सर्व महालाला पांढरा शुभ्र रंग दिलेला असल्यामुळें दुरून त्याची अद्वितीय शोभा दिसते. हल्लीं या वाड्यांत संस्थानच्या सर्व कचेऱ्या आहेत. याचा हल्लीं राहण्यास उपयोग करीत नाहींत. या बागेंतील दुसरा मोठा राजवाडा **जयविलास** होय. येथेंच हल्लींचे श्रीमंत महाराज राहतात. हा राजवाडा त्याच्या नांवाला शोभेल असाच आहे. हा १८७४ मध्यें बांधला गेला. बडोद्याच्या महाराजांनीं बांधलेल्या लक्ष्मीविलास राजवाड्याप्रमाणें हा राजवाडाही भव्य व सुंदर आहे. बडोद्याच्या राजवाड्याप्रमाणें येथेंही एक मोठा दरबारहॉल आहे. हा दरबारहॉल शंभर फूट लांब, पन्नास फूट रुंद व चाळीस फूट उंच आहे. याप्रमाणें लांबी रुंदी व उंची यांमध्यें अनुरूप मेळ असल्यामुळें हा दिवाणखाना फार बहारीचा दिसतो. दिवाणखान्यांतील उंची सामान, त्याचा शुभ्रट गुलाबी रंग व तेथील रोषनाई वगैरे गोष्टींमुळें दरबारी दिवाणखान्यांत पाय ठेवल्याबरोबर मनुष्य आश्चर्यानें थक्क होऊन जातो. याच दिवाणखान्यांत फार प्रसिद्ध अशीं दोन प्रचंड झुंबरें आहेत. हीं पॅरीसहून हजारों रुपयें खर्च करून आणिलेलीं आहेत. इतकीं प्रचंड झुंबरें हिंदुस्थानांत दुसऱ्या कोठेंही नाहींत! हल्लीं राजवाड्यांत सर्व विजेचे दिवे केलेले असल्यामुळें या झुंबरांमध्येंही विजेच्या दिव्यांचीच योजना केली आहे. हे विजेचे दिवे मेणबत्तीच्या आकाराचे केल्यामुळें झुंबरांत मेणबत्त्या लावल्या आहेत असा भास होतो. रात्रीची रोषनाई केल्यावर या दिवाणखान्याची अद्वितीय शोभा दिसते, असें सांगतात.

लष्करांतील दुसऱ्या प्रेक्षणीय इमारती म्हणजे व्हिक्टोरिया कॉलेज आणि जयारोग्य हॉस्पिटल. आम्ही गेलों तेव्हां कॉलेज बंद होतें. कॉलेजची इमारत फार सुंदर आहे; तसेंच कॉलेजची शिक्षणाची व्यवस्था व इतर उपकरणसामुग्री चांगल्या प्रकारची आहे. जयारोग्य हॉस्पिटलही फार मोठें व वैद्यकी उपकरणांनीं युक्त आहे.

जुनें ग्वालेर शहर हें आतां मोडकळीस आलेलें शहर आहे. येथील घरें मोडकीं तोडकीं दिसतात. वस्ती १६००० ची आहे. पूर्वी येथें दगडाचें कोरीव काम करण्याचा धंदा फार प्रख्यात होता. तसेंच गुळगुळीत व चकाकणारीं कवलेंही येथें उत्तम होत असत व लोखंडी कामही सुबक होई. त्या कलांचे मासले ग्वालेरच्या किल्ल्यांतील मानमंदिरांत अजूनही दिसतात. हें शहर मुसलमानी तऱ्हेचें दिसतें. मशिदी व थडगीं पुष्कळ आहेत. जुम्मामशीद चांगली आहे. महमद घोष हा एक महंमदी साधुपुरुष ग्वालेरींत १५१० च्या सुमारास होऊन गेला, त्याच्या प्रेतावर बांधलेली इमारत फारच सुंदर आहे. ही इमारत चतुष्कोनाकृति चबुतऱ्यावर बांधलेली आहे. प्रत्येक कोनावर षट्कोनी मनोरे असून त्यावर लहान लहान घुमट आहेत. सर्व इमारतीवर एक मोठा थोरला घुमट आहे व त्यावर निळ्या रंगाचीं चकाकणारीं कवलें बसविलीं आहेत. सर्व इमारतीच्या बाजूला निरनिराळ्या जातींच्या वेलबुट्टीच्या दगडांत जाळ्या कोरलेल्या आहेत. हें जाळ्यांचें काम फारच नाजूक व सुबक आहे. यावरून येथील कोरींव कामाच्या कलेची चांगलीच साक्ष पटते.

याच भव्य व सुंदर इमारती शेजारीं एक अगदींच साधें व छोटें थडगें आहे. हें कोणाचें असें आम्हीं आमच्या बरोबर नेलेल्या माणसाला विचारलें असतां हें थडगें प्रख्यात **तानसेन** गवयाचें आहे असें त्यानें सांगितलें. हें ऐकून आम्ही आश्चर्यचकित झालों. ज्या गवयाची कीर्ति सर्व हिंदुस्थानभर पसरलेली आहे, ज्या गवयाचें नांव मराठी भाषेंतसुद्धां उपमानपद झालें आहे, ज्याचें नांव सर्वतोमुखीं आहे, त्याचें थडगें इतकें

साधें व छोटें पाहून आम्हांला आश्चर्य वाटलें. परंतु थोड्या विचारांतीं असें होणें स्वाभाविक आहे, असें आमच्या ध्यानांत आलें. कारण, सरस्वतीभक्तांवर लक्ष्मीची मेहेरनजर कधींच नसते व सरस्वतीभक्ताचें खरें स्मारक दगडांधातूंचें असण्याची जरूरी नसते ! कारण, त्याचें स्मारक लोकांच्या हृदयांत असतें. अशा अदृश्य स्मारकाचें महत्त्व दृश्य स्मारकापेक्षां जास्त आहे, असें माझ्या मनांत आलें. हा तानसेन ग्वालेरचा राजा मानसिंग यानें ग्वालेर येथें स्थापन केलेल्या गायनशाळेंत शिकलेला होता व पुढें तो रेव्याचा राजा रामचंद्र याच्या पदरीं राजगवई म्हणून राहिला. १५६२ मध्यें त्याला अकबर बादशहानें आपल्या पदरीं ठेविलें व तेथें त्याची फार वाहवा झाली. त्यानें महंमदी धर्म स्वीकारला होता असें दिसतें. म्हणूनच त्याचें थडगें महंमद घोष साधूच्या जवळ बांधलेलें आहे.

आतां राहिला **ग्वालेरचा किल्ला**. हा या प्रांताचा अपूर्व अलंकारच होय ! येथील प्रेक्षणीय स्थळांतील हा किल्ला अत्यंत रम्य स्थळ आहे. महाराष्ट्रांतील लोकांना किल्ल्यांची पुष्कळ माहिती आहे. महाराष्ट्रांत कितीतरी किल्ले आहेत; परंतु दौलताबादच्या किल्ल्याखेरीज बाकी सर्व किल्ले आतां मोडकळीस आलेले आहेत. कांहीं किल्ल्यांच्या फक्त आतां सामक्षा राहिलेल्या आहेत. परंतु ग्वालेरचा किल्ला अगदीं शाबूद असून त्याचें लष्करी बाजूनेंच महत्त्व आहे असें नाहीं, तर पुराणवस्तुसंशोधनाच्या बाजूनेंही महत्त्व आहे. उत्तर हिंदुस्थान हा प्रदेश फार सपाट असल्यानें इकडे किल्ले थोडे आहेत. यामुळेंच एका ग्रंथकारानें ग्वालेरच्या किल्ल्याचें उत्तर हिंदुस्थानच्या दुर्गमुक्ताहारामधील सर्वांत सुंदर मोतीं असें वर्णन केलें आहे व तें यथार्थ आहे. हा किल्ला फार अभेद्य व अजिंक्य असा समजला जात असे. साताऱ्याच्या अजिमतारा किल्ल्यासारखाच कांहींसा याचा आकार आहे. हा किल्ला तांबूस पांढऱ्या रंगाच्या खडकाच्या टेकडीच्या माथ्यावर आहे. ही टेकडी लांबट असून सर्वत्र सपाट प्रदेशांत एकदम सुळक्यासारखी वर आलेली दिसते. यामुळें या किल्ल्याला कोठू-

नहीं मान्याला जागा नाहीं. फक्त एका बाजूला बऱ्याच अंतरावर दुसरी एक टेकड्यांची ओळ आहे. तेथून तोफांचे गोळे या किल्ल्यावर येऊं शकतात. १८५७ सालीं तात्या टोपे व झांशीची राणी लक्ष्मीबाई यांनीं येथूनच मारा केला होता, असें म्हणतात. हा इकडला तट त्या वेळीं थोडासा पडला होता. तो दुरुस्त करण्याचें काम श्रीमंत महाराज माधवराव शिंदे यांनीं सुरू करून व तें कित्येक वर्षांनीं संपविलें. हा किल्ला लांबीला पावणेदोन मैल आहे व त्याची सर्वांत जास्त रुंदी २८०० फूट आहे.

हा किल्ला फारच पुरातन आहे, हें वर सांगितलेंच आहे. कांहींच्या मतें हा किल्ला ख्रिस्ती शकापूर्वी ३१०१ मध्यें बांधला गेला; तर कांहींच्या मतें तो इसवीसनाच्या २५५ ते २८२ च्या दरम्यान बांधला गेला. याच्या बांधणीसंबंधानें पुढील दंतकथा आहेः--


" ग्वालेरपासून वीस मैलांवर असलेल्या कटवार या भागाचा राजकुमार सूरजसेन हा महारोगानें किंचित् ग्रस्त होता. तो शिकारीस गेला असतां त्याची व त्याच्या अनुयायांची चुकामुक झाली. तो या टेकडीच्या माथ्यावर आला. तेथें त्याला ग्वालीप नांवाचा एक साधुपुरुष भेटला. तहानेलेल्या त्या राजकुमारास त्या साधुपुरुषानें आपल्या झोपडीनजीकच्या तळ्यांतील पाणी प्यावयास दिलें. त्या जलपानानें राजकुमाराचा महारोग बरा झाला. हें पाहून राजकुमारानें त्या साधुपुरुषास ' मी आपल्याकरितां काय करूं ? ' असें विचारलें. साधूनें सांगितलें कीं, 'तूं या ठिकाणीं किल्ला बांधून या तलावाला शोभा आण!' सूरजसेनानें साधूच्या सांगण्याप्रमाणें केलें व किल्ल्याला ग्वालियावार असें नांव दिलें. "

या किल्ल्याचा खरा विश्वसनीय उल्लेख **मिहीरकूल** या हूण वीरानें बांधलेल्या सूर्याच्या देवळाजवळील शिलालेखामध्यें सांपडतो. हा लेख ५१५ मधला आहे. ५३३ मध्यें मिहिरकुलाचा पराभव होऊन तो


काश्मीरांत परत गेला. पुढें या किल्ल्यावर कनोजच्या भोजदेवाचें स्वामित्व झालें. परंतु हा किल्ला व इकडील प्रांत बरींच शतकेंपर्यंत कचवार नांवाच्या घराण्याकडे होता व याच घराण्यामधला सर्वांत बलाढ्य, संपत्तिमान् आणि कलाकौशल्याचा व ललितकलांचा पुरस्कर्ता मानसिंग राजा होऊन गेला. ही कारकीर्द म्हणजे या घराण्याच्या वैभवरवीचा मध्यान्ह होय. पुढें या घराण्याला उतरती कळा लागली. मानसिंग १४८६ मध्यें गादीवर आला. व त्यानें ३४ वर्षें राज्य केलें. मानसिंगाच्या मरणानंतर हा किल्ला व हा प्रांत मोंगलांच्या ताब्यांत गेला व तो त्यांचेकडे दीडशें वर्षें राहिला. त्या काळीं या किल्ल्याचा उपयोग राजकीय कैदखाना म्हणून करीत असत. १७६१ च्या पानिपतच्या लढाईनंतरच्या अराजक स्थितींत गोहदचा राणा लोकेन्द्रसिंह यानें हा किल्ला आपल्या ताब्यांत घेतला. १७६५ मध्यें महादजी शिंद्यांनीं गोहदच्या राण्याचा पराभव करून हा किल्ला हस्तगत केला. तेव्हांपासून शिंद्यांच्या घराण्याचा या किल्ल्याशीं निकट संबंध आला. १७६५ पासून १७८० पर्यंत हा किल्ला शिंद्यांकडे राहिला; परंतु त्या सालीं इंग्रज व शिंदे ह्यांमध्यें तंटा उत्पन्न झाला. व त्या वेळीं जनरल पापननें रात्रीचा छापा घालून किल्ला हस्तगत केला. पण तो गोहदच्या राण्याला परत द्यावा, असें वॉरन हेस्टिंगनें ठरविलें. १७८१ मध्यें शिंद्यांनीं तो पुन: हस्तगत केला. १७८१ पासून १८०४ पर्यंत तो शिंद्यांकडे राहिला. १८०३ मधील लढाईत इंग्रजांनीं तो पुन: काबीज केला. महाराजपूरच्या लढाईनंतरच्या ग्वालेरच्या तहाप्रमाणें १८४४ मध्यें तो किल्ला शिंद्यांच्या इंग्रज सरकाराकरितां उभारलेल्या सैन्याकडे द्यावा असें ठरलें. १८५२ मध्यें जयाजीराव शिंद्यांना तो परत मिळाला, परंतु १८५७ सालच्या बंडांत तेथील सैन्य बंडवाल्यांस सामील होऊन हा किल्ला तात्या टोपे व झांशीची राणी यांच्या ताब्यांत गेला. पुढें थोड्याच दिवसांनीं इंग्रज सैन्यानें तो परत घेतला व १८५८ पासून १८८५ पर्यंत तो इंग्रजांच्या ताब्यांत राहिला; परंतु त्यावेळीं शिंदेसरकार व

ब्रिटिश सरकार यांचेमध्यें प्रांतांची जी [redacted] झाली त्यांमध्यें इंग्रज सरकारनें झांशी आपल्याकडे घेतली व हा किल्ला व मोरार कँप वगैरे भाग शिंदेसरकारास परत दिले. याप्रमाणें या किल्ल्याच्या स्वामित्वामध्यें वारंवार परिवर्तन होऊन आतां तो कायमचा शिंदेसरकारचा झाला आहे.

चला, किल्ल्याची ही पूर्वपीठिका पाहून आतां प्रत्यक्ष किल्ल्याकडे व आंतील दर्शनीय स्थळांकडे वळूं. किल्ल्याचें मुख्य दार पूर्वेकडून म्हणजे जुन्या ग्वाल्हेर गांवाकडून आहे. किल्ल्याला पोहोंचण्यास सहा दरवाजांतून जावें लागतें. शेवटच्या दरवाजाचें नांव हत्तिपोल असें आहे. पूर्वी येथें एका मोठ्या हत्तीचें चित्र होतें. या मार्गानें चाललें म्हणजे किल्ल्याची अवर्णनीय शोभा दिसते. हत्तिपोल दरवाजालाच लागून या किल्ल्यांतील अद्वितीय इमारत मानमंदिर ही आहे. दुसरेही एक दोन दरवाजे आहेत. आम्हीं उरवाई दरवाजाकडून गेलों. लष्करपासून या दरवाजापर्यंत शिंदे सरकारनें हल्लीं घोड्याची गाडी जाण्यासारखा सुंदर रस्ता केला आहे व यामुळें या रस्त्यानें किल्ल्यावर जाणें जास्त सोईचें आहे. या वाटेनें जातांना किल्ल्याच्या दुर्भेद्यतेची साक्ष पटते. किल्ल्याच्या टेकड्यांच्या बाजू अगदीं कड्यासारख्या तुटलेल्या आहेत. खडकांत पुष्कळ मूर्ति खोदलेल्या आहेत, त्या जैन धर्मीयांनीं आठव्या नवव्या शतकांत कोरलेल्या असाव्यात, असें म्हणतात. मूर्ति फारच प्रचंड व भव्य आहेत. कांहीं बुद्ध देवासारख्या दिसतात. तेव्हां त्या याहीपेक्षां जुन्या आहेत कीं काय, हें सांगतां येत नाहीं. पुष्कळ छिन्नविछिन्न केलेल्या आहेत. वाटेनें मनुष्य जाऊं लागलें म्हणजे या मूर्ति व हा किल्ला जणूं कांहीं आपल्याला पूर्व गोष्टींचा इतिहास सांगत आहेसें भासतें. या मूर्तींनीं कितीतरी स्थित्यंतरें पाहिलीं आहेत: कालाच्या प्रचंड ओघांत हजारों घडामोडी झाल्या; कित्येक राजे आले व गेले; परंतु हा किल्ला आहे तसाच दुर्भेद्य आहे.




नं. ४ ] ग्वाल्हेर : मानमंदिर, पूर्वीय दृश्य. [ पान ३७



नं. ५ ] ग्वाल्हेर : मोठें सासबाहु मंदिर. [ पान ३७



नं. ६ ] ग्वाल्हेर किंग जार्ज पब्लिक पार्क. [ पान ४०



नं. ७ ] ग्वाल्हेर : कौन्सिल हॉल. [ पान ४२

हें असे विचार मनांत येत आहेत तोंच आम्हीं किल्ल्यावर येऊन पोंचलों व पहिल्यानें मानमंदिर पहाण्यास गेलों.

**मानमंदिर** हा राजवाडा मानसिंग राजासारख्या वैभवशाली व ललित-कलाप्रिय राजाला शोभेसाच आहे. हा राजवाडा तीनशें फूट लांब व साठ फूट रुंद आहे. त्याचे वर दोन मजले असून तळघरवजा खालीं खडकांत खोदलेले आणखी दोन मजले आहेत. राजवाड्यासभोंवार खडकाची कोर-लेली भिंत आहे; ती शंभर फूट उंच आहे. राजवाड्याचे आंतील काम पहाण्यासारखें आहे. राजवाड्यांत निरनिराळीं दालनें, दरबारचा दिवाण-खाना, राण्यांच्या राहण्याच्या जागा, स्नानगृहें, वगैरे सर्व सोई आहेत. सर्व राजवाडा पाहिला म्हणजे मानसिंगाच्या अभिरुचीचें व त्याच्या शिल्पकलाप्रियतेचें मोठें नवल वाटतें. हा सर्व राजवाडा हिंदु वास्तु-पद्धतीचा आहे. राजवाड्यामध्यें रंगाचें कामही केलेलें आहे; तें फार सुबक आहे. मनोरे व घुमट प्रेक्षणीय असून राजवाड्याची एकंदर घटना फार कुशलतेची आहे. प्रसिद्ध मोगल बादशाह बाबर हा १५२७ मध्यें येथें आला होता. त्यावेळीं राजवाडा बांधून २० वर्षें झालीं होतीं. त्यानें या वाड्याचें हुबेहुब वर्णन करून ठेविलें आहे.

मानसिंगाच्या वेळची दुसरी इमारत म्हणजे गुजरी महाल ही होय. हा महाल मानसिंगानें आपली आवडती राणी मृगनयना हिच्याकरितां बांधला होता. हाही पाहण्यासारखा आहे.

किल्ल्यावर तीन देवळें प्रेक्षणीय आहेत. पहिल्या दोहोंना धाकटें व मोठें **सासबाहु** म्हणतात. हा सहस्त्रबाहु याचा अपभ्रंश असावा, असा तर्क केलेला आहे. अडाणी लोक या देवळांना सासू–सुनेचीं देवळें म्हणतात. कांहीं युरोपियनांनीं यांना जैन देवळें म्हटलें आहे, परंतु तें बरोबर नाहीं. हीं देवळें हिंदु देवतांचीच आहेत. मोठ्यावर १०९२ सालचा शिलालेख आहे व त्यांत हें देऊळ ग्वालेरचा कच्वार राणा महीपाल यानें बांधलें असें लिहिलें आहे. याला पद्मनाभ देऊळ म्हणतात. शिलालेखांत याला

हारिसदानन असें म्हटलें आहे या देवळाचें जोतें १२ फूट उंच असून त्यावर सुबक कोरीव काम केलेलें आहे. देऊळ १०० फूट लांब व ६३ फूट रुंद आहे. पूर्वी तें १५० फूट उंच होतें. देवळाचें एकंदर काम प्रेक्षणीय आहे. धाकटें सासबाहू याच नमुन्यावर आहे परंतु तें लहान प्रमाणावर आहे. तिसऱ्या देवळाला **तेलीमंदिर** म्हणतात. याचें पूर्वीचें नांव तैलंगण मंदिर असें होतें. त्याचें हल्लींचें नांव अपभ्रष्ट होऊन झालें आहे. या देवळाची पद्धति तैलंगण प्रांतांतील आहे. किल्ल्यावरील सर्व इमारतींत हें उंच म्हणजे ११० फूट आहे. देवळाचा आकार चौकोनी आहे. चौकोनाची एक बाजू ६० फुटांची आहे. याचें शिखर बैलगाडीच्या वांकलेल्या तट्टयाच्या आकाराचें आहे. हेंही देवालय फार सुबक आहे व नक्षीचें काम पहाण्यासारखें आहे.

झालें, येथें आमचें ग्वालेर पुराण संपलें. ह्या सुंदर इतिहासप्रसिद्ध स्थळाची रजा घेतांना आम्हांस फार वाईट वाटलें; परंतु नाइलाज म्हणून आह्मी आपल्या पुढच्या प्रवासास निघालों. ग्वालेरीहून आम्ही आग्र्यास गेलों. परंतु आग्र्यासारखें ठिकाण उभ्या उभ्या पहाण्यासारखें नाहीं. तसेंच हिंदुस्थानची नवी राजधानी हिची, व कौरव पांडवांपासून प्रसिद्धीस असलेला भाग याची, अशी उडत उडत भेट घेणें म्हणजे या स्थळांचा अपमान करणें होय असा विचार करून आम्हीं दिल्लींत न शिरतां उत्तर हिंदुस्थानांतील माझें विश्रांतीचें सदर स्टेशन मुरादाबाद येथें आलों. येथें पांच सहा दिवस प्रियजनांच्या सहवासांत मोठ्या आनंदानें घालविले व मग मंडळीसह तेथून हरिद्वारला आलों.

# प्रकरण ३ रें*

## आजचें ग्वालेर

पुरायत्र स्रोतः पुलिनमधुना तत्र सरिताम् ।
विपर्यासं यातो घनविरलभावस्त्वभिरुहाम् ।
निवेशः शैलानां तदिदमिति बुद्धिं जनयति ॥

वीस पंचवीस वर्षांपूर्वीं पहिल्यांदा पाहिलेल्या ग्वालेरचें वर्णन मागील प्रकरणांत दिलें आहे. पण कै. श्रीमंत महाराज माधवराव शिंदे व हल्लींचें ग्वालेर दरबार कौन्सिल यांच्या कारकीर्दीमध्यें ग्वालेर शहराची व संस्थानची इतकी सुधारणा झाली आहे कीं, तिची यथार्थ कल्पना देण्याकरितां **आजचें ग्वालेर** हें नवें प्रकरण लिहिणें आवश्यक आहे. हें प्रकरण एप्रिल सन १९३५ मध्यें ग्वालेरचें **पुनर्दर्शन** घेऊन लिहिलेलें आहे.

जी. आय. पी. रेलवेचें ग्वालेर स्टेशन ग्वालेरच्या किल्ल्याच्या पूर्वेस आहे. स्टेशनांतून बाहेर आलें म्हणजे लांबच लांब दक्षिणोत्तर पसरलेला तो दुर्भेद्य ग्वालेरचा प्रख्यात किल्ला प्रवाशांचें लक्ष वेधतो व प्रवाशी आश्चर्यानें थक्क होतो. लष्कर शहर या किल्ल्याच्या आग्नेय दिशेस वसलेलें आहे व स्टेशनपासून शहरांत जाणारा मुख्य रस्ता त्याच दिशेनें गेला आहे. हा रस्ता हल्लीं सुधारून रुंद केला असून त्याचे दोन्ही बाजूंस सुंदर पायवाटा ठेवल्या आहेत. या रस्त्यानें शहराकडे निघालें म्हणजे डावे हातास उद्योगशाळागृहाची सुंदर इमारत लागते व त्याच्या दक्षिणेस औद्योगिक पदार्थसंग्रहालयाची इमारत प्रवाशांचें लक्ष वेधते. समोरच किंग जॉर्ज पार्कचा उंचच उंच व भव्य लोखंडी कठडा

---

*३,४ व ५ हीं प्रकरणें या आवृत्तिकरितां लिहिलेलीं आहेत.

लागतो व प्रवेशद्वारही दृष्टीस पडून युरोपांतील सुधारलेल्या शहरांतील पार्कचीच आठवण होते. जिला पूर्वी **फुलबाग** म्हणत व जी पूर्वी राजवाड्यासमोरची खासगी बाग होती, तिचेंच रूपांतर व नामांतर हल्लींच्या **किंग जॉर्ज सार्वजनिक पार्क** मध्यें झालें आहे. ही पार्क कै. माधवराव महाराजांनीं सन १९२२ सालीं लोकांच्या उपयोगासाठीं **प्रिन्स ऑफ वेल्सच्या** हस्तें खुली केली. याच पार्कमध्यें सरकारी पदार्थसंग्रहालय व पशुपक्षी संग्रहालय आहे. हीं प्रेक्षणीय आहेत हें सांगावयास नकोच. पण या पार्कचा विशेष म्हणजे हिंदु देवालय, मुसलमानी मशीद, शीख गुरुद्वार व थिऑसॉफिकल लॉज अशा निरनिराळ्या धर्मांच्या व धर्मपंथाच्या लोकांकरितां सरकारी खर्चानें देवळें व प्रार्थनामंदिरें बांधलेलीं आहेत. यावरून माधवराव महाराजांचें धर्माच्या बाबतींतील उदार व सहिष्णु धोरण दिसून येतें. लॉर्ड कर्झनच्या कारकीर्दीमध्यें **कलकत्यास** व्हिक्टोरिया राणीचें अपूर्व स्मारक करण्याचें ठरलें त्यावेळीं उत्तर हिंदुस्थानांतील सर्व धर्मांच्या लोकांच्या उपयोगाकरितां स्मारकाच्या विस्तीर्ण जागेमध्यें देवळें, मशीदी वगैरे बांधाव्या अशी माधवराव महाराजांनीं लॉर्ड कर्झन साहेबांस सूचना केली होती. पण ती अर्थात् बड्या लाटसाहेबांस पसंत पडली नाहीं ! ती सूचना ध्यानांत ठेवून माधवराव महाराजांनीं आपल्या राजधानींत ती कल्पना मूर्त सृष्टींत आणून दाखविली. सायंकाळच्या वेळीं या पार्कमध्यें नानाधर्मी लोक शेजारीं शेजारीं आपआपल्या धर्मसमजुतीप्रमाणें गुण्यागोविंदानें परमेश्वर प्रार्थना व पूजा करतांना पाहून महाराजांच्या या उदार सहिष्णु धोरणाचें कौतुक केल्यावांचून राहवत नाहीं. या फुलबागेचें किंवा हल्लींच्या पार्कचें वर्णन मागल्या प्रकरणांत केलेंच आहे तेव्हां त्याची पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं.

या पार्कच्या दुसऱ्या बाजूच्या रस्त्याला लागून डाव्या हातास एक नवेंच सुबक प्रेक्षणीय स्थान बनविण्यांत आलें आहे. हें स्थळ म्हणजे प्रख्यात **झांशीच्या राणीचें** स्मारक होय. झांशीची राणी ५७ सालच्या बंडांत सामील होऊन तिनें इंग्रज सैन्याशीं किल्ल्यानजीक निकराची

लढाई दिली व त्यांतच तिचा अंत झाला. तिच्या प्रेताची शत्रू विटंबना करतील म्हणून तिच्या जवळ असलेल्या हुजऱ्यांनीं तिचें प्रेत एका गवताच्या गंजीमध्यें टाकून त्या गंजीला आग लावून दिली. अशा तऱ्हेनें तिच्या प्रेताचें दहन केलें अशी हकीकत झांशीच्या राणीच्या चरित्रांत आहे. ही गंजीची नक्की जागा ठाऊक नव्हती. पण ग्वालेरच्या पुराणवस्तुसंशोधन खात्याचे मुख्य अधिकारी रावसाहेब गर्दे यांनीं पूर्ण शोध करून ती जागा निश्चित केली व दरबारच्या परवानगीनें व खर्चानें हें स्मारक तयार केलें. खरोखरींच हें स्मारक फार सुबक व अनुरूप बनविलें आहे. गंजीच्या जागेवर बेताचें जोतें बांधून त्याचे सभोंवार ठेंगणा पण सुबक लोखंडी कठडा घातला आहे व सर्व जागा सुंदर वृक्षवेलींच्या ताटव्यांनीं सुशोभित केली आहे व आवाराचे मध्यावर सुबक तुळशीवृंदावन बांधलें आहे. त्या वृंदावनाचे समोरच्या बाजूवर संगमरवरी दगड बसवून त्यावर झांशीच्या राणीचा स्मारक मृत्युलेख कोरला आहे. हें स्मारक पाहून त्याचे योजक रा. गर्दे यांच्या कल्पकतेचें मला मोठें कौतुक वाटलें व योजकस्तत्र दुर्लभः हें वाक्य सहज माझे मुखांतून बाहेर पडलें. हें सुबक स्मारक टाकून पुढें गेलें म्हणजे किल्ल्याचें दक्षिण टोंक आपल्या डाव्या हातास दिसतें व त्या दुर्भेद्य किल्ल्याच्या दर्शनानें मन थक्क होतें. येथून रस्ता थेट आग्नेय दिशेनें शहराच्या सराफ बाजाराकडे जातो. हल्लीं लष्कर शहराचे रस्ते रुंद केले असून त्यांचे दोन्ही बाजूस पायवाटा ठेविल्या आहेत. तो मधला सुंदर रस्ता, त्याच्या बाजूचें तें खुलें गटार व पायवाटेच्या मर्यादेची पांढुरक्या तांबडसर दगडाची कोर व त्याच्या पलीकडील त्या नानारंगी सुबक इमारती हा देखावा नयनमनोहर दिसतो. ठिकठिकाणीं मोकळ्या जागा टाकून त्यांवर सुंदर छोट्या बागा केल्या आहेत, जुना अरुंद सराफ बाजार जाऊन त्या जागीं सुंदर नवा रस्ता व तीन तीन चार चार मजली सुंदर इमारती झाल्या आहेत. यामुळें ही बाजारपेठ शहराचा एक अलंकार बनली आहे. पण या बाजाराच्या टोकाला तर मन

थक्क करणारा असा नवा प्रशस्त चौक बनविण्यांत आला आहे. केवढा विस्तीर्ण चौक तो! त्याचे मधोमध जयाजीराव महाराजांचा भव्य पुतळा संगमरवरी पायऱ्यांनीं मंडित अशा मोठ्या संगमरवरी चबुतऱ्यावर बसविला असून त्या पुतळ्याचे वर कमानदार चौकोनी मंडप उभारला असून त्यावर पांचसहा मजली उंच असें शिखर बांधलें आहे. हें स्मारकाचें काम पाहून मन आश्चर्यानें थक्क होतें. या स्मारकासभोंवार सुंदर कठडा केला असून चारी कोपऱ्यांवर उंच उंच दीपस्तंभ उभारले आहेत. या विस्तीर्ण व भव्य चौकाचे चारी बाजूंस मोठमोठ्या सार्वजनिक इमारती आहेत; त्या म्हणजे टाऊन हॉल, अलिजा दरबार छापखाना, व्हिक्टोरिया मेमोरियल मार्केट, जुना राजवाडा, जनरल पोस्ट ऑफिस, न्यायकचेऱ्या व बँक बिल्डिंग्स या होत. हल्लीं हा चौक म्हणजे लष्कर राजधानीचें दृश्य होय यांत शंका नाहीं. रात्रीच्या वेळीं या चौकामध्यें विजेची रोषनाई झाली म्हणजे त्याची अद्वितीय शोभा दिसते यांत शंका नाहीं. लष्कर राजधानीचा चौक पाहिला म्हणजे म्हैसूर राजधानींतील **चामराज चौकाची** आठवण होते. पूर्वींचें जुनें गलिच्छ दाट वस्तीचें शहर मोडून माधवराव महाराजानीं आपल्या कारकीर्दीमध्यें नवी सुंदर राजधानी निर्माण केली कीं काय असा मला भास झाला. इतकें लष्कर शहर पालटून गेलें आहे. मोती महाल व जयविलास राजवाडे, व्हिक्टोरिया कॉलेज, जयारोग्य हॉस्पिटल व शिंदे घराण्याच्या छत्र्या या इमारती पूर्वींच्याच आहेत व त्यांचें वर्णन मागील प्रकरणांत आलें आहे.

अर्वाचीन काळीं कोणत्याही शहराची आरोग्य व शोभा या दृष्टीनें सुधारणा करावयाची म्हटली म्हणजे प्रथमतः शहरांतील रस्ते रुंद व निर्धूळ केले पाहिजेत व शहराची दाट वस्ती मोडली पाहिजे. या दोन्ही गोष्टी हल्लीं लष्कर शहरांत झाल्या आहेत व चालू आहेत. रस्ते-रुंदाई व वस्ती-पातळाई या शहरसुधारणेच्या साधनापेक्षां जास्त महत्वाचीं साधनें म्हणजे शहराच्या आरोग्याकरितां विपुल पाणीपुरवठा व शहराच्या प्रकाशाकरितां विजेचा पुरवठा हीं होत. हल्लीं ग्वालेर राजधानीमध्यें या सोयी-

ही करण्यांत आल्या आहेत.शहरांतलें पाणी शुद्ध करण्याचें व वीज उत्पन्न करण्याचें ठिकाण हें एक शहरांतील सुंदर प्रेक्षणीय स्थळ बनलें आहे, तर अकरा बारा मैलांवर असलेला **तिग्रा** तलाव हें ग्वालेरच्या आसपासचें सुंदर प्रेक्षणीय स्थळ बनलें आहे. या माझ्या ग्वालेर दर्शनांत मीं दोन्ही प्रेक्षणीय स्थळें पाहिलीं. तेव्हां त्याचें वर्णन येथें देणें क्रमप्राप्त आहे. विजेच्या कारखान्याचें ठिकाण ग्वालेर किल्ल्याच्या वायव्य दिशेस दीड दोन मैलांच्या अंतरावर आहे. आवाराच्या प्रवेशद्वारांतून आंत गेल्या-बरोबर वृक्षराजींनीं अलंकृत केलेला सुंदर रस्ता लागला व फुलझाडांचे व पानझाडांचे ताटवे व कुंड्या दिसल्या.समोरच मोठी थोरली वीज उत्पन्न करण्याच्या कारखान्याचीं इमारत लागली. तेथल्या अंमलदारानें आम्हांला वीज उत्पन्न करण्याचा सर्व कारखाना दाखविला. तिग्रा तलावांतून पाटानें येथें पाणी आणून मग तें स्वच्छ करून पंपानें शेजारच्या उंच टेकडी-वरील तलावांत सांठविलें जातें व मग तेथून सर्व शहराला नळानें पाणी पुरविलें जातें. ही अर्वाचीन शास्त्रीय योजना आम्हीं पाहिली व लोकांना शुद्ध पाणी व मुबलक प्रकाश मिळण्याकरितां दरबारनें केलेल्या या योजनेचें मला कौतुक वाटलें. या योजनेला पांच सहा लाख रुपये लागले आहेत असें मला सांगण्यांत आलें. एंजिनाला पाण्याचा तुटवडा पडूं नये म्हणून येथें मोठा पाण्याचा सांठा केला असून त्या तलावावरून मोठमोठे नळ टाकून त्या नळांतून पाण्याचीं कारंजींच कारंजीं व फवारेच फवारे उडावे अशी व्यवस्था केलेली आहे. तेथल्या अंमलदारानें तीं सर्व कारंजीं व ते सर्व फवारे एकदम सुरू केले व त्यायोगें त्या तलावभर जिकडे तिकडे पाण्याचे तुषार उडूं लागले. ती विलक्षण शोभा पाहून मला काश्मीरांतील बागांतील कारंज्यांचीच आठवण झाली. कारंज्यांचा व फवाऱ्यांचा हा देखावा मोठा नयनमनोहर आहे यांत शंका नाहीं.

दुसरे दिवशीं सकाळीं आम्ही मोटारीनें **तिग्रा** तलाव बंधारा पाहण्यास गेलों.ग्वालेर शहर व किल्ला टाकून नवाच रस्ता वायव्य दिशेनें जातो. पुढें एक टेकडीची ओळ लागते. ५७ सालच्या बंडाचें वेळीं याच टेकडीवरून

इंग्रज सैन्यानें तोफेचे गोळे किल्ल्यावर फेकले होते तेवढ्यानें तटाचा एक लहानसा भाग पडला होता. तो पुढें माधवराव महाराजांनीं दुरुस्त केला. या टेकडीच्या खिंडीवजा भागांतून रस्ता नेला आहे. टेकडीच्या पलीकडे गेल्यावर उंचसखल असा माळरानाचा भाग लागला. या भागांत थोडेंफार भुरटें रान उगवलेलें दिसलें. जमीन खड-काळ व दगडाळ असून तांबूस रंगाची आहे. पुढें **तिग्रा** गांव लागला. गांव कसचा तो ? चार दोन झोपड्यांचें तें एक खेडें आहे असें वाटलें.हा सर्व भाग चढता असल्यामुळें तलावाचें पाणी किंवा तलावाचा बंधारा मुळींच दिसत नाहीं. पण शेवटीं आम्ही बंधाऱ्यानजीकच्या बागेच्या व बंगल्याच्या प्रवेशद्वाराशीं आलों तों फाटक बंद होतें. म्हणून मोटारचें शिंग जोरानें फुंकण्यांत आलें. तेव्हां एकदांचा रखवालदार आला व आम्हांला बंगल्याच्या आवारांत जातां आलें. हा छोटा सुबक बंगला आम्हीं मागाहून पाहिला.प्रथम आम्ही बंधाऱ्याकडे गेलों.हा बंधारा बराच मोठा आहे.तो जवळ-जवळ एक मैल लांब आहे. या बंधाऱ्याच्या ठिकाणचा देखावा कांहींसा नाशिकजवळील **डारणा** धरणासारखा आहे. पण या बंधाऱ्याची बांधणी मोठी मौजेची वाटली. प्रथमतः नेहेमींसारखा बंधाऱ्यावरील रस्ता व दोन्ही बाजूंचा कठडा लागला. पुढें बंधारा सात आठ फूट अधिक उंचीचा बांधलेला असून त्यावर दरवाजांची उघडझाप करण्या-करितां केलेले हातक्रेन्स बसविलेले आहेत. यामुळें बंधाऱ्यावरून जाण्यास मुळींच वाट नाहीं. कारण सर्वत्र रूळ आहेत. पण या मधल्या अधिक उंचीच्या बंधाऱ्याच्या जरा खालीं पण दारांना लागून एक साहा साडे-सहा फूट उंचीची कमानदार पायवाट ठेविली आहे. त्या वाटेनें जातांना एकीकडे सारखे दरवाजे लागतात वर दुसरीकडे खोल नदीचें पात्र व कांठ दिसतो व आपण सारखे एका बाजूला खुला असलेल्या बोगद्यांतून चाललों आहों कीं काय असा भास होतो. मीं आतांपर्यंत पुष्कळ बंधारे पाहिले पण अशा तऱ्हेची बंधाऱ्याची बांधणी मीं पूर्वीं कधींच पाहिली नसल्यामुळें या बंधाऱ्याच्या

रचनेचें मला मोठें नवल वाटलें. बराच वेळ या बोगदेवजा पायवाटेनें चालल्यावर आम्हीं बंधाऱ्याच्या शेवटच्या टोंकाशीं आलों. येथें एक मोठा विलक्षण चमत्कार आमच्या दृष्टीस पडला व आम्हीं आश्चर्यानें तोंडांत बोटेंच घातलीं. तिग्रा तलावाला पूर्वीं एक छोटासा बंधारा बांधण्यांत आला होता. पण तो एका मोठ्या पुरामध्यें फुटून वाहून गेला म्हणून हा जास्त मोठा व जास्त मजबूत असा नवा बंधारा बांधण्यांत आला. या जुन्या बंधाऱ्याचा पन्नास पंचावन फूट उंचीचा एक मोठा भाग पुराच्या पाण्याच्या भयंकर शक्तीनें पायापासून उखळला जाऊन नदीकांठावर उभाच्या उभा राहिला. ती प्रचंड भिंतची भिंत हालून पलीकडे गेली कशी याचें मला मोठें आश्चर्य वाटलें. त्या आश्चर्यचकित करणाऱ्या प्रचंड भित्तिखंडाकडे आम्ही किती तरी वेळ पहात होतों. नंतर आम्हीं आल्या वाटेनें बंधाऱ्याच्या चातुर्याच्या रचनेचें कौतुक करीत बंगल्यांत आलों. हा छोटा व सुबक बंगला श्रीमंत महाराजसाहेब, राजघराण्यांतील मंडळी व बडेबडे खास पाहुणे यांचेकरितां बांधलेला आहे. अशा खाशा स्वाऱ्यांना योग्य अशा तऱ्हेचा हा बंगला आहे. बंगल्यावर छप्पर नसून सबंद गच्ची आहे. येथून तलावाचा व सभोंवारच्या भूमिभागाचा मोठा मनोहर देखावा दिसतो. हा भाग साधारणतः माळरानी असून जिकडेतिकडे भुरटें रानचरान दृष्टीस पडतें. त्या गच्चीवरून तो निसर्गरमणीय देखावा आम्ही बराच वेळ पहात होतों. या पाणीपुरवठ्याच्या बंधाऱ्यास वीस लाखांच्यावर खर्च आला आहे असें मला कळलें; पण त्या योगें शहराला मुबलक पाणी मिळण्याची सोय झाली आहे. मीं प्रथमतः ग्वालेर शहर पाहिलें होतें त्यावेळीं तेथें पाण्याचा तुटवडा होता. पण हल्लीं तेथें पाण्याचा पुरवठा मुबलक आहे. शहराकडे परत येतांना आम्ही श्रीमंत माधवराव महाराजांचें एक आवडतें देवस्थान पाहिलें. हें प्रेक्षणीय स्थळ बंधाऱ्याला गेलेल्या रस्त्यावर नाहीं. आम्हाला उजव्या बाजूस वळून दोन तीन मैल जावें लागलें. हा भाग डोंगराळ व खडकाळ आहे व आपण टेकड्यांमधील खोल दरीकडे

जात आहों असा भास होतो. दरीच्या तोंडाशीं मोटार रस्ता संपतो व मोटारचा तबेला लागतो. तेथें मोटार ठेवून आम्हीं पाऊल वाटेनें चाललों. तेव्हां दोन टेकड्यांमधील चिळणींत तें देवस्थान असावें असें वाटलें. थोड्याच वेळानें आम्हीं दोन चार झाडांच्या गर्दछाय राईपाशीं आलों तोंच आम्हांला त्या दरीमधील निर्मळ पाण्याचा व झुळझूळ वाहणारा ओढा व वरच्या बाजूस एक छोटासा डोह दृष्टीस पडला. त्या ओढ्याला छोटासा पूल आहे व टेकडीवर जाण्यास दगडी पायऱ्या आहेत. त्या चढून आम्हीं वर आलों तों फरसबंदी केलेलें पटांगण लागलें. त्याचे पलीकडे छोटेसें महादेवाचें मंदिर होतें. देवळाचे पुढचे बाजूस गच्चीवजा खुली फरसबंदी जागा असून तिला दगडी कठडा केला आहे. देवळाच्या पलीकडे अशीच फरसबंदी खुली जागा असून तेथें एक छोटी बैठी बंगलीवजा इमारत आहे. श्रीमंत महाराजसाहेब या स्थळाला आले म्हणजे थोडावेळ विश्रांति घेण्याकरितां व खाण्यापिण्याकरितां ती बंगली बांधली आहे असें कळलें. या सर्व ठिकाणीं कोठेंही कचरा किंवा घाण दिसली नाहीं किंवा झाडांचा वाळलेला पाचोळा दिसला नाहीं. इतकी स्वच्छता असलेलें निसर्गरमणीय ठिकाण मी पूर्वीं कधींही पाहिलें नव्हतें. जणूं कांहीं कोणी तरी बडा पाहुणा यावयाचा आहे व म्हणून जिकडे तिकडे मुद्दाम स्वच्छता व साफसुफी केलेली आहे असा मला भास झाला. माझ्या बरोबर आलेले मित्र म्हणाले "माधवराव महाराजांचें हें एक आवडतें विश्रांतिस्थान व सहलस्थान होतें व महाराज या ठिकाणाला **अवचित भेट** देत असत. यामुळें या ठिकाणची व्यवस्थापक मंडळी नेहेमीं जागरूक राहून हें स्थळ स्वच्छ व साफसूफ ठेवीत; तोच परिपाठ अद्यापही चालू असल्यामुळें या स्थळाची नेहेमीं उत्तम काळजी घेतली जाते." ग्वालेरच्या आसपासचें हें प्रेक्षणीय स्थळ अपूर्व आहे यांत शंका नाहीं. येथें नैसर्गिक रमणीयता व मानवी करामत यांचा मोठा मनोहर मिलाफ झालेला आहे.

ग्वालेरच्या नव्याजुन्या प्रेक्षणीय स्थळांचा मुकुटमणी म्हणजे ग्वालेर किल्ला होय. अर्थात् तो पाहिल्याखेरीज कोणताही प्रवाशी रहात नाहीं. पूर्वीं किल्ल्यावर जाणें हें प्रयासाचें काम होतें. कारण किल्ला पायीं चढावा लागे व त्याला वेळही बराच लागे; घोड्याच्या गाडीनें गेलें तर त्रास कमी पडे खरा, पण वेळ फारसा कमी लागत नसे. पण हल्लीं ग्वालेर दरबारनें किल्ल्यावर जाण्याजोगा सुंदर मोटार रस्ता केला आहे. तो सुंदर तांबडा रस्ता, दोन्ही बाजूंचे दगडी कठडे व उजव्या हातास किल्ल्याचा भिंतीसारखा उभा खडक व डाव्या हातास खालीं सखल भागांतील तें शहर हा देखावा मोठा नयनमनोहर वाटतो व मनुष्य मोटारीनें तेव्हांच किल्ल्याच्या दरवाज्याच्या समोर येतो. येथें रस्ता बराच उभा असून चढ जरा कठीण आहे व किल्ल्यावरून येणारी मोटार खालून दिसत नाहीं म्हणून येथें रेल्वे रस्त्यावरील फाटकाप्रमाणें निशागाचा लाकडी हात केलेला आहे. मोटार या उचललेल्या हाताशीं आल्याबरोबर तेथला मनुष्य वरच्या माणसास मोटारीबद्दल तारेनें वर्दी देतो म्हणजे तो मनुष्य रस्ता मोकळा आहे व वरून मोटार येत नाही अशा अर्थाची लाकडी हात खालीं पाडण्याची खूण करतो. मग मोटार चालू होते. ही निशाणाची नवी योजना मोटारीचा रस्ता झाल्यापासून करण्यांत आलेली आहे. यामुळें मोटारींची टक्कर होण्याचा मुळींच संभव नाहीं. या लहानशा पण फार सोयीच्या तजविजीवरून भाताची परीक्षा शितावरून होते या म्हणीप्रमाणें किल्ल्यावरील एकंदर व्यवस्थितपणाची व टापटिपीची साक्ष पटली व किल्ल्यावर गेलों तों या गोष्टीचें पदोपदीं प्रत्यंतर पटलें. मी किल्ल्याच्या दरवाज्यांतून किल्ल्याच्या पठारावर आलों तों जिकडे तिकडे त्या स्वच्छ सुंदर तांबूस सडका, त्यांचे बाजूस त्या पांढऱ्या पायवाटा, त्या हिरव्यागार वृक्षराजी व विजेच्या दिव्याचे खांब, त्या नव्या जुन्या इमारतीच इमारती व त्यांचे सभोंवतालच्या आवाराच्या पांढऱ्या शुभ्ररंगी खुज्या भिंती, त्या पुराणवस्तुसंरक्षणखात्यानें लावलेल्या मार्गदर्शक व पुराणवस्तुदर्शक पाट्या, असा सर्वच नवीन देखावा

पाहून मी थक्कच झालों. वीसपंचवीस वर्षांपूर्वी पाहिलेला तो किल्ला हाच काय असा मला क्षणभर संशय पडला ! इतका किल्ल्यावर हल्लीं सर्वच बदल झाला आहे ! पण पूर्वीच्याच त्या बराकांच्या लांबचलांब इमारती, पूर्वीचीच ती **तेलीची लाट** नांवाची उंचच उंच इमारत, पूर्वीचेंच तें मानमंदिर दृष्टीस पडून संशय दूर झाला व पूर्वीचाच प्रख्यात ग्वालेर किल्ला व त्यावरील पुरातन संस्मरणीय वस्तूच आपण पहात आहों अशी खातरी पटली. मागील प्रकरणांत सविस्तर वर्णन केलेल्या इमारतींवर पुनः मीं ओझरती नजर टाकली. सासबाहू देवळानजीकच्या सर्व खुल्या जागेवर पांढरी शुभ्र शहाबादी फरशी केली असून,किल्ल्याच्या तटाला लागून असलेल्या रुंद पायवाटेपर्यंत ती नेली होती व पायवाटही फरसबंदी केली होती. यामुळें त्या सर्व जागेला उच्चासनानें मंडित उघड्या व खुल्या सभागृहाची शोभा आली होती. येथून खालच्या शहराचा व सभोंवारचा दूरवरचा देखावा फार आश्चर्यकारक दिसत होता. बड्या व खास पाहुण्यांना सायंकाळची **चहापार्टी** करण्याकरितां या खुल्या सुंदर सभागृहाचा उपयोग करण्यांत येतो असें समजलें. सासबाहूचीं तीं लहान मोठीं देवळें नव्या कोऱ्या कामासारखीं दिसत होतीं ! किल्ल्यावरील **गुजरी महाल** नांवाच्या इमारतीचा हल्लीं ग्वालेर संस्थानच्या **पुराणवस्तु संग्रहालया**करितां उपयोग करण्यांत आला आहे. याप्रमाणें मी किल्ल्यावरील देखाव्यांत घडून आलेल्या फरकांचें सानंद अवलोकन करीत असतां ग्वालेरच्या पुराणवस्तुसंरक्षण खात्याचे सुपरिंटेन्डेंट रावसाहेब गर्दे हे अकस्मात् भेटले. किल्ल्यावरील जुन्या इमारती नव्यासारख्या केल्याबद्दल, इमारतीच्या आसपासच्या जागा नयनमनोहर केल्याबद्दल व जागजागीं मार्गदर्शक व माहितीदर्शक पाट्या लावून प्रवाशांची सोय केल्याबद्दल मी गर्देसाहेबांचे आभार मानले. त्यांनीं आपल्या खात्यानें प्रसिद्ध केलेली ग्वालेरची व किल्ल्याची माहिती देणारीं सचित्र पुस्तकें मला देऊं केलीं व तीं पुस्तकें नंतर मला मिळालीं

व **आजचें ग्वालेर** हें प्रकरण लिहिण्यांत त्याला त्या पुस्तकांचा फार उपयोग झाला.

झालें, माझें **आजच्या ग्वालेरचें** दृश्य दर्शन संपलें. पण **आजच्या ग्वालेर संस्थानची** संक्षिप्त माहिती येथें दिल्याखेरीज या प्रकरणाची पूर्तता होणार नाहीं.

हिंदुस्थानांत जीं सहासात सुधारलेलीं पहिल्या दर्जाचीं संस्थानें आहेत त्यापैकीं ग्वालेर एक प्रख्यात संस्थान आहे. या संस्थानचें क्षेत्र-फळ सुमारें सव्वीस हजार चौरस मैल असून लोकवस्ती पसतीस लाखांवर आहे. या संस्थानचे तुटकतुटक असे दोन मुख्य भाग आहेत. एक ग्वालेरकडील भाग व दुसरा माळव्याकडील भाग. संस्थानचे एकंदर अकरा जिल्हे असून एकंदर खेडीं दहा हजारांच्यावर आहे. लाखाजवळ वस्ती असलेलीं शहरें म्हणजे हल्लींची राजधानी ग्वालेर व जुनी राज-धानी उज्जेन हीं होत. संस्थानचे हल्लींचे महाराज जार्ज जयाजीराव हे अजून वयांत आले नसल्यामुळें सर्व राज्यकारभार कै. श्रीमंत माधवराव यांनीं केलेल्या व्यवस्थापत्रकाप्रमाणें रीजंट श्रीमती मातोश्री राणीसाहेब यांचे अध्यक्षत्वाखालीं दहा मंत्र्यांचे मंत्रिमंडळाकडे आहे. प्रत्येक मंत्र्याकडे विशिष्ट खातीं सोंपविलीं असून मंत्रिमंडळाच्या ठरावाप्रमाणें अंमलबजावणी करण्याची जबाबदारी त्या त्या मंत्र्यावर आहे. श्रीमंत माधवराव महाराज आपल्या कारकीर्दीमध्यें स्वतः सारखें काम पहात असल्यामुळें त्यांनीं कधींही दिवाणाची नेमणूक केली नाहीं व हल्लीं सुद्धां या संस्थानचा निराळा दिवाण म्हणून मुख्य मंत्री नाहीं.

संस्थानचें वार्षिक उत्पन्न सरासरी दोन कोट रुपये असून उत्पन्नापेक्षां जरा कमी असा दरसालचा खर्च असतो. शिल्लक गंगाजळी म्हणून ग्वालेर संस्थानच्या पिढ्यानुपिढ्या चाललेल्या चालीप्रमाणें ठेवण्यांत आलेल्या निराळ्या खजिन्यांत भरली जाते. श्रीमंत महाराज माधवरावांच्या कारकीर्दीपासून या गंगाजळींतील कांहीं भाग व्याजानें संस्थानांत

कर्जाऊ दिला जातो व त्याचें व्याज फक्त लोकोपयोगी खात्यावर नित्याच्या खर्चापेक्षां अधिक खर्चाकरितां दिलें जातें. या व्याजाचा बराच मोठा भाग शिक्षणाप्रीत्यर्थ खर्च होतो व बाकीची रक्कम शेतकी, वैद्यक व पतपेढी या खात्यांना दिली जाते. सुमारें दरसाल सात लक्ष रुपये शिक्षणाकडे खर्च होतात व पांच लाख इतर तीन खात्यांमिळून खर्च होतात. अर्थात् या रकमा नेहेमीच्या जमाखर्चांतील खर्चाचे रकमां-खेरीज देणग्या म्हणून त्या त्या खात्याला दिल्या जातात. उ. शिक्षणा-प्रीत्यर्थ नेहमींच्या जमाखर्चांतून सुमारें पांच लाख खर्च होतात व गंगाजळीच्या व्याजांतून दरसाल सात लक्ष रुपये शिक्षणखात्याला मिळतात. याप्रमाणें श्रीमंत माधवराव महाराजानीं जमाखर्चाची मोठी सोयीची व प्रगतीपर व्यवस्था करून ठेविली व त्याप्रमाणेंच हल्लीं कौन्सिलचा कारभार चालू आहे.

ब्रिटिश मुलखांत सुद्धां जी सुधारणा अजून अमलांत आली नाहीं ती सुधारणाही ग्वालेर संस्थानांत अंमलांत आलेली आहे. ती म्हणजे न्याय व अंमलबजावणी हीं कामें निरनिराळ्या अंमलदारांकडे सोंपवि-ण्यांत आलीं आहेत. यामुळें प्रजेला निःपक्षपाती न्याय मिळण्याची सोय झाली आहे. ग्वालेर संस्थानच्या राज्यकारभारासंबंधीचें पुस्तक वाचलें म्हणजे श्रीमंत महाराज माधवराव यांनीं घालून दिलेल्या प्रगती-पर राज्यकारभारपद्धतीचें कौतुक वाटतें. या प्रगतीपर कारभाराचें आणखी एक गमक म्हणजे संस्थानांतील सरदार व जहागीरदार यांच्याबद्दल महाराजांनीं केलेल्या व्यवस्थेवरून दिसतें. ग्वालेर संस्थानांत या वर्गाची संख्या जवळ जवळ सहाशें आहे. यामध्यें निर-निराळ्या जातीचे लोक आहेत. त्यांत रजपूत घराणीं सुमारें अडीचशें आहेत, ब्राह्मणघराणीं सुमारें एकशें तीस आहेत, मराठ्यांचीं घराणीं सुमारें पन्नास आहेत व मुसलमान घराणीं सुमारें तीस आहेत. या सरदार व जहागीरदार वर्गाच्या हितसंरक्षणार्थ महाराजांनीं **रजपुत हितकारिणी** सभा व **महाराष्ट्र हितकारिणी** सभा नांवाच्या

सभा स्थापन केल्या आहेत. या वर्गाच्या मुलांना इंग्रजी शिक्षण देण्या-करितां ग्वालेरच्या किल्ल्यामध्यें सरदार स्कूल म्हणून एक शाळा मागल्या महाराजांनीं काढली होती. सध्यां त्या शाळेचा शिक्षणक्रम केंब्रिज सीनियर प्रवेश परीक्षेइतका करण्यांत आला असून त्या शाळेची व्यवस्था इंग्लंडांतील पब्लिक स्कूलांच्या धर्तीवर करण्यांत आली असून शाळेला **शिंदे पब्लिक स्कूल** असें नवें नांव देण्यांत आलें आहे. असो.

ग्वालेर संस्थानांत सरदार व जहागीरदार यांची संख्या बरीच मोठी आहे खरी. पण सुमारें पन्नास हजार ते दीड लाख रुपयांचें सालिना उत्पन्न असणारे जहागीरदार सहाच आहेत व तीं घराणीं इतिहास-प्रसिद्ध घराण्यांपैकींच आहेत. हीं सहा सरदार घराणीं खालील होत: फाळके, महाडिक, राजवाडे, जाधव, आंग्रे व शितोळे. हीं सर्व घराणीं मूळचीं महाराष्ट्रांतील असून त्यांतील बहुतेक पुरुषांनीं महादजी शिंद्यांच्या उत्तर हिंदुस्थानांतील लढायांमध्यें उत्तम कामगिरी केल्यामुळें त्यांना जहागिरी मिळाल्या. या जहागीरदारांमध्यें शितोळ्यांचें घराणें पहिल्या दर्जाचें आहे. या घराण्यांतील सध्यांचे जहागीरदार श्रीमंत **बाळासाहेब शितोळे** यांना माझा उत्तर हिंदुस्थानचा प्रवास-पुष्प अर्पण केलें आहे व त्यांनीं या पुस्तकाच्या प्रकाशनास उदार आश्रय दिला आहे. तेव्हां त्यांच्या घराण्याचा व त्यांचा जास्त विस्तृत परिचय करून देणें गैर होणार नाहीं.

सरदार बाळासाहेब **शितोळे** यांचें घराणें शिवाजी महाराजांच्या कारकीर्दींमध्यें उदयास आलें. या घराण्यांतील **शिधोजी** या वीर पुरुषाच्या शौर्याबद्दल महादजी शिंद्यानें फार वाखाणणी केली. पुढें त्यानें आपली मुलगी बालाबाई हिचें शिधोजीचा शूर मुलगा लाडोजी याच्याशीं लग्न केलें. लाडोजीनें भरतपूरच्या लढाईत आपली तलवार गाजविली. लाडोजीचा पुत्र सिमोजी नरसिंग यानें हैदराबादकरांवरील स्वारींत

मोठी बाहादुरी गाजविली. अशा मोठ्या शूर वीर घराण्याचे सध्यां
सरदार **मालोजीराव नरसिंग** ऊर्फ बाळासाहेब हे प्रतिनिधि आहेत
मालोजीराव दोन वर्षांचे असतांना त्यांना श्रीमंत नरसिंगरावांनीं स
१९०२ सालीं दत्तक घेतलें. सरदार मालोजीराव हे चांगले शिकले
असून त्यांनीं खूप प्रवास केलेला आहे. ते स्वतंत्र आगबोट करून लं
व रामेश्वर येथें गेलेले आहेत. त्यांनीं हिंदुस्थान तर पाहिलें आहेच. प
त्यांनीं विलायत व युरोप येथपर्यंत प्रवास केला आहे. युरोप
असतांना ते इटलींत फ्लॉरेन्स शहरीं गेले होते. तेथें कोल्हापूरचे
माजी राजाराम महाराज यांची छत्री आहे. त्या छत्रींचा त्यांनीं मुद्द
फोटो घेऊन तो इकडे आणिला. अशा बहुश्रुत व प्रवासप्रिय सरद
साहेबांचा व माझा परिचय होऊन तो कायमचा रहावा असा योगाय
या पुस्तक-प्रकाशनानें आला. तेव्हां सरदारसाहेबांचे त्यांच्या आश्रय
बद्दल जाहीर आभार मानून आजचें **ग्वालेर** या प्रकरणाची समा
करतों.



नं. ९ ] फ्लारेन्समधील के. राजाराम महाराज छत्रपती कोल्हापूर यांची छत्री [पान ५२

हिंदुस्थानांतील मोंगल बादशाही राजघराण्याचा उदयास्तामधील काळ सरासरी तीनशें तीस ( १५२६–१८५७ ) वर्षांचा आहे. तरी मोंगल बादशाहीच्या खऱ्या राजवैभवाचा व साम्राज्यसत्तेचा काळ सुमारें एकशें ऐशी वर्षांचाच ( १५२६–१७०७ ) आहे. या काळांत सहाच प्रख्यात बादशाह होऊन गेले.

हिंदुस्थानांतील मोंगल घराण्याचा प्रस्थापक व हिंदुस्थानचा पहिला मोंगलबादशहा याची कारकीर्द संकटमय पण भाग्यशाली होती. **बाबर** वयाच्या अकराव्या वर्षीं **समरकंदाचा** राजा झाला. पण त्या डळमळींत राज्यपदावरून त्याची दोनदां पदच्युति झाली. तरी पण त्याचा काबूलवरील ताबा केव्हांही नष्ट झाला नाहीं. त्यानें हिंदुस्थानावर सन १५२६ च्या पूर्वीं लहान लहान स्वाऱ्या केल्या होत्या. पण आग्र्याच्या अफगाण राजघराण्यांतील सुलतान इब्राइम लोदी याच्या जुलमी व अरेरावी राज्यकारभाराला कंटाळून त्याच्या सरदारांनीं व सुभेदारांनीं बाबरजवळ लष्करी मदत मागितली. ही संधि साधून बाबरनें जय्यत तयारी करून तोफखान्याच्या नव्या अंगानें युक्त अशा आपल्या चतुरंग सैन्यासह सन १५२६ मध्यें हिंदुस्थानावर स्वारी केली. सुलतान इब्राईम लोदी व बाबर यांची निकराची लढाई पुराणप्रसिद्ध **पानिपत** येथील रणभूमीवर झाली. अर्वाचीन इतिहासांतील पानिपतचें हें पहिलें घनघोर युद्ध होय. या युद्धामध्यें **इब्राईम लोदीचा पूर्ण** पराभव होऊन सुलतान धारातीर्थीं मरण पावला. लागलींच दिल्ली व आग्रा हीं शहरें **बाबरच्या** स्वाधीन झालीं. **बाबरनें** आपला थोरला मुलगा **हुमायून** याला आग्र्यास पाठविलें व सर्व खजिना आपल्या ताब्यांत घेतला. पानिपतच्या युद्धामध्यें कामास आलेल्या ग्वालेरच्या राजाच्या राणीनें मांडलिकत्वाच्या कबूलीदाखल एक हिऱ्याचा हार **हुमायुनास** अर्पण केला. **बाबरच्या** प्रख्यात आत्मचरित्रांत म्हटलें आहे कीं, या हिऱ्याच्या हारांत प्रख्यात **कोहिनूर** ( प्रकाशपर्वत ) हिरा होता. हा प्रख्यात

हिरा नादिरशहाकडे गेला; पुढें तो पंजाबचा सिंह रणजीतसिंह याकडे आला व धुलीपसिंगाकडून एका इंग्रजाकडे आला. मोंगल बादशाहापासून मालकीच्या अशा परिवर्तनानंतर शेवटीं तो हिरा इंग्लिश राजघराण्याच्या मालकीचा झाला. हा हिरा हल्लीं टॉवर ऑफ लंडन नांवाच्या राजवाड्यांतील जवाहिरखान्यांत ठेवलेला आहे. ( माझ्या विलायतच्या यात्रेंत हा प्रख्यात हिरा पहाण्याची मला संधि मिळाली होती. )

पानिपतच्या लढाईनंतर मिळालेलें राज्यपद स्थिर करण्याकरितां बाबरला आणखी एक घनघोर युद्ध करावें लागलें. आग्र्याच्या पश्चिमेस तीस मैलांवर **बयाना** म्हणून गांव आहे. त्या बाजूनें उदेपूर-मेवाडचा **राणा संघ** हा मोठ्या रजपूत सैन्यासह **बाबर**वर स्वारी करण्याकरितां आला. तेव्हां बाबरला या रजपूत सैन्याला तोंड देणें भाग पडलें. शूर रजपूत शिपायांनीं बाबरच्या सैन्याची फार नासाडी केली व बाबरचा या लढाईंत पराभवच व्हावयाचा; पण बाबरनें एका राजद्रोही रजपुताच्या साहाय्यानें शेवटीं **राणा संघाचा** पराभव केला. ही लढाई सन १५२७ मध्यें झाली. बाबर बादशाह सुशिक्षित व विद्याभिलाषी होता; परशीयन संस्कृतीची त्याच्या मनावर छाप बसलेली होती. तो स्वतः लेखक होता. हिंदुस्थानचा सुसंगत अर्वाचीन इतिहास तयार होण्यास बाबरच्या आत्मचरित्राचा फार उपयोग झालेला आहे. बाबर सन १५३० मध्यें आग्रा शहरीं वारला. पण त्याच्या इच्छेप्रमाणें त्याची कबर काबूल शहरीं बांधली गेली.

बाबरचा थोरला मुलगा **हुमायून** यानें काबूल व पंजाब प्रांत आपल्या भावाला दिला व स्वतः तो दिल्ली आग्रा येथल्या गादीवर बसला. पण नव्या व नुकत्याच संपादन केलेल्या राज्याचा कारभार यशस्वी रीतीनें चालविण्याचें सामर्थ्य व शहाणपण त्याचे अंगीं नव्हतें. त्याचेसंबंधीं विनोदानें खालील विधान एका लेखकानें केलें आहे. " कारभारांत चुकी करण्याची एकही संधि हुमायुनानें चुकविली नाहीं." यामुळें

कारकीर्दीचीं दहा वर्षें पुरीं होत आहेत तोंच **शेरशहा** या अफगाण सरदारनें **हुमायुनास** सन १५४० मध्यें दिल्ली-आग्र्यांतून हाकून लाविलें. **शेरशहानें** हुमायुनानें सुरू केलेला दिल्लीचा पुराणा किल्ला पुरा केला व सन १५५५ पर्यंत राज्य केलें. राज्य गमावून दिल्ली-आग्र्याहून परशीयाच्या शहाकडे पळत जात असतांना राजपुतान्याच्या वाळवंटांत सन १५४२ सालांत एका मोठ्या झाडाच्या गर्द छायेखालीं असतांना **हुमायून** व त्याची परशीया देशांतील राणी **हमीदा** यांना पंधरा आक्टोबर रोजीं एक पुत्र झाला ! हाच पुढें प्रख्यात **अकबर** बादशाह बनला. हुमायुनानें सुमारें पंधरा वर्षें वनवास भोगला व सन १५५५ मध्यें त्यानें आपली गादी परत मिळविली व तो दिल्ली येथें पुराण्या किल्ल्यामध्यें राहूं लागला. पण **शीरशहानें** बांधलेल्या **शीरमंडळ** नांवाच्या ग्रंथ-संग्रहालयाच्या छोट्या इमारतीच्या जिन्यावरून उतरतांना हुमायुनाचा पाय घसरला व दुखावला. त्या दुखण्यानें **हुमायून** सन १५५६ मध्यें मृत्युमुखीं पडला. त्याच्या राणीनें त्याची कबर दिल्लीस बांधली. मोंगल बांध-कलेच्या उत्तम मासल्यापैकीं ही कबर ही पहिलीच इमारत होय.

हुमायुनाचा मुलगा **अकबर** सन १५५६ मध्यें वयाच्या चवदाव्या वर्षीं गादीवर आला व त्यानें पन्नास वर्षें राज्य केलें. अकबर हा अलौलिक पुरुष होऊन गेला. त्यानें हिंदुस्थानांत खरें मोंगल साम्राज्य स्थापन केलें. त्याचा अंमल सर्व उत्तर हिंदुस्थानभर पसरला. त्यानें आपल्या राज्याला खरें स्थैर्य येण्याकरितां व हिंदू व मुसलमान या दोन धर्मांच्या अनुयायांची एकी होण्याकरितां रजपूत घराण्यांतील राजकुमारिकांशीं विवाह करण्याची पद्धत पाडली व प्रथम जोधपूरच्या जोधबाई राजकुमारिकेशीं लग्न केलें. त्यानें सर्व धर्मांच्या लोकांना समानतेनें वागविलें इतकेंच नाहीं तर हिंदु धर्म व मुसलमानी धर्म यांचा मिलाफ घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

आपलें साम्राज्य स्थापन करण्याकरितां अकबरास पुष्कळ लढाया कराव्या लागल्या. त्याच्या कारकीर्दीच्या प्रारंभीं बहिरामखान नांवाचा

बाबरबरोबर आलेला व पुढें प्रख्यात सेनापति बनलेला सरदार यानें पानिपतच्या रणक्षेत्रीं प्रख्यात **हेमू** नांवाच्या रजपूत सेनापतीचा पराभव केला व अकबर निर्वेधपणें गादीवर आला. त्यानें आग्रा ही आपली राजधानी केली. तेथें सन १५६५ मध्यें यमुनेच्या कांठीं तांबड्या दगडाच्या सत्तर फूट उंचीच्या दीड मैल घेराच्या तटानें अलंकृत असा आग्र्याचा प्रख्यात किल्ला बांधण्यास सुरवात केली व आठ वर्षांमध्यें आरबी-भाषेंतील गोष्टींतल्या अजब राजवाड्याप्रमाणें भासणारा राजवाडा किल्ल्यामध्यें तयार झाला. पण हा वाडा व किल्ला पुरा होतो न होतो तोंच अकबरानें **फत्तेपूरशिक्री** येथें नवी राजधानी निर्माण करण्याचा बेत केला. तो कां व कसा केला हें खालील हकीकतीवरून कळून येतें.

अकबराचीं बरींच मुलें लहानपणीं वारलीं होतीं व पुत्रप्राप्तीबद्दल त्याला मोठी चिंता लागली होती. आग्र्याहून तेवीस मैलांवर असलेल्या **शिक्री** या खेडेगांवीं **शेखसालिम किस्ती** नांवाचा एक मुसलमान साधु रहात असे. तपःसामर्थ्याबद्दल व साधुत्वाबद्दल त्याची कीर्ति अकबराच्या कानावर आली. म्हणून अकबर त्या साधूच्या भेटीस गेला व त्यानें आपल्या मनांतील गुह्य गोष्ट साधूस सांगितली. शेख सालीम किस्तीनें शिक्री येथें आपल्या हिंदू राणीस राहण्यास पाठविण्याबद्दल सुचविलें. तदनुरूप अकबरानें व्यवस्था केली व वर्षाच्या आंत अकबराच्या हिंदू राणीस पुत्ररत्न झालें. हाच **सालिम** मोठेपणीं **जहांगिर** म्हणून प्रख्यात बादशाह झाला.

साधूच्या सांगीप्रमाणें आपल्याला पुत्ररत्न झालें; याबद्दल अकबरास फार आनंद झाला. ज्या ठिकाणीं आपल्याला पुत्ररत्न झालें तेथेंच नवी राजधानी निर्माण करण्याचा अकबरानें निश्चय केला. तदनुरूप एका एकाकी टेकडीवर सन १५६९ मध्यें नव्या नगराची स्थापना झाली व जादुगारानें कांडी फिरवून नवी सृष्टि निर्माण करावी त्याप्रमाणें **फत्तेपूर शिक्री** नांवाची नवी नगरी निर्माण झाली. ही नगरी मोगल बांधकला

व खोदकला यांच्या कमालीचें मूर्तिमंत रूप होय असें प्रेक्षकांस वाटल्यावांचून रहात नाहीं. पण स्थापनेपासून अवघ्या अर्ध्या शतकांत ही राजधानी **टाकलेली नगरी** झाली. कारण येथें पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणें अशक्य झालें. कारण येथें मिळणारें पाणी इतकें खारट व विषारी होतें कीं रहिवाश्यांमध्यें मृत्युसंख्येचें प्रमाण अतोनात वाढलें.

अकबराचे कारकीर्दीमध्यें सन १५९७–९८ च्या सुमारास तीन इंग्रज एलिझबेथ राणीकडून पत्र घेऊन अकबर बादशाहाच्या दरबारीं आले. त्यांपैकीं एक नाहींसा झाला. दुसऱ्यानें बादशाहाची नोकरी धरली व तिसरा लंडनचा व्यापारी **राल्फ फिच** यानें देशीं परत गेल्यावर "ईस्ट इंडियाशीं" व्यापार करण्याकरितां एक कंपनी काढली व सन १६०० मध्यें त्या कंपनीला राणीकडून त्यानें सनद मिळवून दिली. पुढें दुसरी एक प्रतिस्पर्धी व्यापारी कंपनी निघाली; पण नंतर या दोन्ही कंपन्या एकत्र झाल्या. ती एकत्रित कंपनी सर्व हिंदुस्थानभर ब्रिटिशांचें साम्राज्य स्थापन करणारी प्रख्यात "ईस्ट इंडिया कंपनी" होय. हिलाच **जॉन कंपनी** या टोपण नांवानें लंडनकर ओळखीत असत. अर्धशतकाच्या अकबराच्या कारकीर्दीनंतर जहांगिर (१६०५ ते १६२७) बादशहा झाला व त्यानें बावीस वर्षें राज्य केलें. हा कधीं आग्र्यास तर कधीं लाहोरास राहात असे. काश्मीर हें त्याचें आवडतें शीतलनिवासस्थान होतें.

जहांगिर फार दारूबाज होता. पण पुढें त्याच्या सुदैवानें परशीयांतील एका कुलीन पण गरीब घराण्यांतल्या नूर-इ-नीसा नांवाच्या बाईवर त्याचें प्रेम जडलें व तिच्याशीं जहांगिरानें लग्न केलें व ती पट्टराणी झाली. ती **नूरजहान** (जगाची चंद्रिका) नांवानें इतिहासांत प्रख्यात आहे. तिनें बादशाहाला ताळ्यावर आणलें व तिच्याच सल्ल्यानें येवढ्या मोठ्या साम्राज्याचा कारभार चालत असे. नूरजहान केवढी अलौकिक विभूति होती हें खालील एका क्षुल्लक गोष्टीवरून कळून येतें.

धार्मिक वेडाच्या एका लहरींत जहांगिरानें पशुहत्या करण्याचें सोडलें होतें. पण राजधानीनजीक एक वाघ माणसें खाण्यास सवकला असून त्यानें पुष्कळांचे प्राण घेतले हें कळल्यामुळें बादशाह राणीस बरोबर घेऊन शिकारीस निघाला. पण वाघ दृष्टीस पडला त्याक्षणीं त्याला आपल्या अहिंसाव्रताची आठवण झाली व त्यानें नूरजहान राणीस वाघावर गोळी घालण्यास सांगितलें. तिनें बेधडक वाघावर गोळी घातली व एकाच गोळीनें वाघास ठार केलें!

जहांगिराच्या कारकीर्दीमध्यें कॅप्टन विल्यम हॉकीन्स् नांवाचा इंग्रज नावाडी दरबारीं आला. तो आग्र्यामध्यें तीन वर्षें राहिला व दरबारचा '**इंग्लीशखान**' बनला. त्याचे हातून **जॉन कंपनीचें** काम साध्य झालें नाहीं. तें पुढें प्रख्यात **सर टॉमस रो** यानें यशस्वी रीतीनें पार पाडलें व तेव्हांपासून कंपनीला मोंगल साम्राज्यांत व्यापाराच्या सवलती मिळाल्या.

या कारकीर्दीमध्यें साहजिकपणें नूरजहान राणीचा बाप इतमत उद्दौला हा मोठ्या हुद्यावर चढला. त्याच्या मृत्यूनंतर नूरजहान राणीनें यमुनेच्या उत्तर तीरावर त्याची सुंदर कबर बांधविली. जहांगिर बादशाह लाहोरास वारल्यामुळें त्याचें कबरस्थान तेथेंच बांधलें गेलें व बादशाहाच्या कबरीशेजारींच नूरजहान राणीची कबर बांधण्यांत आली.

जहांगिरानंतर त्याचा थोरला मुलगा शहाजहान हा गादीवर आला व त्यानें सन १६२८ ते सन १६५८ पर्यंत प्रत्यक्ष राज्य केलें. मोंगल बादशाहीच्या वैभवरवीचा हाच माध्यान्ह काळ होय व मोंगल कलचा तर तो कळस होय. शहाजहानानें शहाजहानाबाद (हल्लींचें दिल्ली शहर) वसविलें; त्यानेंच दिल्लीचा प्रख्यात किल्ला बांधला. त्यानें मुसलमानी जगांतील कदाचित् सर्वांत मोठी अशी दिल्लीची जुम्मामशीद बांधली. त्यानेंच आग्रा किल्ल्यांतील कांहीं इमारती बांधल्या व शेवटीं त्यानेंच जगांतील **सात आश्चर्यांमध्यें** अन्तर्भूत झालेला **ताजमहाल** बांधला.

आपल्या कलाकौशल्यांच्या कामांनीं मोंगल बादशहीची व मोंगल कलांची अजरामर कीर्ति करून ठेवणाऱ्या बादशाहाचा वृद्धापकाळ चार पुत्रांच्या भाऊबंदकीमुळें व राज्यतृष्णेमुळें आग्रा किल्ल्यांतील एका छोटया खोलींत बंदिवासांत गेला व शहाजहानानें सन १६६६ मध्यें ताजमहालाकडे पहात तुरुंगवासांत प्राण सोडला!

आपल्या तिन्ही भावांची वाट लावून औरंगजेब बादशाह सन १६५८ मध्यें गादीवर बसला व त्यानें अर्धशतक राज्य केलें. हा बादशाह सर्व मोंगल बादशाहांमध्यें अत्यंत कडवा मुसलमान होता. म्हणूनच धर्मवेडया मुसलमानांना औरंगझेब हा **अलमगिर** वाटे व अजूनही वाटतो. पण औरंगझेबाच्या असहिष्णु धर्मवेडानें मोंगल साम्राज्याला सर्व बाजूनें शत्रू उत्पन्न झाले व त्यांच्याशीं झगडण्यांत औरंगझेबानें साम्राज्याचें सर्व सामर्थ्य खर्च केलें व मोंगल साम्राज्याला उतरती कळा लागली. औरंगझेबानें हिंदू धर्माचा छळ केला व मथुरा व काशी येथील पवित्र देवळें पाडून त्यांच्या ज्योत्यावर, व हिंदूंच्या भर वसाहतीमध्यें हिंदूंच्या छातीवर पाय दिल्याचीं जणूं कांहीं मूर्तिमंत स्मारकें अशा मशिदी बांधल्या! व दिल्लीच्या किल्ल्यामध्यें मोती मसजिद नांवाची छोटी संगमरवरी इमारत बांधली. औरंगझेबाची कलाविषयक कामगिरी एवढीच! बाकी त्याचें सर्व आयुष्य हिंदूंचा पाडाव व पाणउतारा करण्यांत व त्यांच्याशीं झगडण्यांत गेलें. औरंगझेब सन १७०७ मध्यें वारला. त्याचेनंतर दिल्लीच्या तक्तावर किती तरी बादशाह बसले. पण ते **आले–गेले** कोटींतले होते. त्यांचे हातीं संपत्ति किंवा सत्ता राहिली नाहीं. केव्हां केव्हां तर राहत्या राजवाड्या पलीकडे त्यांची सत्ता राहिली नव्हती. तरी पण नामधारी मोंगल बादशाही सन १८५७ सालच्या बंडापर्यंत चालू होती. पण बंडांत सामील झाल्याबद्दल दुसऱ्या बहादूरशहाला हद्दपार करण्यांत आलें व तो मोंगल बादशाहीचा शेवटचा बादशाह रंगून येथें वारला! दिल्ली–आग्रा–फत्तेपूरशिक्री या त्रिस्थळी वर्णनाचें या व पुढील प्रकर-

णांत रेखाटावयाचें शब्दचित्र उठावांत दिसण्याकरितां व तें चित्र कळण्याकरितां रंगचित्राच्या पार्श्वभूमीप्रमाणें या प्रकरणाचे प्रारंभीं मोगल बादशाहाच्या उदयास्ताचा संक्षिप्त गोषवारा येथपर्यंत सांगितला. तेव्हां आतां प्रथम आग्रा वर्णनास लागूं या.

गेल्या पंचवीस वर्षांमध्यें मीं उत्तर हिंदुस्थानचा प्रवास कधीं कामाकरितां तर कधीं करमणुकीकरितां कैक वेळां केला आहे व तो प्रवासही केव्हां बी. बी. सी. आय. रेलवेच्या **नागडा भरतपुर मथुरा** या मुख्य रस्त्यानें किंवा **नागडा बयाना-आग्रा** या रेलवे फाट्यांनीं केला आहे तर केव्हां जी. आय. पी. आरच्या **बॉबे-बिना-ग्वालेर** या मुख्य रेलवे रस्त्यानें केला आहे. अशा तऱ्हेनें प्रवास केला म्हणजे **आग्रा** शहर वाटेवर येत असल्यामुळें तेथें कांहीं वेळाचा मुक्काम करावासा वाटतो. असा मुक्काम पडला म्हणजे आग्रा शहरांतील प्रेक्षणीय स्थळांचा मुकुटमणी **ताजमहाल** हा पाहिल्याखेरीज व शहरांत थोडा फार फेरफटका केल्याखेरीज मनुष्य रहात नाहीं; तसेंच अशा मुक्कामामध्यें शहरांतील राहण्याच्या निरनिराळ्या सोयींचा उपयोग करावा लागतो. तदनुरूप मीं कधीं स्टेशनवर क्लोकरूममध्यें सामान ठेवून अर्धाअधिक दिवस आग्रा शहर पाहण्यांत घालविला आहे, तर कधीं आग्रा शहरांतील **राजा की मंडी** या स्टेशननजीक असलेल्या धर्मशाळेंत खोली घेऊन एक दोन दिवसांचा मुक्काम केलेला आहे; तर कधीं कॉलेजच्या वसतीगृहांत थोडा वेळ मुक्काम करून तिकडील चौक्याच्या पद्धतीच्या क्लबामध्यें डाळ रोटी खाऊन आग्र्यामधील शिक्षणसंस्था पाहिल्या आहेत. अशा तऱ्हेनें आग्रा शहर मीं नानावेळां पाहिलें असल्यामुळें एका फोटोग्राफीच्या काचेवर एकापेक्षां अधिक वेळां फोटो घेतल्याप्रमाणें माझ्या मनाची स्थिति झालेली होती. म्हणून " माझा उत्तर हिंदुस्थानचा प्रवास " या पुस्तकाची ही तिसरी आवृत्ति छापण्यापूर्वीं मीं मुद्दाम **दिल्ली आग्रा फत्तेपूरशिक्री** ही त्रिस्थळी यात्रा एप्रिल सन १९३५ मध्यें केली व नुकत्याच पाहिलेल्या दृश्यदर्शनाचेंच मी येथें वर्णन करणार आहें. पण तें तारीखवार वर्णन

देण्यापूर्वीं आग्रा शहराचें सामान्य स्वरूप व त्याची भौगोलिक उपस्थिति सांगणें सोयीचें होईल.

यमुना नदीच्या पश्चिम किंवा दक्षिण कांठावर सोनपत, पानपत, दिल्ली, मथुरा व आग्रा हीं इतिहासप्रसिद्ध शहरें वसलेलीं आहेत. दक्षिणेकडून उत्तर हिंदुस्थानचा प्रवास करणारास **आग्रा** हें यमुना कांठचें शहर प्रथम लागतें. यमुना नदी हिमालयाच्या दक्षिण पाणलोटाकडून **जम्नोत्री**-पासून निघते ती प्रथमतः साधारणपणें दक्षिणवाहिनी आहे. ती आग्र्याच्या-पर्यंत दक्षिणवाहिनी राहते व आग्र्यापासून ती आग्नेय ( दक्षिण पूर्व ) वाहिनी बनते. तेव्हां आग्रा हें शहर यमुनेच्या पश्चिम तीरावर व दक्षिण तीरावर वसलेलें आहे असें म्हणतां येतें. आग्रा शहर रेलवे मार्गानें मुंबईहून ८३४ मैल आहे तर कलकत्त्याहून ८४२ मैल आहे. रेलवे रस्ता होण्यापूर्वीं **बांबे आग्रा रोड** नांवाचा मोठा रहदारी राजरस्ता होता. तो हल्लीं मोटारीचा बादशाही रस्ता झालेला आहे. आग्रा हें जी. आय. पी. रेल्वेचें, ई. आय. रेल्वेचें व बी. बी. सी. आय. रेल्वेच्या मिटरगेज व ब्रॉडगेज अशा दुहेरी रेल्वे रस्त्यांचें जंक्शन स्टेशन आहे.

याप्रमाणें आग्रा शहर चार रेल्वेचें जंक्शन असल्यामुळें शहरामध्यें रेल्वे रस्त्यांचें जणूं कांहीं जाळें पसरलेलें आहे, असा आग्र्यामध्यें प्रथम प्रवेश करणारास भास होतो व शहरांतील अनेक रेल्वे स्टेशनांवरून तो भास वृथा नाहीं हें समजून येतें. **कँटोन्मेंट स्टेशन, राजाकीमंडी व त्रिलोचपूर** अशीं जी. आय. पी. रेलवेचीं तीन स्टेशनें आग्रा शहरांत आहेत; **जमनाब्रीज** व **सिटी** स्टेशन नांवाचीं ई. आय. रेलवेचीं दोन स्टेशनें आहेत. व बी. बी. सी. आय. रेलवेचीं **आग्रा** फोर्ट व **इद्गा** अशीं दोन स्टेशनें ब्राड व मिटर अशा दोन्ही गेजच्या रस्त्यांवर आहेत.

आग्रा शहर यमुनेच्या पश्चिम व दक्षिण तीरावर पसरलेलें आहे. कारण यमुना नदीनें येथें बरोबर धनुष्याकार धारण केला आहे. शहराचा विस्तार पूर्व पश्चिम दिशेपेक्षां दक्षिणोत्तर दिशेनें जास्त आहे.

शहराच्या उत्तरेकडून यमुनेचा एक कालवा गेला आहे त्यामुळें तो शहराची उत्तर मर्यादाच बनला आहे. या कालव्याच्या लगतच कालव्याच्या दक्षिणेला सरकारी कचेऱ्या, कोर्टें व तुरुंग इत्यादि इमारती व त्यांच्या अनुषंगानें वसलेला नवा शहराचा भाग आहे. त्याचे दक्षिणेस आग्र्याचें मुख्य शहर आहे व तेथें शाळा कॉलेजादि शिक्षणसंस्था व त्यांच्या इमारती व यमुना नदीच्या कांठीं आग्र्याचा किल्ला, जुमामशीद व म्युनिसिपल कचेरी इत्यादि इमारती आहेत. ताजमहाल व त्याच्या आसपासच्या इमारती व बागा या यमुना नदीच्या वाकणानंतरच्या पूर्ववाहिनी प्रवाहाचे दक्षिणेस आहेत. ताजमहालाच्या इमारतीचा हा शहराचा पूर्वभाग व कँटोन्मेंट स्टेशनचा पश्चिमभाग याचे दरम्यानच्या भागांत आग्र्याचें कँटोन्मेंट स्टेशन आहे असें आग्रा शहराचें चौकोनी सामान्य स्वरूप आहे. यमुना नदीचें धनुष्याकार पात्र शहराच्या ईशान्य ( उत्तरपूर्व ) दिशेस आहे. शहराची लोकसंख्या दोन लाखांचे वर आहे व त्यामध्यें शेंकडा ८० हिंदुधर्माचे लोक आहेत.

मागें सांगितल्याप्रमाणें आग्रा शहरामध्यें जी. आय. पी. रेलवेचीं आग्रा कँटोन्मेंट, राजाकीमंडी व बलोचपुर अशीं तीन स्टेशनें आहेत. ग्वालेरकडून गेल्यास कँटोन्मेंट स्टेशन आधीं लागतें; तर दिल्ली मथुरेकडून आल्यास राजाकीमंडी स्टेशन आधीं लागतें. आग्राशहरीं उतरण्याच्या दृष्टीनें मुंबईकडून जाणारी पंजाबमेल व दिल्लीकडून येणारी झांशी प्यासेंजर या गाड्या फार सोयीच्या आहेत. कारण या दोन्ही गाड्या दिवसाउजेडीं सव्वापांच साडेपांच याचे दरम्यान **राजाकी मंडी** स्टेशनला एकदमच येतात. बी. बी. सी. आय. रेलवेकडून येण्यास अशी सोयीची गाडी नाहीं. तिकडून येतांना **बयाना** येथें रात्रीचे चार पांच तास थांबावें लागतें व प्रवासी तेथून सकाळीं पावणेसात वाजतां निघून सव्वानऊ वाजतां आग्र्यास येऊं शकतो.

ग्वालेर मुंबईहून जी. आय. पी. रेलवे मार्गानें ७६२ मैल आहे व तेथून आग्रा ७२ मैल आहे. पंजाब-मेल ग्वालेरला दुपारीं तीन वाजतां


येते व वर सांगितल्याप्रमाणें ती आग्र्यास सव्वापांच वाजतां पोहोंचते. ग्वालेरपासून धोलपुरपर्यंतचा मुलूख खडकाळ व भुरख्या माळरानाचा आहे. धोलपुराचे जरा आधीं चंबळा नदीवरील मोठा पूल लागतो. चंबळा नदी ही शिंदे सरकारच्या राज्याची उत्तर सीमा होय. चंबळा नदी बरीच खोल असून तिच्या दोन्ही कांठांकडील पांढरट जमिनीमध्यें राक्षसी ओहोळ व घळी पडलेल्या दिसतात. यामुळें हा भूमिभाग विलक्षण आश्चर्यकारक वाटतो. पण चंबळा नदीचा उत्तर कांठ व तेथल्या त्या आ पसरलेल्या सुक्या ठणठणीत घळी व ओहोळ टाकून पुढें गेलें म्हणजे मात्र सपाट, सुपीक, विपुल पाण्याचा हिरवागार नयनमनोहर असा यमुना नदीच्या दक्षिण तीरानजीकचा भूमिभाग लागतो. याच्या दर्शनानें मन आनंदित होतें तोंच प्रवाशी आग्रा कँटोन्मेंट स्टेशनला येऊन पोहोंचतो. आग्र्याचें हें स्टेशन बरेंच मोठें आहे. आग्रा शहराचें स्टेशन राजाकी मंडी हें थोड्याच वेळांत येतें. मी या खेपेला स्टेशनच्या लोखंडी कठड्याच्या कांपाऊंडला लागून असलेल्या नव्याच बांधलेल्या चंद्रमहाल नांवाच्या हॉटेलमध्यें उतरलों. रेलवे रस्त्यावरील जिना टाकल्याबरोबर हें हॉटेल लागतें. आगगाडींतच भेटलेले व आग्रा पहाण्यास आलेले दोन बंगाली व एक मद्रासी असे चार सहप्रवासी आम्ही एकदम हॉटेलमध्यें आलों. हॉटेलची इमारत रेलवेच्या लोखंडी कठड्याला लागून पण समांतर अशी लांबलचक बांधलेली आहे. आंत गेल्यावर पुढें एक सोपा व मध्यें खुल्या जागेची पट्टी टाकून मागें एक सोपा अशी ही इमारत आहे. मागल्या सोप्याच्या खोल्या एकेरी असून त्यांचे दर खोलीस दररोजचें आठ आणे भाडें पडतें तर पुढच्या खोल्या दुधई जोड खोल्या असून त्यांचें भाडें दररोज एक रुपया पडतें. मद्रासी गृहस्थ व मी मिळून आम्हीं पुढची एक खोली घेतली व बंगाली तरुणांनीं मागची एक खोली घेतली. येथें हॉटेलांत जेवलेंच पाहिजे असा नियम नाहीं. पण जेवण घेतल्यास दर जेवणास पांचसहा आणे पडतात व चहास बिसकिट किंवा ब्रेड या सकट दोन आणे पडतात.

म्हणजे दर दिवसाचा खाण्यापिण्याचा एक रुपया व खोलीचा रुपया आठ आणे एकएका माणसास पडतो; पण मागच्या खोल्यांत दोन माणसें राहूं शकतात; पुढच्या खोल्यांत तर तीन माणसें सहज व सोयीनें राहूं शकतात. या चन्द्रमहाल हॉटेलची इतकी सविस्तर माहिती देण्याचा उद्देश आग्र्यासारख्या शहरीं किती स्वस्ताईंत राहतां येऊन मुंबईंतील सरदारगृह, माधवाश्रम किंवा एंपायर हॉटेल यांच्यासारख्या सुखसोयी उपभोगतां येतात हें भावी प्रवाशास कळावें हा होय. अशा तऱ्हेच्या सोयीच्या पण स्वस्ताईच्या नुसत्या राहण्याच्या खाणावळी मुंबईंत होणें अवश्य आहे असें चन्द्रमहालमधली व्यवस्था पाहून मला वाटलें. असो.


आम्हीं आपलें सामान खोलींत नीटनेटकें ठेवलें व चहा बिसकिटें घेऊन बरोबर साडेसहा वाजतां आग्र्यांतील प्रेक्षणीय स्थळांचा मुकुटमणि **ताजमहाल** पाहण्यास टांग्यानें निघालों. आम्ही आग्र्यास ता. ११ एप्रिल सन १९३५ रोजीं सायंकाळीं पोहोचलों होतों व तो दिवस चैत्र शुद्ध अष्टमीचा होता. म्हणून आम्हीं ताजमहालाची रात्रीची शोभा पहाण्याकरितां रात्रीं नऊ वाजेपर्यंत तेथें थांबावयाचें असा बेत केला होता. शहरांतील दाट वस्तीचा व तांबड्या दगडी फरशीचा अरुंद रस्ता टाकून आम्ही ताजमहालकडे जाणाऱ्या डामरी निर्धुळ रस्त्यानें गेलों. तांबड्यालाल दगडी सत्तर फूट उंचीच्या तटबंदीनें व त्यापुढील खोल खंदकानें वेष्टिलेला भव्य व दुर्भेद्य किल्ला डाव्या हातास टाकून रस्ता खुल्या मैदानांतून जातो. ताजमहालापुढील मोकळ्या जागेंत हल्लीं म्युनसिपालिटीनें सुंदर फुलबाग केला आहे, सर्व जागेवर हिरवी हरळी लावली आहे व मध्यें एक वर्तुळाकार हिरवागार गवतानें आच्छादिलेला उंचवटा केला आहे व त्यावरील बांधीव चबुतऱ्यावर राणीचा पुतळा बसविला आहे. ताजमहालाच्या आवारांतील बागेला, पुष्करणीला व कारंज्यांना पाणी पुरविणारा छोटासा कालवा या बागेंतून गेला असून त्यावर एक सुबक छोटेखानी पूल आहे. बागेचा हा सर्वच देखावा मोठा चित्ता-

कर्षक वाटला व तो ताजमहालासारख्या अद्वितीय कलाकृतींचें जणूं कांहीं प्रसादचिन्ह आहे असें भासलें. याप्रमाणें विचार मनांत येत आहेत तोंच आमचा टांगा ताजमहालाच्या प्रचंड प्रवेशद्वारा समोरच्या पटांगणांत असलेल्या रस्त्याच्या बाजूच्या गर्दछाय झाडांच्या सावलीच्या जागीं येऊन थांबला. ही राई म्हणजे एक टांग्यांचा स्वाभाविक व सावलीचा तबेलाच आहे असें म्हटलें तरी चालेल.


प्रशस्त पायऱ्या चढून आम्ही ताजमहालाच्या त्या कमानदार भव्य प्रवेशद्वारांत शिरलों. ताजमहालाचें हें प्रवेशद्वार मुख्यतः तांबड्या लाल दगडाच्या बांधणीचें आहे खरें; पण नक्षीवजा त्या बांधणीमध्यें पांढऱ्या संगमरवरी दगडाचा जागोजाग व थराथराला उपयोग केला आहे; त्या उंच उंच मधल्या कमानीला सुंदर मेहेरपीदार नक्षीकाम केलें आहे. कमानीच्या वर व त्याचे दोन्ही बाजूंस दुमजली बांधकाम केलेलें आहे. या प्रवेशद्वाराच्या भव्यतेनें पाहणारा आश्चर्यानें थक्क होऊन जातो. प्रवेशद्वारानें आंत शिरलें कीं दोन्ही बाजूंस सुतांत लावलेली हिरवीगार सुरूंच्या झाडांची रांगच रांग दृष्टीस पडते व त्यांचेमध्यें दगडांनीं बांधलेल्या लांबचलांब पाण्याच्या पाटामध्यें बांधलेल्या छोट्या कारंज्यांची दुहेरी रांग दिसते व समोर संगमरवरी पुष्करणी व चौकोनी चबुतरा व त्याचेही पलीकडे दूर अंतरावर तो पांढरा शुभ्र ताजमहाल दृष्टीस पडतो व तें पाहून मनुष्य आश्चर्यानें तोंडांत बोटेंच घालतो. आम्ही कारंज्याच्या व पाण्याच्या पाटाच्या बाजूनें गेलेल्या तांबड्या फरसबंदी पाऊल वाटेनें ताजमहालाचा तो दुरून दिसणारा अद्वितिय दर्शनी देखावा सावकाशपणें पण चकित चित्तानें पहात पहात पुढें चाललों तोंच पांढऱ्याशुभ्र पुष्करणीच्या चबुतऱ्याशीं आलों. हा चबुतरा चढण्यास दोनतीन पांढऱ्या संगमरवरी पायऱ्या आहेत. पुष्करणी पाण्यानें तुडुंब भरलेली असून त्यांत कमलवेली सोडलेल्या आहेत. या पुष्करणीच्या संगमरवरी चबुतऱ्यावर क्षणभर विश्रांति घेण्याकरितां पांढरीं शुभ्र व गुळगुळीत अशीं संगमरवरी बाकें



नं. १० ] आग्रा : ताजमहाल व पुढली बाग. [ पान ६६



नं. ११ ] आग्रा : ताजमहालाचें प्रवेशद्वार. [ पान ६६



न. १३ ] आग्रा : दिवाणी आम व मोती मशीद. [ पान ७०

ठेविलीं आहेत. येथें आल्यावर खुल्या बाकावर बसण्याचा मोह आवरत नाहीं. येथें बाकावर बसलें म्हणजे ती पांढरी शुभ्र ताजमहालाची इमारत व तिच्या चारी कोपऱ्याचे ते सुबक बारिक मनोरे आपल्या समोर दिसतात तर पाठीमागें तांबड्या रंगाची भव्य कमानदार प्रवेशद्वाराची इमारत दिसते. उजव्या व डाव्या बाजूस जुळ्या भावंडांसारख्या समान आकाराच्या व समान बांधणीच्या मशीदीच्या इमारती दिसतात. याप्रमाणें चारी दिशांस बांधकला व खोदकला यांचे आश्चर्यानें थक्क करणारे मासले दृष्टीस पडतात; तर चौकोनी आवारामध्यें नाटासारख्या आडव्या उभ्या पाऊलवाटांनीं अलंकृत अशी नयनमनोहर हिरवीगार बाग नजरेस पडते. असा हा मनोहर देखावा पहात आम्ही त्या संगमरवरी बाकावर कितीतरी वेळ बसलों होतों. आम्हांला परत जाण्याची घाई नव्हती; उलट आम्हीं चांदण्याची ताजमहालाची शोभा पहाण्याच्या उद्देशानेंच आलों होतों; व अष्टमीचा तो चन्द्राचा अर्धगोल आमचे डोक्यावरच होता. जसजशी सायंकाळ व पुढें रात्र होत चालली तसतसा चन्द्रप्रकाश वाढतच चालला व सभोंवारच्या सर्व देखाव्याला अद्वितीय शोभा येत होती. ही अद्वितीय शोभा पहात पहात आम्हीं ताजमहालाच्या प्रशस्त व पुरुषभर उंच जोत्यावर जिन्यानें चढून गेलों व ताजमहालाच्या त्या प्रमाणबद्ध सुंदर इमारतीकडे चकित चित्तानें व अनिमेष नजरेनें पहात उभे राहिलों. सप्तचमत्कारांत गणल्या गेलेल्या या अद्वितीय इमारतीचें शब्दानें सविस्तर वर्णन करणें अशक्य आहे. आम्हीं दिव्याच्या मदतीनें वरच्या दर्शनी कबरी पाहिल्या, काळोख असल्यामुळें खऱ्या खालच्या कबरी पाहिल्या नाहींत. नंतर आम्हीं ताजमहालाच्या मागच्या बाजूला जाऊन तेथून धनुष्याकार वळणाची यमुना नदी पाहिली. खिशांतील घड्याळांत पाहतां नऊ वाजून गेले असें दिसलें. तेव्हां आतां अधिक वेळ घालविणें बरोबर नाहीं असें पाहून आम्ही प्रमुदित मनानें टांग्याशीं आलों व तडक आमच्या चन्द्रमहाल हॉटेलांत गेलों व थोडासा फराळ करून झोंपी गेलों.

ता. १२ एप्रिल सन १९३५ सकाळीं चहा फराळ करून आम्हीं चवघे जण जाता-येताचा एक टांगा भाड्यानें करून आग्र्याच्या मामुली दृश्यदर्शनास निघालों. या मामुली दृश्यदर्शनांत इतमतउद्दौला ( जहांगीर बादशहाचा सासरा व नूरजहान राणीचा बाप ) याची कबर, ताज महाल व आग्र्याचा किल्ला अशीं तीन प्रेक्षणीय स्थळें येतात. जाता-येताचें भाडें दीड रुपया ठरलें. आम्हीं हॉटेलमधून बरोबर सकाळीं सात वाजतां निघालों ते यमुना नदीच्या दुमजली पुलावर आलों. येथें गाडीचा रस्ता खालच्या मजल्यावरून तर आगगाडीचा रस्ता दुसऱ्या मजल्यावरून आहे. खालून टांगा जात असतांना जर वरून धाडधाड करीत मोठ्या वेगानें आगगाडी गेली तर भीतिच वाटते. आमच्या डोक्यावरून अशी आगगाडी गेली, तेव्हां आम्ही सुद्धां घाबरलों. पूल टाकल्यावर लवकरच इतमतउद्दौला ही कबर लागते. या कबरीची इमारत एक मजली व ठेंगणी असून तिचेवर घुमट नाहीं. तरी पण या कबरीचें संगमरवरी काम उच्च दर्जाच्या कलाकुसरीचें आहे. कबरीचे सभोंवार संगमरवरी दगडाच्या नक्षीदार जाळ्या बसविलेल्या आहेत ! किती सुबक,नाजूक व बारकाईचें हें खोदकाम व कातरकाम आहे ! पाथरवटाच्या हातोड्याचा एक घाव जास्त जोराचा पडला किंवा भलतीकडे पडला तर जाळीची नक्षी बिघडावयाची ! पण खणाखणाच्या त्या दगडी जाळ्यांत एकही चूक दृष्टीस पडावयाची नाहीं ! इतकें बिनचूक बारीक नक्षीकाम करणाऱ्या कारागिराचें कौतुक करावें तितकें थोडें आहे असें मला वाटलें. या कबरीच्या सभोंवारची बाग कबरीइतकीच साधी पण सुबक, नीटनेटकी व नयनमनोहर आहे. कबर पाहून आम्ही पुलावरून परत शहरांत आलों, पण शहरांतील रस्त्यानें ताजमहालाकडे न जातां नदीकांठच्या रस्त्यानें ताजमहालाकडे चाललों. यमुना नदीनें येथें धनुष्याकार धरिला आहे व इतमतउद्दौलाची कबर ही धनुष्याच्या एका पण नदीपलीकडच्या टोकाला तर ताजमहाल दुसऱ्या पण अलीकडच्या टोकाला आहे. तरी पण पुलाच्या अलीकडे येऊन नदीकांठच्या रस्त्यानें चाललें म्हणजे

ताजमहाल नदीपलीकडे आहे असा सारखा भास होतो. उजवी-कडचें नदीचें पात्र व कांठ हा कलिंगडे, काकड्या, इत्यादि-कांच्या फळवेलांनीं व भाज्यांच्या वाफ्यांनीं हिरवाहिरवागार दिसत होता. रस्त्याच्या डाव्या बाजूस पांढरट हिरवट जाड पानांनीं व कमळासारख्या बचके येवढ्या पिवळया पांढऱ्या फुलांनीं शोभायमान झालेल्या मुचकुंद झाडांची रांगच रांग थेट ताजमहालापर्यंत लावलेली होती. या रस्त्याच्या उजव्या बाजूस आग्रा किल्ल्याचा तो सत्तर फूट उंचीचा तांबड्या लाल दगडाचा प्रचंड तट सारखा लागलेला होता. किल्ल्याच्या तटाचा तो तांबडा भडक रंग, त्याच्या पुढील खोल जागेचा गालिचा सारखा हिरवा रंग, रस्त्याचा पांढरट रंग, झाडांच्या रांगेचा तो हिरवा पिवळा रंग, पलीकडील बागांचा तो हिरवा रंग व यमुनेच्या प्रवाहाचा तो काळसर निळसर रंग हा विविध रंगी देखावा सारखा ताजमहालाशीं पोहोंचेपर्यंत दिसत राहतो. यामुळें या रस्त्यानें जातांना प्रवाशाचें मन आनंद व आश्चर्य अशा मिश्र भावनांनीं उल्हसित होतें. या उल्हसित मनःस्थितींत आम्हीं आदल्या रात्रीं थांबलों होतों त्या झाडाच्या सावलीशीं आलों व टांग्यांतून उतरून तडक ताजमहालाकडे गेलों. रात्रीचया व दिवसाच्या ताजमहालाच्या देखाव्यांत महदंतर वाटतें यांत शंका नाहीं. रात्रीच्या शीतल चन्द्रप्रकाशांत ताजमहालाची शोभा हिमकणांनीं आच्छादलेल्या वनश्रीसारखी किंवा अर्धोन्मीलित फुलासारखी दिसते तर भरदिवसाच्या सूर्यप्रकाशांत ती शोभा वसंतऋतूं-तील वनश्रीसारखी किंवा पूर्ण उमललेल्या फुलासारखी दिसते. या खेपेस आम्ही ताजमहालच्या संगमरवरी भिंतीवरील नाना रंगी खड्यांनीं (पूर्वकाळीं पाचूमाणकांनीं) काढलेली नक्षी व हुबेहुब फुलझाडांचीं चित्रें पाहिलीं. हीं कलाकुसरीचीं कामें नाजुक, सुबक व नयनमनोहर आहेत हें सांगणें नकोच. मुख्य दालनांतील शहाजहान व मुमताज यांच्या दर्शनी कबरी व तळघरांतील खऱ्या कबरी आम्हीं पाहिल्या. नंतर आम्ही एका मनोऱ्यावर चढलों. वरून सर्व शहराचा व यमुना नदीचा

देखावा मोठा मनोहर दिसतो. नंतर आम्हीं डावी उजवीकडील माशिदीच्या तांबड्या दगडांच्या इमारतीवर नजर टाकली. उजव्या बाजूची इमारत व ताजमहाल यांच्या मधल्या फरशीवर ताजमहालाच्या पडणाऱ्या सावलीची आकृति काळया दगडांनीं दाखविली आहे. ती नवलाची वाटली. डाव्या बाजूच्या इमारतीची दुरुस्ती चालू होती. मागच्या बाजूंच्या कोपऱ्यावर एक मजली छोटी इमारत आहे. तेथें नदींतून पाणी वर आणण्याची व्यवस्था केलेली आहे. ताजमहालाचें एकूण एक काम इतकें प्रमाणबद्ध, इतक्या कलाकुसरीचें, व इतक्या बारकाव्याचें आहे कीं या कलाकृतीची सर्वानुमतें सात चमत्कारांत का गणना झाली हें कळून येतें.

ताजमहाल पाहून झाल्यावर आम्हीं परतून आग्र्याच्या किल्ल्याशीं आलों. येथें हल्लीं दोन आणे देऊन परवानगीचा पास घ्यावा लागतो.

हा किल्ला तांबड्या लाल दगडाचा बांधलेला आहे. त्याचा आकार अर्ध चन्द्राकृति आहे. त्याच्या तटाच्या भिंती सत्तर फूट उंच असून त्याची लांबी दीड मैल आहे. हा किल्ला बांधण्यास अकबरानें सन १५६५ मध्यें सुरवात केली व तो पुरा होण्यास आठ वर्षें लागलीं. या किल्ल्यामध्यें अकबरानें जोधबाई राणीकरितां एक तांबड्या कुरुंदी दगडाचा सुंदर राजवाडा बांधला होता तो प्रथम आम्हीं पाहिला. या राजवाड्याच्या तळघरांत राजकीय कैद्यांना कोंडून ठेवीत व गुप्तपणें ठार मारीत. नंतर आम्हीं प्रख्यात संगमरवरी **दिवाणी आम** व **दिवाणी खास** नांवाचे सार्वजनिक व खासगी भेटींचे दिवाणखाने पाहिले. पुढें बादशहाचे राहण्याचे दिवाणखाने व तेथले हमामखाने ( स्नानगृहें ) व खासगी प्रार्थनेची मोती मशीद पाहिली. ज्या छोट्या खोलींत औरंगजेबानें शहाजहान बादशहाला कैदेंत ठेविलें होतें व जेथून ताजमहालाकडे पहात त्यानें प्राण सोडला ती खोली पाहिली. या किल्ल्यामध्यें शिरून एकामागून एक लागणाऱ्या सुंदर संगमरवरी धवळ्या शुभ्र इमारती पाहिल्या म्हणजे काय पाहूं, किती पाहूं असा मोठा मनाचा गोंधळ उडून जातो. हल्लीं पुराण वस्तुसंशोधन

खात्यानें प्रत्येक इमारतीवर माहिती देणाऱ्या पाट्या लावल्या आहेत. यामुळें आतां कांहीं तरी थापा मारणाऱ्या मार्गदर्शकाची जरूरी राहिली नाहीं. तसेंच किल्ल्यांतील सर्व खुल्या जागेंत सुंदर फुलबागा व **हिरवळ गवताचीं मैदानें** ( lawns ) बनविलीं असल्यामुळें सर्व संगमरवरी इमारती अधिकच सुशोभित दिसतात व पांढऱ्या व हिरव्या रंगाचा मिलाफ मोठा नयनमनोहर वाटतो.

याप्रमाणें आग्र्यांतील तीन प्रख्यात प्रेक्षणीय स्थळें पाहून आम्ही बाराचे सुमारास चन्द्रमहालांत परत आलों व भोजनोत्तर **दयाळ बाग** नांवाची संस्था व वसाहत पाहण्यास टांग्यानें गेलों.


ही वसाहत शहरापासून सुमारें दोन अडीच मैल अंतरावर सुरू होते. तुतीच्या सुंदर वृक्षांच्या दुहेरी रांगेनें शोभायमान केलेल्या डामरी रस्त्यानें जातांना मोठी मौज वाटली. लवकरच वसाहतीच्या बदामी व गुलाबी रंगाच्या लहान मोठ्या सुंदर इमारती लागल्या. वाटोवाट नामदर्शक पाट्या लावलेल्या आहेत व जिकडे तिकडे स्वच्छता, टापटीप व नीटनेटकेपणा पाहून या वसाहतीच्या प्रथम दर्शनाचा मनावर फारच अनुकूल परिणाम झाला. शेवटीं एकदांचे आम्हीं प्रवेशद्वाराशीं आलों. टांगेवाल्याचें भाडें चुकतें करून त्याला परत पाठविला. कारण येवढी मोठी वसाहत व त्यांतील नानाविध संस्था पाहण्यास दोन तीन तास तरी लागतील तेव्हां सायंकाळ होईलच व मग आपण चालत सहल करीत हॉटेलांत जाऊं असा आम्हीं मनाशीं बेत केला होता. पण दयाळ बागेंत प्रवेश केला तों जिकडे तिकडे सामसूम दिसलें. मॅनेजरच्या कचेरींत चवकशी केली. तेथून बऱ्याच अंतरावर असलेल्या **चवकशी कचेरीं** ( inquiry office )त गेलों. तेथें शिपायाखेरीज कोणी भेटलें नाहीं म्हणून पुन्हां परत आलों. याप्रमाणें **गडाच्च सासवडं** सासवडाच्च गडम् करतांना अखेर आम्हांला प्रदर्शन दुकाना ( Show-room ) चा पत्ता लागला. तेथें कळलें कीं दयाळ बागेंतील वीज उत्पन्न करण्याचें यंत्र त्या दिवशीं सकाळींच बंद पडल्यामुळें सर्व कारखान्यांना

सुटी द्यावी लागली व दयाळ बागेंतील शाळा कॉलेजच्या परीक्षा झाल्यामुळें त्या संस्था चालू नाहींत. पण दुसरे दिवशीं कारखाने चालू होऊन चवकशी कचेरींतून परवानगी पास आणल्यास कारखाने पहाण्यास सांपडतील. याप्रमाणें आमची थोडी निराशा झाली खरी, पण इकडून तिकडे जातां येतां व प्रदर्शन दुकान पाहून व तेथें दयाळ बागेच्या हकीकतीचें पुस्तक मिळून दयाळ बागेच्या संस्थांची व वसाहतीची बरीच कल्पना आम्हांला आली व दुसरे दिवशीं सर्व जरी नाहीं तरी एक दोन कारखाने पाहण्यास सांपडले. दयाळ बाग ही संस्था व वसाहत राधास्वामी पंथाच्या लोकांनीं आग्र्या नजीकच्या प्रशस्त जागेंत सन १९१५ मध्यें सुरू केली. सन १८१८ मध्यें आग्रा येथें जन्मास आलेले **सोमजी महाराज** ( खानदानीच्या घराण्यांतील एक पुरुष ) यांनीं राधास्वामी नांवाचा एकेश्वरी पंथ सन १८६१ मध्यें काढला. हल्लीं त्या पंथाचे एक लाख लोक आहेत व त्या पंथाचा कारभार राधास्वामी सत्संग सभा नांवाची प्रातिनिधिक सभा पाहते. मूळ उत्पादकाच्या जन्मस्थानामुळें आग्रा ही वसाहतीची व संस्थेची कायमची जागा ठरविण्यांत आली व तिला दयाळ बाग असें नांव देण्यांत आलें. या वसाहतीच्या मालकीची सध्यां सुमारें २६०० एकर जागा आहे व या वसाहतींत २६००लोक सध्यां राहतात. येथें मुलामुलींकरितां हायस्कुलें, औद्योगिक कॉलेज इत्यादि शिक्षणसंस्था असून नमुनेदार औद्योगिक कारखाने, गोशाळा व शेतकीशास्त्राचें प्रयोगक्षेत्र इत्यादि धनोत्पादक कारखाने आहेत. अशी ही मोठी वाखाणण्यासारखी संस्था आहे. या वसाहतीच्या सविस्तर माहितीचें सुंदर पुस्तक श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे इचलकरंजी संस्थानचे अधिपति यांनीं लिहिलें आहे. तें पुस्तक वाचण्याची वाचकांस शिफारस करून व त्या पुस्तकावर हवाला देऊन मी दयाळबागेचें वर्णन व त्याबरोबरच आग्र्याचें वर्णन संपवितों.


ता. १३ एप्रिल सन १९३५:— फत्तेपुर शिक्री हें शहर बी. बी. सी. आय. रेल्वेच्या **बयाना आग्रा** या ब्राड गेज रेल्वे फाट्यावर आग्र्यापासून



नं. २० ]  आग्रा : दयाळबागेचें 'प्रेमविद्यालय'  [ पान ७२



नं. २१ ]  आग्रा : दयाळबाग औद्योगिक कारखाने. [ पान ७२




नं. १८ ] फत्तेपुर शिक्री : बिरबलाचा वाडा. पान ७५




नं. १९ ] फत्तेपुर शिक्री : हिरणमिनार [ पान ७६

तेवीस मैल दूर आहे. बी. बी. सी. आय. ब्राड गेजचें स्टेशन **आग्राफोर्ट** नांवाचें आग्र्याच्या किल्ल्याच्या नजीक व किल्ल्याच्या तटाच्या अंगास आहे. आम्ही हॉटेलांतून सकाळीं सहा वाजतां निघून टांग्यानें आग्राफोर्ट स्टेशनला आलों. आगगाडी प्लॅटफॉर्मवर होती तेव्हां परतीचें तिकीट काढून डब्यांत जाऊन बसलों. आगगाडी साहा वाजून पंचेचाळीस मिनिटांनीं निघाली. फोर्टस्टेशन व गांवांतील **इदगा** स्टेशन टाकून बाहेर आल्यानंतर हिरव्या गार बागा व शेती असा नयनमनोहर भूमिभाग लागला. आम्हीं फत्तेपुर शिक्री स्टेशनला आठ वाजतां पोहोंचलों. स्टेशनच्या बाहेर पडलें कीं फत्तेपुर शिक्रीची दोनशें फूट उंचीची टेकडी व तेथल्या किल्ल्याचा बुलंददरवाजा प्रवाशाचें लक्ष वेधतो. केवढा प्रचंड व लालभडक तो दरवाजा ! फत्तेपूर-शिक्रीच्या किल्ल्यांतील बांधकलाकृतीची विजयपताका अशा त्या किल्ल्याच्या दरवाज्याशीं पोहोंचण्यास आम्हांला टेकडीच्या शिडीसारख्या उभ्या चढावाच्या बिकट वाटेनें जावें लागलें. दरवाज्याशीं धापा टाकीत आलों तोंच आम्हीं आश्चर्यानें तोंडांत बोटें घातलीं. तांबडा लाल कुरंदी दगड व पांढरा शुभ्र संगमरवरी दगड यांच्या प्रमाणबद्ध मिलाफानें बांधलेला तो प्रचंड व भव्य दरवाजा हिंदुस्थानांतील नव्या जुन्या सर्व प्रवेशद्वारांना किंवा प्रख्यात कमानींना मागें टाकील यांत शंका नाहीं. प्रवेशदरवाज्याच्या माथ्यावर तीन डौलदार सुबक घुमट आहेत व दरवाज्याच्या मेहरपीदार कमानीला लागून असलेल्या दगडी रुंद चवकटीला लागून दोन छोटे दगडी वाटोळे बारीक खांब दरवाज्याच्या घुमटापर्यंत नेलेले असून त्यांचे माथ्यावर पेलेदार छोटेखानी घुमट आहेत व त्याचेमध्यें १३ मेहरपी, छोट्या कमानी असून त्यांवर त्या छोट्या कमानींना साजेसे छोटेच घुमट आहेत ! या प्रवेशदरवाज्याची विलक्षण शोभा दिसते व अकबराच्या काळच्या बांधकला व शिल्पकला किती उच्च दर्जाला पोहोंचल्या होत्या याचें राहून राहून आश्चर्य वाटतें. या टेकडीवर हा दरवाजा अकबरानें आपल्या दक्षिण हिंदुस्थानांतील विजयाच्या स्मरणार्थ सन १६०१ मध्यें बांधला म्हणून तो


किल्ल्याच्या व टेकडीच्या दक्षिणेच्या बाजूस बांधलेला आहे. या टेकडीच्या पायथ्याशीं शिक्री गांव आहे त्याला तेव्हांपासून **फत्तेपूर**–शिक्री असें नांव ठेवण्यांत आलें. अशी या बुलंद दरवाज्याची मोठी मनोरंजक जन्म-कथा आहे. या दरवाज्याजवळ बत्तीस फूट लांबीची एक पाण्यानें भर-लेली विहीर आहे. त्यामध्यें पैसे दिले असतां बुड्या मारणारीं पोरें व पुरुष सदा उभे असतात. आश्चर्यचकित मनानें त्या दरवाज्याचें काम पहात व तोंडानें वाहवा वाहवा असे शब्द उच्चारीतच आम्हीं दरवाज्याच्या आंतील जुम्मामशिदींत प्रवेश केला. दिल्लीच्या प्रख्यात जुन्या मशिदी-प्रमाणें ही मोठी विस्तीर्ण मशीद आहे. तिचीं तीन दालनें असून त्यां-पैकीं एक दालन थेट हिंदु देवळाच्या सभामंडपासारखें आहे. अकब-राच्या हिंदु राण्यांकरितां हा भाग बांधलेला होता असें म्हणतात. या मशिदीचें कामही फार वाखाणण्यासारखें आहे. या किल्ल्यांतील सर्व इमारती तांबड्या कुरुंदी दगडाच्या आहेत व हा किल्ला बांधून तीन शत-कांच्या वर वर्षें झालीं असतांना हा किल्ला नुकताच बांधलेला आहे कीं काय असा क्षणोक्षणीं भास होतो. या कुरुंदी दगडाचा तांबडा लाल रंग व दगडावरील घडीव व कोरीव काम यांचेवर पाऊसपाणी व थंडीवारा इत्यादि नैसर्गिक आपत्तींचा कांहींएक परिणाम झाला नाहीं याचें राहून राहून आश्चर्य वाटतें. या मशिदीच्या चौकांत अकबराचा उपदेशक साधू शेख सालिम किस्ती याची एकमजली छोटी कबर आहे. ही सर्व इमारत संगमरवरी पांढऱ्या शुभ्र दगडाची असून हिच्या बांधणीची धाटणी व कलाकौशल्य आग्र्यांतील इतमत-उद्दौलाच्या कबरीसारखें आहे. शेख सालीम किस्तीची दर्शनी कबर एका शिसवी सुंदर मखराचे आंत बांधलेली आहे. या शिसवी मखराचे पुढले दोन खांब पितळी असून त्यावर नानारंगी बारीक जडवाचें काम केलेलें आहे. यापैकीं एक खांब खराब झाला म्हणून लॉर्ड कर्झनच्या कारकीर्दीमध्यें तो पूर्वीसारखा बनविण्यांत आला. त्याला बारा हजार रुपये खर्च आला असें म्हणतात. हें कबरस्थान मुसलमान लोकांचें एक मोठें यात्रास्थान आहे असें



न. १६] फत्तेपुर शिक्री : जुम्मा मशीद व सालीमची कबर [पान ७४



नं. १७ ] फत्तेपुर शिक्री : पंचमहाल. [ पान ७६



नं. १४] फत्तेपुर शिक्री : बुलंद दरवाजा. [पान ७३



नं. १५ ] फत्तेपुर शिक्री : जोधबाई व बीरबल यांचे वाडे. [ पान ७५

कबरींत टांगलेल्या नानारंगी रेशमी धाग्यांवरून कळतें. हे धागे नवसाचे असतात.

ही मशीद व कबर टाकून पुढें गेल्यावर दिवाणी आम व दिवाणी खास नांवाचे मुसलमानी सर्व किल्ल्यांत व राजवाड्यांत असणारे दरबार दिवाणखाने लागले. दिवाणीखासचे जवळ एक फारच आश्चर्य-कारक छोटी इमारत आहे. ही इमारत कसची! हा एक तांबड्या लाल दगडाचा साहासात फूट उंचीचा नक्षीदार खांब आहे. त्याचे माथ्यावर सिंहासनवजा बसावयाची कठडेदार बैठक आहे. ती मधोमध अधांत्री असलेली बैठक तीन दगडी फरशांनीं इमारतीच्या भिंतीशीं असलेल्या सज्जाला जोडलेली आहे. अर्थात अधांत्री असलेल्या खांबावरील बैठकीवर जाण्याच्या त्या वाटा होत. ही विलक्षण छोटी इमारत म्हणजे अकबराचें **धर्म-चर्चा-मंदिर** होय. त्या नक्षीदार खांबाच्या बैठकीवर अकबर बसत असे व नाना धर्मांचे धर्मवेत्ते खांबाचे सभोंवार बसत असत व अकबर त्यांच्याशीं धर्मविषयक चर्चा करीत असे असें म्हणतात! अकबराची धर्मसहिष्णुता व सर्व धर्म एकत्र आणण्याची कल्पना अजब खरी!

या दिवाणीखासच्या एका बाजूस या किल्ल्यांतील दुसरी अजब गोष्ट म्हणजे एक दगडी फरसबंदी खुलें चौकोनी अंगण होय. हा चौक म्हणजे ६४ घरांच्या बुद्धिबळांचा पट होय. या पटावर जीवंत दासी बुद्धिबळांतील मोहोऱ्याप्रमाणें उभ्या रहात! अकबर व त्याचा सवं-गडी हे या दासींना पटावरील निरनिराळया घरांत जाण्यास सांगून बुद्धिबळांचा खेळ खेळत! काय विलक्षण ही हौस व त्याच्या पूर्ततेची ही तितकीच विलक्षण तजवीज! पुढें गेलें म्हणजे अकबराच्या मिरीयम-बाई व जोधबाई या दोन आवडत्या राण्यांचे राहते राजवाडे लागतात. जोधबाईचा वाडा फारच विस्तीर्ण असून त्याची बांधणी हिंदू पद्धतीची आहे. त्याला उन्हाळ्यांत राहण्यायोग्य असा खुला व वारा येणारा एक भाग आहे तर हिंवाळ्यांत राहण्यायोग्य असा बंदिस्त व ऊबदार असा दुसरा भाग आहे! या दोन राजवाड्यांखेरीज तिसरी एक विलक्षण इमारत

या किल्ल्यामध्यें दृष्टीस पडली ती म्हणजे **पंचमहाल:** ही पांच मजली छोटी इमारत आहे. पण हिची मौज अशी आहे कीं,वरचा मजला खालच्या मजल्यापेक्षां बराच लहान आहे; अशा विलक्षण बांधणीमुळें शेवटला पांचवा मजला म्हणजे एक छोटीशी गच्चीच आहे म्हणाना. यामुळें ही इमारत दुरून चिनी देवळासारखी कमी कमी होणाऱ्या कंगोऱ्या-कंगोऱ्यांची आहे असें भासतें. कदाचित् या इमारतीची बांधणी चिनी कारागिराच्या हातचीच असेल! या इमारतीच्या उंच व उघड्या गच्च्यांवरून जनानखान्यांतील बायकामंडळी सायंकाळीं हवा खाण्यास बसत असत असें म्हणतात. आम्हीं या पांचव्या मजल्याच्या गच्चीवर एकसंधी सुंदर दगडी पायऱ्यांनीं चढलों. सर्व किल्ल्याचा व शेजारच्या खेड्याचा देखावा या गच्चीवरून फार चांगला दिसला. टेकडीच्या आसपासचा भूमिभाग नापीक भुरट्या रानाचा दिसला.

फत्तेपूर-शिक्रीमधील प्रेक्षणीय व विशेष कलाकौशल्याच्या इमारती येवढ्याच. बाकी सामान्य बांधणीच्या आणखी किती तरी इमारती त्या किल्ल्यांत दृष्टीस पडल्या. घोड्याच्या पागेची केवढी तरी मोठी चौसोपी इमारत किल्ल्यांत मीं पाहिली. पागेंत घोड्याचे पायबंद व ठाणबंद बांधण्याकरितां आंगचीं भोंकें असलेले दगड सारख्या रांगेनें सर्व चौकभर बसविलेले पाहिले; त्याचें मोठें नवल वाटलें. मग आम्हीं किल्ल्याच्या मागल्या दरवाज्याशीं आलों. तेथें बैल रहाटानें विहिरींतून पाणी वर काढण्याची व्यस्था केलेली दिसली. फरसबंदी पायवाटेनें आम्हीं टेकडीचे खालीं आलों. तेथेंही एक विहीर होती व त्या विहिरीजवळ एका तांबड्या दगडाच्या चबुतऱ्यावर छोटासा मनोरा होता. या मनोऱ्याला **हरण** मनोरा असें नांव आहे. याचे वाटोळ्या वर्तुळाकार बाहेरील भिंतींत हत्तीच्या दातासारखे पांढरे दगडी दांत बसविले आहेत. या मनोऱ्याचा किंवा खांबाचा काय उद्देश होता व विशेषत: हत्तीच्या दाताच्या नमुन्यांनीं अलंकृत असा तो मनोरा कां बांधण्यांत आला हें कळत नाहीं.

याप्रमाणें फत्तेपूर–शिक्रीच्या किल्ल्यांतील प्रेक्षणीय स्थळें पहात पहात आम्ही टेकडीखालीं आलोंच होतों तेव्हां तेथूनच मळलेल्या पाऊलवाटेनें आम्हीं स्टेशनच्या रस्त्याला येऊन मिळालों व मग थेट स्टेशनवरच आलों. आग्र्याची आगगाडी येण्यास किंचित् अवकाश होता त्या अवधींत आम्हीं स्टेशनवरील चहावाल्याकडून चहा करविला व चहा बिसकिटें यांवर तहानभूक भागविली व आगगाडी येतांच डब्यांत बसलों व तासा दीड तासानें चन्द्रमहाल हॉटेलांत पोहोंचलों.

आग्रा व फत्तेपूर–शिक्री हीं स्थळें पहातांना आकस्मिकपणें एकत्र आलेले आम्ही चौघे प्रवासी त्या दिवशींच्या चौथ्या प्रहरीं आपआपल्या इष्ट स्थानाकडे जाण्यास जवळ जवळ एकदमच हॉटेलांतून निघालों. माझे तिघे सोबती तीन दिशांना गेले व मी दिल्लीच्या दिशेनें गेलों. माझें बरेंच लांबलेलें आग्रा–शिक्री–पुराण संपलें.

# प्रकरण ५ वें

## नवींजुनीं दिल्ली-शहरें

ज्याप्रमाणें **रोम** शहर राजकीय दृष्टया, धार्मिक दृष्टया व दृश्य ललित-कला दृष्टया युरोपचें केन्द्र समजलें जातें व म्हणून 'सर्व रस्ते रोमकडे जातात' अशी युरोपमध्यें म्हण पडली आहे त्याप्रमाणें दिल्लीशहराची स्थिति आहे व म्हणूनच हिंदुस्थानच्या कोनाकोपऱ्यांतील शहरांच्या व किल्ल्यांच्या तटबंदीच्या मुख्य दरवाज्याला **दिल्ली दरवाजा** असें म्हणण्याची रीत पडली. रोम व दिल्ली या शहरांच्या इतिहासाची तुलना केल्यानें किती तरी बावतींत या दोन प्रख्यात् शहरांमध्यें साम्य दिसून येतें. रोम टायबर नदीचे कांठावर वसलें आहे; तर दिल्ली यमुना नदीचे तीरावर वसलें आहे; रोम सात टेकड्यांवर वसलें आहे तर दिल्ली टेकड्यांच्या रांगेवर व बाजूवर वसलें आहे; रोमची पूर्वपीठिका दोन-अडीच हजार वर्षांपर्यंत पोहोंचते; तर दिल्लीची पूर्वपीठिका इन्द्रप्रस्थ या नांवानें तीन चार हजार वर्षांच्या मागें जाते; रोमच्या वैभवामध्यें व भरभराटीमध्यें समुद्राच्या भरती-ओहोटीप्रमाणें चढउतार झालेला आहे; तर दिल्लीही भरती-ओहोटीच्या स्थितींतून गेलेली आहे; रोम रोमन दृश्य ललितकलांचें माहेरघर किंवा प्रदर्शनगृह आहे तर दिल्ली मोंगल दृश्य ललितकलांचें आगर आहे. असो.

सन १९१० पासून मी उत्तर हिंदुस्थानचे प्रवास करूं लागलों. दिल्ली हें उत्तर हिंदुस्थानांतील सदर स्टेशन असल्यामुळें या गेल्या पंचवीस वर्षांत मी किती तरी वेळां दिल्लीस गेलों आहें व तेथलीं प्रेक्षणीय स्थळें पाहिलीं आहेत. या गेल्या पंचवीस वर्षांत दिल्ली शहराचीं किती तरी स्थित्यंतरें झालीं आहेत. आधीं सन १९१२ मध्यें जॉर्ज बादशाहानीं

दिल्ली दरबार भरवून दिल्ली ही हिंदुस्थानची राजधानी केल्याचें जाहीर केल्यापासून ब्रिटिश अंमलांत मागें पडलेल्या दिल्लीला पुनर्महत्त्व आलें. तेव्हां-पासून कोट्यावधी रुपये शहराच्या सुधारणेस व पुनर्रचनेस खर्च झाले. यामुळें वीसपंचवीस वर्षांपूर्वीची दिल्ली ओळखत नाहींशी झाली. ज्या-प्रमाणें ग्वालेर शहरामध्यें गेल्या पंचवीस वर्षांमध्यें किती तरी फरक झाला त्याप्रमाणें दिल्लीमध्येंही बदल झाला: उदाहरणार्थ पूर्वीचा मध्यें पाटाचें पाणी असलेला चांदणीचौक जाऊन तेथें अर्वाचीन तऱ्हेचा प्रशस्त निर्धूळ डामरी रस्त्याचा व मोठमोठ्या उंच इमारतींचा चांदणीचौक बनला आहे. दिल्ली शहराच्या उत्तरेस व दक्षिणेस नवीं दोन शहरें बनलीं आहेत. दहावीस वर्षांपूर्वी ज्यानें दिल्ली पाहिली असेल त्याला हल्लींची दिल्ली ओळखतां येणार नाहीं इतका त्यांत फरक झालेला आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणें मी दिल्लीस पुष्कळ वेळां आलों गेलों. सन १९३२ च्या नवंबर डिसेंबर महिन्यांत तर मी दिल्लीस दहाबारा दिवस सारखा राहिलों. त्यामुळें मला बंगलोरप्रमाणें दिल्ली हें शहर सावकाशपणें व बारकाईनें व नाना वाहनांच्या साधनांनीं पहातां आलें. कधीं मी शहरांतील प्रेक्षणीय स्थळें टांग्यानें जाऊन पाहिलीं तर कधीं मोटारीनें जाऊन पाहिलीं. जेव्हां मी पंधरवडा भर दिल्लीस रहात होतों तेव्हां तर सकाळ संध्याकाळ तीन तीन तास मी पायीं चालत असें. यामुळें शहरांतील पुष्कळ भाग मी पायींच चालत जाऊन पाहिले. याप्रमाणें नाना वेळीं व नाना प्रकारांनीं मीं नवी जुनी दिल्ली व त्यांतील प्रेक्षणीय स्थळें पाहिलीं आहेत. या पुस्तकाची नवी आवृत्ति छापण्यापूर्वी मी आग्र्याच्याप्रमाणें दिल्लीचें दोन दिवस दृश्यदर्शन उरकून घेतलें खरें. पण आग्रा फत्तेपुरशिक्रीच्या वर्णनाप्रमाणें मी दिल्लीचें नुकत्याच पाहिलेल्या क्रमानें व दोन दिवसांची हकीकत देऊन वर्णन करणार नाहीं. कारण आग्रा फत्तेपुरशिक्रीपेक्षां दिल्ली हें किती तरी पुरातन व केवढ्या विस्ताराचें शहर आहे. नव्हे, पुराण कालापासून कालगणना ध्यानांत धरली तर दिल्लीच्या भूमि-भागांत किती तरी राजधान्या व राज्यव्यवस्था होऊन गेल्या आहेत.

तेव्हां त्यांचे कालक्रम व स्थलक्रम या दुहेरी क्रमानुरूप वर्णन करणें सोईचें होईल.

फार पुरातन कालापासून जो भूमिभाग राजधानीला योग्य समजला जाऊन तेथें राजधान्या स्थापिल्या गेल्या तो बराच विस्तीर्ण भूमिभाग असून तो स्वाभाविक व संरक्षणक्षम अशा चतुःसीमांनीं मर्यादित आहे. हा भूमिभाग त्रिकोणाकृति असून त्याचा कोन उत्तरेस **वजिराबाद**-नजीक आहे. या तिकोनी भूमिभागाची पश्चिम बाजू टेकड्यांच्या रांगेनें तर पूर्व बाजू यमुना नदीनें मर्यादित व संरक्षित आहे. या बाजवा बारापंधरा मैल लांबीच्या आहेत. या त्रिकोणाची दक्षिण बाजू सातआठ मैलांची असून तीही टेकड्यांनीं मर्यादित झालेली आहे. अशा स्वाभाविक संरक्षणक्षम भूमिभागांत पुराणकाळापासूनच्या राजधान्या स्थापन करण्यांत आल्या आहेत. साहासातशें वर्षांच्या मुसलमानी अमदानींत सात दिल्ल्या वेळोवेळीं बसविण्यांत आल्या असें समजतात. कौरवपांडवांचे काळची राजधानी व ब्रिटिश अंमलांत बांधल्या गेलेल्या राजधान्या व मुसलमानी अंमलांतील राजधान्या या सर्व एकत्र केल्या म्हणजे दहा राजधान्यांची मोजदाद होते व त्यांपैकीं पहिली व दहावी या अगदीं समोरा समोर आलेल्या आहेत. ही गोष्ट आकास्मिक घडून आली किंवा मुद्दाम घडवून आणली हें सांगतां येत नाहीं. पण अशा योजनेनें राजधान्यांच्या परिवर्तनाचें चक्र पूर्वपदावर आलें खरें. या दहा राजधान्यांचीं कालक्रमानें खालील नांवें होत. त्याच क्रमानें त्यांचें मी संक्षिप्त वर्णन देणार आहें.


| राजधानीचें नांव. | बांधणाराचें नांव. |
|---|---|
| १ इन्द्रप्रस्थ | पांच पांडव |
| २ जुनी दिल्ली ( लालकोट ) | अनंगपाल, पृथ्वीराज, कुतुबुद्दिन अबेक |
| ३ सीरी | अलाउद्दिन खिलजी |
| ४ तघलखाबाद | ग्यासुद्दिन तघलख |

| राजधानीचें नांव. | बांधणाराचें नांव. |
|---|---|
| ५ जहांपन्ना | महमद्‌शहा तघलख |
| ६ फिरोजाबाद | फिरोजशहा तघलख |
| ७ पुराणा किल्ला ( इन्द्रप्रस्थ ) | हुमायुन व शीरशहा |
| ८ शहाजहानाबाद ( अर्वाचीन दिल्ली ) | शहाजहान |
| ९ तात्पुरती नवी दिल्ली | हिंदुस्थान सरकार |
| १० नवी दिल्ली | ” ” |

दंतकथेप्रमाणें जेथें हल्लीं पुराणा किल्ला आहे तेथें पांडवांनीं आपली इन्द्रप्रस्थ राजधानी बांधली. इंद्रप्रस्थ माहात्म्य नांवाचें एक पुराण आहे. त्यांत मयासुरानें इन्द्रप्रस्थ नगरी कशी बांधली याचें साविस्तर वर्णन आहे. पण तें अतिशयोक्तीनें व कविकल्पनेनें भरलेलें असल्यामुळें विश्वासास पात्र नाहीं. अझून पांडवांचा व भारतीययुद्धाचा काल निश्चितपणें व बिनचूक असा ठरला नाहीं. युधिष्ठिरानें पुष्कळ वर्षें राज्य केलें व येथेंच त्यानें राजसूययज्ञ केला अशी दंतकथा व पुराण-कथा आहे. पण त्या काळच्या इमारतींचे किंवा वस्तूंचे अवशेष अझून सांपडलेले नाहींत. सिंध प्रांतांतील **मोहनजोडेरोच्या** प्रमाणें पुढेंमागें भूमिगत अवशेष सांपडले तरच दंतकथेला ऐतिहासिक सत्याचा आधार मिळण्याचा संभव आहे. तेथपर्यंत पुराणांतील अघळपघळ हकीकतीला ऐतिहासिक महत्व नाहीं.

पण जुन्या दिल्लीच्या किंवा लाल कोटच्या स्थापनेपासून ऐतिहासिक काळाचा प्रारंभ होतो व तव्हांपासूनचे इमारतींचे व दुसऱ्या वस्तूंचे कमीजास्त अवशेष प्रत्यक्ष उपलब्ध आहेत. ही जुनी दिल्ली हल्लींच्या दिल्ली शहरापासून दहाबारा मैल दूर आहे. नव्याजुन्या दिल्लयांच्या त्रिकोणाकृति भूमिभागाच्या नैऋत्य टोकाला ( पश्चिम दक्षिण ) ही जुनी दिल्ली आहे. तेथें जाण्यास आतां सुंदर निर्धूळ अस्फाल्ट रस्ता केलेला आहे. टांगे व टॅक्सी जाऊन येण्यास भाड्यानें मिळतात.

या जुन्या दिल्लीचें आवार बरेंच विस्तृत असून त्यासभोंवार सध्यां मोडका तोडका तट आहे. या किल्ल्यामध्यें दोनतीनशें वर्षांतील हिंदु व मुसलमान कारकीर्दींतील कितीतरी प्रेक्षणीय अवशेष व वस्तू आहेत. त्यांपैकीं सर्वांत जुनी आश्चर्यकारक वस्तु म्हणजे **लोहस्तंभ** होय. हा जुन्या हिंदु देवळाच्या चौकाचे मधोमध बसविलेला आहे. हा लोखंडाचा खांब ओतीव आहे. याचा व्यास सोळा इंच आहे. त्याची जमीनींत पुरल्यासकट उंची साठ फूट असावी म्हणजे यांत एकंदर पावणेपांचशें मण लोखंड आहे. इतक्या वजनाचा खांब ओतला असेल कसा याबद्दल अत्यंत आश्चर्य वाटतें. या स्तंभावर सर्वांत जुना जो शिलालेख आहे त्यांत स्तंभाला **कीर्तिभुज** असें म्हटलें असून तो **भाव** अगर **चंद्र** नांवाच्या राजानें उभारला असें लिहिलें आहे. या लेखाचीं अक्षरें **गुप्तकाळच्या** अक्षरासारखीं आहेत. यावरून हा शिला-लेख व हा लोहस्तंभ गुप्त घराण्यांतील राजांचा पाडाव करणाऱ्या एखाद्या राजाचा असावा; म्हणजे तो सन २१९ मधला असावा असा अंदाज केलेला आहे. आकराव्या शतकांत **तोमर** किंवा **तुवर** घराण्याच्या अनंगपाल नांवाच्या राजानें दिल्ली येथें राज्य स्थापिलें. त्याला एका विद्वान ब्राह्मणानें सांगितलें कीं, ‘ येथला लोहस्तंभ वासुकी सर्पाच्या डोक्यापर्यंत खोल गेलेला आहे. हा लोहस्तंभ अचल आहे तोंपर्यंत तुझें राज्य राहील.” अनंगपालास तें म्हणणें खोटें वाटलें. म्हणून त्यानें तो लोहस्तंभ उकरून पाहिला तों त्या खांबाचा बुंधा रक्तानें भरलेला दिसला ! आपल्या अश्रद्धेबद्दल अनंगपालाला वाईट वाटलें व त्यानें तो स्तंभ पुन्हा उभारला. पण तो पहिल्याइतका खोल गेला नाहीं, व म्हणून **ढिला** राहिला. या गोष्टीवरून या शहराला “ **दिल्ली** किंवा **ढिली** ” असें नांव पडलें अशी दंतकथा आहे. हल्लीं लोहस्तंभाचा चबुतऱ्यावरील खालचा दोनतीन फुटांचा भाग ओबडधोबड आहे. तेव्हां हा लोहस्तंभ एकदां काढून पुन्हां बसविलेला आहे व तो पहिल्या



नं. २२ ]  जुनी दिल्ली : कुतुबमिनार.  [ पान ८४



नं. २३ ] जुनी दिल्ली : हिंदु देवालय. [ पान ८३

इतका खोल गेला नाहीं हें खरें आहे. पण ही दंतकथा केव्हां व कशी निघाली हें सांगतां येत नाहीं.

अनंगपालानंतर चव्हाण घराण्याचा **पृथ्वीराज** दिल्लीचा राजा झाला. राठोर रजपूत घराण्याचा जयचंद हा त्याचा समकालीन असून तो बनारस येथें राज्य करीत होता. जयचंदानें आपल्या मुलीचें स्वयंवर मांडलें. उत्तर हिंदुस्थानचे पुष्कळ राजे आले; पण पृथ्वीराज आला नाहीं म्हणून त्याचा मातीचा पुतळा थट्टा म्हणून दाराशीं ठेवण्यांत आला. पण राजकन्येचें मन पृथ्वीराजावर गेलेलें होतें. म्हणून सर्व जमलेल्या जीवंत राजांना टाकून राजकन्येनें मातीच्या निर्जीव पुतळयाच्या गळयांत माळ घातली. पृथ्वीराज जवळच लपून बसला होता. त्यानें लगेच राजकन्येस घोड्यावर घेतली व तो दौडत आपल्या राजधानीला गेला. या कृत्याचा सूड उगविण्याकरितां जयचंदानें अफगाणिस्थानच्या **महमद घोरीस** स्वारी करण्यास बोलाविलें. ही दंतकथा कितपत विश्वसनीय आहे हें सांगतां येत नाहीं. पण सन ११९२ मध्यें महमद घोरीनें दुसऱ्यांदा हिंदुस्थानावर स्वारी केली व पानिपतच्या रणमैदानावर पृथ्वीराजाचा पराभव केला. पृथ्वीराज धारातीर्थीं मरण पावला. तेव्हांपासून उत्तर हिंदुस्थानांत मुसलमानांचा कायमचा अंमल सुरू झाला. महमद घोरी हिंदुस्थानांत राहिला नाहीं.. पण कुतुबुद्दिन अबेक महमदाचा प्रतिनिधि सन १२०६ मध्यें दिल्लीचा स्वतंत्र सुलतान बनला.

जुन्या दिल्लीला **रायपिठोराचा** कोट म्हणतात. पृथ्वीराजाच्या वेळच्या इमारती किंवा देवळें आतां शिल्लक नाहींत. पण कुतुबुद्दिन अबेकनें जी मशीद बांधली ती हिंदु देवळाच्या जोत्यावर व त्याच देवळाच्या नक्षीच्या व कोरलेल्या खांबानीं व दगडांनीं बांधली. अजून सुद्धां बारकाईनें पाहिल्यास छिन्नभिन्न केलेल्या मूर्ति दगडावर कोरलेल्या दिसतात. तसेंच खांबावर खूब नक्षी व कोरीव काम केलेलें आहे व तें सर्व हिंदू बांधकला व खोदकला पद्धतीचें आहे. भिंतीमध्यें एक संस्कृत

भाषेंतील शिलालेख आहे. मूर्ति खोदलेले दगड भिंतींत उलटे बसविलेले आहेत. बाराव्या शतकांतील हिंदु शिल्पकलेचे ते सुंदर अवशेष पाहून त्या काळच्या संस्कृतीचें आश्चर्य वाटतें.

जुन्या दिल्लीमध्यें हल्लीं जीं प्रेक्षणीय स्थळें आहेत तीं कुतुबुदिन अबेक, अलतमश व अल्लाउद्दीन खिलजी या सुलतानांच्या कारकीर्दींतील आहेत. त्यामध्यें अल्लाउद्दिन खिलजीनें बांधलेली **मद्रेसा** (शाळा), अल्तमशची कबर, व अलाईदरवाजा हीं खरोखरी वाखाणण्यासारखीं असून पुराणवस्तु संरक्षणखात्यानें या इमारतींची दुरुस्ती करून त्या चांगल्या स्थितींत ठेवल्या आहेत व मोकळ्या जागा स्वच्छ करून त्यावर हिरवें गवत लावलेलें आहे. यामुळें हा सर्व जुना भाग पहातांना आनंद व आश्चर्य असे मनोविकार प्रेक्षकाच्या मनांत उद्भूत होतात यांत शंका नाहीं. पण जुन्या दिल्लींतील प्रेक्षणीय स्थळांचा मुकुटमणि म्हणजे खरोखरींच कुतुबमिनारचें काम इतकें अप्रतिम आहे कीं, त्याची प्रचीति प्रत्यक्ष पाहिल्याखेरीज पटणारच नाहीं. त्याचें हुबेहुब शब्दचित्र काढणें कठीण काम आहे. हा मनोरा तांबड्या दगडाच्या बांधणीचा आहे. त्याच्या निरनिराळ्या मजल्याच्या तांबड्या दगडाच्या रंगांत थोडा-फार फरक आहे. यामुळें निरनिराळ्या मजल्याच्या तांबडेपणांत निर-निराळी छटा भासमान होते. पहिले तीन मजले सबंद तांबड्या दगडाचे आहेत. चवथा मजला सबंद संगमरवरी दगडाचा आहे व पांचवा शेवटचा मजला तांबड्या व पांढऱ्या दगडांच्या मिश्र बांधणीचा आहे ! हा मनोरा २३८ फूट उंच असून त्याला ३७९ पायऱ्या आहेत ! कुतुब-मिनारचा चबुतरा चौवीस कोनी असून त्याचा घेर १८७ फूट आहे. पहिला मजला ९५ फुटांचा असून त्याला एक अर्धवर्तुळाकार तर दुसरा तिकोनी असे पैलू पाडलेले आहेत. बहुतेक सर्व मुसलमानी इमारतींमध्यें मनोरे हे निवळ वर्तुळाकार असतात. कुतुबमिनारची ही पैलूची कल्पना अपूर्व आहे व या त्याच्या विशेषामुळेंच हा मनोरा अप्रतिम सुंदर दिसतो. शिवाय प्रत्येक मजल्याची घडण निरनिराळी आहे. दुसरा


मजला ५० फूट उंच असून मजल्याचे सर्व पैलू अर्धवर्तुळाकार आहेत. तिसरा मजला ४० फूट असून त्याचे सर्व पैलू तिकोनी आहेत. चवथा मजला २५ फूट असून तो नेहेमींच्या मनोऱ्याप्रमाणें अगदीं साधा व विन पैलुदार आहे. पण तो सर्व संगमरवरी दगडाचा असल्यामुळें पांढरा शुभ्र दिसतो. शेवटचा पांचवा मजला २२ फूट असून त्याला पुनः अर्ध वर्तुळाकार पैलू थोडच्या थोडच्या अंतरानें पाडलेले आहेत. पांचव्या मजल्याच्यावर गेल्यावर मनोऱ्यासभोंवतीं खुल्या कमानीचा घुमट आहे. हा कमानदार घुमट हल्लीं खालीं काढून ठेवण्यांत आला आहे व त्याऐवजीं पितळी कठडा केला आहे. पण पंचवीस वर्षांपूर्वीं मीं प्रथमच कुतुबमिनार पाहिला त्यावेळीं तो घुमट अजून मनोऱ्यावरच होता. प्रत्येक मजल्याचा सभोंवारचा सुंदर देखावा दिसावा व चढतांना विश्रांति मिळावी अशा दुहेरी उद्देशानें प्रत्येक मजल्याला सुंदर नक्षीदार सज्जे बांधलेले आहेत. हा मनोरा खालपासून वरपर्यंत सारख्या आकाराचा नाहीं. जोत्याजवळ त्याचा व्यास ४७ फूट आहे तर माथ्यावर फक्त ९ फूट आहे. म्हणजे जसजसें वर जावें तसतसा हा मनोरा निमुळता होत गेला आहे. सर्व मनोऱ्याला आंतून वर्तुळाकार जिना आहे. या जिन्यावरून चढत जाऊन प्रत्येक सज्जावर आल्यावर सभोंवारचा जास्त जास्त विस्तीर्ण असा भूमिभाग दिसूं लागतो. कुतुबमिनारावर याप्रमाणें चढत चाललें व शेवटल्या मजल्याच्या खुल्या व पितळी कठड्याच्या जागेवर उभें राहिलें म्हणजे तर दहा मैलांचा प्रदेश दृष्टीस पडून आश्चर्य वाटतें. कारण या सर्व प्रदेशांत कबरी मशिदी इत्यादि धार्मिक इमारती, तलावाचे बंधारे, शहरांच्या तटबंद्या व खासगी वाडे इत्यादिकांच्या अवशेषांचें अगणित रान पसरलेलें दिसतें व हिंदू व मुसलमान व ब्रिटिश अशा तीन अमदानींचा हजार वर्षांचा मूर्तिमंत इतिहास आपल्या मनःचक्षूंपुढें व चर्मचक्षूंपुढें एकसमयावच्छेदेंकरून उभा राहतो व कालचक्राच्या अप्रतिहत गतीचें राहून राहून आश्चर्य वाटतें. एकट्या लालकोट व राय-

पिठोरा नांवाच्या जुन्या दिल्लींत तीन साडेतीन शतकांचें स्मरण करून देणारीं प्रेक्षणीय स्थळें एकदम दृष्टीस पडतात !


जुनी दिल्ली अपुरी वाटूं लागल्यामुळें अल्लाउद्दिन खिलजीनें सन १३०३ मध्यें **सीरी** नांवाचें नवें शहर बांधण्यास सुरवात केली. जुन्या दिल्लीमध्यें जुम्मा मशिदीची वाढ व अलाई दरवाजा नांवाचा सुंदर दरवाजा हीं कामें आधींच केलीं होतीं. पण सीरी येथें त्यानें राजवाडा बांधला व त्याचे संरक्षणार्थ उंच तट बांधला. सीरी येथें सध्यां मोडक्या तोडक्या तटाखेरीज दुसरें कांहीं एक नाहीं.

चवथें दिल्ली शहर **तघलखाबाद** नांवानें **तघलख** घराण्याचा प्रस्थापक **ग्यासुद्दिन** तघलख यानें सन १३२१ मध्यें बांधलें. हें शहर जुन्या दिल्लीपासून पूर्वेकडे पांच सहा मैलांवर आहे. जी. आय. पी. रेलवेनें दिल्लीकडे येतांना **तघलखाबाद** नांवाचें स्टेशन लागतें. तेथून दिल्ली स्टेशन बारा मैल आहे. तघलखाबाद शहर स्टेशन नजीक आहे. दिल्लीचीं मामुली प्रेक्षणीय स्थळें पहातांना हें स्थळ जरा बाजूला राहतें. म्हणून मी एकदां टांग्यानें मुद्दाम तघलखाबादेस गेलों होतों. या शहराचा तट फार मोठमोठ्या दगडांचा बांधला असून तो मजबूत व दुर्भेद्य वाटला. हल्लीं हा तट मोडकळीस आला आहे खरा. तरी अद्यून सुद्धां हा तट व त्याचा संरक्षक खंदक हे भव्य भयप्रद दिसतात. किल्ल्यामध्यें सध्यां ग्यासुद्दिनच्या साध्या पण संगमरवरी घुमटाच्या कबरीखेरीज प्रेक्षणीय असें कांहीं एक राहिलें नाहीं. जिकडे तिकडे पडक्या इमारती व त्यांचे दगड दृष्टीस पडतात !


पांचवें **शहापन्ना** नांवाचें शहर **सीरी** शहराला लागून आहे व दोन्हीं शहरें जुन्या दिल्लीला नजीकच आहेत. हीं दोन्हीं शहरें जुन्या दिल्लीच्या वाढत्या वसाहती आहेत असें म्हटलें तरी चालेल. सीरीप्रमाणें शहापन्नामध्यें मोडकी तोडकी तटबंदी व एकदोन सामान्य मशिदी याखेरीज प्रेक्षणीय कांहीं एक नाहीं.




नं. २४ ]  जुनी दिल्ली : मशीद व लोहस्तंभ  [ पान ८२



नं. २५ ]  इन्द्रप्रस्थ : पुराणाकिल्ला.  [ पान ८७



नं. २६ ] दिल्ली : हुमायुनाची कबर. [ पान ९१



नं. २७ ] फिरोजाबाद : अशोकस्तंभ. [ पान ८७

सहावी दिल्ली **फिरोजाबाद** नांवाची **फिरोजशहा** तघलख यानें जुन्या दिल्लीच्या उत्तरेस आठ मैलांवर व हल्लींच्या दिल्ली शहराच्या तटाच्या आग्नेय दिशेस ( दक्षिण पूर्व ) बांधली. फिरोजशहानें सदतीस वर्षें राज्य केलें. या दीर्घकालीन कारकीर्दीमध्यें फिरोजशहानें जुन्या दिल्लींत, हल्लींच्या दिल्लीच्या उत्तरेच्या टेकडीवर व इतर ठिकाणींही पुष्कळ इमारती व मशिदी बांधल्या.त्या इकडे तिकडे विखुरलेल्या आहेत. फिरोजाबाद येथें फिरोजशहानें एक किल्ला बांधला, तो फिरोजशहाचा कोटिला म्हणून सध्यां प्रसिद्ध आहे. किल्ल्याची पडकी तटबंदी व एका मशिदीचा अवशेष याखेरीज फिरोजाबादमध्यें आतां प्रेक्षणीय असें कांहीं नाहीं, मात्र तीन मजली कमानदार चबुत्र्यावर एक अशोक स्तंभ बसविलेला आहे. तो अशोकाच्या इतर प्रेक्षणीय स्तंभांप्रमाणें फार प्रेक्षणीय आहे. फिरोशहानें अशोककालीन दोन स्तंभ, एक **अंबाला** जिल्ह्याहून व दुसरा **मिरत** जिल्ह्याहून, उचलून दिल्लीमध्यें आणले. येवढे मोठे दगडी खांब फिरोजशहानें इतक्या दूरच्या अंतरावरून दिल्लीमध्यें कसे आणले हें एक आश्चर्य आहे. पण त्यानें हें आश्चर्यकारक काम सिद्धीस नेलें. त्यानें या अशोक स्तंभांपैकीं एक फिरोजाबादमध्यें उभा केला व दुसरा हल्लींच्या दिल्लीच्या उत्तरेकडील टेकडीवर उभा केला. हल्लीं हे अशोककालीन दोन स्तंभ दिल्ली शहराचे प्रेक्षणीय अलंकार बनले आहेत.

सातवें दिल्ली शहर म्हणजे **पुराणा** किल्ल्याचें ठिकाण होय. याच ठिकाणीं पांडवांची राजधानी इन्द्रप्रस्थ होती अशी दंतकथा आहे. हल्लींची नवी दिल्ली व विशेषतः सेक्रेटॅरीएट गृहें व व्हाईसरॉयाचें गृह हीं या पुराणा किल्ल्याच्या अगदीं समोर थेट पश्चिमेस उंचवट्याच्या जागेवर बांधलीं आहेत. सन १९१२ सालीं नवी दिल्ली बांधण्याकरितां जेव्हां हा सर्व भूमिभाग साफसूफ करून सपाट करण्यांत येत होता व पुराण्या किल्ल्याचा तट व आंतील जागा मोकळ्या करण्यांत येत होत्या त्यावेळीं मीं व माझे बंधू यांनीं या पुरातन व भावी प्रेक्षणीय स्थळाचीं ठिकाणें पाहिलीं होतीं. हल्लीं हा नव्या शहरांतील खुला भाग झालेला आहे व

जिकडे तिकडे उत्तम सडका, विजेची रोषणाई, झाडांच्या रांगा व हिरवीं गार गवताळ मैदानें दृष्टीस पडतात व प्रवाशाचें मन आनंदानें व आश्चर्यानें उचंबळून येतें. इतकी या स्थळीं हल्लीं क्रांति घडून आली आहे. मीं पुराणा किल्ला पुन्हा एकदां गेल्या एप्रिल महिन्यामध्यें पाहिला. तेव्हां मीं दिल्ली सेंट्रल स्टेशनच्या नजीक नवाबझार रस्त्यावरील महाराष्ट्रीय वसतिगृहांत रहात होतों. तेथून मोटारीनें चांदणी चौक रस्त्यानें एलजीन रस्त्याला मिळालों. चांदणी चौकाचे प्रारंभींच मोठा थोरला घड्याळ बुरुज लागतो. हा रस्ता दिल्ली शहरांतील एक प्रशस्त व सुंदर रस्ता आहे. एलजिन रस्ता हा शहराच्या तटाच्या **लाहोर** दरवाजांतून थेट दक्षिणदिशेनें जुन्या दिल्लीकडे जातो. या रस्त्याचे डाव्या हातास व नव्या दिल्लीकडून पूर्वेकडे येणाऱ्या रस्त्यावर पुराणा किल्ला आहे. या किल्ल्यासभोंवार पूर्वकाळीं मोठा खंदक होता. आतां तो खंदक बुजविला आहे. तरी पण किल्ल्याचे प्रवेश दरवाजाशीं पूर्वींच्या खंदकावर पूल आहेच. दरवाजांतून आंत शिरल्याबरोबर जिकडे तिकडे हिरवें हिरवें गार मैदानच मैदान पाहून माझें मन प्रसन्न झालें. हल्लीं पुराण वस्तू संरक्षण खात्याच्या देखरेखीमुळें सर्व प्रेक्षणीय स्थळें नयनमनोहर बनलीं आहेत असें पदोपदीं वाटल्याखेरीज रहात नाहीं. किल्ल्याच्या मध्यभागीं एक तांबड्या दगडाची साधी पण सुबक मशीद आहे. येथली दुसरी पाहण्यासारखी इमारत म्हणजे शेर मंडळ ही होय. ही इमारत फारच छोटी आहे व हिला वर जाण्यास उंच उंच व अरुंद दगडी पायऱ्यांचा जिना आहे. ही छोटेखानी इमारत शीरशहा बादशहानें वाचनालय म्हणून बांधली असें म्हणतात. या इमारतींतील बिकट व संकुचित जिन्यावरून उतरतांना हुमायून बादशाहाचा पाय दुखावला व त्याच दुखण्यानें त्याला मृत्यु आला.

पुराणा किल्ला व त्यांतील साधें व सुबक शिल्पकाम हें शीरशहा व मोंगल बादशाह हुमायून यांच्या कारकीर्दींतील आहे. जगप्रसिद्ध मोंगल

बांधकलेचा पूर्वरंग या पुराण्या किल्ल्यांतील नक्षीदार कारागिरीच्या कामावरून दिसून येतो यांत शंका नाहीं.

आठवी दिल्ली ही शहाजहान बादशाहानें वसविली. तिलाच **शहाजहानबाद** म्हणतात. हल्लींचें दिल्ली शहर म्हणजे शहाजहान-बादच होय.

शहाजहान बादशाहाची कारकीर्द म्हणजे मोगल बादशाहीच्या सामर्थ्याचा, वैभवाचा व ललितकलाकृतिनिर्मितीचा माध्यान्ह काळ होय. शहाजहान बादशाहानें दिल्ली व आग्रा या मोगल बादशाहीच्या दोन्ही राजधान्या जगप्रसिद्ध कलाकृतींनीं अलंकृत केल्या. यामुळें हीं दोन शहरें उत्तर हिंदुस्थानांतील प्रेक्षणीय स्थळांचे मुकुटमणी बनलीं.

मोंगल बादशाही अंमल संपून इंग्रजी अंमल सुरू झाल्यापासून दिल्ली शहराचें महत्त्व व वैभव कमी होत गेलें. पण त्या दिल्ली शहराचें गत-वैभव त्याला पुनः मिळण्याचा योग बंगालच्या फाळणीच्या चळवळीनें आला. त्या चळवळीचा परिणाम असा झाला कीं, ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थानची राजधानी कलकत्त्याहून दिल्लीस आणण्याचें ठरविलें व सन १९१२ मध्यें दिल्ली दरबार भरून जॉर्ज बादशाहानीं स्वमुखानें दिल्ली राजधानी केल्याचें जाहीर केलें. त्यावेळीं नववें दिल्ली शहर तात्पुरती नवी दिल्ली म्हणून बांधण्यांत आलें. हें शहर शहाजहानबादेच्या उत्तरेस व प्रथमतः वर्णन केलेल्या दिल्लीच्या त्रिकोणाकृति भूमिभागाच्या निमुळत्या उत्तर कोपऱ्यांत वसविण्यांत आलें. पण हा भूमिभाग संकुचित, सखल व नदीकांठचा असल्यामुळें गैरसोयीचा व बिनहवेचा व रोगट आहे असें समजून आलें म्हणून पुनः राजधानीचें स्थानांतर करून शेवटचें दहावें शहर **नवी दिल्ली** म्हणून बांधण्यांत आलें. मागें सांगितल्याप्रमाणें शहाजहानबादेच्या दक्षिणेस व इन्द्रप्रस्थाच्या पश्चिमेस टेकड्या सपाट करून त्या पठारावर हें बांधण्यांत आलें. या नव्या दिल्लीला वीस कोट रुपये खर्च करण्यांत आले आहेत ! अशी ही दश दिल्ल्यांची कुळकथा आहे.

तेव्हां हल्लींचें विस्तीर्ण दिल्ली शहर आठ, नऊ व दहा या शहरांचें त्रिकूट आहे. उत्तरेच्या तात्पुरत्या भागाला सिव्हिल स्टेशन म्हणतात, मधला भाग म्हणजे दिल्ली **शहर** व दक्षिणेचा भाग म्हणजे **नवी** दिल्ली होय.

हल्लीं दिल्ली शहर हें हिंदुस्थानांतील एक अत्यंत रमणीय शहर बनलें आहे यांत शंका नाहीं. जुन्या दिल्लीपासून तों थेट वजिराबादेपर्यंत दक्षिणोत्तर पंधरा वीस मैल लांब व यमुना नदीपासून शकूरपुर व टाटरपूर या दोन रेल्वेंच्या दोन स्टेशनांपर्यंत पूर्वपश्चिम सातआठ मैल इतक्या विस्तृत भूमिभागांत जिकडे तिकडे फरसबंदी पायवाटेसकट निर्धूळ डामरी व कांक्रीटचे उत्तम रस्ते झाले आहेत. रस्त्यांच्या दोन्ही बाजूंस नाना जातीचीं व नानारंगी फुलांचीं सुंदर झाडें लावलीं आहेत. या सर्व रस्त्यांवर हारीनें विजेचे दिवे लावले आहेत, व रात्रींच्या वेळीं शहरांत व रस्त्यावर इतका विजेच्या दिव्यांचा लखलखाट होतो कीं, प्रत्यक्ष **आकाशगंगा** खालीं पृथ्वीवर उतरली आहे कीं काय असा भास होतो.

अशा या त्रिकुटी शहराचें विस्तीर्ण वर्णन करण्यास स्वतंत्र पुस्तकच लिहावें लागेल. पण मला या त्रिकुटी शहराचा समाचार एका प्रकरणांत घेणेंच भाग आहे. प्रथम दिल्ली शहरांतील प्रख्यात प्रेक्षणीय स्थलवर्णनाकडे वळणें बरें. हीं प्रख्यात स्थळें म्हणजे हुमायुनाची कबर, सफतर जंगाची कबर, दिल्लीचा किल्ला व जुम्मा मशीद हीं होत. हीं सर्व स्थळें व पूर्वीं वर्णन केलेलीं जुन्या दिल्लींतील स्थळें हल्लींच्या काळीं मोटारीनें तीनचार तासांत सहज पाहून होतात. पूर्वींच्या काळीं टांग्यानें जास्त वेळ लागे व एका दिवसांत सर्व प्रेक्षणीय स्थळें पहावयाचीं म्हटलें तर सकाळीं दोनतीन तास व दोन प्रहरीं दोनतीन तास इतका वेळ लागे.

दिल्लींतील मोंगल बांधकलापद्धतीचा प्रारंभ हुमायुनाच्या कबरीनें केला. सफतरजंगाची कबर व हुमायुनाची कबर या अगदीं समोरासमोर असून हल्लीं त्या लोदी नांवाच्या सुंदर रस्त्यानें जोडलेल्या आहेत.

दिल्ली शहरांतील स्टेशनकडून तटाच्या दिल्लीदरवाज्यांतून बाहेर आलें म्हणजे थेट दक्षिणेस जाणारा दिल्ली कोटरा नांवाचा प्रशस्त रस्ता लागतो. थोड्याच वेळानें जी. आय. पी. रेल्वे रस्ता भुयारी पुलानें ओलांडावा लागतो. तेथेंच नैऋत्य दिशेनें ( दक्षिणपश्चिम ) पृथ्वीराज रस्ता नांवाचा एक नवाच रस्ता लागतो. तो सरळ सुतासारखा थेट सफतरजंगाच्या कबरीला जातो.

सफतरजंग हा अयोध्येच्या पहिल्या नबाबाचा पुतण्या होता. हा दिल्लीच्या बादशाहाचा एक मोठा सरदार होता. कांहीं काळ तो मुख्य प्रधानाच्या पदवीपर्यंत चढला होता. त्या अंदाधुंदीच्या काळांत वाऱ्याला पाठ देऊन वागणारा असल्यामुळें सफतरजंग हा त्या काळाचा एक यशस्वी मुत्सद्दी होऊन गेला. तो वयातीत होऊन सन १७५३ मध्यें वारला. त्याची कबर ही मुख्यतः तांबड्या दगडाची बांधली आहे; पण त्यांत पिवळट रंगाच्या दगडाचे थर घातले आहेत. शिवाय नक्षीकरितां संगमरवरी दगडही वापरला आहे. या कबरीचें कलाकुसरीचें काम फार प्रेक्षणीय आहे. बायकांच्या अंगावर फाजील अलंकार घातले म्हणजे कांहींशी सौंदर्यहानि होते तशी या कबरीची एकंदर स्थिति आहे. तरी पण कबरीची प्रमाणबद्ध बांधणी, कबरीचा आकार व तिची पार्श्वभूमि या सर्वांचा मनावर फारच अनुकूल परिणाम होतो हें मी स्वानुभवावरून सांगू शकतों. मोंगल शिल्पकलेचा हा शेवटचा उत्तम मासला होय यांत शंका नाहीं.

सफतरजंगाच्या कबरीवरून थेट पश्चिमेकडे जाणाऱ्या लोदी रस्त्यानें गेलें म्हणजे दिल्ली मथुरा रस्ता लागतो. त्याचे जरा पुढें गेलें कीं हुमायुनाच्या कबरेचें भिंतींनीं संरक्षित चौकोनी आवार लागतें. आंत प्रवेश केल्याबरोबर तांबड्या पांढऱ्या दगडांची व पांढऱ्या शुभ्र संगमरवरी घुमटाची भव्य व सुंदर इमारत पाहून प्रवाशी तोंडांत बोटें घालतो. सफतरजंगाची कबर मोंगल शिल्पकलेचा शेवटचा उत्तम मासला तर हुमायुनाची कबर त्या कलेच्या प्रारंभींचा उत्तम मासला:

हीं दोन प्रेक्षणीय स्थळें समोरासमोर असलेलीं पाहून पौर्णिमेच्या पहांटेस एकदम दिसणाऱ्या चन्द्रसूर्यांच्या अस्तोदयकाळच्या आकाशाची मला आठवण झाली. त्या काळचा आकाशाचा देखावा जसा व जितका आश्चर्यानंददायी असतो तसाच व तितकाच हा सफतरजंग-हुमायून कबरींचा देखावा वाटतो, यांत शंका नाहीं. हुमायुनाच्या कबरीचें नानारंगी दगडाचें नक्षीकाम चित्ताकर्षक आहे. पांढरा शुभ्र, साध्या व शुद्ध 'सारसानिक' बांधणीचा घुमट तर अप्रतिम आहे. हुमायुनाची ही कबर म्हणजे भावी ताजमहालाची **नमुन्याची अल्पप्रमाणी** प्रतिकृति नव्हे **पूर्वकृति** आहे असें वाटल्याखेरीज रहात नाहीं ! इतकी ही कबर सुबक व सुंदर बांधणीची आहे!


हुमायुनाच्या कबरेच्या जरा अलीकडे व दिल्ली मथुरा रस्त्याच्या दोन्ही अंगांस इतक्या मशीदी, कबरी व दर्गे लागतात कीं, येथें काय पहावें व काय पाहूं नये असा मनाचा मोठा गोंधळ उडून जातो. कारण येथें नव्या जुन्या व उत्तम, मध्यम, कनिष्ठ बांधकलापद्धतींची अगदीं खिचडी झाली आहे. प्रथमतः येथें तघलख घराण्याच्या समकालीन व ह्यातीत होऊन वारलेल्या **निझामुद्दीन अलिया** नांवाच्या साधूची सुंदर संगमरवरी समाधी आहे. या समाधीला जाण्याचा छपरानें व नक्षीच्या संगमरवरी जाळ्यांनीं अलंकृत असा लांबचलांब प्रवेशमार्ग आहे. हा प्रेक्षणीय आहे. या मुख्य समाधीच्या आसपास औरंगझेबानंतरच्या किती तरी बादशाहांच्या छोट्या छोट्या कबरी आहेत ! ज्या बादशाहांना स्वतःची स्वतंत्र कबर आपल्या हयातींत बांधण्याचें सामर्थ्य व संपत्ति नव्हती त्यांना या साधूच्या समाधीशेजारीं पुरलें असून त्यावर छोट्या कबरी बांधल्या आहेत. हा भूमिभाग पाहून क्रिसचन प्रार्थनामंदिरा नजीक असलेल्या कबरस्थानाचीच मला आठवण झाली व तीं कबरस्थानें पाहतांना जी करुणरसात्मक भावना मनांत येते तशीच भावना हा भूमिभाग व तेथल्या त्या लहानमोठ्या कबरी व मशिदी पहातांना माझ्या मनांत उद्भूत झाली. असो.

दिल्लीशहरामध्यें किती तरी मशिदी आहेत व मुसलमानी मशिदींची बांधणी एका ठरीव साच्याची असते. फरक काय तो मशिदीच्या आकारामध्यें व बांधण्याला उपयोगांत आणलेल्या उपकरणांमध्यें असावयाचा. यामुळें मासल्याकरितां एक मशीद पाहिली कीं, बाकीच्यांची सहज कल्पना करतां येते. दिल्लींतील शहाजहान बादशाहानें बांधलेली मशीद हिंदुस्थानांतील मुसलमानी मशिदींचा मुकुटमणी आहे यांत शंका नाहीं. या मशिदीसभोंवार केवढें तरी खुलें पटांगण आहे. (हल्लीं तें पटांगण दुकानांनीं व्यापल्यामुळें कमी खुलें दिसतें). यामुळें ही भव्य व सुंदर इमारत फारच उठावांत दिसते. खुल्या मैदानाच्या उंचवट्यावर ही बांधलेली असून वर चढण्यास प्रशस्त व ऐसपैस अशा तांबड्या दगडाच्या पायऱ्या बांधलेल्या आहेत. लांबचलांब व रुंद पण बेताच्या उंचीच्या पायऱ्यांचा हा खुला जिना चढतांना मशिदीच्या भव्यतेची कांहींशी कल्पना मनांत उभी राहते. पण पुढल्या महादरवाज्यांतून मशिदींत पाऊल टाकलें कीं, समोरची अवाढव्य इमारत व तिच्या पुढचा तो ऐसपैस चौक पाहून पाहणारा थक्क होऊन जातो. सर्व चौकभर तांबड्या पांढऱ्या दगडांची फरसबंदी केली आहे. हा ४५० फूट लांब व तितकाच रुंद असा खरा चौकोनी चौक आहे. म्हणजे हल्लीं आमचीं नियमानुरूप क्रिकेट मैदानें जेवढीं लांब रुंद असतात तितका हा चौक मोठा आहे! चौकाच्या तिन्ही बाजूंना खुल्या कमानींचे पण वरून फरसबंदी गच्ची केलेले सोपे आहेत. या प्रशस्त चौकासमोरच संगमरवरी दगडाची पांढरी सफेत जुम्मा मशीद आहे. तिला मधल्या भागांत तीन मोठे घुमट असून दोन बाजूच्या कोपऱ्यांवर दोन उंच व बारिक मनोरे आहेत. सर्व मशिदीच्या प्रचंड दालनांत निमाज पढणाऱ्या मंडळीकरितां काळ्या दगडाच्या महिरपीनें आंखलेल्या व हारीनें राखलेल्या संगमरवरी पांढऱ्या शुभ्र जागा केल्या आहेत. मशिदीच्या मधोमध मौलवीकरितां तीन पायऱ्या भिंतीला लागून बांधलेल्या आहेत. मशिदीमध्यें प्रवेश केला म्हणजे मशिदीचा


भव्यपणा व प्रमाणबद्ध बांधणी यांनीं पाहाणाराचें मन आश्चर्यचकित होतें. ही जुम्मा मशीद मोगल बांधकलेचा उत्तमांतला उत्तम मासला आहे यांत शंका नाहीं.

शहाजहानाबादेपैकीं सर्वांत मोठें प्रेक्षणीय स्थळ म्हणजे दिल्लीचा किल्ला होय. आग्र्याचा किल्ला व दिल्लीचा किल्ला हे एकमेकांपासून सुमारें सव्वाशें मैलांचे अंतरावर असले तरी ते जुळया भावंडासारखे किल्ले आहेत. दोन्ही किल्ले यमुना नदीचे दक्षिण कांठावर आहेत; ते भुईकोट, राहत्या राजवाड्यावजा किल्ले आहेत; ते तांबड्यालाल दगडाच्या सुमारें पाऊणशें फूट उंचीच्या व दीड मैल लांबीच्या तटांनीं व तटाला लागून खणलेल्या खोल खंदकांनीं संरक्षिलेले आहेत; ते ललितकलाप्रिय अशा बादशाहांनीं बांधलेले आहेत व म्हणून त्यांच्यामध्यें कमानदार आच्छादिलेले बाजार, स्नानगृहें, रंगमहाल, मोतीमसजिद, दिवाणी खास व दिवाणी आम अशा **एकावर एक ताण** सुंदर सुंदर प्रेक्षणीय इमारती आहेत!


दिल्लीच्या किल्ल्याचा मुख्य दरवाजा **लाहोर दरवाजा** हा पश्चिमाभिमुख असून शहराच्या **चांदणी चौक** नांवाच्या प्रशस्त व सुंदर रस्त्यासमोर आहे. हल्लीं किल्ल्यांत जाण्यास खंदकाचे बाहेर असलेल्या तंबूवजा देवडीमधून दोन आणे भरून परवानगी पास घ्यावा लागतो. दोन्ही बाजूला तांबड्या लाल दगडाच्या तीन मजली बुरुजांनीं संरक्षिलेला व माथ्यावर लहान मोठ्या पांढऱ्या शुभ्र घुमटांनीं व मनोऱ्यांनीं शोभायमान झालेला तो चाळीस फूट उंचीचा व चोवीस फूट रुंदीचा भव्य कमानदार दरवाजा प्रवाशाचें मन मोहून टाकणारा आहे. दरवाजांतून आंत शिरलें कीं, हल्लीं दोन्ही बाजूंस दुकानेंच दुकानें लागतात. पूर्वींचा हा बाजारच होता. तो लांबच लांब बाजार टाकून पुढें गेलें कीं चौकोनी हिरवींगार हिरवळीची फुलबाग लागते. पूर्वीं हा चौकोनी तलाव होता असें म्हणतात. ही बाग ओलांडली कीं, बादशाही नौबत-




नं. २८ दिल्ली : शहराचा काश्मीर दरवाजा. [ पान ९९



नं. २९ ] दिल्ली : किल्ल्याचा दिल्ली दरवाजा. [ पान ९४



नं. ३२ ] नवी दिल्ली : सेक्रेटारिएट इमारत ( उत्तर भाग ) [ पान ९८



नं. ३०] दिल्ली : किल्ल्यांतील मोती मशीद [पान ९३

खान्याची छोटी पण सुबक दुमजली इमारत लागते. या नौबतखान्याच्या दरवाजांतून आंत गेलें कीं, लंब चौकोनी व ऐसपैस असें विस्तीर्ण पटांगण लागतें व समोरच **दिवाणी आम** नांवाचा डोळे दिपविणारा तो अद्वितीय दिवाणखाना दृष्टीस पडतो ! या एक मजली खुल्या दरबार दिवाणखान्याच्या कलाकुसरीच्या कामाचें शब्दांनीं वर्णन करणें अशक्य आहे. हें काम प्रत्यक्ष पाहूनच डोळयाचें पारणें फेडलें पाहिजे. या दरबार दिवाणखान्यांतच शहाजहान बादशहाचें जगप्रसिद्ध रत्नजडित **मयूरासन** नांवाचें सिंहासन होतें. हा दिवाणखाना कितीही वेळ पाहिला तरी मनाचें समाधान होत नाहीं ! पण प्रेक्षकाला नाइलाजानें पुढें पहात पहात जावें लागतें. या दिवाणखान्याच्या मागें पण दिवाणखान्याला जोडून रंगमहाल नांवाची बादशहाची विश्रांति घेण्याची पांढरीशुभ्र इमारत आहे. या इमारतीच्या कमानदार खिडकींतून यमुना नदीचा नीळसर काळसर प्रवाह दिसतो. येथून दिसणारा निसर्गरमणीय देखावा अवर्णनीय आहे यांत शंका नाहीं. या रंगमहालाचे डाव्या बाजूस दिवाणी खास, हमामखाना ( स्नानगृहें ) व पुढें मोती मसजिद इत्यादि इमारती एकापुढें एक लागतात तर उजव्या बाजूस बादशहाच्या राण्यांकरितां बांधलेल्या इमारती लागतात. या सर्व इमारतींवर झराझर नजर टाकीत पुढें पुढें पहात जाण्याखेरीज प्रेक्षकांस गत्यंतर नसतें. कारण प्रत्येक प्रेक्षणीय नक्षीकाम व कलाकुसरीचें काम बारकाईनें पाहीन म्हटलें तर तासचे तास नव्हे दिवसचे दिवस हा एक किल्ला पहाण्यास पुरावयाचे नाहींत, मग तास दीड तासाच्या अवधींत काय काय पहाणार ! तेव्हां सर्व किल्ल्यांतील इमारतींचें ओझरतें दर्शन घेऊनच समाधान मानावें लागतें. मलाही त्याच प्रमाणें करावें लागलें. झालें, येथें हल्लींच्या दिल्लीचें म्हणजे शहाजहानाबादेचें माझें दृश्यदर्शन संपलें. आतां इंग्रजांच्या **तात्पुरत्या** व **नव्या** दोन दिल्ल्यांचें वर्णन तेवढें राहिलें. तात्पुरती दिल्ली ही आतां **टाकलेल्या** शहरासारखीच आहे. तिचें दृश्य-

दर्शन मीं एका दोन प्रहरीं पायी चालीनें तीन चार तासांत संपविलें. तेव्हां त्याकडे वळणें बरें.

हिवाळयामध्यें दिल्लीची हवा थंडगार,सुखकर व आरोग्यवर्धक असते. त्या ऋतूमध्यें दिल्लींतील निवास सामान्यतः विलायतेंतील निवासाप्रमाणें वाटतो. लोकरीचे कपडे घालून बाहेर पडलें म्हणजे कडक थंडीसुद्धां भासत नाहीं. मी नोव्हेंबर सन १९३२ सालीं दिल्लीस एक पंधरवडा राहिलों होतों. सेंट्रल स्टेशननजीकच्या रॉयल हॉटेलमध्यें मी एक स्वतंत्र खोली घेऊन रहात होतों. दररोजचा हॉटेल चार्ज चार रुपये होता. या सर्व पंधरवड्यामध्यें मी सकाळ संध्याकाळ तीन तीन तास पायीं सहल करावयास जात असें.

पूर्वपश्चिम जाणारी इ. आय. आर. रेल्वेलाईन हीच दिल्ली शहर आणि दिल्ली कँटोन्मेंट व सिव्हिल लाईन व तात्पुरती दिल्ली यामधली मर्यादा होय. या लाइनीच्या उत्तरेस दिल्ली शहराचा तट लागतो. मी एका दिवशीं बरोबर चार वाजतां चहा घेऊन पायीं दिल्ली सिव्हिल लाइन्स व तात्पुरती दिल्ली पाहण्यास निघालों. हाटेलांतून निघालों तों रेल्वे लाइनला समांतर असलेल्या सुंदर व गर्दछाय रस्त्यानें जरासा पश्चिमदिशेकडे गेलों तोंच सदर बाजाराकडून येणारा व दिल्लीमधील दक्षिणोत्तर जाणाऱ्या टेकडीच्या पठारावरून थेट वजिराबादेपर्यंत जाणारा सुंदर रस्ता लागला. मी या रस्त्याला लागलों व थेट उत्तर दिशेनें चाललों. या रस्त्याला लागल्याबरोबर रेल्वेवरील पायवाटांनीं युक्त असा मोठा पूल लागतो. या पुलावरून शहरांतील रेल्वेच्या जाळ्यांची मोठी मौज दिसते. आपल्या उजव्या हाताला वायव्य दिशेनें ( पश्चिम उत्तर ) जाणारा अंबाला कालका रेल्वे रस्ता व नैऋत्य दिशेनें बी. बी. सी. आय. रेल्वेचा अजमेर मेवाड रस्ता दिसतो तर डावीकडे पूर्वेस जाणारा इ. आय. आर. रेल्वे रस्ता व दक्षिणेस जाणारा जी. आय. पी. रेल्वे रस्ता दिसतो. पूल टाकून

पुढें आलें कीं, टेकडीचा पठार व त्यावरील सुतांत गेलेला तो सुंदर रस्ता पाहून मनाला आनंद व आश्चर्य वाटतें. येथून दिसणारा देखावा विचित्र ( विशेषेण चित्र picturesque ) दिसतो. या ठिकाणीं टेकडी बरीच उंच आहे ती समुद्रसपाटीपासून ७३० फूट उंच आहे असें दिल्लीच्या नकाशावरून मला कळलें. उजव्या हाताला खालीं खोलांत सबर्जा मंडी नांवाचा शहराचा भाग आहे. हा भाग पुष्कळच दाट वस्तीचा दिसला. डावीकडे खुलीं सपाट हिरवीगार मैदानें व बागा दिसल्या व तरळक तुरळक बंगले दिसले. सबजी मंडीकडून पूर्वपश्चिम जाणारा एक मोठा रस्ता या पठारावरून जाणाऱ्या रस्त्याशीं काटकोन करून जातो. यामुळें पठारावरच्या प्रारंभींच एक मोठा रस्त्याचा चौक पडतो. येथें सभोंवारचा सुंदर देखावा पहात मी कांहीं वेळ उभा राहिलों. हा चौक टाकून पठार रस्त्यानें पुढें गेलें कीं, उजव्या हातास ५७ सालच्या बंडाचा स्मारक स्तंभ दृष्टीस पडतो. हा स्मारक स्तंभ पाहून माझे मनांत सुखदुःखद असा मिश्र मनोविकार उद्भूत झाला हें कबूल केलें पाहिजे. हिंदुस्थानाला स्वातंत्र्य मिळवून देण्याचा बंडवाल्यांचा प्रयत्न निष्फळ झाला म्हणून वाईट वाटलें. पण अनन्वित कृत्यें करणाऱ्या व बेशिस्तपणें वागणाऱ्या शिपायांचा पराभव होऊन हिंदुस्थान दुसाळ्या व्हिक्टोरिया राणीच्या प्रत्यक्ष अंमलाखालीं आला म्हणून बरें वाटलें. अशा मिश्रमनोविकाराच्या मनःस्थितींत मी पुढें गेलों तों उजव्या बाजूस सुंदर चबुतऱ्यावर उभा केलेला अशोकस्तंभ पाहिला व आतां आनंदाश्चर्याचा मनोविकार मनांत उद्भूत झाला. अशोकाच्या उदार व प्रजाहितपर कारकीर्दीबद्दल व त्या काळच्या हिंदुस्थानच्या सुस्थितीबद्दल आनंद वाटला तर फिरोजशहा तघलख बादशाहानें मोठ्या प्रयासानें अशोकाचे दोन स्तंभ दिल्ली शहराची शोभा वाढविण्याकरितां आणिले याबद्दल आश्चर्य वाटलें. हा पठार व आसपासचें जंगल फिरोजशहा तघलख बादशाहानें शिकारभूमि म्हणून राखून ठेविलें होतें व त्यानें या पठारावर नकळत आपलीं बरींच स्मारकें करून ठेविलीं.

त्यांपैकीं पहिलें स्मारक म्हणजे अशोक-स्तंभ होय. दुसरीं दोन स्मारकें इमारत रूपानें अस्तित्वांत आहेत. तींहि रस्त्याच्या उजव्याच हाताला आहेत. पहिली इमारत विलक्षण आहे. ही एक वेधशाळा किंवा घड्याळ बुरुज यासारखी इमारत असावी. दुसरी इमारत चौबुर्जी ( चार घुमटी ) मशीद आहे. दोन्ही साध्या पण सुबक बांधणीच्या इमारती आहेत. हीं तीन फिरोजशहाच्या काळचीं पुरातन स्मारकें टाकून पुढें गेलें म्हणजे अगदीं अर्वाचीन काळचा इंग्रज अंमलाचा निदर्शक निशाणबुरुज लागतो.

टेकडीच्या पठारावरील हा रस्ता साधारण उतरता आहे. निशाण बुरुजाशीं तर तो सभोंवारच्या जमिनीसपाट होतो. येथून सन १९१२ मध्यें तात्पुरती पण आतां टाकलेली राजधानी सुरू होते. या निशाण बुरुजाच्या डाव्या हातास व्हाईसरॉयच्या राजवाड्याचें दुहेरी लोखंडी फाटक व त्याच्या बाजूचे खुजे पहारेकरी बुरुज व आंतील बसक्या इमारती दृष्टीस पडतात तर दुसरे बाजूस सेक्रेटारिएटच्या जोड इमारती दृष्टीस पडतात. पण सध्यां या इमारती ओसाड असून इकडे सर्वत्र सामसूम आहे असें वाटतें. पठारावरील हा रस्ता सरळ उत्तर दिशेनें फिरोज तघलख बादशाहानें बांधलेल्या शहाअलम साधूच्या समाधी-वरून थेट वजिराबादेपर्यंत जातो. पण हॉटेलांतून निघाल्यापासून येथपर्यंत चालत येण्यास मला जवळ जवळ दोन तास लागले. म्हणून व पुढें पहाण्यालायक असें कांहीं नाहीं म्हणून मी **अलीपूर** नांवाच्या सिव्हिल लाईन्सकडे व शहराकडे जाणाऱ्या रस्त्यानें परत फिरलों. तात्पुरती सेक्रेटारिएट इमारत ही **अलीपुर** रस्त्यावर आहे. टेकडीच्या पठारावरून जाणारा **रिज** रोड हा जसा एक दक्षिणोत्तर रस्ता सिव्हिल लाईन्सच्या पश्चिमेकडच्या बाजूनें सारखा दिल्ली शहराच्या उत्तर तटा-पर्यंत गेला आहे, तसाच हा **अलीपुर** रोड सिव्हिल लाईन्सच्या पूर्वे-कडच्या बाजूनें थेट शहराच्या प्रख्यात **काश्मीर** दरवाज्यापर्यंत गेला आहे. **रिजरोडप्रमाणें** हाही रस्ता प्रशस्त गर्दछाय व निर्धूळ असून,

त्याचे दोन्ही बाजूंस सार्वजनिक इमारती,विलायती वसतीगृहें (Hotels) व दुकानें लागलीं आहेत. यांतलीं पुष्कळ प्रेक्षणीय आहेत यांत शंका नाहीं. यामुळें या रस्त्यानें चालतांना जिकडे तिकडे स्वच्छता, नीटनेटकेपणा व सुबकपणा दृष्टीस पडून मनाला सारखा उल्हास, व आनंद वाटतो व चालण्याचे श्रम भासत नाहींत. पुढें पुढें चालत गेलें म्हणजे समोरच शहराचा तो मजबूत तट व त्याचा **काश्मीर दरवाजा** नांवाचा बुरजांनीं अलंकृत असा दुहेरी दरवाजा व त्यांतून आलेले दुहेरी सुंदर रस्ते दुरून दृष्टीस पडतात व मन आश्चर्य-चकित होतें. तोंच डाव्या बाजूस **कुडशिया बेगम**च्या नांवाची बरीच विस्तार्ण बाग लागते; तर जवळच उजव्या हातास **निकॉलसन** नांवाच्या बंडांत कामास आलेल्या शूर शिपायाच्या स्मारकार्थ केलेली व त्याच्या पुतळ्यानें शोभायमान झालेली छोटी सुबक बाग लागते. आतां सायंकाळ होत चालल्यामुळें या बागांवर ओझरती नजर टाकूनच मला पुढें जावें लागलें. **निकॉलसन** बागेंतून बाहेर येतों तोंच काश्मीर दरवाज्याचा भव्य व सुंदर देखावा दृष्टीस पडला ! येथल्या कठड्याच्या पायवाटेवर मी क्षणभर उभा राहिलों व थोडी विश्रांति घेतली. कारण मी आतांपर्यंत सारखा चार तास सहल करीत आलों होतों !

काश्मीर दरवाज्यांतून शहरांत प्रवेश केला तोंच चार सार्वजनिक संस्थांच्या इमारती शेजारीं शेजारींच दृष्टीस पडल्या. हिंदु कॉलेज, सेंट स्टीफन्स कॉलेज, सेंट जेम्स चर्च व गव्हर्मेंट हायस्कूल या त्या संस्था होत. या इमारती मीं बाहेरूनच पाहिल्या. कारण, आतां संध्याकाळ झाली होती व या इमारती बंदच होत्या. सेंट जेम्स चर्चच्या समोर फारच सुंदर बाग असल्यामुळें व चर्चचें दार उघडें असल्यामुळें मी बागेंत शिरलों व चर्चच्या दाराशीं जाऊन आंत ओझ-रती दृष्टि टाकली. हें प्रार्थनामंदिर छोटेसें खरें पण तें फार सुबक व प्रेक्ष-णीय आहे. विशेषतः त्यापुढील छोटा बगीचा मला फार आवडला. जरा

पुढें गेल्यावर इ. आय. रेल्वेचा पूल ओलांडून मी **पीपल्स पार्क** नांवाच्या पार्कमधील रस्त्यानें तडक चालत आलों व **चांदणी**चौकाच्या रस्त्याला येऊन मिळालों. आतां चांगला अंधार पडला होता व **चांदणी चौकाच्या** दोन्हीं बाजूच्या दुकानांत व रस्त्यावर विजेच्या दिव्यांचा लखलखाट दिसत होता ! चांदणी चौकाची रात्रीची ही विजेची रोषनाई फारच बहारीची दिसते यांत शंका नाहीं. ही चांदणीचौकाची रात्रीची शोभा पाहून रात्र झाली म्हणून व तबल साडेचार तासाच्या सहलीनें दमलों म्हणून मीं येथें टांगा केला व रॉयल हॉटेलमध्यें आलों व मोठ्या प्रमुदित मनानें भोजन करून निद्रादेवीची आराधना केली व चार पांच तासांच्या सहलीच्या श्रमाची माझी तपश्चर्या ध्यानांत आणून, ती माझ्यावर तात्काळ प्रसन्न झाली व मीं सबंध रात्र गाढ झोपेचें सुख अनुभवलें. झालें. माझें तात्पुरत्या दिल्लीचें किंवा हल्लींच्या सिव्हिल लाईन्सचें दृश्यदर्शन संपलें.

राहतां राहिलें नव्या व दहाव्या दिल्लीचें वर्णन. हिच्या स्थापनेचा इतिहास मनोरंजक आहे ! बंगालच्या फाळणीच्या परिणामी चळवळीमुळें त्या फाळणीमध्यें फेरबदल करण्याची अवश्यकता लार्ड हार्डिंगसाहेबाच्या मनाला पटली. हा महत्त्वाचा फेरबदल करतांना हिंदुस्थानच्या कोनाकोपऱ्यांतल्या कलकत्ता राजधानीचें स्थलांतर करून दुसरी अधिक सोयीची व मध्यवर्ति राजधानी बनविण्याचा बूट निघाला. त्यावेळीं दिल्लीबरोबर जबलपूर, नाशीक, पुणें इत्यादि शहरांचा शक्य राजधान्या म्हणून निर्देश झाला. या प्रत्येक शहराच्या बाजूनें कांहीं कांहीं गोष्टी अनुकूल होत्या. पण दिल्लीची फार पुरातन काळापासून दिगंत पसरलेली कीर्ति व बोलबाला ध्यानांत येऊन म्हणा किंवा हिंदुस्थानांतील मोगल साम्राज्याऐवजीं ब्रिटिश साम्राज्य आलें तेव्हां त्या जुन्या राजधानींमध्यें नवी साम्राज्यव्यवस्था केन्द्रीभूत करावी, म्हणजे जुन्या बाटलींत नवी दारू घातल्याप्रमाणें होईल अशा समजुतीनें म्हणा किंवा बंगाली लोकांच्या इच्छेला थोडासा तरी मान देतांना

तेथल्या मुसलमानांची मर्जी संभाळण्याकरितां म्हणा पण दिल्लीमध्यें नवी हिंदुस्थानची राजधानी बनविण्याचा बेत कायम झाला व तो बेत सन १९१२ मध्यें जार्ज बादेशाहांच्या हिंदुस्थानांतील सिंहासनारोहणाच्या दिल्ली दरबारचे प्रसंगीं जगजाहीर करण्यांत आला! व प्रथमतः हल्लींच्या दिल्लीच्या उत्तरेकडचा भूमिभाग नव्या राजधानीकरितां पसंत करण्यांत आला. पण अधिकाऱ्यांच्या अनुभवानें व नगर बांधणाऱ्या योजकांच्या अवलोकनानें पहिल्यांदा ठरलेली जागा संकुचित, रोगट, खोलगट व यमुनानदीला फार नजीक आहे असें कळून आलें व म्हणून ती प्रथम पसंत केलेली जागा टाकण्यांत आली; व हल्लींच्या दिल्लीच्या नैऋत्येस ( दक्षिणपूर्व ) जें उफीरवाफीर, उंचसखल, खांचखळग्याचें व मोडक्या तोडक्या इमारतींच्या व भिंतींच्या अवशेषांनीं विखुरलेलें अफाट माळरान होतें तें नव्या दिल्लीचें कायमचें ठिकाण म्हणून ठरविण्यांत आलें व त्या माळरानामध्यें पाण्यासारखा पैसा ओतून त्याची पूर्वेकडून पश्चिमेकडे सारखी सहज चढती व मध्यावर सपाट पठाराची व म्हणून हवाशीर, आरोग्यवर्धक व नयनमनोहर अशी तांबड्यालाल मातीची भूमि बनविण्यांत आली. ही भूमि दंतकथेप्रमाणें **इन्द्रप्रस्थ** नांवाच्या पुरातन आर्यसाम्राज्य राजधानी समोरच असल्यामुळें या भूमीच्या निवडीनें नव्याजुन्याचा मनोहर संगम कळत म्हणा किंवा नकळत म्हणा घडविण्यांत आला हें खरें. या नव्या बनविलेल्या मुबलक मैदानावर स्वच्छ पाटीवर मनाजोगें चित्र काढावें त्याप्रमाणें, नव्या दिल्लीच्या एंजिनीयरांनीं पुरातनकाळच्या मयासुराप्रमाणें अद्वितीय नवी दिल्ली बारा पंधरा वर्षांमध्यें निर्माण केली! या नव्या दिल्लीस सुमारें वीस कोट रुपये आजपर्यंत खर्च झाले आहेत. हिंदुस्थानची नवी राज्यघटना चालूहोऊन **संयुक्त हिंदुस्थानची** राजधानी म्हणून आणखी किती खर्च करावा लागेल हें सध्यां सांगणें अशक्य आहे. या नव्या दिल्लीची येवढी पूर्वपीठिका बस आहे.


नवी दिल्ली मोटारीनें तीन चार तासांत सहज पाहून होण्यासारखी आहे. असें मोटारीचें जलदीचें दृश्यदर्शन मी एप्रिल सन १९३५ मध्यें केलें. पण सन १९३२ मध्यें मी जेव्हां दिल्लीस पंधरा दिवस रहात होतों तेव्हां नव्या दिल्लीच्या पहिल्या प्रचंड **सरकशीपर्यंत** ( नऊ रस्ते एकत्र आलेला अति विस्तीर्ण चौक) टांग्यानें येऊन मग नव्या दिल्लींतील प्रेक्षणीय स्थळें, मीं पायींपायीं चालून पाहिलेलीं होतीं. तरी आतां स्थलक्रमानें त्या प्रेक्षणीयांचें वर्णन करूं या.

दिल्लीमध्यें मी स्टेशननजीकच्या रॉयल हॉटेलमध्यें रहात असें. तेथून रेल्वेच्या थोडेसें पश्चिमेस गेल्यावर **नवा बाजार** नांवाचा नवाच प्रशस्त रस्ता दक्षिणेकडे जातो. या रस्त्याच्या उजव्या बाजूस सारखा जी. आय. पी. रेल्वेचा रस्ता लागतो; तर डाव्या बाजूस मोकळी जागा व पलीकडे दिल्ली शहराचा तट लागतो. याप्रमाणें अर्धा एक मैल गेल्यावर शहराच्या तटाचा **अजमेर** दरवाजा आपल्या दृष्टीस पडतो व त्या दरवाजाखालून येणाऱ्या रस्त्याला हा **नवा बाजार** रस्ता मिळतो. हा जुना रस्ता अझून डामरी निर्धूळ करण्यांत आला नाहीं. पण हा रस्ता टाकून नैऋत्य दिशेला वळलें कीं, नव्या दिल्लीकडे जाणारा **मिंटो** रोड लागतो. हा निर्धूळ, प्रशस्त, डामरी, सुंदर, सरळ रस्ता नव्या दिल्लीचें आनंददायी प्रसादचिन्हच वाटतो ! या रस्त्यानें गेलें म्हणजे थोड्याच वेळांत रेल्वे रस्ता एका भुयारी पुलानें ओलांडावा लागतो. तो खोलगट जागेंतील पूल टाकून चढत्या रस्त्यानें जरा पुढें आलें कीं, नव्या दिल्लीचा तो प्रचंड चौक लागतो. केवढा विस्तीर्ण तो चौक ! या चौकांत फुलझाडांनीं व पानझाडांनीं शोभायमान झालेलें हिरव्यागार हिरवळीचें वर्तुळ राखलें आहे. या मध्यवर्तुळासभोंवार वर्तुळाकार सुंदर सडक असून या सडकेला दहा प्रशस्त रस्ते निरनिराळ्या दिशेनें येऊन मिळाले आहेत ! वर्तुळाकार सडकेच्या सभोंवार तिन्ही बाजूंस मोठमोठीं पांढऱ्या शुभ्र रंगाचीं दुमजली दुकानेंच दुकानें आहेत ! पॅरीसमधील नेपोलीयनच्या विजय कमानींच्या चौकांची आठवण करून देणारा दिल्लींतील हा चौक आहे, यांत


शंका नाहीं. मात्र येथें कमान नाहीं. पण अशा प्रकारची कमान दिल्ली आग्रा रस्त्याला राजप्रतिनिधी राजवाड्यासमोरून (Viceroy's House) येणारा दुहेरी रस्ता जेथें मिळतो तेथें लढाईची स्मारक कमान म्हणून बांधण्यांत आली आहे. पण तेथें या चौकाप्रमाणें दुकानें नाहींत किंवा आठ रस्ते येऊन मिळालेले नाहींत. नव्या दिल्लींतील हा प्रचंड **चौक**—नव्हे **नौक** (नऊ रस्त्यांचें संगम स्थान) नव्या दिल्लींत प्रथम पाऊल टाकणाऱ्या प्रवाशाला आश्चर्यचकित करणारा आहे, यांत शंका नाहीं. या **नौकाचे** मध्यभागीं **आश्चर्यवत् पश्यति** अशा मनःस्थितींत कितीही वेळ उभें राहिलें तरी मनाचें समाधान होत नाहीं! नव्या दिल्लीमधील प्रेक्षणीय स्थळें दररोज पायींपायीं पहातांना हा **नौक** म्हणजे माझें एक विश्रांति-स्थान व चहापान स्थान होतें. ज्याप्रमाणें तुकारामानें धार्मिक यात्रे-करूंच्या स्थितीचें वर्णन 'देवाचीये दारीं उभा क्षणभरीं तेणें मुक्ति चारी साधीयेल्या' या अभंगार्धांत केलें आहे त्याप्रमाणें मला व्यावहारिक प्रवाशाच्या स्थितीचें वर्णन "**दिल्लीचीयें दारीं** उभा क्षणभरीं । तेणें मुक्ति चारी साधीयेल्या" याच अभंगार्धानें करतां येईल. कारण तीन चार तास नव्या दिल्लींतिल प्रेक्षणीय स्थळें पाहून प्रवाशी या **नौकासमोरील** चहापानगृहामध्यें क्षणभर बसला व त्यानें चहाचे दोन घुटके घेतले म्हणजे तिन चार तासाच्या पायपाटींत झालेले **श्रम**, सोसलेलें **ऊन** व लागलेली **तहानभूक** यांच्या परिहाररूपी **चारी मुक्ति** प्रवाशाला साध-तात असा माझा अनुभव आहे. असो

या **नौकाच्या** नऊ रस्त्यांमधील थेट नैऋत्य दिशेनें जाणाऱ्या मधल्या रस्त्याला **पार्लमेंट स्ट्रीट** असें नांव दिलें आहे. नव्या दिल्लीमध्यें ज्याप्रमाणें नवीन अर्वाचीन प्रख्यात राजप्रतिनिधींचीं नांवें उ. मिंटो, एलजीन्, कर्झन व ऐतिहासिक योध्यांचीं नांवें—डुप्ले, क्लाईव्ह इत्यादि नांवें रस्त्यांना दिलीं आहेत, त्याप्रमाणें हिंदुस्थानच्या इतिहासांतील प्रख्यात हिंदुमुसलमान पुरुषांचींही नांवें दिलीं आहेत: पृथ्वीराज, अकबर, फिरोजशाह, लोदी इत्यादि. हें पाहून एक प्रकारचें समाधान


वाटतें. पार्लमेंट रस्त्यानें गेलें म्हणजे डाव्या हातास **जंतरमंतराचें** ( जयसिंगानें बांधलेली वेधशाळा ) आवार लागतें. या आवाराला वदामी रंगाची सुंदर खुर्जी भिंत घातली असून, सुंदर प्रवेशद्वार केलें आहे. आंत जिकडे तिकडे फरशीच्या पायवाटा केल्या असून, मधील ताटव्यांत फुलझाडें व ताडमाडांचीं झाडें लाविलीं आहेत व बाकीच्या जागेवर हिरवीगार हरळी लावली आहे. बाकी भागांत जुन्या तऱ्हेच्या विलक्षण आवाराच्या लहान मोठ्या खुल्या दगडी भिंती, जिने, वर्तुळें व अर्ध वर्तुळें बांधलेलीं आहेत व एका इमारतीवर जयसिंगानें ही वेधशाळा कधीं बांधली याबद्दल संगमरवरी शिलालेख बसविला आहे. ज्याला आपल्या हिंदु ज्योतिषशास्त्राची माहिती नाहीं, अशा माझ्यासारख्या प्रवाशाला या विलक्षण दगडी वस्तूंचा अर्थ व उपयोग मुळींच कळत नाहीं. पण सध्यां सामान्य प्रवाशांना हें एक नयनमनोहर असें जुनें नवें प्रेक्षणीय स्थळ बनलें आहे खरें. याच रस्त्याला आणखी दोन अर्वाचीन प्रेक्षणीय इमारती आहेत. त्या पदार्थसंग्रहालयाच्या इमारती आहेत. इमारती नव्या कोऱ्या करकरीत, अर्वाचीन पद्धतीच्या असून, त्या तांबड्या लाल दगडाच्या बांधणीच्या आहेत व त्यांना उंच जोतें आहे. यामुळें या इमारतींत शिरल्याबरोबर प्रथमच मनावर मोठा अनुकूल परिणाम होतो. एका पदार्थसंग्रहालयाचें नांव **एशिअन म्युझीक** असें आहे. यामध्यें मध्य एशियाचा प्रख्यात संशोधक **कॅप्टन स्टीन** याला नेपाळ, तिबेट व मध्य एशियांत सांपडलेल्या नानाविध वस्तूंचा व्यवस्थेशीर संग्रह करून ठेविला आहे. दुसरी इमारत या इमारतीपेक्षां लहान आहे. त्यामध्यें वरील प्रांतांतून आणलेलीं भिंतीच्या गिलाव्यावरील रंगी चित्रें, कडीपाटावरील नक्षीदार कामें इत्यादि प्रेक्षणीय भाग जुन्या इमारतींतून काढून आणलेले येथें जसेच्यातसे बसविले आहेत. यांतील बहुतेक भाग बुद्धकालीन आहेत. या इमारती टाकून पुढें गेलें म्हणजे समोरच तांबड्या दगडाची वाटोळी सुंदर दुमजली इमारत लागते. हेंच हिंदुस्थानचें पार्लमेंट गृह ! ही



नं. ३४ ] नवी दिल्ली : हिंदुस्थानचें पार्लमेंट गृह [ पान १०५



नं. ३६ ] हरिद्वार : हरीची पायरी. [ पान ११७



नं. ३७ ] मथुरा : गोपीनाथाचें देऊळ [ पान १५५

इमारत रोमन नाटकगृहाप्रमाणें वर्तुळाकार बांधणीप्रमाणें आहे. त्याचे मध्यावर वाचनालय आहे व बाजूच्या वर्तुळाकार इमारतीचे तीन सारखे भाग पाडले असून तेथें लेजिस्लेटिव्ह असेंब्ली, कौन्सिल ऑफ स्टेट व प्रिन्सेस चेंबर या तीन मंडळांकरितां अर्धवर्तुळाकार दरबार दिवाणखाने केले आहेत. हिंदुस्थानचें हें पार्लमेंटगृह तांबड्या दगडी बांधणीचें असून, वर्तुळाकार इमारतीच्या सभोंवार कमानदार सज्जावजा सुंदर व्हरांडा ठेवला आहे. येवढ्या मोठ्या इमारतीला शोभेल असें कंबरभर उंचीचें जोतें बांधलें आहे व इमारतीचे सभोंवार सारखी खुली जागा ठेवून त्यावर सर्वत्र हिरवीगार हरळी लाविली आहे. ही इमारत फार प्रेक्षणीय आहे यांत शंका नाहीं. ही इमारत पाहून पूर्वेकडून येणाऱ्या प्रशस्त प्रचंड रस्त्याला प्रवाशी येतो व त्या रस्त्याचा विस्तीर्णपणा पाहून थक्कच होतो. या विस्तीर्ण रस्त्याचे दोन्ही बाजूंस हवेंत सदा थंडावा यावा म्हणून लांबचलांब पाण्यानें तुडुंब भरलेले कालवे केले आहेत व कालव्याचे प्रारंभीं भलीं मोठीं तांबड्या दगडाचीं कारंजीं केलीं आहेत. या रस्त्याचे पूर्वेस प्रारंभीं महायुद्धाची स्मारक कमान केली आहे. पूर्वेकडे दूरवर दिसणारी ती लालरंगी कमान, तो दुहेरी लाल रस्ता व त्याच्या बाजूच्या फरशीच्या पायवाटा व सभोंवारची हिरवीगार हिरवळ व हिरव्यागार हिरवळीमधून जाणारे दगडी बांधणीचे व नीळसर रंगाच्या पाण्याचे पाट व पश्चिम दिशेकडे पठाराच्या मधोमध तो राज-प्रतिनिधीचा ( Viceroy's house ) मोठ्या घुमटाचा राजवाडा व दोन बाजूच्या त्या सेक्रेटारिएटच्या जुळया भावंडासारख्या तांबड्यालाल दगडी बांधणीच्या मोठमोठ्या इमारती, हा सर्व देखावा एकसमयावच्छेदेंकरून पाहिला म्हणजे प्रवाशी आश्चर्यानें थक्क होऊन जातो व नव्या दिल्लीमध्यें इंग्रजांनीं नवें इन्द्रभुवन निर्माण केलें आहे असें वाटतें. मात्र इंग्रज इंजिनीयरांनीं नकळत म्हणा किंवा जाणून बुजून म्हणा लंडनमधील बकिंगहॅम राजवाडा, ब्रिटिश पार्लमेंटगृहें व सरकारी कचेऱ्या या

वेस्टमिंस्टर भागाचें अनुकरण केलें आहे. यामुळें, हा नव्या दिल्लीचा भाग पाहिला म्हणजे ज्यांनीं लंडन शहर पाहिलें त्यांना लंडनच्या वेस्टमिंस्टर भागाची आठवण झाल्याखेरीज रहात नाहीं. हा भाग पाहून मला तशी आठवण झाली व **सवाई वेस्टमिंस्टर** नव्या दिल्लीमध्यें निर्माण करण्याची महत्त्वाकांक्षा इंग्रज एंजिनीयरांनीं धरली होती व हें साधण्याकरितां त्यांनीं पाण्यासारखा पैसा खर्च करून, या सुंदर व भव्य इमारती बांधल्या असें मला वाटलें. या इमारतींवर ओझरती नजर टाकण्यापलीकडे व खुल्या भागांतून भराभर पावलांनीं इमारतीच्या प्रवेशद्वारांत शिरून मागल्या दारांतून बाहेर पडण्यापलीकडे पाहण्यास प्रवाशास वेळ कोठें राहतो? राजप्रतिनिधीच्या राजवाड्याच्या समोरच्या प्रवेशद्वारामधून डोकावून जो काय भाग दिसला तेवढ्यावरच मला मनाचें समाधान करून घ्यावें लागलें. मात्र या राजवाड्याच्या उत्तर बाजूला जी नानाविध झाडांची सुंदर राई केली आहे, ती मी सावकाश व प्रमुदित मनानें पाहूं शकलों. तसेंच एका संध्याकाळीं राजप्रतिनिधीच्या राजवाड्याच्या मागें वायव्य दिशेस असलेल्या **तालकटोरा** नांवाच्या विस्तीर्ण बागेमधील नानाविध फुलझाडांची व पानझाडांची शोभा पहात व **विलायती** वृक्षवेलींकडे कुतूहलानें नजर टाकीत बराच वेळ मी त्या बागेंत हिंडलों. नव्या दिल्ली-मधील विशेष प्रेक्षणीय स्थळें हींच होत. बाकी नव्यानव्या हजारों इमा-रती नव्या दिल्लींत झाल्या आहेत व सारख्या होत आहेत. पण त्या विटांच्या बराकींसारख्याच इमारती वाटतात! त्यामध्यें फारशी प्रेक्षणीयता नाहीं. मात्र त्यांत नाविन्य अर्थात् आहेच. नव्या दिल्लीमधील विशेष गोष्ट म्हणजे तेथले सरळ सुतांत बांधलेले मैलच्या मैल रस्ते होत. या रस्त्याचे दोन्ही बाजूस चन्द्रप्रकाशी विजेचे दिवे हारीनें लावलेले आहेत. रात्रीचे वेळीं या रस्त्यांनीं चालूं लागलें म्हणजे असंख्य दिव्यांच्या रांगाच रांगा सारख्या लागत राहतात व नव्या दिल्लीमध्यें सदा दिवाळीच आहे असा भास होतो! मुंबईपेक्षांही

विजेची रोषनाई नव्या दिल्लीमध्यें जास्त मोठ्या प्रमाणावर केली आहे खरी; पण मुंबईसारखी माणसांची गर्दी व रहदारी तेथें दृष्टीस पडत नाहीं. वर्षाच्या सहा सात महिने तर नवी दिल्ली आरबी गोष्टींतील राजवाड्याप्रमाणें व नगराप्रमाणें निर्जन व ओसाड व म्हणूनच भयप्रद वाटते. नव्या दिल्लीकरितां पाण्यासारखे कोट्यावधी रुपये खर्च झाले आहेत; तेथें अर्वाचीन सुधारलेल्या शहराच्या सर्वसुखसोयी—विजेचे दिवे, विजेचे पंखे, मुबलक पाणी, निर्धूळ प्रशस्त व गर्दछाय रस्ते, सुंदर बागा, राखीव हिरवींगार मैदानें इत्यादि—झाल्या आहेत तेव्हां सरकार व सरकारी कचेऱ्या यांनीं आपला अद्वातद्वा खर्चाचा साहा सात महिन्यांचा सिमल्याचा प्रतिवार्षिक निवास सोडून नव्या दिल्लींतच सतत बाराही महिने वसती करावी म्हणजे येवढ्या पाण्यासारख्या केलेल्या खर्चाचें थोडें फार चीज तरी होईल असें मला वाटलें. संयुक्त हिंदुस्थानची नवी घटना अंमलांत येऊन खऱ्या हिंदी अमदानींत तरी ही गोष्ट घडून येवो अशी इच्छा करण्यापलीकडे मी काय करूं शकणार ? झालें. माझें नव्याजुन्या दिल्ली शहरांचें बरेंच लांबलेलें वर्णन संपलें. नवें ग्वालेर, आग्रा, फत्तेपूर, शिक्री व नवीं जुनीं दिल्ली-शहरें हीं तीन प्रकरणें मीं या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीकरितां सन १९३५ मध्यें मुद्दाम पाहून लिहिलीं आहेत. पुढील प्रकरणापासून पूर्वकाळच्या प्रवासवृत्तकथेचें थांबलेलें अनुसंधान सुरू करतो.

---

# प्रकरण ६ वें.

## हरिद्वार किंवा गंगाद्वार.

**शिरः शार्वं स्वर्गात्पशुपतिशिरस्तः क्षितिधरम् ।**
**महीध्रादुत्तुंगादवनिमवनेश्चापि जलधिम् ।**
**" अधो गंगा सेयं पदमुपगता लोकविमुदे "**

मागल्या लेखाच्या शेवटीं सांगितल्याप्रमाणें आम्ही मुरादाबादेस पांच सात दिवस मुक्काम केला. मुरादाबाद हें बऱ्याच मोठ्या वस्तीचें शहर असून तें तीन चार रेल्वेंचें जंक्शन स्टेशन आहे. तेथूनच नैनितालकडे जाणारा रेलवेचा एक फांटा निघतो. दुसरा फांटा मुसलमान लोकांच्या कॉलेजामुळें प्रसिद्धीस आलेल्या अलीगडकडे जातो. औंदरोहिलखंड रेल्वेची एक मोठी शाखा—सहारहाणपुर ते मोगलसराई—इजवर मुरादाबाद आहे. येथून लकसरपर्यंत या शाखेनें हरिद्वाराला जाण्याकरितां जावें लागतें. लकसरपासून डेहराडून या शीतळ निवासस्थानापर्यंत एक रेल्वेची शाखा जाते. तिच्यावरच हरिद्वार आहे. लकसरपासून प्रथमतः हरिद्वारापर्यंत रेल्वेचा फांटा तयार केला गेला. तो १८८६ मध्यें पुरा झाला, व तोच पुढें १९०० सालीं डेहराडूनपर्यंत नेण्यांत आला. डेहराडूनहून मसुरीला ( हिमालयांतील दुसरें उंच ठिकाण ) वाट जाते. मुरादाबादेपासून हरिद्वार शंभर मैल लांब आहे. सोईस्कर गाडी मुरादाबादेपासून रात्रीं निघून हरिद्वारास सकाळीं पोहोंचते. लक्सर जंक्शनला मात्र बराच वेळ थांबावें लागतें.

आम्हीं हरिद्वारास जाण्याकरितां रात्रीं अकरा वाजतां निघालों तों लकसरला सुमारें ४ वाजतां येऊन पोहोंचलों. तेथें दोन अडीच तास थांबावें लागलें. परंतु पुढल्या प्रवासास अर्धा तास सुद्धां लागला नाहीं.

प्रवास रात्रींचाच असल्यामुळें मुरादाबादेपासून लकसरपर्यंतचा प्रदेश दिसला नाहीं. परंतु राहून राहून मनाला एक प्रकारचा संतोष वाटत होता. हरिद्वार, गंगोत्री, बद्रिकेदार हीं उत्तरेकडील अत्यंत पवित्र स्थानें यांचीं नांवें मी लहानपणीं आमच्या वडील मंडळींच्या तोंडून ऐकलीं होतीं. या यात्रा घडण्यास फारच मोठी पूर्वपुण्याई लागते, अशा प्रकारचे उद्गार मीं ऐकलेले होते. त्याचें मला आतां स्मरण झालें. या पूर्वकाळीं अत्यंत बिकट अशा यात्रांपैकीं हरिद्वारची यात्रा अर्वाचीनकाळीं थोडी जास्त सुलभ झाली आहे. तरी पण असें पवित्र स्थान एका दीड वर्षाच्या आंत मला दोनदां पहावयास मिळालें, हें पाहून माझी पूर्वपुण्याई खरीच फार मोठी असली पाहिजे, असें वाटून मला एक प्रकारचा आनंद झाला. कारण, मी हरिद्वारला दोनदां गेलों होतों. पहिल्यांदा गेलों तो १९१० च्या आक्टोबरमध्यें गेलों होतों. त्या वेळीं फक्त दोन दिवसच मीं तेथें वास केला होता. या खेपेला आम्हीं तेथें सुमारें एक आठवडा काढला. यामुळें या सुंदर व पवित्र स्थानाची निरनिराळया ऋतूंतील शोभा मला पहाण्यास मिळाली. या लेखांत माझ्या पहाण्यांत आलेल्या त्या स्थळाच्या दोन्हीं स्थितींचें मी वर्णन देणार आहें.

वर लिहिलेंच आहे, कीं, आम्हीं लकसरला सुमारें चार वाजतां येऊन पोंचलों. या दिवसांत इकडे संधिप्रकाश फार वेळ असल्यामुळें चार साडे चार वाजतां चांगलें दिसूं लागतें. या ठिकाणापासून हरिद्वारचे पंडे दृष्टीस पडूं लागतात. यात्रेकरूंच्या शोधार्थ ते प्लॅटफॉर्मवर सारखे हिंडत असतात, व भेटेल त्याला "हरिद्वाराला जावयाचें आहे ? कोठें उतरणार ? तुमचें नांव काय ? तुमचा येथें पंड्या आहे ?" वगैरे प्रश्न विचारण्याचा सपाटा लावतात. मी पहिल्या खेपेला हरिद्वारला गेलों होतों तेव्हां एका पंड्याचे घरींच उतरलों होतों, परंतु तेथली जागा फार कोंदट व गैरसोईची होती. म्हणून या खेपेला आम्हीं मुरादाबादेहून गांवाबाहेरील एका चांगल्या धर्मशाळेच्या व्यवस्थापकाला पत्र घेतलें होतें. लकसरपासून बऱ्याच झाडीच्या प्रदेशाला सुरवात होते व उत्तरेच्या

बाजूला टेकड्या टेकड्या दिसूं लागतात. "**अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा । हिमालयो नाम नगाधिराजः ।**" असें ज्या पर्वताचें वर्णन केलेलें आहे, त्या पर्वताच्याच पायथ्याशीं आपण चाललों आहों, असें या लहानशा टेकड्या पाहून वाटत नाहीं. ज्याप्रमाणें नदीच्या उगमाशीं नदी लहानशा झऱ्यासारखी असते, व तिचाच पुढें प्रचंड नद बनतो, तशांतली या टेकड्यांची स्थिति आहे. ढेंगभर वाटणाऱ्या या थोड्या टेकड्यांचाच वर जातां जातां अलंघ्य पर्वत बनून, त्यांचींच कांचनगंगा, धवलगिरी वगैरे सारखीं अठ्ठावीस एकूणतीस हजार फूट उंचीचीं शिखरें झालेलीं आहेत, हें मनांत आलें म्हणजे सृष्टिकर्त्याचें कौतुक केल्यावांचून रहावत नाहीं.

याप्रमाणें विचार मनांत येत आहेत नाहींत तोंच हरिद्वाराचें स्टेशन आलें व आमची उतरण्याची घाई झाली. स्टेशनवर तर काय पंड्यांची गर्दीचगर्दी होऊन गेली. या पंड्यांचा पोशाख अगदीं साधा असतो. नेसूं धोतर, अंगांत एक शुभ्र तालिमबाजी सदरा व डोक्यास पांढऱ्या विरविरीत कापडाची तीन चार पैशांची टोपी. कांहींजणांजवळ वह्यांचीं पुडकीं असतात. हे लोक यात्रेकरूंना आपल्या घरीं येण्याबद्दल सारखा लकडा लावीत असतात. स्टेशनच्या बाहेर पंड्यांच्या आंतल्यापेक्षां मोठाल्या झुंडीच्या झुंडी दृष्टीस पडतात. यात्रेकरूगणिक येथें पंड्ये आहेत कीं काय, असा भास होतो व एका दृष्टीनें हें खरेंच आहे. या गांवची वस्ती म्हणजे मुख्यतः पंड्यांचीच आहे. पंडे, यात्रेकरूंना लागणारी मिठाई व इतर जिन्नस विकणारे पुरभय्ये आणि परान्नपुष्ट बैरागी व याचक या त्रिवर्गानें या गांवची सर्व वस्ती झालेली आहे. या प्रत्येकाचा धंदा म्हणजे यात्रेकरूंना लुटण्याचा ! प्रत्येक पंड्याला असें वाटतें, कीं, आपण यात्रेकरूजवळ किती मागूं आणि किती नाहीं. बाकी या पंड्यांमध्यें बरेच लोक चांगले सधन असतात. कांहीं तर चांगले श्रीमान् झालेले आहेत. तरी त्यांचा धनलोभ मात्र कमी झालेला नाहीं. बैराग्यांची व तपस्व्यांची तर गोष्टच बोलूं नका. हे लोक यात्रेकरूंच्या पैशावर चैन करीत असतात.

बाजारांतून आपण जाऊं लागलों म्हणजे हे तुंदिलतनु लोक सारखे पाठीस लागतात. एक म्हणतो "बाबूजी हमकू दूध लाव !" दुसरा म्हणतो "बाबूजी हम मलई चाहते हमकू मलई देव !" तिसरा तिसरेंच कांहीं मागतो ! सारांश या लोकांना याचना व भोजन यांखेरीज दुसरा विषयच ठाऊक नाहीं. याप्रमाणें येथले लोक पाहून व त्यांची दिनचर्या व एकंदर वृत्ति आणि वागणूक पाहून मनुष्याला एक प्रकारचा खेदच होतो. काय या लोकांचें जीवित ! **वाणीच याचनकृते असनाय वक्त्रम्** अशी यांची वृत्ति व कृति ! अशा माणसांबद्दल आदर वाटण्याऐवजीं तिरस्कार मात्र उत्पन्न होतो. याप्रमाणें येथल्या वस्तीकडे पाहिलें म्हणजे धर्मप्रवृत्ति जागृत न होतां उलट मावळूनच जाते. तरी या ठिकाणचें सृष्टिसौंदर्य पाहिलें म्हणजे मात्र याच्या अगदीं उलट परिणाम होतो व या स्थानाचें इतकें महात्म्य व पावित्र्य सतत कायम कां राहणार हें ध्यानांत येतें. असो.

वर सांगितलेंच आहे, कीं, आम्हांला या खेपेला पंड्याच्या साहाय्याची जरूरी नव्हती. म्हणून आम्हीं एक दोन घोड्यांची गाडी करून त्यांत सर्व सामान भरलें व आमच्या ठरलेल्या ठिकाणीं जाण्यास निघालों. आम्हांला जरूर नाहीं असें म्हटलें, तरी एक पंड्या आमच्या गाडीच्या बॉक्सवर बसलाच ! गांव लहानच असल्यामुळें आमची धर्मशाळा आम्हांला तेव्हांच सांपडली, अर्थात् आम्हांला पंड्याची मुळींच गरज लागली नाहीं. हरिद्वाराहून निघण्याचे आधीं, आमचे बरोबर आलेल्या पंड्यास एक रुपया दिला ! मात्र बळेंच बॉक्सवर बसणाऱ्या पंड्यास कांहीं एक न देतां परत लावलें.

आम्हीं ज्या धर्मशाळेंत उरण्यास गेलों होतों ती धर्मशाळा साधारण गांवाबाहेर असून चांगली प्रशस्त व स्वच्छ होती व तेथील व्यवस्थापकही फार चांगला माणूस असल्यामुळें व त्याला थोडें फार इंग्रजी येत असल्यामुळें आम्हांला भाषाव्यवहाराची अडचण भासली नाहीं व आमची सर्व सोय उत्तम झाली. प्रथमतः जेव्हां मी हरिद्वारास आलों होतों तेव्हां

जेवणाखाणाचे बरेच हाल झाले. म्हणून या खेपेला आम्हीं बरोबर अलीकडे प्रचारांत येऊं घातलेला 'कुकर' घेतला होता. प्रवासांत या 'कुकर' पासून फारच सोय व सुख होतें. कारण त्याला लाकूडफाटें किंवा चूल लागत नाहीं. एक प्रायमस स्टोव्ह बरोबर असला म्हणजे सर्व काम भागतें. या कुकरनें आम्हांला पुराणांतरींच्या द्रौपदीच्या स्थालीचीच आठवण झाली. त्या स्थालींत ज्याप्रमाणें इच्छेप्रमाणें आपोआप अन्न तयार होत असे, तसाच येथेंही प्रकार होतो. भाजी, भात वरण हे पदार्थ 'कुकर'-मध्यें घालून 'कुकर' स्टोव्हवर ठेवून खुशाल बाहेर जावें आणि तास दीड तासानें परत यावें, तों स्वयंपाक्यानें तयार केल्याप्रमाणें सुंदर अन्न तयार होतें. अशी आमची व्यवस्था असल्यामुळें आमचा हरिद्वार येथील आठवडा फारच सुखानें व आनंदानें गेला; व तो इतक्या जलद गेला, कीं, आमचें हरिद्वारचें राहाणें स्वप्नांतील तर नव्हे, असें आम्हांला केव्हां केव्हां वाटे.

हरिद्वार या पवित्र स्थानाचा विशेष म्हणजे येथील गंगा होय. बाकी, हें गांव काशी, प्रयाग, मथुरा किंवा द्वारका याप्रमाणें मोठें नाहीं. येथली वस्ती अवघी चार हजार आहे. येथें मोठमोठ्या इमारती नाहींत. येथें भव्य देवळें नाहींत, येथें मोठा व्यापार आहे असाही प्रकार नाहीं. प्रत्यक्ष गांव मोठ्याशा खेड्यासारखें आहे. घरेंही सामान्यच आहेत. परंतु या गांवची रचना, ठेवण व येथली गंगा हीं मात्र अप्रतिम आहेत. म्हणूनच या गांवाला फार प्राचीन काळापासून इतकें पावित्र्य आलेलें आहे.

हें पवित्रस्थान निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या नांवानें प्रसिद्ध होतें. प्रथमतः शिवभक्त व विष्णुभक्त यांचेमध्यें या गांवाच्या नांवासंबंधानें मोठा वाद आहे. शिवभक्त म्हणतात या गांवाचें नांव हरद्वार, विष्णुभक्त म्हणतात या गांवाचें खरें नांव हरिद्वार. या दोन पंथांच्या लोकांमध्यें मोठमोठ्या मारामाऱ्या या स्थळीं होत व त्या अगदीं अव्वल इंग्रजीपर्यंत चालत असत. या गांवाचें फार जुनें नांव कपिल हें होय व अजूनही कपिलस्थान म्हणून एक जागा दाखविण्यांत येते. कपिल हा एक फार

प्रख्यात तपस्वी होता. या कापिल शहरालाच तैमूरलंगानें आपल्या इतिहासांत कुटिल म्हटलें आहे असें म्हणतात. प्रसिद्ध चिनी प्रवासी हुएनसंग हा या ठिकाणीं आला होता. त्यानें या गांवाचें नांव मोयुलो असें दिलें आहे. मोयुलो म्हणजे मयापूर किंवा मयूर असावें. मयापूर या नांवाचें फार जुनें ठिकाण हरिद्वारच्या दक्षिणेस फारच जवळ आहे. अकबराच्या कारकीर्दींतील प्रसिद्ध इतिहासकार अबुल फाजल यानें या गांवाला मय अथवा हरिद्वार असें म्हटलें आहे. अकबराच्या काळीं येथें तांब्याच्या नाण्यांची एक टांकसाळ होती व अकबर आपल्याला प्यावयाला पाणी नेहमीं या ठिकाणाहून नेत असे, असें म्हणतात. या ठिकाणाला गंगाद्वार असेंही नांव आहे व मुसलमान इतिहासकार या स्थळाचा निर्देश गंगाद्वार म्हणूनच करतात; व पुढील वर्णनावरून हेंच नांव अन्वर्थक आहे असें दिसून आल्याखेरीज राहणार नाहीं.

या पवित्र स्थानाचें येवढें पूर्वचरित्र बस्स आहे. आतां आपण त्याच्या सांप्रतच्या स्वरूपाकडे वळूं. हरिद्वार हें गांव गंगेच्या दक्षिण तीरावर शिवालिक नांवाच्या हिमालयाच्या पायथ्याशीं असलेल्या टेकड्यांच्या बाजूला वसलेलें आहे व गंगानदी थेट गांवाला व टेकड्यांना लागून गेली आहे. नदीच्या दोन्ही तीरांस टेकड्यांची रांग आहे व मध्यें एक दरी झाली आहे. यामुळें हिमालयानें जणूं काय आपल्या लहान लहान टेकड्यांचें एक दार बनवून त्यांतून गंगेला जाण्यास वाट दिली आहे कीं काय असा भास होतो. कारण, दोन टेकड्यांमधला भाग खिंड किंवा दार यासारखा खरोखरी दिसतो व म्हणून **गंगाद्वार** हें नांव जास्त अन्वर्थक आहे असें आम्हीं वर म्हटलेंच आहे. गांवाच्या वरच्या बाजूला नदीकिनाऱ्यावर उभें राहून उत्तर दिशेकडे दृष्टि फेंकली म्हणजे अद्वितीय देखावा दिसतो. दृष्टि पोंचत नाहीं येथपर्यंत सारखी टेकड्यांची रांगची रांग लागलेली दिसते. या टेकड्या एकावर एक अशा सारख्या चढत चढत गेलेल्या आहेत. व आपण दृष्टि कितीही उंच केली तरी या टेकड्या म्हणून संपत नाहींत. अगदीं दूरवर डोळे ताणून ताणून पाहिलें

म्हणजे पांढऱ्या शुभ्र रंगाची पर्वतराजी दिसूं लागते. ही पर्वतराजि आहे किंवा पांढऱ्या ढगाचा समुदाय आहे, याबद्दल भ्रांति उत्पन्न होते. परंतु बर्फाच्छादित म्हणूनच सदाधवल अशा हिमवानाचा हा धवलध्वज होय, अशी खात्री झाली म्हणजे मन सानंदाश्चर्यांत निमग्न होतें. या पर्वतराजीच्या खालीं पाहिलें म्हणजे स्फटिकाप्रमाणें शुभ्र असा गंगाप्रवाह दूरपर्यंत दिसतो. गंगेच्या पाण्याइतकें शुभ्र व निर्मल पाणी दुसऱ्या कोणत्याही नदीचें नसेल. मी पहिल्यानें हरिद्वारास गेलों तो आक्टोबरमध्यें. तो ऋतु हरिद्वारास जाण्यास सर्वांत उत्तम. त्या ऋतूंत येथील हवा फारच चांगली असते. फार थंडीही नाहीं, फार उष्णताही नाहीं. पाणी तर इतकें निर्मळ व स्वच्छ असतें, कीं, गळाभर खोल पाण्यांतसुद्धां एकादी सुई किंवा टांचणी स्पष्टपणें दिसते. या नदीच्या प्रसन्न पाण्याकडे पाहून प्राण्याचें मन प्रसन्न झाल्याखेरीज राहतच नाहीं. एकीकडे त्या हिरव्यागार टेकड्या, व त्यांचेच पायथ्याशीं शुभ्र दगड, व तो स्फटिकाप्रमाणें शुभ्र पाण्याचा प्रवाह, हा देखावा एकसमयावच्छेदेंकरून पाहिला म्हणजे कसाही मनुष्य असो त्याचा अंतरात्मा गारीगार झाल्याखेरीज रहात नाहीं. त्या पवित्र स्थानीं क्षणभर उभें राहिल्यावर आमचीही तीच अवस्था झाली. हिमालयाचा शुभ्र विस्तार, जणूं कांहीं स्वर्गापर्यंत पोंचलेला दिसत होता व त्याची एक सोपानपरंपरा झाली आहे, असा भास होई. गंगा स्वर्गांतून आली ती याच सोपानपरंपरेनें आली. ती प्रथम स्वर्गांतून शंकराच्या डोक्यावर पडली, तेथून हिमवानाच्या माथ्यावर पडली व तेथून अवनितलाला पोंचून खालीं खालीं जात शेवटीं सागराला मिळाली, असें भर्तृहरीनें वर्णन केलें आहे तें अत्यंत यथार्थ आहे असें मला वाटलें. तसेंच, सृष्टिदेवीचे अद्वितीय देखावे पाहिल्यावर त्यांचें रूपकात्मक वर्णन करण्याची कवीला स्फूर्ति होऊन त्या रूपकात्मक वर्णनाच्याच पुढें पुराणांतील कथा होतात असें जें म्हणतात, त्याचीही सत्यता माझ्या डोळ्यांपुढें उभी राहिली. व असलाच एकादा गंगेचा देखावा पाहून महाभारतांतील किंवा रामायणांतील गंगावतरणाची कथा एकाद्या कवीच्या डोक्यांत आली असावी

असें मला त्या वेळीं वाटलें, व त्या देखाव्यानें मला माझ्या लहानपणच्या एका अदृष्टपूर्व अनुभवाचें स्मरण झालें. मी लहानपणीं पुण्यांत इंग्रजी शिकण्यास होतों, त्या वेळीं आम्हांला पुण्यास कोंकणांतून येण्याजाण्यास बैलगाडीच्या रस्त्यानें जावें लागत असे. एका मे महिन्यांत आम्ही पुण्याहून निघून आमच्या गांवीं जात होतों. वाटेंत आम्हांला प्रचंड सह्याद्रि ओलांडावा लागतो. आम्ही पहांटेच्या सुमारास सह्याद्रीच्या पुष्कळ उंच उंच टेकड्या उतरून एका पर्वताच्या शेवटाला आलों, तों तेथें मीं एक अद्वितीय देखावा पाहिला. त्या दिवशीं धुकें फार आलें होतें. आम्ही समोर दिसणारे डोंगर ओलांडून कोंकणाच्या बाजूकडील डोंगरांच्या माथ्यावर आलों मात्र, तों आमच्यापुढें एक अफाट समुद्र पसरला आहे असें आम्हांला वाटलें! तें सर्व जग व्यापणारें धुकें थेट समुद्राप्रमाणें भासत होतें. ज्या ठिकाणीं धुकें किंचित् कमी दाट होतें तेथें थोडा भूमिभाग दृग्गोचर होत होता. असे भूमिभागाचे लहान लहान तुकडे समुद्रांतील लहान लहान बेटांप्रमाणें दिसत होते. हा विलक्षण देखावा पहात आम्ही किती वेळ तरी उभे होतों. इतक्यांत आमच्यामागें पूर्व दिशेला सूर्यानें आपलें डोकें उदयाचलाच्या माथ्यावर काढल्याबरोबर त्याचे किरण त्या हिमतुषारमय समुद्रावर पडूं लागले, तसतसें तें धुकें वितळून आम्हांला समुद्राच्या ठिकाणीं जमीन दिसूं लागली, व या समुद्राचा हा पालट एका क्षणांत झाला. हा विलक्षण देखावा पाहून कोंकणप्रांत निर्माण झाल्याची कथा कशी उत्पन्न झाली असेल, याची मला उत्तम कल्पना आली. पूर्वीं सह्याद्रिपर्यंत समुद्र होता, म्हणजे सर्व कोंकणाचा भाग जलमय होता. पुढें परशुरामानें आपल्या बाणानें समुद्राचें पाणी मागें हटवून कोंकणाचा भूमिभाग निर्माण केला, अशी दंतकथा आहे. ही दंतकथा मीं पाहिलेल्या देखाव्यावर उत्तम रूपक आहे. तेव्हां माझ्यासारख्या प्रत्यक्ष अनुभव आलेल्या एकाद्या कवीनें ही दंतकथा रचली असावी, असें मला त्या वेळीं वाटलें. हरिद्वारच्या गंगा-किनाऱ्यावरील अलौकिक देखावा अवलोकन करून गंगावतरणाची कथा

अशीच रूपकानें निर्माण झाली असावी, असें मला वाटतें. ही कथा रामायणांत व महाभारतांत बहुतेक सारखीच आहे. महाभारतांत गंगावतरणाचा अगस्त्य ऋषीनें समुद्र प्राशन करून टाकल्याच्या कथेशीं संबंध जोडला आहे एवढेंच. इक्ष्वाकु वंशांत फार प्राचीन काळीं सगर म्हणून मोठा राजा होऊन गेला. त्याला दोन बायका होत्या. एकीपासून त्याला असमंजस म्हणून चिरकालीन कीर्ति मिळविणारा मुलगा झाला, व दुसरीपासून साठ सहस्र मुलगे झाले. सगरानें एकदां अश्वयज्ञास प्रारंभ केला परंतु त्याचा अश्व असूयाप्रेरित इंद्रानें पळवून नेऊन पाताळांत कपिलमहामुनि तप करीत होते तेथें ठेवला. सगरानें आपल्या साठ सहस्र मुलांना अश्वशोधार्थ पाठविलें. त्यांनीं अश्वाचा दशदिशा शोध केला, तरी त्याचा सुगावा लागला नाहीं. तेव्हां त्यांनीं पित्राज्ञेनें पृथ्वी खणण्यास प्रारंभ करून ते पाताळापर्यंत खणत गेले. तेथें त्यांनीं कपिल महामुनि व त्यांचे शेजारीं आपला यज्ञाश्व पाहिला. हाच चोर समजून ते त्याच्या अंगावर धावले. कपिल महामुनींना राग येऊन त्यांनीं या साठ सहस्र सगर पुत्रांना भस्मसात् करून टाकिलें. इकडे सगर आपले मुलगे अजून कां येत नाहींत अशा विवंचनेंत होता. शेवटीं फार काळ लोटला म्हणून त्यानें आपला नातू अंशुमान याला त्यांचे शोधार्थ पाठविलें. तो शोध करीत करीत कपिल महामुनि ज्या ठिकाणीं होते त्या ठिकाणीं आला व त्यानें मुनीला प्रणाम करून त्यांना कुशल प्रश्न केले व आपल्या चुलत्यांची माहिती विचारली. तेव्हां कपिल महामुनि संतुष्ट होऊन त्यांनीं त्याला अश्व परत दिला व सगराच्या भस्मसात् झालेल्या मुलांच्या उद्धाराकरितां गंगा पातालाप्रत आणण्यास सांगितलें. अश्व परत आल्यावर सगरानें आपला यज्ञ पुरा केला. अंशुमानाला गंगा खालीं कशी आणावी हें समजलें नाहीं. पुढें त्याला दिलीप म्हणून मुलगा झाला. त्यानेंही गंगा आणण्याची खटपट केली. परंतु त्याचे हातूनहि सगरपुत्रांचा उद्धार झाला नाहीं. परंतु दिलीपाचा मुलगा भगीरथ म्हणून होता. हा फार धार्मिक व दृढनिश्चयी होता. त्यानें आपल्या

पूर्वजांचा उद्धार करण्याचा निश्चय केला व त्याकरितां त्यानें घोर तप आरंभलें. त्या तपानें प्रसन्न होऊन गंगेनें पातालामध्यें जाण्याचें कबूल केलें. परंतु "स्वर्गांतून खालीं पडतांना माझा वेग पृथ्वीला सहन होणार नाहीं. तरी तूं शंकराची आराधना करून त्यांना आपल्या डोक्यावर मला घेण्याची विनंति कर." असें गंगेनें सांगितलें. गंगेच्या सांगण्याप्रमाणें भगीरथानें पुनः तप करून शंकराला प्रसन्न करून घेतलें. शंकरही त्याच्या तपानें प्रसन्न होऊन त्यानें गंगेला धारण करण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें प्रथमतः गंगा स्वर्गांतून शंकराच्या डोक्यावर पडली, तेथून हिमालयाच्या माथ्यावर पडली, तेथून जमिनीवर फार वेगानें आली व पुढें भगीरथाचे रथाचे मागोमाग समुद्रापर्यंत जाऊन पुढें पाताळांत गेली. तेथें भगीरथानें आपल्या पूर्वजांच्या भस्मावर गंगाजल शिंपडलें व त्यांना जलदान केलें व त्या योगानें ते स्वर्गाप्रत गेले. गंगावतरणाची कथा म्हणजे स्वाभाविक दिसणाऱ्या सृष्टीच्या देखाव्यावर एक कविकृत रूपक आहे अ[illegible]स वाटणार नाहीं ? असो.

आतां आपण हरिद्वारच्या प्रेक्षणीय स्थळांकडे वळूं. येथलें पहिलें प्रेक्षणीय स्थळ व अत्यंत पवित्र स्थान म्हणजे 'हरीकी पायरी' होय. हा स्नानाचा घाट आहे व याच्या एका भिंतीच्या एका कोनाड्यांत विष्णूच्या पादुका असलेला एक दगड बसविलेला आहे. हा घाट पूर्वी फार लहान होता. त्याला ३९ पायऱ्या होत्या व तो ३४ फूट लांब होता. सर्व यात्रेकरूंची इच्छा या घांटावर येऊन स्नान करण्याची असते. यामुळें येथें अत्यंत गर्दी होते. १८२० सालीं मोठ्या यात्रेच्या प्रसंगीं गर्दीनें ४३० माणसें मेलीं. तसेंच पुष्कळ माणसें वारंवार बुडून मरत म्हणून सरकारनें हा घांट साठ पायऱ्यांचा व शंभर फूट लांबीचा केला. १८९२ मध्यें येथें कॉलरा फार झाला होता. याकरितां हरिद्वार इंप्रूव्हमेंट सोसायटी काढण्यांत आली व तिनें पुष्कळ सुधारणा घडवून आणल्या. सर्व नदीकिनारा व नदीचा तळ फरसबंदी केला. या घांटावर नेहमीं पाण्याचा सारखा व वेगाचा प्रवाह येईल अशी तजवीज केली. गंगानदी पर्वत

सोडून मैदानावर या ठिकाणीं एकदम पसरते यामुळें तिचे येथें पुष्कळ फाटे झालेले आहेत. पश्चिमेकडच्या फांट्यावर हरिद्वार आहे. आक्टोबरमध्यें जेव्हां मी हरिद्वारास गेलों होतों तेव्हां या घांटाजवळ मुळींच पाणी नव्हतें. हा सर्व भाग पांढऱ्या दगडांनीं युक्त दिसत होता. नदीचा प्रवाह या ऋतूंत अत्यंत कमी होतो. पण या दिवसांत गंगेचें पाणी फारच सुंदर दिसतें. या ऋतूंत स्नान करण्याकरितां घांटाजवळचा किनारा सोडून जरा पलिकडच्या प्रवाहाकडे जावें लागतें. परंतु या खेपेला जेव्हां मी हरिद्वारला आलों, तेव्हां सर्व फांटा तुडुंब भरून चालला होता. ज्याप्रमाणें वर्षाकालांत आपल्या इकडे नद्या दुथडी भरून वेगानें जातात, त्याप्रमाणें या वेळीं गंगानदी दुथडी भरून चालली होती. हा देखावा पाहून मला विलक्षण आश्चर्य व कौतुक वाटलें. ज्या वेळीं सर्व ठिकाणीं पाण्याची टंचाई होते, ज्या कालांत सर्व नद्यांना पाण्याचें दारिद्र्य येतें, त्याच भर उन्हाळ्याच्या दिवसांत या नदीला मोठा पूर आलेला पाहून प्रथमच उत्तर हिंदुस्थानांत जाणाराला याचें फारच आश्चर्य वाटतें. पण या पुराचें कारण उघड आहे. उष्णतेमुळें हिमालयावरील बर्फ भराभर वितळूं लागतें व त्यामुळें या नदीला मोठा पूर येतो. हिमालयांतून निघणाऱ्या सर्व नद्यांचा हाच विशेष आहे. हरिद्वारच्या ऋतुभेदामुळें झालेल्या विपर्यासाकडे पाहून मला सानंद आश्चर्य वाटलें व उत्तररामचरित्रांतील '**पुरा यत्र स्रोतः पुलिनमधुना तत्र सरिताम्**' या श्लोकाची आठवण झाली. मात्र या ठिकाणीं '**पुरा यत्रारोहः सलिलमधुना तत्र सरिताम्**' असा प्रकार झाला होता. हरिद्वाराच्या देवळांमधील सर्वांत मोठें व महत्त्वाचें देऊळ गंगाद्वार हें या शेजारींच आहे. हरीकी पायरीचा देखावा खरोखरच अवर्णनीय आहे. प्रत्यक्ष पाहिल्याखेरीज त्याच्या सौंदर्याची कल्पना करतां येणार नाहीं.

याच्या दक्षिणेस एकसारखा विटांची फरशी केलेला अर्वाचीन तऱ्हेचा प्लॅटफॉर्मवजा घांट आहे व त्याचे एका बाजूला नदीचा प्रवाह व एका बाजूला धर्मशाळा व देवळें लागतात. काशी किंवा मथुरा या ठिकाणींही

असाच देखावा आहे खरा, तरी पण तेथें घांटाघांटाचा संबंध नाहीं; यामुळें नदीकिनाऱ्याला सारखें फिरतां येत नाहीं. हरिद्वाराचा हा एक विशेष आहे. या ठिकाणीं सायंकाळीं फिरावयास येण्याची फार मौज वाटते. आमचा येथें मुक्काम असेपर्यंत रोज सायंकाळीं येथें सहल करण्यास येण्याचा आमचा परिपाठ असे. एकीकडे तुडुंब भरून वेगानें धावणारी प्रचंड नदी व दुसरीकडे निरनिराळ्या तऱ्हेच्या सारख्या लागलेल्या इमारतींचा देखावा व उत्तरेस तो हिमाच्छादित धवलगिरी ! हा देखावा अद्वितीय दिसतो व या ठिकाणापासून केव्हांही हलूं नये असें वाटतें. इतर सर्व पवित्र स्थानांपेक्षां हरिद्वारचा हाच विशेष आहे कीं, त्या ठिकाणीं धार्मिक पावित्र्य व सृष्टिसौंदर्य यांचा पूर्ण मिलाफ झालेला आहे आणि यामुळें हें स्थान केवळ धर्मश्रद्ध लोकांनाच प्रिय होतें असें नाहीं, तर तें आमच्यासारख्या माणसासही अत्यंत प्रिय वाटतें व अशा ठिकाणीं वर्षाचे कांहीं दिवस घालवितां आले, तर ती महद्भाग्याची गोष्ट होय, असें वाटूं लागतें. असो.

हरिद्वारमधलें दुसरें प्रेक्षणीय स्थळ म्हणजे गांवावरून उत्तरेच्या बाजूला जाणारा रस्ता व तेथील सृष्टिसौंदर्य होय. हाही देखावा अवर्णनीय आहे. गांवाला लागूनच टेकड्या आहेत हें वर सांगितलेंच आहे. या टेकड्यांना लागूनच, केव्हां केव्हां टेकड्यांचा भेद करून व केव्हां केव्हां बोगदा पाडूनच डेहराडूनचा रस्ता गेला आहे. एकीकडे हा नागमोडीचा रस्ता व त्याच्या पलीकडे प्रचंड टेकड्या आणि दुसऱ्या बाजूला गांव व दुथडी भरून वहात जाणारी नदी हा देखावा प्रेक्षणीय आहे. गांवाजवळ रेल्वेचा एक लहानसा बोगदा आहे त्यामुळें रस्ता सुंदर दिसतो. टेकड्या सर्व खडकाच्या आहेत. या सर्व डोंगरांत लहान लहान गुहा व पर्णकुटिका बांधलेल्या आहेत. या ठिकाणीं बैरागी व तपस्वी लोक राहतात. हा देखावा पाहून पुराणांतरींच्या ऋषींची व त्यांच्या पर्णकुटिकांची आठवण झाल्याखेरीज रहात नाहीं व या ऋषींची पूर्वींची राहाणी किती साधी असे याची थोडीशी कल्पना येते. जरा पुढें गेलें म्हणजे रेल्वेचा

एक पूल लागतो व या पुलाखालून गेलें म्हणजे **भीमघोडा** तलाव लागतो. तेथें टेकड्या जरा आंत गेल्यासारख्या आहेत व त्या पोकळींत हा तळाव व जवळचीं देवळें बांधलेलीं आहेत. अशी दंतकथा आहे, कीं, पांडवांपैकीं भीमाला गंगावतरणाचे वेळीं येथें घोड्यावर उभें राहण्यास सांगितलें होतें. त्याच्या घोड्याची लाथ लागून तेथें टेकड्यांमध्यें खांच पडली व तिचा तलाव झाला. या दंतकथेला महाभारतांत किंवा रामायणांत मुळींच आधार नाहीं. आपल्या लोकांना निव्वळ नांवावरून दंतकथा बनविण्याची फार संवय आहे, त्याचेंच हें उदाहरण आहे. हा रस्ता आगगाडीच्या रस्त्याचे वांजूनें डेहराडूनपर्यंत गेला आहे. याच रस्त्यानें बद्रीकेदाराला जातात. हरिद्वारहून बदरिकेदारास जाण्यास सुमारें दहा दिवस लागतात. प्रवास पायींच करावा लागतो. या रस्त्यानें मैल सव्वा मैल गेल्यावर गंगेच्या कालव्याचें काम लागतें. तेथें फार मोठें धरण वगैरे आहे, अशांतला प्रकार नाहीं. पण गंगेचे दोनतीन फांटे होतात. त्या निरनिराळ्या फांट्यांत पाणी विभागून न जातां एकाच पश्चिमेकडच्या फांट्याकडे ओघ वळावा अशी तजवीज केलेली आहे. नदीचें पाणी आणखी उंच व्हावें म्हणून सध्यां कांहीं बांधकाम चाललें आहे तें आम्हीं पाहिलें. याप्रमाणें पाण्याचा ओघ हरिद्वारच्या फांट्यांत आणून हरिद्वारच्या खालीं नदीच्यापासून कालवा वेगळा करून घेतला आहे. असो.

परंतु हरिद्वारचें सर्वांत प्रेक्षणीय स्थळ म्हणजे **कनखल तीर्थ** हें होय. कनखल हें गांव हरिद्वारपासून दीड मैलावर आहे. या गांवांत दगडाची फरशी आहे, घरें बऱ्या प्रकारचीं आहेत. बाजारही मोठा असून दिसण्यांत बरा आहे. हरिद्वारापासून कनखलला जाण्यास एक्के मिळतात. ते माणशीं एक एक आणा घेतात. तेथें दक्षप्रजापतीचें मोठें देऊळ आहे व नदीच्या तीराला एक लहानसा घांट आहे. किनाऱ्यावर मोठमोठे वडाचे वृक्ष आहेत. या घाटाच्या पायथ्याशींच प्रसिद्ध कनखल तीर्थ आहे. येथल्या गंगेचा देखावा हरिद्वारापेक्षां अगदींच निराळा आहे. येथें नदीचें पात्र फारच रुंद झालेलें आहे व त्याचे निर-

निराळे प्रवाह बनलेले दिसतात. येथून टेकड्या बऱ्याच दूर अंतरावर गेल्या आहेत व हरिद्वारप्रमाणें येथें नदीच्या किनाऱ्यावर बांधलेली अशीं देवळें किंवा घरें नाहींत. मी पहिल्यांदा या क्षेत्रीं जेव्हां आलों, त्या वेळचा देखावा मी आजन्मांत विसरणार नाहीं. नदीच्या घांटाला लागून प्रवाह जोरानें वाहात होता व त्यामुळें पाण्याला फेंस येत होता. आधींच गंगेचें पाणी शुभ्र. त्यांतच तो फेंस मिसळलेला. बरें किनाऱ्याच्या बाजूला असलेले दगड व गोटेहीं शुभ्रच. या प्रवाहाच्या समोर व आम्ही ज्या घाटावर बसलों होतों त्याच्या समोरच नदीला एक उंचवटा होता. तो उंचवटा सर्व शुभ्र दगडांनीं व गोट्यांनीं भरलेला होता व त्यामधून सारख्या शुभ्र पाण्याच्या हजारों धारा खालीं कनखल तीर्थांत सळसळ करीत पडत होत्या. यामुळें त्या प्रवाहाला विशेषच शोभा आली होती. सर्व पाण्याकडे नजर ठरत नव्हती. ते हजारों झरे किंवा धारा तर इतक्या वेगानें मुख्य प्रवाहांत पडत होत्या कीं त्या ठिकाणीं लहरींचा भास होत होता. हें स्थान पाहून माझें मन थक्क होऊन गेलें. या ठिकाणीं गडबड किंवा मनुष्यवस्तीचा गंधही दिसून येत नाहीं. सर्व ठिकाण शांतमय भासतें. अशा प्रकारचें ठिकाण समाधीला व मनाच्या एकाग्रतेला फार उत्तम असें वाटतें. आम्ही घांटावर गेलों तेव्हां तेथें कोणीही माणूस नव्हतें. आम्ही या देखाव्याकडे किती वेळ पहात होतों याचें आम्हांला भानच राहिलें नाहीं. इतक्यांत आमचा गाडीवाला फार उशीर झाला म्हणून आमचा शोध करीत आला व मग आम्हांला निरुपाय म्हणून तेथून पाय काढावा लागला. परंतु तें ठिकाण सोडतांना प्रिय-जनांचा वियोग होतांना ज्या प्रकारची मनाची स्थिति होते तशी आमच्या मनाची स्थिति झाली. दुसऱ्या खेपेला जेव्हां आम्ही कनखल तीर्थाला आलों तेव्हां तो पूर्वींचा देखावा गुप्त झाला होता. आक्टोबर-मध्यें 'हरीकी पायरी'चा घांट शुष्क व जलविहीन होता तर कनखल तीर्थ जलपूर्ण व आपल्या पूर्ण वैभवांत होतें. मेमध्यें आम्ही गेलों तों 'हरीकी पायरी' जलमय झालेली व आपल्या पूर्ण वैभवांत होती, तर

कनखल तीर्थ अगदीं शुष्क जलहीन होतें. तेव्हां या असल्या पवित्र स्थानांनासुद्धां '**नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण**' याप्रमाणें वागविणाऱ्या दैवाच्या फेऱ्यानें सोडिलें नाहीं, हें पाहून एक प्रकारचा खेद वाटला व ऋतुमानानें या प्रेक्षणीय स्थळांत होणाऱ्या विपर्यासाचें सखेदाश्चर्य वाटलें. तरी पण कनखल तीर्थाचे ठिकाणीं गेलें म्हणजे आपण मूर्तिमंत शांततेच्या ठिकाणीं आलों आहोंत, असें वाटल्याखेरीज रहात नाहीं.

येथील तिसरें पाहण्यासारखें ठिकाण म्हणजे मयापूर हें होय. येथें एकदोन फार जुनीं देवळें आहेत. एक देऊळ बुद्ध देवाचें स्थान म्हणून सांगतात. हें दुसऱ्या एका बाजूनें येणाऱ्या मोठ्या ओढ्याच्या कांठीं आहे व येथला देखावा बरा आहे. परंतु देऊळ फारसें जुनें आहे असें आम्हांला वाटलें नाहीं. असो.

अशीं निरनिराळीं प्रेक्षणीय स्थळें पाहण्यांत व रोज सायंकाळीं गंगेच्या किनारीं सहल करण्यांत आमचा आठवडा मोठ्या आनंदानें गेला. येथें आमची जेवणाची सोय उत्तम जमत असे हें वर सांगितलेंच आहे. येथला बाजार बराच मोठा आहे व सर्व जिन्नस येथें चांगले मिळतात. दूधदहीं तर फारच चांगलें असतें. दक्षिणेंतून इकडे प्रथमच येणाराला येथल्या बाजारांतील एका चालीचें आश्चर्य वाटतें. येथें सर्व जिनसा वजनीमापानें विकतात. तांदूळ तोलून घ्यावे लागतात. ! डाळ तोलून घ्यावी लागते ! आटा तोलून घ्यावा लागतो ! हिरवे आंबे सुद्धां तोलून घ्यावे लागतात ! सारांश त्या बाजारांत मापी वजन किंवा संख्यामोजणी ठाऊकच नाहीं, असें वाटतें. या ठिकाणीं साधुसंत असल्यामुळें म्हणा किंवा प्रघात आहे म्हणून म्हणा, येथें खडावा फार चांगल्या मिळतात. एका पांढरट तांबूस दगडाच्या दगड्या वगैरे पदार्थहि पुष्कळ मिळतात; बाकी म्हणण्यासारखा व्यापार या गांवाला नाहीं.

कनखल, हरिद्वार व ज्वालापूर हीं तीन गांवें मिळून हरिद्वार युनियन म्हणून एक म्युनिसिपालिटी आहे. हीं तिन्हीं गांवें आरोग्याच्या दृष्टीनें फार चांगलीं आहेत. मथुरा किंवा काशीसारखी येथें घाण किंवा दुर्गंधी

मुळींच नाहीं. सर्व घरें अगदीं स्वच्छ आहेत व गांवांत किंवा नदींत कोठेंही घाण नाहीं. येथें नदीचा प्रवाह जोराचा असल्यामुळें नदींत घाण राहूं शकत नाहीं. बारा वर्षांनीं येथें मोठा कुंभ मेळा भरतो, त्या वेळीं फार मोठी यात्रा भरते. बाकी या ठिकाणीं बाराही महिन्यांत निरनिराळया प्रांतांचे यात्रेकरू दृष्टीस पडतात. उत्तरहिंदुस्थानांत सर्व पवित्र स्थानांत, स्वच्छता व सृष्टिसौंदर्य या बाबतींत या क्षेत्राचा पहिला नंबर लागेल असें मला वाटतें.

या ठिकाणचें शब्दांनीं यथार्थ वर्णन करणें अशक्य आहे. हें ठिकाण प्रत्यक्ष पाहिल्यावांचून त्याचें महत्त्व कधींही कळावयाचें नाहीं. तरी वाचकांना अशा पवित्र स्थानाचें दर्शन पूर्व वयांत घेण्याची बुद्धि होवो अशी इच्छा प्रदर्शित करून हें हरिद्वारचें वर्णन संपवितों.

# प्रकरण ७ वें

## गुरुकुल

मीं उत्तर हिंदुस्थानांतील प्रवासास सुरवात केली तेव्हांपासून ' गुरु-कुल ' ही संस्था पहाण्याचा माझा मानस होता; परंतु पहिल्या प्रथम मी हरिद्वारला गेलों तेव्हां तेथें मी फक्त दोनच दिवस होतों. ते दोन दिवस तेथील अवर्णनीय सृष्टिशोभा पाहाण्यांत केव्हांच निघून गेले. तेव्हांसुद्धां मीं गुरुकुलाबद्दल चवकशी केली; परंतु मी एका फक्त हिंदी जाणाऱ्या जुन्या तऱ्हेच्या पंड्याकडे उतरलों असल्यामुळें मला आधीं बरोबर माहिती मिळाली नाहीं; शिवाय जी मिळाली त्यांत हरिद्वारापासून गुरु-कुल पांच मैल आहे असें कळलें. तेव्हां इतक्या लांब जाऊन येण्यास व ती संस्था सावकाशपणें अवलोकन करण्यास सवड सांपडणार नाहीं, असें दिसून आलें. म्हणून मनांतील उत्कंठा दाबणें भाग पडलें; पण ती संस्था उभ्या उभ्या व अगदीं तांतडीनें पाहून जाणें बरोबर नव्हे, असेंही मनाला वाटलें. कारण या संस्थेबद्दल व तिच्या उत्पादकाच्या आत्मत्यागाब-द्दल वर्तमानपत्रांत कितीतरी वेळां मीं वाचलें होतें. शिवाय, पंजाबांतील आर्यसमाजाची ही संस्था असल्यामुळें, या पंथांतील लोकांमध्यें तिच्या-बद्दल विलक्षण उत्साह, अभिमान व आदर वसत आहे; गुरुकुलाच्या वार्षिक उत्सवप्रसंगीं हजारों स्त्रीपुरुष तेथें जमतात व दरवर्षीं अर्धा अर्धा लाख रुपये रोख जमा होतात, असें मीं ऐकिलें होतें. तेव्हां अशी महत्त्वाची संस्था ज्या वेळीं मला वेळ अगदीं थोडा होता त्यावेळीं पाहिली नाहीं, हें एका अर्थीं बरें झालें.

एके दिवशीं सायंकाळीं आम्ही एक्क्यांत बसून कनखल तीर्थाला गेलों होतों. तेथील सर्व देवळें पाहिल्यावर आम्ही थोडा वेळ घाटावर जाऊन बसलों, व गंगेच्या प्रचंड पात्राकडे, त्याचप्रमाणें दृष्टि पोहोंचेपर्यंत

हिमालयाच्या उंचउंच पर्वतराजींकडे पहात होतों. याप्रमाणें थोडा वेळ गेल्यावर मुक्कामाला परत फिरण्याचे आधीं आम्ही “ गुरुकुल कोठें आहे, त्याला रस्ता कोणता, तेथें केव्हां जावें, गाडी वगैरे जाते किंवा नाहीं? ” वगैरे गोष्टींची चवकशी आमच्या मोडक्या तोडक्या हिंदी भाषेंत करीत होतों; इतक्यांत एक तद्देशीय गृहस्थ आमच्याकडे आले व त्यांनीं “तुम्हांला गुरुकुल पहावयाचें आहे काय?” असा इंग्रजींत प्रश्न केला.

हा प्रश्न ऐकून आम्हांला स्वाभाविकच आनंद झाला व भाषेसंबंधीं अडचणही दूर झाली. आम्ही त्या गृहस्थाला म्हटलें कीं, “ आम्हांला गुरुकुलास जावयाचें आहे व आम्ही त्याबद्दलच चवकशी करीत आहों.”

ते गृहस्थ म्हणाले “ गुरुकुलांतील एक प्रोफेसर आतां येथेंच आहेत, व ते दक्षिणी गृहस्थ असून त्यांनीं मला आपल्याला विचारण्यास पाठविलें आहे. तेच आले असते, परंतु आपल्याला बरें वाटेल किंवा नाहीं ही शंका येऊन ते आले नाहींत. ”

हें ऐकून आम्हांला फारच आनंद झाला. विशेषतः इतक्या दूरच्या प्रदेशांत आपली भाषा बोलणारे व आपल्याच देशांतील गृहस्थ येथें शिक्षक आहेत, हें ऐकून तर आमचा आनंद गगनांत मावेना ! आतां आपल्याला गुरुकुलाची सर्व माहिती मिळून पाहण्यासंबंधीं कांहींएक अडचण राहणार नाहीं असें वाटून, आम्ही फार सुदैवी म्हणून सहजगत्या असा योग आला, असें आम्हीं म्हटलें. इतकें बोलणें झाल्यावर आम्ही त्या गृहस्थाबरोबर देवळाच्या लतामंडपानें सुशोभित केलेल्या एका ओरी-कडे गेलों. तेथें एका साधारण ठेंगण्या, पण तेजस्वी व पाणीदार गृह-स्थाला पाहिलें. त्यांचा आमचा परिचयविधि झाला. प्रो. व्ही. जी. साठे हे मुंबईकडील राहणारे आहेत व ते स्वतः एम्. ए. असून त्यांचे बंधु पूर्वी आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या शाळेचे प्रिन्सिपॉल होते व हल्लीं मुंबईस वकिलीचा धंदा करतात असें समजलें. शिवाय प्रो. साठे यांनीं मला मुंबईस एकदोन वेळां पाहिलें होतें. याप्रमाणें ओळख निघाल्यानें

विशेषच आनंद झाला, व आम्हांला सर्व गोष्टी आपल्याच भाषेच्या द्वारें ठरवितां आल्या. प्रो. साठे यांनीं दुसऱ्या दिवशीं सकाळींच गुरुकुल पाहाण्यास येण्याबद्दल व तेथें सबंध दिवस राहून सायंकाळीं परत फिरण्याबद्दल आम्हांला सुचविलें, व सात आठांच्या सुमारास आपला मनुष्य वाटेवर ठेवतों, असें आश्वासन दिलें. इतकी आमच्याकरितां तसदी घेतल्याबद्दल व सुदैवानें अशी अचानक गांठ पडून ओळख झाल्याबद्दल आनंद प्रदर्शित करून व प्रो. साठे यांचे आभार मानून आम्ही प्रमुदित मनानें आमच्या निवासस्थानास परत आलों. मुक्कामाला येतांच आमच्या अर्वाचीन स्थालीची आराधना करून तींत अन्न शिजण्यास लावून नित्य क्रमाप्रमाणें आम्ही गंगेच्या घांटावर सहल करावयास गेलों.

या वेळची घांटाची शोभा अवर्णनीय असते. आधीं सर्व घांट माणसांनीं फुललेला असतो. निरनिराळ्या देवळांतून देवांची पूजा व आरती चालू असते, व निरनिराळ्या आवाजाच्या घंटांचा नाद चालू असतो. सर्व ठिकाणीं यात्रेकरूंची सारखी गर्दी असते. **'हरीकी पायरी'**च्या घांटावरील गर्दी तर विचारूंच नका! आरतीच्या दीपावलीचा प्रकाश प्रवाहावर पडून त्या प्रवाहाला जास्तच शोभा आली होती. आम्ही हरिद्वारास होतों ते दिवस चांदण्याचे नव्हते; परंतु चांदण्याच्या दिवसांत व विशेषतः पौर्णिमेच्या सुमारास नदीवरील व घांटावरील देखावा यापेक्षांही सुंदर दिसतो, असें आम्हांला सांगण्यांत आलें व त्याचें थोडेंसें प्रत्यंतर आह्मांला आमच्या हरिद्वारच्या आठवड्यांतील शेवटच्या एकदोन दिवशीं आलें. कारण त्या दिवसांत थोडासा चंद्रप्रकाश पडूं लागला होता. घांटावर बसून धो धो वाहणाऱ्या गंगाप्रवाहांत पाय सोडून बसण्याची फारच मौज वाटते. ते उन्हाळ्याचे दिवस, तरी पण अशा तऱ्हेनें फार वेळ पाण्यांत पाय सोडून बसवत नाहीं. अर्धापाव तास बसलें कीं, सर्व उष्मा नाहींसा होई व दिवसाचा सर्व थकवा जाऊन मन फार प्रसन्न होई. घांटावर इकडे तिकडे सहल करून मग थोडा वेळ पाण्यांत पाय सोडून बसण्याचा आमचा रोज परिपाठ पडला होता. अशा वेळीं नाना तऱ्हेचे विचार

मनांत येत व पूर्वीच्या ऋषींनीं हिमालयासारखीं ठिकाणें तपाला उत्तम म्हणून कां पसंत केलीं, हें सहज ध्यानांत येई. मनुष्याचें मन धर्मपरायण व ईश्वरपरायण बनण्यास, मनाची एकाग्रता साधण्यास, आत्म्याची समाधी लागण्यास हीं शांत गंभीर स्थानें फारच अनुकूल होत. यांत मुळीं शंका नाहीं.

याप्रमाणें बराच वेळ गंगानदीची शोभा पाहून व तिचा सुखकर स्पर्श अनुभवून आम्ही परत येतों तों, आमच्या दिव्य स्थालानें आमची पाकनिष्पत्ति उत्तम तऱ्हेची करून ठेविली होती. लवकरच भोजन आटोपून आम्हीं गच्चीवर निजण्यास गेलों. इकडल्या तिकडल्या गोष्टी बोलत असतांना उद्यां आपल्याला गुरुकुल पहावयास जावयाचें आहे या आनंदमय विचारांत असतांना आम्हांला निद्रादेवीनें मोहून टाकलें व लवकरच गाढ झोंप लागली.

आदल्या दिवशीं ठरल्याप्रमाणें आम्हीं पहांटेस पांच वाजतां उठलों व गुरुकुलास जावयाचें तें स्नान करून जावें म्हणजे बरोबर कपडालत्ता नेण्याचा त्रास नको, असा विचार करून लागलीच गंगेवर स्नानास गेलों. स्वच्छ गंगास्नान करून आणि निवळ दुधाचा चहा घेऊन आम्ही एक्यामधून सुमारें सहासाडेसहाला कनखल तीर्थाला आलों. गुरुकुलाचा रस्ता या तीर्थाच्या खालच्या बाजूनेंच जातो, व तो सर्व नदीच्या वाळवंटांतून जात असल्यामुळें, आम्हीं सर्व रस्ता पहात पहात व चालत चालत जाण्याचा बेत केला होता. म्हणून एक्का देवळाशींच सोडला, व आम्हीं वाट चालूं लागलों.

कनखलापासून गुरुकुलाचें ठिकाण तीन मैल आहे. परंतु बहुतेक सर्व रस्ता नदीच्या पात्रांतूनच जातो. कारण, हरिद्वारच्या खालीं गंगानदीचें पात्र फारच रुंद झालेलें आहे व तिचे निरनिराळे प्रवाह बनलेले आहेत. ज्याप्रमाणें एकादी अल्लड हरिणी अथवा कालवड गोठ्यांतून बाहेर पडली म्हणजे सैरावैरा धावूं लागते, त्याप्रमाणें येथें गंगेची स्थिति होते. हरिद्वाराजवळ तिला दोन टेकड्यांचा प्रतिबंध आहेसा दिसतो, परंतु हिमा-

लयाच्या पर्वतराजीरूपी कोंडवाड्याच्या शेवटच्या दारांतून मोकळ्या मैदानावर गंगा आली म्हणजे ती सैरावैरा धांवत आहे कीं काय, असा भास होतो. कनखल तीर्थाच्या खालींच गुरुकुलाची वाट नदीच्या पात्रांतून लागते. गंगेच्या पात्रांत बहुतेक दगड शुभ्र आहेत. परंतु मधून मधून निरनिराळ्या रंगाचे दगडही दृष्टीस पडतात. तांबडा, पिवळा, हिरवा, निळा, काळा वगैरे निरनिराळ्या रंगाच्या व त्यांच्या निरनिराळ्या छटांच्या गोट्यांनीं भरलेलें पात्र पाहून प्रथमतः पहाणाराला आश्चर्य वाटतें. कारण, आपल्या इकडे सर्व नद्या एकाचं काळयाकुट्ट गोट्यांनीं भरलेल्या असतात. त्यांत वैचित्र्य फारच क्वचित असतें. अशा प्रकारची मौज व दगडांचें वैचित्र्य नर्मदानदीच्या पात्रांत व विशेषतः जबलपूरनजीक मार्बल रॉक्स म्हणून जो नदीचा भाग आहे त्यामध्यें दिसून येतें. लहान मुलांना वाळूंतील शिंपा वेंचण्याची जशी हौस वाटत असते, त्याप्रमाणें गंगेच्या या पात्रांतून जातांना मोठ्या माणसांनाही दगड वेंचण्याची हौस वाटते. निरनिराळ्या रंगांचे गोटे गोळा करण्याची तशी हौस, आम्हांलाही वाटली व खरोखरीच आम्हीं प्रत्येकानें हातरुमालांत मावतील इतके दगड गोळा केले. परंतु जड झाल्यामुळें आम्हांला त्यांतले बरेच ‘ समुद्रास्तृप्यंतु ’ नव्हे ‘ नद्यास्तृप्यंतु ’ करावे लागले. तरी पण सरासरी हातरुमालभर गंगेंतील गोटे आम्ही पुण्यास आणलेच !

गंगेच्या पात्राची शोभा पाहात, व उत्तरेची दिशा भरून टाकणाऱ्या हिमालयाची दूरस्थित रांगची रांग निरखीत आणि नकळत भूगर्भशास्त्रज्ञाप्रमाणें निरनिराळ्या जातीचे दगड जमवीत चालल्यामुळें आमचा प्रवास फार धीरे धीरे होत होता. कनखलपासून गुरुकुलाला पोहोंचेपर्यंत वाटेंत लहान मोठे असे नदीचे पांच प्रवाह लागतात. त्या पांचांवरही लहान मोठे पूल केलेले आहेत; पूल कच्चे आहेत. दोन पूल जरा मोठे आहेत. ते होड्या एकापुढें एक ठेवून त्या होड्या दोरखंडांनीं जखडून त्यांवर लाकडाचे ओंडे टाकून, त्या ओंड्यावर आडव्या फळ्या व वांसे बांधून

त्यांवर गवत पसरून वर मातीचा थर देऊन सरासरी गाडी जाण्यापुरते कच्चे पूल केलेले आहेत. कांहीं पूल तर दोन चार लांकडाचे ओंडे टाकूनच केलेले आहेत. कारण प्रवाहाची धार फारच लहान आहे.

हे सर्व कच्चे पूल पाहिले म्हणजे पुढें येणाऱ्या गुरुकुलाच्या साधेपणाचीच साक्ष पटते, व आपण सृष्टिकृतींत अवश्य तितक्याच भर घातलेल्या स्थलाकडे जात आहों असें वाटतें. गंगेचा सर्वांत मोठा जो प्रवाह आहे, व ज्यावर बराच लांब पण कच्चाच पूल आहे, तो ओलांडल्यावर तरीचें नाकें लागतें. व तेथें दरमाणशीं एक पैसा तरभाडें द्यावें लागतें. या ठिकाणींच प्रो. साठे यांनीं वाट दाखविण्याकरितां पाठविलेला मनुष्य आह्मांला भेटला.

हा प्रवाह टाकल्यावर नदींत बनलेलें एक बेट लागतें. या बेटावर जंगल साधारणच आहे. फार उंच किंवा फार दाट झाडी नाहीं. पुढें लवकरच शेवटचा प्रवाह ओलांडून आपण गुरुकुलाच्या मर्यादेंत प्रवेश करतों. परंतु गुरुकुल जवळ आल्याचें एकही चिन्ह दिसत नाहीं. फक्त एक दूरवर निशाण दिसतें. त्या खुणेनेंच जावयाचें असतें. थोड्याच वेळानें आपण तीनशें साडेतीनशें मनुष्यवस्तीच्या खेड्यासारख्या ठिकाणीं जाऊं असें वाटत नाहीं. कारण, आतां सर्व भाग जंगलाप्रमाणें भासतो. झाडेंही जास्त दाट दिसूं लागतात. हा देखावा गुरुकुलाच्या अगदीं बाहेरच्या कवाडाशीं येईपर्यंत सारखा दिसतो. हें कवाड दिसलें म्हणजे आपण मनुष्य वस्तींत आलों असा विश्वास पटतो.

आम्ही कवाडांतून आंत शिरलों तों दोन्ही बाजूंना एकेरी खोल्याखोल्यांसारख्या जागा दिसल्या. याच विद्यार्थ्यांच्या जागा कीं काय, असा प्रथमतः आम्हांला संशय आला; परंतु त्या गोशाळेच्यापैकीं होत, असें पुढें समजलें. हें पहिलें कवाड टाकून बरेंच आंत गेल्यावर गुरुकुलाचें दुसरें फाटक लागतें. वाटेनें जातांना संस्कृत शब्दांनीं व्यक्त केलेल्या इंग्रजी खेळाच्या निदर्शक पाट्या लागतात. या खेळण्याच्या जागा दाखविणाऱ्या पाट्या होत्या.

दुसऱ्या फाटकाच्या आंत गेल्याबरोबर गुरुकुलाची बाग लागते. ही बाग नीटनेटकी, पण अगदीं साधी दिसते. येथेंच एक मोठी विहीर असून तिला भला थोरला एक बैलरहाट जोडलेला आहे. या रहाटाच्या योगेंच सर्व बागेला पाणी दिलें जातें व स्नानशाळेला येथून पाणी जातें. जरा पुढें गेलें कीं स्नानशाळा लागते. या शाळेंत लांबच लांब व अगदीं अरुंद असा मोठा थोरला हौद आहे. आपल्या इकडे गुरांना पाणी पिण्याकरितां ज्या तऱ्हेचा लांबच लांब हौद बांधतात, तशा तऱ्हेचा हा बांधलेला आहे. येथें पन्नास मुलें एकदम स्नान करूं शकतात. बहुधा नदीवर स्नान करण्याचा परिपाठ आहे; परंतु ज्या वेळीं नदीवर जाणें शक्य नाहीं त्या वेळीं स्नानशाळेचा उपयोग करतात.

ही शाळा टाकून जरा पुढें गेलें म्हणजे गुरुकुल महाविद्यालयाची इमारत लागते. ही दोन मजली पण अगदीं साध्या परंतु पक्क्या बांधणीची इमारत आहे. शहरांतील कॉलेजच्या इमारतींप्रमाणें भव्यता, सौंदर्य किंवा अवाढव्यपणा या इमारतींत मुळींच नाहीं. पण ही इमारत गुरुकुलासारख्या पूर्वकालीन संस्कृतीचें पुनरुज्जीवन करणाऱ्या संस्थेला साजेशीच आहे. इमारत दुमजली आहे व त्यांत २२ वर्ग बसण्याची जागा असून एक मोठा पुस्तकालयाचा दिवाणखाना आहे व दुसरा शास्त्रीय शिक्षणाचा दिवाणखाना आहे. दुसऱ्या मजल्यावर महाविद्यालयाकडील ब्रह्मचारी राहण्याची सोय केलेली आहे. या इमारतीस चाळीस हजार रुपये खर्च आलेला आहे. ही इमारत कॉलेजच्या शाखेची होय.

शाळेच्या शाखेकरितां अजून कायमच्या पुऱ्या इमारती बांधलेल्या नाहींत. सर्व ब्रह्मचारी तात्पुरत्या बांधलेल्या एका भव्य चौकांत राहातात. हा चौक फारच मोठा असून त्याचे मधोमध एक मोठी यज्ञशाळा आहे. ती शहरांतील एकाद्या उपवनांतील बँडस्टँडसारखी हुबेहुब दिसते. मात्र ही फार मोठी आहे व मधोमध एक यज्ञकुंड आहे. यांत सकाळीं होम होतो व त्या वेळीं सर्व ब्रह्मचारी एके ठिकाणीं जमून हवन करतात.

सायंकाळचा होम वर्गवारीनें व निरनिराळ्या ठिकाणीं होतो. या इमारतीला एकंदर पसतीस हजार रुपये लागले आहेत. येथें विद्यार्थ्यांच्या राहाव-याच्या खोल्या, शाळेच्या खोल्या, व दवाखाना, स्वयंपाकघर व भोजनशाळा इतक्या इमारती आहेत. या इमारती एकमजली असून सोपा व त्याचेपुढें खुली पडवी, अशा धर्तीच्या आहेत. वर पत्रे घातलेले आहेत. भोजन शाळा फारच विस्तृत आहे. येथें अडीचशेंपासून तीनशें विद्यार्थी एकदम भोजनास बसण्याची सोय आहे. परंतु गुरुकुल विद्यालयाची ही चाल-चलाऊ व्यवस्था आहे. कायमची इमारत बांधण्याचा विचार आहे. त्यांत सहाशें विद्यार्थ्यांची सोय व्हावयाची आहे व त्याला पांच लाख रुपये खर्च येईल असा अंदाज केलेला आहे. गुरुकुलाच्या चालकांचा ‘ इमारतफंड ’ जमविण्याचा प्रयत्न चालू आहे.

या इमारतीपासून जरा दूर आनंदाश्रम म्हणून एक लहानशी इमारत आहे. या ठिकाणीं अविवाहित शिक्षक राहातात. येथून थोड्या अंतरावर दिल्लीचे सुपरवायझर लाला परमेश्वरी दास यांनीं चार हजार रुपये खर्चून एक पक्की धर्मशाळा बांधलेली आहे. गुरुकुल पहाण्यास सहकुटुंब येणाऱ्या गृहस्थास येथें उतरण्याची सोय आहे. शिवाय प्रोफेसर, शिक्षक, सुपर-वायझर यांच्या कुटुंबांकरितां स्वतंत्र घरें बांधलेलीं आहेत. गुरुकुलाचे मुख्य आचार्य यांच्याकरितां एक स्वतंत्र आश्रम बांधलेला आहे.

गुरुकुलाचें आवार फारच विस्तृत आहे. हें एक लहानसें खेडेंच आहे. ही जागा पूर्वीं निवळ जंगल असून येथें पशूंचें वसतिस्थान होतें. परंतु या स्थळाचा देखावा मात्र सुंदर आहे. हें ठिकाण गंगेच्या डाव्या तीरावर आहे. येथें हवा फार चांगली असून गंगेचा प्रवाह जवळच वहात अस-ल्यामुळें प्रवाहावरून नेहमीं गार वारा येत असतो. येथून हिमालयाच्या पर्वतराजी सारख्या दिसत असतात. सर्व जागा झाडांनीं आच्छादलेली आहे.

अशी शांत, एकीकडची आणि हवाशीर जागा पाहून महात्मा लाला मुनशीराम हे बारा चवदा वर्षांपूर्वी आपल्या दोन मुलांना घेऊन येथें

राहण्यास आले व निवळ जंगलांत त्यांनीं गुरुकुलास आपल्या एकट्याच्या हिमतीवर सुरवात केली. गुरुकुलाची ही जागा, व आपली सर्व इष्टेट श्रीमन्मुनशी अमेनसिंहजी यांनीं गुरुकुलास बक्षीस दिलेली आहे. या इष्टेटीची किंमत तीस हजार रुपयांची आहे. त्याप्रमाणें प्रथमारंभींच या थोर गृहस्थांनीं गुरुकुल महाविद्यालयाला आपल्या विलक्षण औदार्यानें स्थैर्य व शाश्वती आणली, व त्यामुळें गुरुकुलाचे उत्पादक महात्मा मुनशीराम यांना इतक्या थोडक्या काळांत या विद्यालयाची इतकी प्रगति करून दाखवितां आली. या गृहस्थांचा आत्मत्यागही अलौकिक आहे. यांनीं आपली दरमहाची हजार रुपयांची प्राप्ति सोडून व आपली सर्व इष्टेट शिक्षणाला अर्पण करून पंडित दयानंद सरस्वतींच्या इच्छेनुरूप गुरुकुल काढण्याचा निश्चय केला, व ते आपल्या दोन लहान मुलांसह वर सांगितल्याप्रमाणें या निर्जन प्रदेशीं प्रथमतः आले; व अवघ्या एका तपामध्यें त्यांनीं एक मोठें अवाढव्य विद्यामंदिर निर्माण करून ज्या ठिकाणीं माणुसहि फिरकावयाचा नाहीं तेथें रात्रंदिवसची तीन-चारशें माणसांची वस्ती बनविली ! बारा वर्षांतील ही कृति महान् पराक्रमासारखी आहे यांत कांहींएक शंका नाहीं. एकंदर गुरुकुलाचा विस्तार, त्याची वाढ व त्याची सांप्रतची स्थिति पाहून आम्हांला महात्मा मुनशीराम यांचें सादर कौतुक वाटलें.

येथपर्यंत गुरुकुलाच्या पूर्व पीठिकेचें, पूर्वरंगाचें व सद्यःकालीन आणि भावी बहिरंगाचें वर्णन झालें; परंतु गुरुकुल ही एक शिक्षणसंस्था होय व या संस्थेची योग्यता तिच्या अंतरंगावर अवलंबून आहे हें उघड आहे. तेव्हां त्या अंतरंगाकडे आतां वळूं.

गुरुकुल ही आर्यसमाजपंथी लोकांची शिक्षणसंस्था आहे. लाहोर येथें त्यांचें अँग्लोवेदिक दयानंद सरस्वती कॉलेज आहे. परंतु त्या कॉलेजाच्या चालकांत व कांहीं दुसऱ्या समाजपंथी लोकांत मतभेद झाल्यामुळें गुरुकुल ही संस्था अस्तित्वांत आली, असें आम्हांला समजलें. जरी

तिला महात्मा मुनशीराम यांनीं प्रथम जन्म दिला, तरी लवकरच ही संस्था पंजाबच्या आर्यप्रतिनिधिसभेनें दत्तक घेतली, व हल्लीं तिच्यावरील सर्व देखरेख व तिची सांपत्तिक जोपासना, या प्रतिनिधिसभेनें नेमलेल्या एका बोर्ड ऑफ कंट्रोल नांवाच्या कमिटीकडेच आहे. या ठिकाणीं दर वर्षी आर्य समाजपंथी लोकांचें संमेलन भरतें, व या संस्थेच्या सद्यः व भावी स्थितीची वाटाघाट होते, व पुढील सालच्या खर्चाची तजवीज केली जाते. गुरुकुलाच्या आंतील व्यवस्थेकरितां अंतरंगसभा म्हणून एक लहान कमिटी आहे, व तीच गुरुकुलाचा आचार्य व गव्हरनर यांची नेमणूक करते. सर्व रोजची व्यवस्था आचार्यांकडे असते.

गुरुकुल विद्यालय ही शिक्षणसंस्था प्रायः वेदाच्या व संस्कृत भाषेच्या अध्ययनाकरितां आहे; परंतु त्यांत इंग्रजी वाङ्मय व अर्वाचीन शास्त्रें आणि तत्त्वज्ञान यांचेंही अध्ययन केलें जातें. इंग्रजी व शास्त्रें शिकणें न शिकणें हें पालकाच्या मर्जीवर असतें. तेव्हां या तीन विषयांपैकीं वेद व वेदांग यांनाच प्राधान्य दिलेलें आहे. इंग्रजी व शास्त्रें शिकवितांना या प्रधान अध्ययनाला धोका किंवा अडचण येतां कामा नये, असा निर्बंध आहे. या शिक्षणाबरोबरच शारीरिक शिक्षण अवश्यमेव दिलें जातें. बऱ्याच वयाच्या विद्यार्थ्यांना कांहीं धंद्याच्या शास्त्रांचें शिक्षण देण्याची व्यवस्था केली जावयाची आहे. या विद्यालयांतील शिक्षकांना दयानंद सरस्वती यांनीं स्थापन केलेल्या आर्यसमाजाचीं तत्त्वें मान्य असलीं पाहिजेत, व त्यांची वेदावर श्रद्धा असून वेदधर्मातील ५१ कलमांवर त्यांचा भरंवसा पाहिजे. एकाद्या शिक्षकासंबंधीं या अटींपैकीं एकादी अगर अधिक अटी काढून टाकण्याचा अधिकार अंतरंगसभेस आहे. परंतु गुरुकुलाच्या आचार्याला मात्र सर्व अटी पूर्णपणें मान्य असल्या पाहिजेत.

ज्यांचा वेदारंभ अथवा उपनयनविधि झालेला आहे, अशा सर्व ब्रह्मचारी विद्यार्थ्यांस गुरुकुलांत घेतलें जातें. मात्र विद्यार्थ्यांचें वय सहा वर्षांचे आंत व आठ वर्षांच्या वर नसावें. दहा वर्षांच्या वरचा विद्यार्थी गुरु-

कुलांमध्यें केव्हांही घेतला जात नाहीं. विद्यार्थी शरीरानें व मनानें सुदृढ पाहिजे, विद्यार्थ्यांच्या पालकानें 'मुलाचें पंचवीस वर्षेंपर्यंत लग्न किंवा वाङ्‌निश्चय करणार नाहीं,' असा करार लिहून दिला पाहिजे. सर्व विद्यार्थ्यांना विद्यादान फुकट दिलें जातें. सर्व ब्रह्मचाऱ्यांना खाण्यापिण्यांत, कपडच्यालत्त्यांत बसण्या उठण्यांत सारख्या तऱ्हेनें वागविलें जातें. जातीजातींमध्यें कोणताहि भेद ठेविला जात नाहीं. सर्वांना निरामिष अथवा शाकाहार मिळतो. ब्रह्मचाऱ्यांनीं आपल्या ब्रह्मचर्यनियमाप्रमाणें राहिलें पाहिजे असा निर्बंध आहे. सर्वांना ब्रह्मचर्याश्रमाला योग्य असाच साधा पोषाख दिला जातो. अध्ययनास लागणारी सर्व सामुग्री गुरुकुलच पुरवितें. ब्रह्मचाऱ्यांना शहरांत किंवा आपल्या घरीं जाण्यास परवानगी नसते. निकट पालक विशेष आजारी असल्यास, किंवा ब्रह्मचारी स्वतःच आजारी पडल्यास, त्याला घरीं जाऊं दिलें जातें. पालकानें महिन्यांतून एक वेळेपेक्षां जास्त वेळां विद्यार्थ्यास भेटतां कामा नये. वर्षांतून एकाद्या सुटीला ब्रह्मचाऱ्यांना जवळपासच्या यात्रांना शिक्षकांसमवेत पाठविलें जातें. महिन्यांतून एकदां पालकास पत्र लिहिण्याची परवानगी ब्रह्मचाऱ्यास दिली जाते. ब्रह्मचर्याचे नियम मोडल्यास, किंवा दुसरें जबर गैरवर्तन झाल्यास, किंवा पालकानें लेखी करार मोडल्यास, ब्रह्मचाऱ्यास विद्यालयांतून काढून टाकितात.

गुरुकुलविद्यालयाचा शिक्षणक्रम १६ वर्षांचा आहे. त्याच्या तीन पायऱ्या आहेत. पहिला क्रम दहा वर्षांचा आहे. त्याचे शेवटीं अधिकारीपरीक्षा होते. या शिक्षणक्रमानंतर महाविद्यालयांत ब्रह्मचाऱ्याला घेतलें जातें. येथें चार वर्षांचा शिक्षणक्रम आहे. याचे शेवटीं परीक्षा घेतली जाते व त्यांत पसार होणाराला 'स्नातक' ही पदवी मिळते. यापुढें आणखी दोन वर्षांचा क्रम आहे. यांत विद्यार्थ्यानें स्वतः नवीन शोध करून निबंध लिहावा लागतो. या कसोटीला जो उतरेल त्यालाच 'वाचस्पति' अशी पदवी मिळते.

'अधिकारी' परीक्षेचा अभ्यासक्रम काहीसा मॅट्रिक परीक्षेसारखा असतो. संस्कृताचा अभ्यास पुष्कळच होतो. विद्यार्थ्यांस संस्कृत व हिंदी भाषा चांगल्या येऊं लागतात. वेदांगांपैकीं व्याकरण व ऋग्वेदादींची भाष्यभूमिका होते. दर्शनांपैकीं न्याय, वैशेषिक, सांख्य व योग इतकीं शिकविलीं जातात, व सोपीं उपनिषदेंही सार्थ पढवितात. पुढें हिंदुस्थानचा इतिहास, गणितशास्त्रें, व सहाव्या यत्तेचें इंग्रजी किंवा ड्राईंग, इतके विषय शिकविले जातात. सर्व विषय हिंदी भाषेच्या द्वारें शिकविण्यांत येतात. 'स्नातक' परीक्षेला वैदिकवाङ्मय, अर्वाचीन संस्कृत, आणि इंग्रजी वाङ्मय, हे तीन विषय आवश्यक असतात; आणि ऐच्छिक विषय एक असतो, तो इंग्रजी तत्त्वज्ञान व नीतिशास्त्र, इतिहास व अर्थशास्त्र, आणि रसायनशास्त्र या तिहींपैकीं, विद्यार्थ्याच्या इच्छेप्रमाणें घ्यावयाचा असतो. 'वाचस्पती'च्या पदवीला दोन निबंध लिहावे लागतात. मुख्य मोठा निबंध वेदासंबंधीं असला पाहिजे, व त्यावरून विद्यार्थ्यानें चारी वेदांचें उत्तम अध्ययन केलें आहे असें दिसून आलें पाहिजे; व दुसरा कोणत्याही खालील एका विषयावर असला पाहिजे:— संस्कृत, व्याकरण, संस्कृतवाङ्मय, महाभारताच्या पूर्वींचें तत्त्वज्ञान, महाभारतानंतरचें तत्त्वज्ञान, वेदकालीन हिंदुस्थान, बुद्धकालीन हिंदुस्थान, हिंदुस्थानचा धार्मिक इतिहास, हिंदुस्थानविषयक समाजशास्त्र, तत्त्वज्ञान, तुलनात्मक व्याकरण, जुने कायदे, प्राचीन युरोपियन तत्त्वज्ञान, अर्वाचीन युरोपियन तत्त्वज्ञान, हिंदुस्थानच्या जमिनी, आणि आयुर्वेदिक औषधिक्रिया.

वर त्रोटक तऱ्हेनें दिलेल्या अध्ययनक्रमावरून गुरुकुलविद्यालयाचें अंतरंग दिसून येईल. या विद्यालयांत प्राधान्येंकरून संस्कृत व हिंदी भाषा, आणि विशेषतः वेद व वेदांगें यांवर जास्त जोर दिला जातो, हें उघड दिसतें. मात्र येथलें अध्ययन आपल्या इकडच्या जुन्या शास्त्रीवैदिकांसारखें अगदींच एकांगी व पंगू नाहीं. पूर्वींच्या वैदिकांना फक्त वेद व वेदांगें मुखोद्गत येत असतात, शास्त्र्यांना संस्कृत वाङ्मयाच्या

एक दोन तीन शास्त्रांचें पूर्ण ज्ञान असतें; परंतु या विद्यालयांत तसा प्रकार नाहीं. येथें जुन्या विद्यांबरोबर पाश्चिमात्य संस्कृतीचाही थोडाफार अभ्यास विद्यार्थ्यांकडून करविला जातो. येथील अभ्यासक्रमांत जुन्या-नव्याचा मिलाफ झालेला आहे. यामुळें येथील विद्यार्थी एकदेशीय संकुचितवृत्तीचे व अंधश्रद्धाप्रेरित न राहतां उदार विचारांचे, विस्तृत मनाचे व सारासार विचार करणारे, असे विद्वान निपजण्याचा जास्त संभव आहे. शिवाय विद्यालयाचा विशेष म्हणजे येथें दानत व शरीर-सामर्थ्य हीं बनविण्याकडे उत्तम लक्ष पुरविलें जातें. यामुळेंही येथील विद्यार्थी नुसते विद्वान् न निपजतां शीलवान् बलवान् सद्गृहस्थ निपज-तील यांतही शंका नाहीं. कारण या विद्यालयांत विद्याशीलबलनिर्मितीस अनुकूल परिस्थितिच आहे. आधीं कोंवळ्या वयांत व बालपणीं मुलांना विद्यालयांत घेतलें जातें. या वयांत कोंवळ्या झाडाप्रमाणें किंवा ओल्या मातीप्रमाणें जसा आकार शरीराला, मनाला, व आत्म्याला द्यावा तसा तो सहज देतां येतो. शिवाय मुलें बारान्बारा चोवीस तास गुरुसह-वासांत असतात. शहरांतील मुलांना मोह उत्पन्न करणाऱ्या गोष्टी येथें मुळींच नाहींत. हवापाणी व खाणेंपिणें शरीरबल वाढविण्यास योग्य असेंच असतें. शिक्षकवर्ग उत्साही, कर्तव्यदक्ष व गुरुकुलाचा अभिमानी असून पैशाच्या साधनाची मुबलकता आहे. इतकी अनुकूल परिस्थिति असतां या संस्थेंतून वाईट विद्यार्थी बाहेर पडले तरच आश्चर्य. उत्तम निर्माण झाले तर त्यांत विशेष नवल करण्यासारखी गोष्ट नाहीं. आतां हा अभ्यासक्रम कितपत अमलांत आलेला आहे हें दाखवून येथल्या महा-विद्यालयांतील प्रोफेसरांची थोडी ओळख करून द्यावयाचें शेवटचें पण आवश्यक काम राहिलें.

मागें सांगितलेंच आहे कीं, आम्हीं गुरुकुलांत सकाळीं आठ साडे-आठच्या सुमारास जाऊन पोहोंचलों. आम्हीं आल्याची वर्दी गेल्याबरो-बर प्रो. साठे बाहेर आले व त्यांनीं प्रथमतः आम्हांस गुरुकुलचे असिस्टंट गव्हरनर महाशय नंदलाल यांचे कचेरींत नेलें व तेथें महाशयांची

ओळख करून दिली. लाला नंदलाल यांनीं मोठ्या प्रेमानें आमची विचारपूस करून गुरुकुलाच्या साध्या व शुद्ध राहणीचें पूर्व चिन्ह म्हणूनच कीं काय, एकएक पेला ताजें गाईचें दूध आणून देवविलें. दूध पिऊन नंदलालचे आभार मानून आम्हीं काय करावयाचें तें ठरविलें. उन्हाळयामुळें गुरुकुलांतील सर्व वर्ग प्रत्यक्ष पाहण्याची संधि मिळाली. आमच्या सुदैवानें तो दिवस बुधवार होता व तो गुरुकुलांतील वादविवादसभेचा दिवस असल्यामुळें त्या दिवशीं संस्कृत भाषेंत वादविवाद व्हावयाचा होता. तेव्हां सर्व वर्ग पाहून आम्हीं या वादविवादास हजर रहावयाचें व अकरासाडेअकराच्या सुमारास महात्मा मुनशीराम यांचें दर्शन घेऊन प्रो. साठे यांचे घरीं भोजनास जावयाचें असा कार्यक्रम ठरविला. लागलेच आम्हीं महाविद्यालयांत आलों. तेथें प्रो. साठे यांनीं आमची प्रो. रामदेव यांच्याशीं ओळख करून दिली. प्रो. साठे यांना दुसरें काम असल्यामुळें प्रो. रामदेव यांनीं आम्हांला सर्व वर्ग दाखविण्याचें काम केलें.

प्रथमतः आम्हीं कॉलेजांतील वर्ग पाहिले. हे वर्ग अर्थातच लहान होते. एखाद्यांत पांचसहा मुलें, एखाद्यांत चारपांच तर एखाद्यांत दोनतीनच होतीं. कोठें अर्थशास्त्र हा विषय चालला होता, तर कोठें पूर्वमीमांसा, कोठें इंग्रजी तर कोठें गणित.सर्व वर्गांची व्यवस्था मात्र अगदीं अर्वाचीन पद्धतीची होती. ब्रह्मचाऱ्यांस बसण्याकरितां डेडले पॅटर्नसारख्या जोड डेस्काच्या खुर्च्या होत्या. वर्गाला लागणारें इतर सामानहि नवीन पद्धतीचेंच होतें.

कॉलेज क्लासेस पाहून झाल्यावर आम्हीं १० व्या वर्गापासून खालीं सारखे वर्ग पहात गेलों. या वर्गांतून मुलें जास्त होतीं. कोठें दहा, कोठें पंधरा, कोठें वीस. वीसपंचवीसच्यापेक्षां जास्त मुलें कोणत्याही वर्गांत नव्हतीं. येथेंही निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळे विषय चालू होते. प्रो. रामदेव आमच्याकरितां हिंदीमध्यें कांहीं प्रश्न विचारीत. मुलें चांगल्या तऱ्हेनें उत्तरें देऊं शकतात, असें आमच्या दृष्टोत्पत्तीस आलें. अर्वाचीन पद्धतीला अनुसरून खालच्या वर्गांत किंडरगार्टन पद्धतीनेंच शिक्षण

चालत होतें व प्रत्येक क्लासांत चित्रें, नकाशे व इतर शिक्षणाचीं उपकरणें नीटनेटकीं मांडलेलीं होतीं. त्यांत पुण्याच्या चित्रशाळेंतील चित्रें पाहून आम्हांला फार नवल वाटलें. कोठें पुणें आणि कोठें हरिद्वार ! कोठें जुन्या विद्येच्या उद्धारार्थ काढलेलें गुरुकुल व कोठें चित्रकलेचा प्रसार करण्याकरितां काढलेली पुण्याची चित्रशाळा ! परंतु अर्वाचीन काळच्या सुलभ साधनांनीं सर्व हिंदुस्थान देश एकरूप करून टाकल्यामुळें, व सर्व देशभर पाश्चात्य शिक्षणानें देशाभिमान उत्पन्न केल्यामुळें देशी धंद्यांस उत्तेजन देण्याची प्रवृत्ति हिंदुस्थानच्या कोनाकोपऱ्यांतही दिसून येऊं लागली आहे, हें पाहून आम्हांला सानंद कौतुक वाटलें.

एकंदर विद्यालयांतील टापटीप, लहान मुलांचीं हस्तकौशल्याचीं कामें व शिकण्याची पद्धति हीं पाहून आम्हांला फार आनंद झाला व या विद्यालयांत जुन्याचा व नव्याचा खरोखरीं संगम घडवून आणलेला आहे यांत संशय नाहीं, अशी आमच्या मनाची खात्री झाली. वर्ग पाहून झाल्यावर आम्हीं वाचनालय व शास्त्रीय उपकरणगृह पाहिलें. नव्या संस्थेच्या मानानें दोन्हींचा संग्रह बरा आहे.

परंतु गुरुकुल विद्यालयांतील अध्ययनविषयक पाहिलेली शेवटची गोष्ट म्हणजे तेथील संस्कृत वादविवाद ही होय. त्यादिवशीं प्रो. साठे हे कामचलाऊ अध्यक्ष होते. पंडित काशीनाथ शास्त्री संस्कृतचे नेहमींचे उपाध्यक्ष हेही अग्रस्थानीं बसले होते. परंतु त्यांनीं वादविवादाला हातभार लावला नाहीं. वादविवादसभेचे सेक्रेटरींनीं आदल्या वादविवादाचा वृत्तांत वाचला व तो सर्वांना पसंत झाल्यावर त्यावर अध्यक्षांनीं सही केली. नंतर त्या दिवशींच्या कामास सुरवात केली. पहिल्या वक्त्यास अमुक वेळ दिला जाईल, उलट पक्षाच्या वक्त्यास इतका वेळ दिला जाईल व पुढील प्रत्येक वक्त्यानें अमुक वेळांत आपलें भाषण आटोपलें पाहिजे वगैरे औपचारिक निर्बंध सांगून झाल्यावर वादविवादास सुरवात झाली. त्या दिवशींचा विवादविषय ‘ लेखनी श्रेष्ठ कीं असि श्रेष्ठ ? ’ हा

होता. अर्थात् शरीरबल श्रेष्ठ कीं ज्ञानबल श्रेष्ठ हा विषय होता. विद्यार्थी संस्कृत अस्खलित बोलत हें पाहून आम्हांला फार नवल वाटलें. विद्यार्थी सुमारें पंचवीस तीस होते. त्यांचे ते ब्रह्मचाऱ्यांस योग्य असे पिवळे पोशाख, धोतराचा उत्तरीयासारखा केलेला उपयोग, त्यांची ती सतेज, निरोगी व सुदृढ शरीरयष्टि आणि त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येणारा तेजःपुंजपणा व आनंद पाहून आणि त्यांची ती अस्खलित संस्कृत वाणी ऐकून, क्षणभर असा भास झाला कीं, आपण पूर्वकालच्या एखाद्या वसिष्ठवाल्मीकीच्या आश्रमाला आलों आहों कीं काय व तेथलेच हे ऋषिकुमार बोलत आहेत, कीं काय? परंतु या ऋषिकुमारांच्या भाषणांतील शिवाजी, नेपोलियन, बुद्ध, दयानंदसरस्वती, शंकराचार्य वगैरे ऐतिहासिक नांवें ऐकलीं व एकंदर विचारसरणीचा झोंक पाहिला, तेव्हां मनाची खात्री झाली कीं, जरी बाह्य देखाव्यांत हे पूर्वकालीन ऋषिकुमार दिसले, तरी अर्वाचीन कालच्या पाश्चात्य संस्कृतीनें ज्यांच्या मनांत देशाभिमानाची लाट उचंबळत आहे, अशा या देशांतील इतर शाळांत, कॉलेजांत शिकणाऱ्या तरुण हिंदी विद्यार्थ्यांप्रमाणें हे अर्वाचीन काळचेच विद्यार्थी आहेत. या वादविवादांत शरीरबलाच्या श्रेष्ठपणाबद्दल बोलणारे थोडेच निघाले. बहुतेकांनीं ज्ञानबलाचेच पोवाडे गाइले. वादविवादाची मर्यादित वेळ संपल्यावर प्रो. साठे यांनीं औपचारिक समारोप केला व दुसऱ्या पंधरवड्याच्या वादविवादाचा विषय ठरून सभेचें काम संपलें.

या वेळीं अकरा साडे अकरा वाजून गेले होते. तरी पण आम्हीं महात्मा मुनशीराम यांचे आश्रमास आलों. महात्मा मुनशीराम हे शांत गंभीर व पहातांक्षणींच ज्यांच्याबद्दल अनुकूल ग्रह होतो अशा तऱ्हेचे गृहस्थ आहेत. हेच या गुरुकुलाचे उत्पादक व सध्यांचे आचार्य होत. महात्मा मुनशीराम यांचें दर्शन घेऊन त्यांच्याजवळ थोडेंसें संभाषण करून उशीर झाला, म्हणून आम्ही प्रो. साठे यांच्या घरीं आलों. तेथें जेवण तयार होतें. आमचें जेवण आटोपतें आहे नाहीं तोंच प्रो. तुलशीराम मिश्र हे आमचे भेटीकरितां आले. यांनीं पूर्वीं दोनतीन कॉलेजांत

इंग्रजी व तत्त्वज्ञान शिकविण्याचें काम केलें असून हल्लीं गुरुकुलांत ते तेंच काम करतात असें आम्हांला कळलें. अर्थात् यांचा व माझा आवडता विषय एकच असल्यामुळें यांचें माझें लवकरच जुळलें. प्रोफेसर मिश्र यांच्या भाषणावरून यांच्या मनांतील सात्विक भावाची मला चांगलीच कल्पना होत होती. यांच्या बोलण्यांत दुसऱ्याविषयीं बोलतांना बंधुभगिनी हे शब्द वापरण्याचा परिपाठ दिसला. त्यावरून मला इंग्रजी कादंबऱ्यांतील क्वेकरांची आठवण झाली. हे गृहस्थ चांगले बहुश्रुत पोक्त, प्रेमळ व विचारी दिसले.

प्रोफेसर मिश्र यांच्याशीं आमचें बोलणें चाललें आहे, तोंच प्रोफेसर बाळकृष्ण हे प्रो. साठे यांच्या घरीं आले. हे तरुण गृहस्थ एम्. ए. असून इतिहास व अर्थशास्त्र यांचे शिक्षक आहेत. अर्थशास्त्रावर त्यांची भक्ति दिसली व हिंदी भाषेंत एक स्वतंत्र ग्रंथ त्या विषयावर लिहिण्याचा त्यांचा मानस असल्याचें त्यांनीं मला सांगितलें. तेव्हां माझाही तो आवडता विषय असून मीं या विषयावर एक पुस्तक मराठींत लिहिलें आहे, असें त्यांना सांगितलें व माझ्या पुस्तकाची एक प्रत पाठवून देण्याचें कबूल केलें. त्यांना महाराष्ट्राच्या इतिहासाची आवड असल्याचें दिसून आलें. इकडल्या तिकडल्या गप्पा होत आहेत, तों प्रो. रामदेव हे गृहस्थ आले. प्रो. रामदेव हे प्रथमतः दिसण्यांत मद्रासकडील गृहस्थासारखे वाटतात. हे गृहस्थ बी. ए. असून इंग्रजीचे प्रोफेसर आहेत. तसेंच ते 'वैदिक मॅगेझिन'चे एडिटर आहेत व शिवाय डेप्युटी गव्हरनर आहेत. यांनींच आम्हांला सर्व विद्यालय दाखविलें व त्यासंबंधीं माहिती सांगितली. हे गृहस्थ फार बोलके, गुरुकुलपद्धतीबद्दल विलक्षण उत्साही व स्वमताबद्दल अत्यंत अभिमानी आहेत. यामुळें आम्हांला फारसे प्रश्न न विचारतां सर्व माहिती आपोआप व सहज जातां जातां मिळाली. दुसऱ्या प्रोफेसरांशीं आमचा फारसा वादविवाद झाला नाहीं. कदाचित् त्यांचीं व माझीं मतें जुळलीं असतील ह्मणा, किंवा आपल्या संस्था पाहण्यास आलेल्या पाहुण्याजवळ वाद घालीत बसणें बरें नाहीं असें त्यांना

वाटल्यामुळें ह्मणा परंतु आम्ही आतांपर्यंत असल्या वादग्रस्त विषयांत पडलोंच नाहीं. परंतु प्रो. रामदेव आल्यापासून वादविवादास सुरुवात झाली. कारण, थोड्याच वेळांत असें दिसून आलें कीं, प्रो. रामदेव यांच्या व माझ्या सर्व वादग्रस्त विषयांसंबंधींच्या मतांत बरेंच अंतर आहे. ज्यांना आपापल्या मतांच्या खरेपणाबद्दल पूर्ण विश्वास आहे व ज्यांचीं मतें भिन्न भिन्न आहेत अशीं दोन सुशिक्षित माणसें एके ठिकाणीं आल्यावर वादविवादास काय तोटा! कोणताही वादग्रस्त विषय असो, आमच्या वादविवादाच्या योगें दोघांचें एकमत होण्याचा सुयोग येईना. एखाद्या मोठ्या जंक्शन स्टेशनवर रेल्वेच्या लाईनींच्या रुळांची विलक्षण तऱ्हेची गुंतागुंत झालेली असून त्यांचें एक जाळेंच बनलेलें असतें; पण स्टेशनच्या बाहेर पडल्यावर दोन लायनी परस्पर भिन्न दिशांनीं जातात, त्याप्रमाणें आमच्या वादविवादाची स्थिति होई. प्रारंभीं प्रारंभीं एकमेकांना सामान्यतः पटतील अशीं विधानें व तत्त्वें यांनीं वादविवादास सुरुवात होई; परंतु शेवटीं परस्पराविरोधी अशा प्रमेयांत वादाचा शेवट होई. आम्हीं कितीतरी निरनिराळ्या विषयांवर संभाषण केलें असेल.प्रो.रामदेवांना दुसऱ्यांना आपल्या मतांचे बनविण्याची फार हौस दिसली,व यामुळें कोणत्या तरी एका विषयांत आमचें मतैक्य होतें कीं काय हें आम्ही पहात होतों; परंतु तसा प्रसंग आलाच नाहीं! एकाच शिक्षणपद्धतीखालून गेलेल्या सुशिक्षितांमध्यें अशा तऱ्हेनें मतवैचित्र्य कसें उत्पन्न होतें, हा प्रश्न मनापुढें उभा राहिला, व याचें कारण मानवी स्वभाववैचित्र्य हें होय, असें ह्मणून आह्मी आपल्या मनाचें समाधान केलें. प्रो. रामदेव यांचा व आमचा वाद सर्व वेळभर—रात्रीं ११।१२ वाजतां निजेपर्यंत—चालला होता; परंतु तो विकोपाला न जातां आम्ही 'शिवरात्र' म्हणून निजावयास जाऊं शकलों, हें नवल आहे.

सायंकाळीं बोर्डिंगची व्यवस्था पाहाण्यास गेलों. कांहीं ठिकाणीं सायंकाळचें हवन चाललें होतें. सायंकाळीं वर्गावर्गाप्रमाणें हवन होतें, असें मागें सांगितलेंच आहे. मध्यें एक लहानसें होमकुंड असतें व त्या शेजारीं

उपाध्याय शिक्षक बसतो व लंबचौकोनांत ब्रह्मचारी लोकरीच्या आसनावर बसतात. शिक्षक मंत्र म्हणतो त्याचा उच्चार सर्व ब्रह्मचारी करतात, व मग शिक्षक अग्निकुंडांत आहुती टाकतो. संध्याकाळीं लहान मुलांची भोजनाची पंगत जरा आधीं दिवसाउजेडींच होते. ब्रह्मचारी बाहेर मोकळ्या जागेंतच जेवावयास बसले होते. सर्वांचे पोषाख सारखे, सर्वांचीं भांडीं सारखीं व एकसारख्या पंक्ती बसलेल्या, हा देखावा मोठा मजेदार दिसे. ताट, वाटी व लोटा इतकींच भांडीं प्रत्येक ब्रह्मचाऱ्याला मिळतात. येथील भोजनही ब्रह्मचाऱ्याच्या वृत्तीला योग्य असेंच होतें. रोटी, डाळ व भाजी इतकेच तीन पदार्थ भोजनास होते. या बाबतींत उत्तरहिंदुस्थानांत बराच सारखेपणा आहे. मीं आग्र्यास एका कॉलेजच्या बोर्डिंगांत जेवावयास गेलों होतों. तेथेंही असाच प्रकार पाहिला होता. तिकडे भात खाण्याचा प्रघात नाहीं. तसेंच फारशा भाज्या खाण्याचाही प्रचार नाहीं. रोटी, डाळ व तूप इतके पदार्थ असले म्हणजे झालें. गुरुकुलांत ब्रह्मचाऱ्यांनीं व शिक्षकांनींच वाढण्याची वहिवाट आहे. जेवण करण्यास मात्र आचारी लागतात. आपापला लोटा व वाटी प्रत्येकानें घांसून आपापल्या खोलींत ठेवावयाची असते. यामुळें येथें जेवणाच्या पंक्तीचा आमच्या इकडल्यासारखा रमणा पडत नाहीं. आमच्या इकडील भाज्या, भाकऱ्या, पोळ्या, भात, वरण, तूप, ताक, दहींदूध, साखर, शिवाय आमटी व चटणी वगैरे अवश्य भासणाऱ्या पदार्थांची व ते पदार्थ वाढण्याच्या आवृत्तींची मोजदाद केली, व उत्तरहिंदुस्थानांतील अवश्य वस्तूंची संख्या पाहिली म्हणजे तिकडील साधेपणाचें कौतुक वाटतें. शिवाय, या साधेपणानें व मसाल्याच्या अभावानें तिकडील भोजन जास्त पौष्टिक व जास्त हितावह असतें, हें निराळेंच. या भोजनास खर्च कमी येतो, हा आणखी एक फायदा आहे. येथील विद्यार्थ्यांचा पोषाख असाच साधा व ब्रह्मचर्याला शोभेसा असतो. एक सदरा व धोतर, आणि धोतराचा एक सोगा पदरासारखा अंगावर घेतलेला असतो. थंडीमध्यें बनातीचा वर आणखी एक कपडा घालण्यास

देतात. धोतर व सदरा प्रत्येक ब्रह्मचाऱ्यानें आपला आपणच धुवावयाचा असतो. जास्त मळल्यावर परटाकडे देऊन आणतात.

ब्रह्मचारीपंक्तीचें जेवण पाहून आम्ही थोडे फिरावयास गेलों. आठ-नवांचे सुमारास आम्ही प्रो. साठे यांचे पर्णकुटिकेंत आलों व तेथें जेवणें आटोपल्यावर पुनः थोडा वेळ बोलणेंचालणें झाल्यावर रात्रीं १२ वाजण्याच्या सुमारास आम्ही झोपीं गेलों. पहांटेस उठल्यावर आम्हांला सर्व गुरुकुलाची एकंदर व्यवस्था दाखविल्याबद्दल, आपल्या सहवासाचा व संभाषणाचा लाभ दिल्याबद्दल सर्वांचे, व विशेषतः प्रो. साठे यांचे, आभार मानून दिसूं लागतांच आम्ही हरिद्वाराची वाट चालूं लागलों.

वाटेनें माझ्या मनांत आदल्या दिवशीं पाहिलेल्या सर्व प्रकारांचें चित्र उभें रहात होतें. एवढी मोठी संस्था अस्तित्वांत आणून दहाबारा वर्षांत तिची अशी भरभराट घडवून आणणें, हें कांहीं लहानसहान काम नाहीं. येथील व्यवस्था व शिस्त फार चांगली आहे, हें पाहूनही व्यवस्थापकांच्या कर्तृत्वाबद्दल सादर कौतुक वाटलें. या संस्थेमध्यें घडवून आणलेल्या दोन सुधारणांमुळें तर मला विशेषच आनंद झाला. त्या सुधारणा म्हणजे जन्मावर जातिभेद न मानणें व ब्रह्मचर्य २४ वर्षेंपर्यंत पाळणें. हल्लींच्या हिंदुस्थानच्या अवनतीच्या बुडाशीं पुष्कळ गोष्टी असतील; परंतु आमच्यांतील बालविवाह व जातिभेद या दोन गोष्टी राष्ट्रीय हानीला प्राधान्येंकरून कारणीभूत आहेत अशी माझी ठाम समजूत असल्यामुळें, या दोन घातुक चालींचें निर्मूलन करण्याचा प्रयत्न गुरुकुलानें चालविला आहे; हें पाहून मला फारच आनंद वाटला, व येवढ्याकरितां सुद्धां गुरुकुलपद्धतीचा जितका प्रसार होईल तितका चांगला, असें मला वाटलें.

शिक्षणक्रमाबद्दल मात्र माझा तितका चांगला ग्रह झाला नाहीं, हें कबूल केलें पाहिजे. गुरुकुलविद्यालयांत जो शिक्षणक्रम आंखून दिला आहे, त्याप्रमाणें तो करवून घेतला जात नाहीं असें नाहीं. तरी पण संस्कृत भाषेवर घालविलेला वेळ वाजवीपेक्षां फाजील आहे, असें मला

वाटलें. गुरुकुल ही संस्था आर्यसमाजाकरितां उपाध्याय व उपदेशक तयार करण्यास फार उत्तम आहे, युरोपमध्यें पूर्वी जशीं बिशप, आर्च-बिशप व इतर उपाध्याय व उपदेशक तयार करणारीं कॉलेजें असत तसें हें विद्यालय आहे, असें मला वाटतें. या विद्यालयांत शिक-लेले विद्यार्थी उदार मनाचे, सच्छीलाचे व आपल्या वाङ्मयाचें व धर्माचें पूर्णज्ञान असलेले व संस्कृत भाषेवर विशेष व्यासंग असलेले असे वंदनीय उपदेशक बनण्याचा बराच संभव आहे खरा; परंतु सर्वांसच उपदेशक केल्यावर उपदेश ऐकणारे कोण राहणार, असें माझ्या मनांत आलें. सारांश, गुरुकुलांतील पद्धति व विशेषतः संस्कृतावरील भर हीं कांहीं थोड्या लोकांकरितां इष्ट असतील; परंतु सर्व सामान्य जनांस इतक्या संस्कृताच्या प्राविण्याची कांहीं जरूरी नाहीं; त्यांना जास्त उपयुक्त विषयांवर परिश्रम करूं देणें श्रेयस्कर आहे, असें मला वाटलें.

असे गुरुकुलाबद्दल मिश्र विचार मनांत येत असतांना आह्मीं कन-खलला येऊन पोंचलों, तोंच आह्मांला महात्मा मुनशीराम पायीं हरिद्वारास जातांना भेटले. त्यांचा आह्मीं पुनः निरोप घेतला, व देवळांत शिरलों. मग माझें मन तेथील सृष्टिसौंदर्यानें पुनः वेधून घेतलें व आह्मी त्या सुंदर स्थानाचें शेवटचें दर्शन घेऊन हरिद्वारास परत आलों. पुढें हरिद्वारास आणखी एक दोन दिवस राहून आह्मीं परत मुरादाबादेस आलों.

# प्रकरण ८ वें

## मथुरावृंदावन

अर्धचन्द्रप्रतीकाशा यमुनातीरशोभिता ।
शोभिता गृहमुख्यैश्च चत्वरापणवीथिकैः ।
चातुर्वर्ण्यसमायुक्ता नानावाणिज्यशोभिता ।
इयं मधुपुरी रम्या मधुरा देवनिर्मिता ।
निवेशं प्राप्नुयाच्छीघ्रमेष मेऽस्तु वरः परः ॥

—रामायण

या घर्मभानोस्तनयापि शीतलैः स्वसा यमस्यापि जनस्य जीवनैः
कृष्णापि शुद्धेरधिकं विधातृभिर्विहन्तुमंहांसि जलैः पटीयसी ॥

माघ :

माझ्या या पाळीच्या प्रवासाचा जो चित्रपट मीं आपल्या मनांत रेखाटला होता तदनुरूप मथुरावृंदावन हीं पवित्र व प्रेक्षणीय स्थळें आम्हीं अगदीं शेवटीं देशीं परत येतां येतां पहावयाचीं, असें योजिलें होतें. प्रवासाच्या दृष्टीनें हा बेत सोईचा होता. बाकी मीं आपल्या स्वाभाविक मनाच्या कलाकडे व सहज औत्सुक्याकडे लक्ष दिलें असतें, तर मी मथुरावृंदावनाला प्रथमतः गेलों असतों. कारण हीं स्थळें माझ्या अत्यंत परिचयाचीं होतीं. अर्थात्, हा परिचय दृष्टिपरिचय नव्हता, तर फक्त श्रुतिपरिचयच होता. कां कीं, माझें बालपण ज्या ग्रामांत व ज्या गृहांत गेलें त्याला लागूनच एक छोटेंसें सुंदर मुरलीधराचें देऊळ आहे. लहानपणीं हेंच आमचें क्रीडाभुवन होतें. येथें मी आपल्या मित्रांबरोबर निरनिराळे खेळ खेळत असे. या देवळांत गोकुळअष्टमीचा उत्साह मोठ्या थाटानें होत असे, व देवळाच्या पुढल्या उघड्या पटांगणांत दरसाल

दहीहंडी फुटून गोपालकाला होत असे. या देवळांत दरसाल चातुर्मासांत बहुधा भागवताचें पुराण सुरू असे, व शाळा सुटल्याबरोबर पुराणाला जाण्याची मला फार हौस वाटत असे. या गोष्टीला आतां सुमारें तीस पसतीस वर्षे झालीं असतील. तरी मला अजूनही त्या काळची चांगली स्मृति आहे. ती मुरलीधराची सुंदर मूर्ति, तो नवाच केलेला टुमदार सभामंडप, ते व्यासपीठावर बसलेले रेशीमकाठी धोतर नेसलेले व करवतीकाठी कोरें उपरणें पांघरलेले तुंदिलतनु व 'जे हे ते कालाचे ठायीं' अशा कांहीं एका लकबीनें व घोगऱ्या आवाजानें पुराण सांगणारे पुराणीकबोवा, तो बायकापुरुषांचा श्रोतृसमुदाय, ते बायकांचे वाती काढण्याचे, डुलक्या घेण्याचे व भाविकपणें श्रवण करण्याचे व्यवसाय, ते चाकासारखें भलें थोरलें चक्रीपागोटें घातलेले अगडबंब भटजी बोवा, ते गांवांतले म्हातारे सुखवस्तु गृहस्थ; हा सर्व देखावा अझूनही माझ्या डोळ्यांसमोर स्पष्टपणें दिसत आहे. जरी आमच्या पुराणिकबोवांना पुराण सांगण्याच्या कांहीं लकबी होत्या, तरी पण त्यांच्या पुराणास चांगला रंग येई व कृष्णचरित्रांतील आश्चर्यकारक गोष्टी जेव्हां ते सांगत असत तेव्हां मला फार मौज वाटत असे. आज काय पूतनावधाचा प्रसंग आहे तर उद्यां काय कालियामर्दनाची हकीकत आहे, पुढें कांहीं दिवसांनीं चाणूरमुष्टिक व कंसाचा वधप्रसंग आहे; या सर्व गोष्टी ऐकण्याची मला हौस असे, व पुराणीकबोवा आम्हां मुलांना त्यांना मिळणाऱ्या प्रसादापैकीं कांहीं प्रसाद केव्हां केव्हां देत असत. उद्यां अमक्या राक्षसाच्या वधाची कथा आहे, असें पुराणिकबोवांनीं सांगितलें म्हणजे आम्हीं बोरूच्या पेराच्या बंदुकी व बोरूच्या गिराच्या गोळ्या करून त्या बंदुकींतून सोडीत असूं, किंवा दिवाळी जवळ आली असल्यास खरोखरीच्या केपाच्या पिस्तुलें आणून त्याचे बार करीत असूं. अशा माझ्या बालपणच्या अनुभवामुळें कृष्णचरित्र, त्याचें जन्मठिकाण व त्याचें बालपण जेथें गेलें तीं गोकुळ व वृंदावन हीं नांवें माझ्या फारच परिचयाचीं होतीं. यामुळें एकाद्या चिरपरिचित मित्राला भेटायला जातांना जशी

मनाची उत्सुक व आनंदी वृत्ति होते, तशी माझ्या मनाची या वेळीं वृत्ति झाली. ज्या कृष्णाच्या मनोहर गोष्टी आपण आपल्या लहानपणीं ऐकल्या, त्या ज्या ठिकाणीं प्रत्यक्ष घडल्या अशा मथुरेला आपण जाणार, व तेथले फार पुरातन असे कृष्णलीलेचे देखावे पहाणार, तसेंच पवित्र यमुना नदीचें आपल्याला दर्शन होणार, म्हणून माझें मन प्रमुदित झालें होतें. असो.

मागें सांगितल्याप्रमाणें गुरुकुल पाहून झाल्यावर आम्ही परत मुरादाबादेस आलों. तेथें आम्हांला एकदोन दिवसांपेक्षां जास्त दिवस राहतां आलें नाहीं. कारण, आमची परत येण्याची वेळ भरत आली; पण मुरादाबादेहून आम्ही पुष्कळजण बरोबर होतों व वाटेनें मथुरेस उतरावयाचें असल्यामुळें आम्हीं मोठ्या आनंदानें मुरादाबाद सोडलें. आम्ही मुरादाबादेहून दिल्लीपर्यंत इंटर क्लासचीं तिकिटें काढलीं होतीं. लहान मुलांचीं धरून आमचीं एकंदर ९ तिकिटें होतीं. परंतु गाडीशीं येऊन पहातों तों इंटरक्लासचा एकच डबा व तो तर माणसांनीं चिकार भरलेला. आमच्यासारख्या सामान्य प्रवाशांना वरच्या वर्गांत कोण बसूं देतो ? तेव्हां आम्हांला तिसऱ्या क्लासच्या डब्यांत बसणें भाग पडलें. वरच्या वर्गाचें तिकिट काढलेलें असतांना जागेच्या अभावामुळें खालच्या वर्गांत बसावें लागल्यास भाड्याचे वरच्या वर्गाकरितां अधिक भरलेले पैसे परत दिले जातील; मात्र गाडी निघण्यापूर्वी गार्डापासून असें खालच्या वर्गानें प्रवास केल्याचें सर्टिफिकेट घेतलें पाहिजे. रेलवे कंपनीच्या गाईड बुक मधील हा नियम दाखवून आम्ही गार्डाजवळ तसें सरटिफिकेट मागूं लागलों. पण तो धड कांहींच बोलेना ! स्टेशनमास्तरकडे जा, पुढें पाहूं वगैरे म्हणूं लागला. स्टेशनमास्तरकडे जाण्यास तर अवकाश नव्हता. कारण, गाडीची वेळ भरत आली होती. म्हणून "तुम्हीं नियमाप्रमाणें सरटिफिकेट दिलें पाहिजे, आम्ही पुढल्या स्टेशनवर आपल्यास भेटतों," असें गार्डास बजावून गाडीची निघण्याची शीळ झाल्यामुळें घाईघाईनें आम्ही डब्यांत जाऊन बसलों. उत्तर हिंदुस्थानांतील

रेल्वेनोकर फार लांचखाऊ असतात; व तिकिटाला सबंध रुपया दिला तर नाणे मिळण्याचीसुद्धां पंचाईत पडते, असें आम्हीं ऐकलें होतें, त्याचेंच प्रत्यंतर येण्याचा रंग दिसूं लागला. पण त्या गार्डाला कांहींएक न देतां कंपनीच्या कायद्याप्रमाणें अधिक भरलेले पैसे परत मिळवावयाचे असा आम्हीं बेत केला. पैसे कांहीं जास्त होते, अशांतला प्रकार नाहीं; तरी पण आपल्या हक्काला सुशिक्षित लोक जागूं लागले आहेत हें दाखविण्याचा आम्हीं निश्चय केला, व त्याप्रमाणें गार्डाचा पिच्छा पुरविला. दुसऱ्या स्टेशनवर उतरून पुनः गार्डाजवळ मागणी केली. तो पुनः अळंटळं करूं लागला. त्याच्या हातावर आम्हीं कांहीं तरी ठेवावें, असा त्याचा उघड उघड मानस दिसला; परंतु आम्हांला तसें करावयाचें नव्हतें. मुरादाबादेहून अर्ध्या वाटेवर आलें म्हणजे हप्पर म्हणून एक बरेंच मोठें जंक्शन स्टेशन लागतें. तेथें गाडी बराच वेळ उभी राहते. म्हणून आम्हीं खालीं उतरून तेथल्या स्टेशनमास्तरजवळ गार्डाच्या वर्तनाबद्दल गाऱ्हाणें गाइलें व सरटिफिकेट मागितलें व तो स्टेशनमास्तर सरटिफिकेट देण्याच्या विचारांत होता; इतक्यांत तो गार्ड तेथें आला व म्हणूं लागला, कीं “आतां इंटरक्लासच्या डब्यांत जागा झाली आहे तेथें पाहिजे तर जा; तुम्हांला सरटिफिकेट देण्याचें कारण नाहीं.” आम्हीं अर्ध्यापेक्षां जास्त रस्ता चालून आलों होतों; व येथें पुनः सामानाची फिरवाफिरव करावयाची म्हणजे पोर्टराकरितां आठबारा आण्यांचा भूर्दंड भरावयाचा; म्हणून आम्हीं तसें करण्याचें नाकारलें व कंपनीच्या नियमाप्रमाणें सरटिफिकेट मागूं लागलों. परंतु तो गार्ड आमच्या वर्तनानें चिरडीस गेल्यासारखा झाला व याप्रमाणें आम्हीं त्याच्याजवळ वादविवाद करीत असतां त्यानें गाडी चालू करण्याची शीळ फुंकली. त्याचा उद्देश आम्हीं मागें रहावें व आमचें सामान व मंडळी पुढें जावी व आम्हांला जास्त खर्च व त्रास पडावा असा दिसला, पण शिताफी करून मी व माझे बंधू गाडी चालत असतां समोरच्या सेकंडक्लासच्या डब्यांत वर चढलों, व दार उघडून आंत जाऊन बसलों. व दिल्लीस गेल्यावर

याबद्दल तक्रार करण्याचा विचार केला. थोड्याच वेळांत दिल्ली स्टेशन आलें. आम्ही आपलें सामान न काढतां स्टेशनमास्तरकडे गेलों व गार्डाच्या वर्तनाबद्दल तक्रार केली. आनंदाची गोष्ट हीं, कीं, स्टेशन-मास्तर आमच्याशीं चांगल्या तऱ्हेनें वागला. "सरटिफिकेट नसलें तरी तुमचे पैसे तुम्हांला परत मिळतील; मात्र तुम्हीं तिसऱ्या क्लासांतच बसलां होतां याबद्दल तिकिटकलेक्टरची खातरी करा व डायरीबुकांत तुमच्या तिकिटांचे नंबर नोंदवून घ्या." स्टेशनमास्तरच्या सांगण्या-प्रमाणें तिकिटकलेक्टरला आम्ही बसलों होतों त्या डब्याशीं आणून तिसऱ्या क्लासांत बसल्याबद्दल त्याची खातरी केली व त्याच्याकडून डायरींत तशी नोंद करविली. पुण्यास परत आल्यावर ट्रॅफिक मॅनेजर-कडे अर्ज केला. आमचे पैसे परत मिळाले इतकेंच नाहीं, तर त्या गार्डाची अशा गैरशिस्त वर्तनाबद्दल कानउघाडणी केली आहे, असेंही आम्हांला लिहून आलें. आपल्या हक्काला जागण्याची प्रवासांत केव्हां केव्हां कशी जरूर लागते हें समजावें व आपण आपल्या हक्काला जागल्यास या कायद्याच्या राज्यांत त्याचा उपयोगही होतो, हें वाचकांच्या ध्यानांत यावें, म्हणून वरील मजकूर लिहिला आहे. दिल्ली-हून आम्हांला मथुरेस जाण्यास लागलीच गाडी होती. आतां वेळ रात्रीं-चीच होती. दिल्लीहून आम्ही निघालों ते सकाळींच मथुरा स्टेशनवर येऊन दाखल झालों.

स्टेशनवर पंड्यांची पुष्कळ गर्दी होती. सामान वगैरे खालीं उतरून आम्ही स्टेशनच्या बाहेरील वेटिंगरूममध्यें आलों. मुरादाबादेहून आम्ही निघालों तेव्हां मथुरेस अहिल्याबाई होळकरीण यांची चांगली धर्मशाळा आहे, तेथें उतरण्यास जावयाचें, असा बेत केला होता. परंतु तेथें आल्यावर कळलें, कीं, ती धर्मशाळा मथुरेंत नसून वृंदावनांत आहे. परंतु स्टेशनपासून वृंदावन पांचसहा मैल दूर आहे. तेव्हां तो बेत रहित करून आम्हीं एक पंड्याचे घरींच उतरावयास जाण्याचें ठरविलें, व दिसण्यांत जरा संभावित असा एक पंड्या गांठला व यात्रेकरितां किंवा धार्मिक

कृत्याकरितां आम्हांला कांहींएक त्रास देणार नाहीं असें त्याजपासून कबूल करून घेतलें व तीन एक्के करून आम्हीं पंड्याच्या बरोबर त्याचे घरीं येऊन दाखल झालों. आमच्या सुदैवानें आम्हांला जागा चांगली मिळाली. या पंड्याचें घर अगदीं यमुनेच्या कांठीं होतें. मध्यें फक्त फरसबंदी सडक होती. सडक टाकली कीं घाटच लागे. शिवाय आम्हांला राहण्यास दिलेली जागा दरवाज्याच्या माडीवर होती. यामुळें खिडकींतून यमुनेचा सर्व देखावा दिसत होता. यमुनेचा तो काळयाभोर पाण्याचा शांत व गंभीर प्रवाह पाहून आम्हांला हरिद्वारची आठवण झाली. गंगेचें पाणी अत्यंत शुभ्र व स्फटिकवत् होतें तर यमुनेचें पाणी बरेंच काळसर, नीळसर रंगाचें होतें. गंगा प्रचंड वेगानें व दुथडी भरून चालली होती तर यमुनेचें पाणी पुष्कळ कमी होतें व त्याचा लांबचलांब डोह बनलेला होता. मागें मीं प्रयाग पाहिलें, तेव्हां गंगायमुनांच्या संगमावर थेट स्नानास गेलों होतों. त्यावेळीं दोन निरनिराळया रंगांच्या प्रवाहांचा संयोग खरोखरच आल्हाददायक वाटला व त्या देखाव्याची यावेळीं मला आठवण झाली. बिऱ्हाडांत सामान वगैरे लावल्यावर मी व माझे बंधू बाजारांत जाऊन भाजीपाला व दूधतूप वगैरे अवश्य जिनसा आणून आमच्या कुकरच्या आराधनेस लागलों. जेवण झाल्यावर मथुरेंतील प्रेक्षणीय स्थळें पंड्याच्या सल्ल्यानें पहावयाचा कार्यक्रम ठरवूं असा विचार करून आम्ही यमुनेवर स्नानास गेलों. परंतु तेथें गेल्यावर आतांपर्यंतचा सर्व आनंद मावळला. घाटावर गेलों तों फार दुर्गंधी येऊं लागली. गांवांतील सर्व नाल्यांचा निकाल येथें घाटावरून उघड्या रीतीनें केला आहे. सर्व नदी घाटानें जणूं कांहीं मढविलेली आहे. घाट उत्तम बांधलेले आहेत; परंतु जेथें तेथें मोरींचें घाण पाणी घाटावरील पायऱ्यांवरून ओघळत येतें. नदीच्या पाण्यांत पाय टाकला तों पाणी सुद्धां वाईट झालेलें दिसलें. उन्हाळ्यामध्यें यमुनेचें पाणी पुष्कळ कमी होतें व प्रवाह बहुतेक बंद झाल्यासारखा होतो. यामुळें गांवांतून मोऱ्यांमधून येणारें सर्व पाणी या संथ पाण्यांत येऊन मिळतें व यामुळें पाणी खराब होतें, असें

आमच्या नजरेस आलें. यासंबंधानें हरिद्वार व मथुरा यांतील फरक आश्चर्य वाटण्यासारखा होता. हरिद्वार हें गांव लहान असल्यामुळें तेथली घाण या मोठ्या गांवाइतकी नाहीं. परंतु हरिद्वारला एकाच मोठ्या नाल्यानें गांवां-तलें घाण पाणी आणून तें बंद नाल्यानें नदीच्या दूरच्या वाहत्या प्रवा-हांत सोडल्यामुळें तेथें नदीमध्यें व विशेषतः स्नान करावयाच्या जागीं तर स्वच्छ पाणी असतें. शिवाय, हरिद्वारास नदी गोट्यांनीं भरलेली आहे; तर मथुरेस बारीक वाळू व काळसर माती व चिखल यांनीं नदी भरलेली असल्यामुळें, नदीचें पाणी जास्तच गढूळ व घाणेरडें होतें. यामुळें घांटाकडच्या बाजूला स्नान करण्यास मन अगदीं घेत नाहीं. नदीच्या पलीकडच्या तीराला जरा बरें पाणी असतें व त्या बाजूला पाणी बेताचें म्हणजे गळाभर असल्यामुळें पोहोण्यासही चांगलें सांपडतें. असें समजल्यामुळें मथुरेंत आम्ही होतों ते दोन तीन दिवस रोज आम्ही स्नानास पलीकडेच जात असूं. नदीच्या पलीकडे जाण्यास येथें नावा हव्या तितक्या मिळतात व त्या फक्त जाण्यायेण्याचा माणशीं पैसा घेतात. यामुळें ही सोय आम्हांला फार पसंत पडली व या बाबतींत हरि-द्वारापेक्षां आम्हांला बरें वाटलें. कारण हरिद्वारास गंगेच्या पाण्याला इतका विलक्षण जोर होता, कीं, मी पोहोणारा आपला बेताबाताचा असल्यामुळें पाण्यांत सुरळी टाकण्याचें केव्हांही धैर्य झालें नाहीं. परंतु मथुरेस पाणी संथ असल्यामुळें व बहुतेक नदीला गळाभर पाणी असल्यामुळें पोहण्यास मुळींच भीति वाटली नाहीं. कारण दमल्याबरोबर खालीं पाय लावण्यास सोय होती व पाण्याला ओढही मुळींच नव्हती. यामुळें माझ्यासारख्या नवशिक्या पोहणारास गंमत वाटली. नदीचें पाणी पिण्यालायक नव्हतें म्हणून आम्हीं एका जवळच्या विहिरीचें पाणी पिण्याकरितां आणीत होतों. तरी पण त्या पाण्यांतही फार घाण व कचरा होता. येथल्या अशा वाईट पाण्यामुळें यात्रेकरू आजारी पडतात.

जेवणखाण आटोपल्यावर आम्ही आपल्या यात्रेचा कार्यक्रम ठरवूं लागलों परंतु पंड्याच्या तोंडून यात्रेचा विस्तार ऐकून रात्र थोडी सोंगें फार अशी

आमची स्थिति झाली. पंड्यानें सांगितलें " सर्व यात्रेला येथें बनजत्रा अगर वनयात्रा म्हणतात. या यात्रेमध्यें कृष्णाच्या आयुष्यांतील बहुतेक गोष्टींच्या सामक्षा पहाण्यास सांपडतात. मनुष्यानें विश्रामघाटापासून निघून प्रथमतः मधुवन पहाण्यास जावयाचें. हें मथुरेच्या दक्षिणेस चार मैल आहे, व येथें मधु राक्षसाचा शत्रुघ्नानें पराभव करून तेथें मधुपुरी स्थापिली. तेथून तालबनास जावयाचें. या ठिकाणीं बलरामानें धेनुक राक्षसास मारिलें. नंतर गोवर्धनास १६ मैल जावयाचें. हें मथुरेच्या बरोबर पश्चिमेस आहे. तेथून पुढें उत्तरेकडे कोटवनापर्यंत ३४ मैल जावयाचें व तेथून परतावयाचें व वृंदावनास यावयाचें. तेथें पवित्र यमुना नदी उतरून पलीकडे जाऊन किती तरी वनें, राया, तलाव, विहिरी—व या सर्वांचा कृष्णाच्या आयुष्यांतील एकाद्या गोष्टीशीं संबंध असतोच—पहावयाच्या व शेवटीं कृष्णाचें बालवय जेथें गेलें त्या गोकुळीं जावयाचें व तेथून पुनः यमुना ओलांडून परत मथुरेस विश्रामघाटीं यावयाचें." येवढ्या मोठ्या विस्तीर्ण प्रदेशाची एक यात्रा आहे व ही पुरी होण्यास कितीक तरी दिवस लागणार, असें पाहून आमची प्रथम फारच निराशा झाली. परंतु विचारांतीं अंथरूण पाहून पाय पसरणें बरें, असा विचार करून आम्हीं मथुरा व पांच मैलांवर असलेलें वृंदावन एवढींच पहाण्याचें ठरविलें. मला गोकुळ पहाण्याची अत्यंत इच्छा होती. परंतु वृंदावन मथुरेच्या थेट उत्तरेस तर गोकुळ थेट दक्षिणेस अशी भूगोलविषयक परिस्थिति असल्यामुळें हीं दोन स्थानें पाहण्यास दोन निरनिराळे दिवस पाहिजेत असें दिसून आलें. परंतु दोन दिवसांची तर आम्हांला सवड नव्हती. यामुळें मथुरा व वृंदावन हीं दोन स्थळेंच पाहून त्यांत समाधान मानणें आम्हांला प्राप्त झालें.

याप्रमाणें कार्यक्रम ठरल्यावर आम्हीं पंड्यास घोड्यांच्या गाड्या आणावयास सांगितलें. तो लवकरच गाड्या घेऊन आला. तेव्हां विशेष पुरातन व कृष्णाच्या जन्मासंबंधाचीं पवित्र स्थळें व चांगलीं देवळें आम्हांला दाखविण्याबद्दल त्याला सांगून आम्ही गाडींत बसलों व मथु-

रेच्या मुख्य बाजार रस्त्यानेंच चाललों. या सर्व रस्त्यानें दुतर्फा दुकानेंच आहेत. रस्ता फरसबंदी आहे. घरें बरींच दगडी आहेत व कांहीं कांहीं कलाकुसरीच्या कामानें शृंगारलेलींहि आहेत. या बाजारामधून आम्हीं 'हार्डिंग गेट' म्हणून दगडाची भव्य कमान १८७० मध्यें मथुरा म्युनिसिपालिटीनें बांधली आहे तिचे खालून बाहेर आलों. हा देखावा बराच प्रेक्षणीय आहे.

तेथून आम्हांला आमच्या पंड्यानें येथील मुख्य देऊळ केशव-देव येथें नेलें. हें देऊळ साधारण चांगल्यापैकीं आहे; परंतु हें अर्वाचीन आहे. केशव-देवाचें फार प्राचीन देऊळ औरंगजेबानें नाहींसें करून त्या ठिकाणीं मोठी जुम्मामशीद बांधली. ही मशीद अजूनही जुन्या देवळाच्या चवथऱ्यावर आहे व एकंदरींत पूर्णपणें हिंदु असलेल्या या शहराच्या मध्यभागीं औरंगजेबाच्या धर्मवेडाची साक्ष ती सतत देत आहे. या देवळाच्या जवळच पोतारकुंड म्हणून एक तलाव आम्हांला दाखविण्यांत आला व पंड्यानें आम्हांला सांगितलें कीं, या तळ्यांत कृष्णाचीं लहानपणचीं चिरगुटें धूत असत. त्याच्याजवळ वसुदेव देवकीचें कारागृह व कृष्णाची जन्मभूमि दाखविण्यांत आली. परंतु ती एकंदर जागा व तिची परिस्थिति पाहून त्याचें म्हणणें सत्य दिसलें नाहीं. पुढें तर आम्हांला असें दिसून आलें कीं, मथुरावृंदावनांत कोठेंही तलाव असो येथें कृष्णाचीं चिरगुटें धूत असत म्हणून आपलें सांगत. कृष्ण ज्याप्रमाणें आपल्या सोळासहस्र गोपींच्या मनोरंजनाकरितां सोळासहस्र रूपें धारण करीत असे त्याप्रमाणें भावी पिढींतील भाविक भक्तांच्या समाधानाकरितां जन्मापासून त्यानें हजारों रूपें धारण केलीं होतीं व म्हणून त्याचीं चिरगुटें धुतल्याची साक्ष पटविणारीं कुंडें मथुरावृंदावनांत असंख्य असून तीं हल्लीं पंड्यांना दाखवितां येतात! हें देऊळ व ही जागा मातीच्या एका उंचवट्यावर आहे. मथुरेच्या बाहेर मातीचे ढिगारे जागोजाग आहेत. पूर्वींच्या शहराच्या तटापैकीं हा कांहीं भाग आहे. किंवा यमुना नदीचा प्रवाह पूर्व काळीं इकडे असून त्याच्या तीराचे हे

भाग आहेत हें सांगतां येत नाहीं. हें पवित्र स्थान दाखविल्यावर पंड्यानें आम्हांला त्याच्या बुद्धीनें जास्त पवित्र व पुरातन अशा ठिकाणीं नेलें व तेथें कृष्णाचीं वडील माणसें व इतर त्याचे संबंधी दृष्टीस पडतील म्हणून सांगितलें. आम्हीं आतां आपल्याला बऱ्याच पुरातन काळच्या मूर्ति पहाण्यास सांपडतील अशा मोठ्या आशेनें व औत्सुक्यानें एका सोप्यावजा दालनांत शिरलों व तेथें आम्हांला वसुदेव, देवकी, बालकृष्ण, कंस, नंद, यशोदा व बलराम वगैरे कृष्णाचीं सख्खीं व दत्तक वडील माणसें यांचीं चित्रें दाखविण्यांत आलीं. तीं चित्रें पाहून आम्हांला भक्तीचा उमाळा येण्याऐवजीं दुसराच कसलातरी उमाळा आला. आपल्या इकडे शिराळशेटाच्या सणाच्या दिवशीं किंवा नागपंचमीचे दिवशीं जशीं ओबडधोबड, अगडबंब, कुरूप व ओंगळ मातींचीं चित्रें करतात, तशाच तऱ्हेच्या त्या मूर्ति पाहून आशाभंग व हास्य असे मिश्र मनोविकार एकसमयावच्छेदेंकरून मनांत उद्भूत झाले. मथुरा पाहण्यास येण्याचा बेत केल्यापासून, या ठिकाणच्या पुरातनत्वाबद्दल व तेथल्या कृष्णाच्या आयुष्याबद्दल बऱ्याच सामक्षा आपल्याला दृग्गोचर होतील म्हणून मोठ्या औत्सुक्यानें या यात्रेला आलों. परंतु आतांचा हा देखावा पाहून आमच्या मनांतील तें औत्सुक्य पार नाहींसें झालें. व आमच्या लोकांच्या अंधश्रद्धेबद्दल व मूर्ख भोळसटपणाबद्दल हसूं येऊं लागलें. आतांपर्यंत पाहिलेल्या सर्व देखाव्यावरून आमची अशी खातरी झाली, कीं, मथुरा कृष्णाचें जन्मस्थान असो वा नसो, त्याच्या गोष्टी खऱ्या असोत वा नसोत, परंतु हल्लीं जीं कृष्णचरित्रांतील स्थळें म्हणून दाखवितात तीं स्थळें कृष्णाच्या गोष्टीनंतर भाविक लोकांना फसविण्याकरितां तयार केलेलीं आहेत व असल्या स्थळांबद्दल, येथल्या चित्रांबद्दल व मूर्तींबद्दल मनुष्याच्या मनांत आदर तरी कसा उत्पन्न होतो, याचेंच आम्हांला गूढ पडलें. परंतु ती वेळ पंड्याजवळ वादविवाद करण्याची नव्हती. या सर्व मूर्तींजवळ एक बुवा बसला होता व तो आम्हांला


पिंवळ्या मातीचा अंश प्रसाद म्हणून देत होता. आह्मीं पंड्याच्या मर्जी-खातर या सर्व विद्रूप चित्रांपुढें एक दोन आण्यांचे पैसे ठेवून तेथून पाय काढला.

पुढें आम्हांला कंसाचा वाडा व किल्ला म्हणून मोडक्यातोडक्य तटांनीं व्यापृत असें एक आवार दाखविण्यांत आलें. तें जुनाट दिसत होतें. परंतु ३००० वर्षांपूर्वींचें असेल असें भासत नव्हतें. परंतु या सर्व ठिकाणच्या अर्वाचीनत्वाबद्दल एकदां मनांत जाणीव उत्पन्न झाल्यावर या असल्या भाविक लोकांना फसविण्याकरितां ठरविलेल्या जागा व ठिकाणें पाहण्याची आमची हौस जागच्या जागींच जिरली व आह्मीं पंड्यास, आम्हांला आतां जुनींपुराणीं देवळें नकोत, येथलीं उत्तम नवीं देवळें दाखवा, म्हणून सांगितलें तेव्हां त्यानें आम्हांला गांवाकडे नेलें व आह्मीं तेथें बरींच देवळें पाहिलीं. त्यानें मात्र आमचें मन प्रसन्न केलें. कारण मथुरेंतील देवळें फार सुंदर आहेत. या देवळांतील दगडाचें नक्षी-काम, जाळीदार खिडक्या, कोरीव खांब व देवळांचें एकंदर अंतरंग फारच सुबक आहे, यांत शंका नाहीं. एकेक देऊळ पहावें तों मागच्या-वर ताण; परंतु मथुरेंतील देवळें अगदीं दाट वस्तींत व भर बाजारांत बांधलेलीं असल्यामुळें व त्यांच्या सभोंवार खुली जागा फारच कमी असल्यामुळें हीं देवळें प्रथमतः मनांत भरत नाहींत. पहिल्या पायऱ्या चढतांना आपण एखाद्या सुंदर आणि फारच विस्तीर्ण व सुबक देवळांत शिरत आहोंत असें वाटत सुद्धां नाहीं. परंतु आंत गेल्यावर देवळाचें काम पाहून तेथल्या कारागिरीबद्दल मनुष्य आश्चर्यानें तोंडांत बोटंच घालतो. मात्र या सर्व देवळांत फारशीं जुनीं देवळें मुळींच दिसत नाहींत, बहुतेक सर्व देवळें अलीकडील तीनचारशें वर्षांतील आहेत. हें असें कां? याचा उलगडा या पुस्तकाच्या शेवटच्या भागावरून होईल.


याप्रमाणें मथुरेंतील बहुतेक पाहण्यासारख्या ठिकाणांचें दर्शन घेऊन तीन चार तासांनीं आम्हीं आपल्या बिऱ्हाडाला आलों व मग नित्याप्रमाणें

आमच्या अर्वाचीन स्थालीची आराधना करून पाकनिष्पत्ति केली व भोजनोत्तर संध्याकाळपर्यंत विश्रांति घेतली.


वर लिहिल्याप्रमाणें मथुरेच्या प्रथम दर्शनानें जरी आमची थोडीशी निराशा झाली, पण पुढें देवळांच्या दर्शनानें ती नाहींशी होऊन आनंद वाटला. तरी जी गोष्ट हरिद्वाराला शक्य नव्हती, ती येथें शक्य झाल्यामुळें माझें मन अधिक आनंदित झालें. हरिद्वारच्या नजिकच्या गंगाप्रवाहांत बोटींतून सहल करून सर्व शहराची शोभा पाहण्याची किती वेळां तरी इच्छा झाली असेल; परंतु इच्छेनें जर होड्या तयार होत्या तर आमची इच्छा तृप्त झाली असती ! परंतु ती गोष्ट शक्य कोटींतील नसल्यामुळें मनींची इच्छा मनांत दाबावी लागली परंतु मथुरेस ज्या बिऱ्हाडीं आम्ही उतरलों होतों त्याच्या समोरचे घाटाजवळ पुष्कळ नावा दिसल्या व त्या पाहून आम्हांला आनंद झाला व येथें असेतोंपर्यंत रोज सायंकाळीं नावेंत बसून सहल करावयास जावयाचें असा आम्हीं बेत केला. तदनुरूप सायंकाळ होतांच आम्हीं एका नाववाल्यास बोलावून आम्हांला सर्व नदीभर सहल करण्यास घेऊन जाण्यास फर्माविलें. माणशीं दोन पैसे आम्हांला स्वस्तच वाटले नावेंतून शहराचा देखावा फारच मनोहर दिसतो. गांवाच्या एका बाजूला तो रेलवेचा लांबच लांब पूल, दुसऱ्या बाजूला तो कंसाचा किल्ला; समोर सर्व शहरांतील घाटांची रांगची रांग, त्या मागें घरांच्या ओळीच्या ओळी, देवळांचीं शिखरेंच शिखरें व मागच्या बाजूला एक काळसर मृत्तिकामय वाळवंटचें वाळवंट, हा देखावा चित्ताकर्षक आहे यांत शंका नाहीं. काशीमध्यें नावेंत बसून सर्व शहर पाहिलें म्हणजे असाच सुंदर देखावा दिसतो. मात्र काशीस गंगेचें पात्र फारच प्रचंड आहे व प्रवाह खोल असून शीघ्रगामी आहे. यमुनेचें पात्र त्या मानानें लहान आहे व यमुनेचा प्रवाहही लहान असून मंदगति आहे. परंतु दोन्ही शहरांची रचना अगदीं सारखीच आहे. यामुळें यमुनेंतून नावेंत बसून कंसाच्या किल्ल्यापासून रेलवेपुलापर्यंत वल्हवीत गेलें म्हणजे आपण छोटेखानी काशीच पहात आहों कीं काय,




नं. ३८ ] मथुरा : भूज. [ पान १५५



नं. ४१ ] ओखाबंदर : कांक्रीटचा धक्का-सयाजी धक्का. [ पान १६९



नं. ३९ ] मथुरा : विश्रामघाट. [ पान १५७



नं. ४० ] वृंदावन : जुनें देवालय. [ पान १५८

असा भास होतो. जरी आम्हीं पाहिली त्या वेळीं यमुना नदी आपल्या वर्षाकाळांतील पूर्ण ऐश्वर्यांत नव्हती, उलट उन्हाळयामुळें तिला कांहींसें जलदुर्भिक्ष आलेलें होतें, व वाळूचीं मैदानें उघडीं पडलीं होतीं, तरी सुद्धां यमुना नदी तिच्या पाण्याच्या रंगामुळें गंभीर व भव्य दिसली. नावें-तून सायंकाळीं नदींतून जात असतांना निरनिराळया घाटांची व त्यावरील देवळांची शोभा अवर्णनीय दिसते. मथुरेंतील सर्वांत प्रेक्षणीय व पवित्र घाट म्हणजे **विश्रामघाट** होय. हा शहराच्या बहुतेक मधोमध आहे. कंसाला मारल्यावर कृष्णानें याच घाटावर विश्रांति घेतली, अशी दंत-कथा आहे. म्हणूनच या घाटाला विश्रामघाट असें म्हणतात. सात साडेसातांच्या सुमारास या घाटावर आरती होते. तीं दिपावलीचीं पाण्यांत पडलेलीं प्रतिबिंबें, तो मंजुळ घंटानाद व ते भाविकांचे सुस्वर आलाप, वगैरे प्रकार पाहून व ऐकून मनाला फार आनंद होतो व नदीच्या पात्रांतून बाहेर येऊंच नये, असें वाटतें; परंतु नावाडी उशीर झाल्यामुळें परतण्याची घाई करतो. नाइलाज म्हणून त्याच्या म्हणण्याला रुकार देऊन परत आपल्या बिऱ्हाडीं यावें लागतें. आम्ही मथुरेस तीन दिवसच होतों. परंतु या तीन्ही दिवशीं सायंकाळीं आम्ही नावेंतून सहल करावयास जात असूं.

दुसरे दिवशीं सकाळीं वृंदावनास जावयाचें असल्यामुळें आम्ही लवकरच उठलों व आदल्या दिवसाप्रमाणें दोन घोड्यांच्या गाड्या आणवून पंड्यास बरोबर घेऊन वृंदावनास गेलों. वाटेनें जातां जातां छोट्या छोट्या बागा व बंगलेवजा लहान लहान घरें लागतात. केव्हां यमुना नदी रस्त्याच्या अगदीं नजिक येते तर केव्हां दूर जाते. इकडील प्रदेश सपाटीचाच आहे. डोंगर किंवा उंचवटा फारसा दृग्गोचर होत नाहीं. अशी सभोंव-तालची शोभा पहात पहात सुमारें तासा दीड तासानें आम्ही वृंदावनास येऊन पोहोंचलों. या गांवाला मथुरेपेक्षांही देवळें जास्त आहेत. सर्व देवळें अर्थात् कृष्णाचींच आहेत. परंतु त्यांना कृष्णाच्या निरनिराळया नांवावरून राधारमण, मदनमोहन, राधावल्लभ, राधागोपाळ, रंगजी, गोविं-दजी, गोविंद–देव, गोपीनाथ, द्वारकाधीश वगैरे नांवें आहेत; किंवा बांध-

णारांच्या नांवावरून तरी तीं पडलेलीं आहेत. जसें 'लालाबाबुका देवल,' 'शेटसाहेबका देवल,' 'ग्वालेर महाराजका देवल' 'राणी निकारीका देवल.' पंड्यानें आम्हांला सांगितलें, कीं, येथें हजारों देवळें आहेत. तेव्हां सगळीं देवळें पाहणें अशक्यच होतें. तरी जीं प्रख्यात देवळें आहेत तेवढीं आम्हांला दाखीव असें आम्हीं त्याला सांगितलें. त्यानें आम्हांस सरासरी दहा बारा देवळें दाखविलीं तीं खरोखरींच सुंदर, भव्य व हिंदु शिल्पकलेची साक्ष पटविणारीं आहेत. या देवळांपैकीं पुष्कळशीं बंगाली बाबूंनीं बांधलेलीं आहेत, याचें प्रथमतः आम्हांला मोठें गूढ वाटलें; परंतु बंगाल्यांत चैतन्य म्हणून जो साधु झाला, त्यानें राधाकृष्णाच्या भक्तिपंथाचा बंगाल्यांत प्रसार केला व तो वृंदावनांत शेवटीं येऊन राहिला होता. यामुळें बंगाल्यांतील भाविक लोकांनीं येथें कृष्णाचीं फारच सुंदर देवालयें बांधलीं आहेत. म्हणूनच वंगश्री वृंदावनांत येऊन राहिली आहे, अशी येथें म्हण पडली आहे. वृंदावनांतील जीं देवळें आम्हीं पाहिलीं त्यांच्या सभोंवतीं खुली जागा बरीच असल्यामुळें तीं मथुरेच्या देवळांपेक्षां जास्त उठावांत दिसतात. बाकी कलाकौशल्याच्या दृष्टीनें मथुरेंतील देवळें कांहीं कमी नाहींत. पण तीं भर बाजारांत व संकुचित जागेंत असल्यामुळें त्यांची शोभा कमी होते यांत शंका नाहीं. येथील देवळांना उत्पन्नें दांडगीं आहेत व भाविक लोकांकडून देणगीच्या रूपानेंही दरसाल फार मोठी रक्कम मिळते. वीसवीस हजार रुपयांच्यावर वार्षिक मिळकत असणारीं देवळें येथें पुष्कळ आहेत. महाराष्ट्रामध्यें अशा प्रकारचीं श्रीमंत देवळें व देव फारसे नसल्यामुळें प्रथमतः इकडल्या देवळांचा थाट पाहून आम्ही अगदीं थक्क होऊन गेलों. कृष्ण हा देव विलासी असल्यामुळें त्या देवाचीं देवळेंही एकाद्या राजविलासी राजाच्या राजवाड्याप्रमाणें, किंवा अंतःपुराप्रमाणें शृंगारलेलीं असावीं, हें स्वाभाविक आहे. तरी पण येथल्या देवांच्या एकंदर पूजाअर्चाबद्दलच्या हकीगती पाहून व ऐकून आम्हांला लोकांच्या भाविकपणाचें हंसूंच आलें. येथल्या बहुतेक देवांची एकाद्या विलासी राजाप्रमाणें रात्रंदिवस तरतूद केली जाते.

येथील देवांचे मनुष्याप्रमाणेंच सर्व आहारविहारादि व्यवहार चालतात. आधीं देवळाच्या गाभाऱ्यांत सर्व सुखसोई व विलासांचे प्रकार असतात. प्रत्येक देवाच्या मूर्तीवर सुंदर पंखा असतो. तिकडे उन्हाळा फार असल्यामुळें देवालाही ऊष्मा भासत असावा. या पंख्याची एक दोरी गाभाऱ्याबाहेर देवदर्शनाला येणाऱ्या भक्ताच्या उभें राहण्याच्या ठिकाणापर्यंत आणलेली असते व प्रत्येक भक्तानें दोरी दोन चार वेळ तरी हालवून देवाला वारा घालून त्याची सेवा करण्याचा परिपाठ आहे. देवळासमोर बहुधा गार पाण्याचें सुंदर कारंजें असावयाचेंच, व कारंज्यांतून उडणारे जलतुषार मूर्तीपर्यंत जावेत, अशी योजना केलेली असते. येथें देवाच्या गाभाऱ्याला सुवासिक फुलांच्या माळा घालण्याचा फारच प्रघात दिसला. यामुळें देवळांत गाभाऱ्याजवळ गेलें, कीं, त्या फुलांच्या माळांच्या सुवासानें, त्या मनोहर कारंजाच्या फवाऱ्यानें, चंदनाच्या उटीच्या वासानें भक्ताचें मन गारीगार होतें, यांत शंका नाहीं. येथल्या देवाचे सर्व सुखसोहाळे दररोज व विशेषतः निरनिराळ्या सणाच्या वेळीं करण्याची रीत आहे. रोज देवाचें न्हाणें व्हावयाचें, पुढें त्याचा पोषाख व्हावयाचा; नंतर त्याचें जेवणखाण व्हावयाचें; पुढें वामकुक्षी व्हावयाची; पुनः मधल्या वेळचें खाणें; सायंकाळीं फिरणें; पुढें रात्रींचें जेवण व तदनंतर निद्रा वगैरे सर्व व्यवहार देवाचे होतात. यामुळें येथें गाभाऱ्यांना पडद्याची सोयही केलेली असते. देवाला निजण्याची इच्छा झाली, कीं, सर्व बाजूचे पडदे टाकून काळोख केला म्हणजे दिवसासुद्धां झोंप घेण्यास हरकत नाहीं! यामुळें या गांवांत सर्व देवांचें दर्शन होणें कठीण जातें. आम्ही एका देवळांत गेलों तेथें आम्हांला समजलें, कीं, देव निद्रा घेत आहेत व अर्धा तास देवाचें दर्शन किंवा भेट होणार नाहीं! त्या देवळांत तमाम लोक उभे! कारण, त्यांना देवाचें दर्शन घेण्याची इच्छा. परंतु आम्हीं इतका वेळ तेथें उभें रहावें किंवा नाहीं हा आम्हांला विचार पडला. आम्हांला तर तिष्ठत बसण्यास सवड नव्हती. तेव्हां आम्हीं मनांत म्हटलें, कीं, "येथले देव निजतात! तर ते वेळींच

उठतीलसा काय नेम ! तेव्हां ज्याप्रमाणें अर्वाचीन काळीं एकादे गृहस्थ घरीं भेटले नाहींत, तर आपण आपल्या नांवाचें कार्ड ठेवून जातों त्याप्रमाणेंच आपण करावें." असें मनांत म्हणून आम्ही नमस्काररूपी आमच्या नांवाचें कार्ड देवाजवळ ठेवून दुसरें देऊळ पहावयास गेलों. दुसऱ्या देवळांत गेलों तों तेथेंही देव भोग भोगीत आहे असें समजलें ! पुनः आम्हांला पंचाईत येऊन पडली. परंतु आमच्या सुदैवानें देवाचें भोग भोगणें संपलें व पडदा एकीकडे झाला व आम्हांला देवाचें दर्शन घडलें. तिसऱ्या एका देवळांत गेलों तेथें देवळाच्या प्रशस्त आवारांत पालखींत बसून देव फिरावयास निघाले आहेत, असें आमच्या दृष्टीस पडलें ! याप्रमाणें वृंदावनांतील देवळांत आमच्या हिंदुसमाजांतील एका धार्मिक पंथाच्या अंधश्रद्धेबद्दलचे बरेच मासले दोन तीन तासांच्या अवधींत पाहण्यास सांपडले.

येथें सर्वांत प्रचंड, भव्य व शिल्पकलेच्या दृष्टीनें पहिल्या प्रतीचें देऊळ म्हणजे रंगजीचें देऊळ होय. हें देऊळ येथील शेट गोविंददास व राधाकृष्ण यांनीं रंगाचार्य नांवाच्या आपल्या गुरूच्या सांगण्यावरून बांधलेलें आहे. याला एकंदर ४५ लाख रुपये खर्च झालेला आहे. याचा बाह्य प्राकार फार विस्तीर्ण असून प्रचंड आहे. हें देऊळ मद्रासी पद्धतीवर बांधलेलें असल्यामुळें दरवाज्यावर उंच गोपुरें आहेत. हीं गोपुरें प्रथमतः दृष्टीस पडलीं, तेव्हां आम्हांलाही आश्चर्य वाटलें. परंतु तेथले मद्रासी पोषाखाचे पुजारी पाहून व देवळाच्या उत्पत्तीची वरील हकीकत ऐकून आमचें आश्चर्य कमी झालें. या देवळाच्या आवाराचें पश्चिम प्रवेशद्वार ९३ फूट उंच असून तें मथुरेच्या धर्तीवर आहे. हें महाद्वार फार भव्य दिसतें. यामुळें आंत जातांना देवळाच्या प्रचंडतेची साक्ष पटते. देवळाचें काम व एकंदर देखावा फारच प्रेक्षणीय आहे. देवळाच्या समोर एक सोन्याचा ध्वजस्तंभ आहे. येथली दुसरीं चांगलीं प्रेक्षणीय देवळें म्हणजे पुढील आहेत: लालाबाबूच्या देवळाचें काम फारच सुबक आहे. मदनमोहन व गोपीनाथ हीं देवळेंही चांगलीं आहेत. राधारमणाचें देऊळ अर्वाचीन

आहे. तें सर्व संगमरवरी दगडाचें आहे. त्याच्या सभामंडपाचे खांब पीळ दिलेल्या दोरखंडाप्रमाणें केलेले असून एक एक खांब एका एका सबंध संगमरवरी दगडाचा आहे. हें देऊळ पाहून दागदागिन्यांनीं गरगच्च भरलेल्या श्रीमंत बाईची आम्हांला आठवण झाली. दागिन्यांच्या अतिरिक्त हौसेनें ज्याप्रमाणें केव्हां केव्हां सौंदर्यहानि होते, तसेंच या देवळाचें झालेलें आहे. या लहानशा देवळाला दहा लाख रुपये खर्च झालेला आहे. यापेक्षां राधाइन्द्रकिशोर हें देऊळ जास्त साधें, पण अधिक सुंदर दिसतें. गिरिधारीदास या नांवाच्या आपल्या गुरूच्या देखरेखीखालीं बांधलेलें ग्वालेरच्या महाराजांचें राधागोपाळाचें देऊळही प्रेक्षणीय आहे. या देवळाला सुमारें चार पांच लाख रुपये लागलेले आहेत.

इतकीं देवळें पाहणें झाल्यावर आम्हीं आपल्या घड्याळांत पाहिलें तों फारच उशीर झाला असें दिसलें व भुकेनेंही आपल्याकडे आमचें लक्ष्य वेधलें. तेव्हां ‘आधीं पोटोबा, मग विठोबा’ या म्हणीप्रमाणें आम्हीं वर्तन करण्याचें ठरवून गाडींत बसून परत आमच्या बिऱ्हाडाला येऊन पोंचलों; भोजनादि विधि उरकले व आदल्या दिवसाप्रमाणें सायंकाळ-पर्यंत करमणुकींत व विश्रांतींत वेळ घालवून सायंकाळीं नौकेंत बसून सहल करावयास गेलों.

तिसरे दिवशीं सकाळीं आम्हीं **जमनाबाग** पहावयास गेलों. तेथील एका प्रसिद्ध व्यापाऱ्याचें हें रहाण्याचें ठिकाण आहे. हें मथुरेच्या दक्षिणेस रेल्वेपुलाच्या पलीकडे परंतु यमुनेच्या कांठींच आहे. आम्ही गेलों ते दिवस भर उन्हाळ्याचे असल्यामुळें यमुनेला पाणी फार कमी झालें होतें, व तिला मधून मधून खांडवे पडले होते. यामुळें नावेंतून जाण्यास सवड नव्हती. बाकी इतर ऋतूंत या बागेस नावेंतून जातां येतें व तसें गेलें म्हणजे शहराची शोभा पहात पहात जातां येतें, असें आम्हांला सांगण्यांत आलें. परंतु सध्यां तें शक्य नसल्यामुळें आम्हांला गाडी करून जाणें भाग पडलें. आवारांत शिरण्याचा दरवाजा भव्य असून प्रेक्ष-

णीय आहे. दरवाजापासून थोड्या अंतरावर एक कारंजें आहे व कारंजां-तील पाणी लांबचलांब पाट बांधून त्यांतून बागेला जाण्याची तज-वीज केली आहे. बाग बरीच विस्तीर्ण आहे, व तींत मोठमोठे वृक्ष पुष्कळ आहेत. झाडांच्या फांद्या वळवून केलेले वृक्षमंडपही दोन तीन आहेत. यंदां आपल्या इकडील आंब्यांचें पीक फारच कमी होतें; परंतु या बागेंतील सर्व आंबे फलभारानें नम्र झालेले पाहून आम्हांला आनंद झाला. बागेच्या मध्यभागीं बंगलेवजा शेटसाहेबांची कोठी अगर राहतें घर आहे. त्यांत एक चांगला शृंगारलेला दिवाणखाना असून त्यामध्यें या घराण्यांतील दोनचार पुरुषांच्या तसबिरी आहेत.बंगल्या शेजारींच व नदीच्या अगदीं कांठीं एक लहानसें देऊळ व एक छत्री आहे. या दोन्ही इमारती दगडाच्या असून त्यांचें काम सुबक आहे. एकंदर ठिकाणची रचना व व्यवस्था पाहून आम्हांला मालकाच्या अभिरुचीचें कौतुक वाटलें.

आमच्या मथुरावासाचा हा शेवटचाच दिवस होता.त्या दिवशीं आमच्या-पैकीं कांहीं मंडळी दोनप्रहरच्या गाडीनें मुरादाबादेस जावयाची होती, व बाकीचे आम्हीं परत देशीं येण्याकरितां रात्रीच्या गाडीनें निघणार होतों. यामुळें लवकरच जेवणें आटपून आम्ही स्टेशनवर गेलों व परत आल्यावर आम्ही दिवसाउजेडींच जेवणखाण करून सामानाची बांधा-बांध करून मथुरेचें शेवटचें दर्शन घेण्याकरितां बाहेर पडलों. मथुरेचे पेढे फार प्रसिद्ध, म्हणून बाजारांत जाऊन पेढे घेतले. हे पेढे कांहीं तरी विशेष प्रकारचे असतील अशी आमची कल्पना होती. परंतु आमची निराशा झाली. पण या पेढ्यांचा मुख्य गुण म्हणजे त्यांचा विलक्षण टिकाऊपणा होय, असें आम्हांला सांगण्यांत आलें. नंतर आम्हीं विश्राम-घाटावर आलों व तेथें क्षणभर विसावा घेतला. सायंकाळीं तेथें एक मौज दिसते. घाटावरील लोक पीठ किंवा दुसरें कांहीं खाद्य यमुनेंत टाकतात व तें खाण्याकरितां तेथें कांसवें जमतात. इतक्या कांसवांचा तांडा आम्हीं आजन्म पाहिला नव्हता. यांतील पुष्कळ कांसवें बरींच मोठीं

होतीं. या ठिकाणीं माकडेंही फार आहेत. हीं माकडें सुद्धां येथें यावेळीं येतात. एका माकडानें तर एका कासवाच्या पाठीवर उडी मारून त्यावर पडलेलें खाद्य पटकन् मटकावून टाकलें व न घाबरतां त्या कांसवाच्या पाठीवर तें मोठ्या ऐटीनें बसलें! हा देखावा पाहून आम्हांला फारच मौज वाटली. ही जशी कांसवांची येथें मौज पहावयास सांपडते, तशीच सायंकाळीं हरिद्वारास माशांची मौज पहावयास सांपडते. यात्रेकरू भाविक लोक दररोज सायंकाळीं पीठ विकत घेऊन त्याच्या लहान लहान गोळ्या करून गंगेंत फेंकतात व माशांच्या झुंडींच्या झुंडी प्रवाहाच्या अगदीं कडेला येतात. ही मौज आम्हीं हरिद्वारास पाहिली त्याची आम्हांला आतां आठवण झाली.

झालें, येथें मथुरावृंदावनाचें दृष्टिगम्य वर्णन संपलें. परंतु मथुरा हें शहर फार जुनें आहे; यानें किती तरी राजकीय आणि धार्मिक स्थित्यंतरें पाहिलीं आहेत. तसेंच हल्लीं तरी तें शहर कृष्णभक्तीचें व वैष्णवपंथाचें आद्यस्थान आहे. तरी आतां मथुरेच्या कृष्णभक्तीच्या व वैष्णवपंथांच्या श्रुतिगम्य भागाकडे वळूं.

# प्रकरण ९ वें.

## द्वारका.

श्रीकृष्णाचें बालपण व तरुणपण ज्या ठिकाणीं गेलें तीं पाहिल्यावर श्रीकृष्णानें मोठेपणीं वसविलेली व हिंदुस्थानच्या प्रख्यात नगरसप्तकांत अन्तर्भूत झालेली नगरी **द्वारका** किंवा **द्वारावती** ही पाहावी असें माझ्या मनांत होतें. पण द्वारका ही नगरी हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यांत असलेल्या काठेवाडच्या वायव्य कोपऱ्याला असल्यामुळें उत्तर हिंदुस्थानच्या हमरस्त्याच्या पुष्कळच आड वाटेला पडते. शिवाय अलीकडच्या काळापर्यंत थेट द्वारकेपर्यंत रेलवे नसल्यामुळें व काठेवाडांत निरनिराळ्या संस्थानचे वेडेवांकडे रेलवे रस्ते व रेलवे फाटे असल्यामुळें रेलवेनें द्वारकेस जाणें बरेंच त्रासाचें होतें. शिवाय या रेलवे-रस्त्यानें मुंबईहून द्वारका साहाशें मैलांचे वरच दूर आहे. मुंबईहून द्वारका जलमार्गानें सुमारें अडीचशें मैलच आहे खरी. तरी पण द्वारका हें खुल्या समुद्रावरील बंदर असल्यामुळें पावसाळीं तें बंदर बहुधा बंद असतें व बाराही महिने त्या बंदरीं बोटीनें जाऊन किनाऱ्यावर उतरण्याचा फार त्रास व दगदग असे. यामुळें द्वारका यात्रा म्हणजे आठ दहा दिवसांची एक स्वतंत्र वेगळी यात्राच बने. म्हणून माझ्या मनांत असूनसुद्धां मे सन १९३५ पर्यंत मला द्वारकेची यात्रा घडली नाहीं.

पण या गेल्या सात आठ वर्षांमध्यें द्वारकेची यात्रा सुलभ, कमी खर्चाची व कमी काळ लागणारी झाली आहे. कारण बडोदा दरबारनें अलीकडे काठेवाडच्या वायव्य कोपऱ्यास व द्वारका बेटाच्या नजीक **ओखा** बंदर नांवाचें बारमाही खोल पाण्याचें सुरक्षित बंदर व धक्का बांधला आहे व **ओखा** नांवाचें नवेंच हवाशीर गांव वसविलें आहे

व कराचीला जाणाऱ्या दोन्ही आगबोट कंपन्यांच्या आगबोटी आठवड्यांतून दोनदां ओखा बंदरास लागतात. तेव्हां कराचीस जातांना ओखा बंदरास उतरून अर्ध्या आठवड्यांत द्वारकेची यात्रा करून पुढें लागलीच कराचीस जाण्यास सांपडतें. या सोयीचा व संधीचा फायदा घेऊन मे सन १९३५ मध्यें कराचीस जातांना मीं द्वारकायात्रा केली. या सर्व प्रवासभर माझा मुलगा मनोहर माझ्याबरोबर होता. हल्लीं द्वारकेची यात्रा म्हणजे एक प्रकारची त्रिस्थळी यात्राच आहे. कारण, येथें ओखा बंदर हें एक प्रेक्षणीय स्थळ आहे. तेथून दीडदोन मैलांवर असलेलें द्वारकाबेट दुसरें प्रेक्षणीय स्थळ आहे. तर आठरावीस मैलांवर असलेलें द्वारका शहर हें तिसरें प्रेक्षणीय स्थळ आहे. अशीं तीन प्रेक्षणीय स्थळें एकदम व एका खेपेंत पाहण्यास मिळतात. तेव्हां आतां अधिक प्रस्तावना न करतां मी आमच्या द्वारका यात्रा वर्णनास लागतों.

ता. १३ मे सन १९३५ रोजीं बी. आय. एस्. एन्. ( ब्रिटिश इंडिया स्टीम नॅव्हिगेशन ) कंपनीच्या **वरेला** आगबोटीनें **ओखा** बंदरास जाण्याकरितां **व्हिक्टोरिया** डॉक ( पंधरावी पडवी ) येथें आम्ही सकाळीं साडे आठ वाजतां आलों. तोंच बंदरावर काय माणसांची व सामानाची चिकार गर्दी, कारण दर आठवड्यास जाणाऱ्या बारमाही आगबोटीशिवाय दुसरी आठमाही जाणारी ही शेवटचीच आगबोट होती. परदेशीं जातांना ज्याप्रमाणें सामानाची जकातीकरितां तपासणी होते, त्याप्रमाणें या देशांतल्या देशांतील प्रवासांत जातांना सुद्धां सामानाची कसून तपासणी होते.' आमचें सामान नेहेमीं प्रवास करणाऱ्या माणसांच्या सामानाप्रमाणें बेताचें असल्यामुळें, त्यावर परवानगीची खडूची खूण लवकरच झाली व हमालानें आमचें सामान उचललें व जिन्यानें आम्हीं आमच्या डेकवर आलों. डेक पॅसेंजरचें ओखाबंदराचें साडेनऊ रुपये भाडें पडलें. कराचीचें तेरा रुपये पडतें. मुंबईपासून **कराची** सुमारें पांचशें मैल आहे व **ओखा** बंदर हें सरासरी निम्मे अंतरावर आहे. तेव्हां पुढचें ओखापासून कराचीचें साडेसात रुपये

भाडें असेल असें आम्हांस वाटलें. पण तेथून निघतांना पहातों तों तें भाडें साडेबारा रुपये पडलें. कारण एकदां **ओखास** गेल्यावर **कराचीस** जाण्यास आगगाडीचा मार्ग फारच लांबीचा असून त्यानें भाडें पुष्कळ पडतें. म्हणून आगबोटवालेही येथून कराचीचें भाडें तितकेंच घेतात! कशीबशी पथारी पसरण्यापुरती जागा आम्हांला डेकवर मिळाली व माणसांनीं चिकार भरलेली बोट बरोबर दहा वाजतां बंदरांतून बाहेर पडली.

ता. १४ मे सन १९३५:—दुसरे दिवशीं बारा वाजतां आम्ही **मांडवी** बंदरास येऊन पोहोंचलों. हें बंदर **कच्छचे** आखाताचे उत्तर तीरावर खुल्या समुद्रकांठींच असल्यामुळें व येथें पाणी उथळ असल्यामुळें आगबोट बंदरापासून फारच दूर अंतरावर उभी राहते. यामुळें माल व माणसें गलबतांतून किनाऱ्यापर्यंत जाण्यास पुष्कळ वेळ लागतो. या बंदरांत आमची बोट बहुतेक रिकामी झाली. इतकीं माणसें व माल येथें उतरला. पुढें चार महिने मांडवीहून मुंबईस जाण्यास सांपडत नाहीं म्हणून यावेळीं फार गर्दी होती असें आम्हांला समजलें. या बंदराहून सुटण्यास आम्हांला दोन अडीच वाजले व मग आम्हीं **ओखा** बंदरास येण्यास परत फिरलों! **ओखा** बंदर **कच्छचे** आखाताचे दक्षिण तीरास व मुख्य समुद्रापासून जरा आंत आहे. आधीं **मांडवीस** जाऊन मग परत **ओखा** बंदरास येऊन नंतर थेट **कराचीस** जाणें हें वारा व समुद्राच्या लाटा यांच्या दृष्टीनें जास्त सोयीचें पडतें म्हणून अशी जरा विचित्र अशी येथें जलप्रवासाची पद्धत पडली आहे असें आम्हांस कळलें! आम्हीं **ओखा** बंदरास सुमारें चार वाजतां पोहोंचलों. या बोटीवरील गुजराथी ब्राह्मणाची खाणावळ मात्र फार घाणेरडी होती व येथें मिळणारे खाद्य पदार्थही फार वाईट होते. प्रत्येक प्रवाशाजवळ घागरीसारखा लठ्ठ फिरकीचा तांब्या, उंच पितळी फराळाचा डबा व फळफळावळीची मोठी करंडी पाहून प्रथम आम्हांला आश्चर्य वाटलें होतें. पण गुजराथी खाणावळीची गैरसोयीची व घाणेरडी व्यवस्था पाहून

व अनुभवून आमचें आश्चर्य मावळलें. आमची बोट धक्याला लागली नाहीं. यामुळें **मांडवी**प्रमाणें येथेंही आम्हाला गलबतांतून धक्यावर जावें लागलें. जोराच्या वाऱ्यानें थोडकें अंतर असूनही गलबतांतून बंदरावरच्या धक्क्याला लागे तों आमची कोण त्रेधा उडविली. गलबताला मागें पुढें व डावी उजवीकडे असे जोराचे हेलकावे बसत होते. गलबतांत पाणी शिरून गलबत बुडेल कीं काय अशी सारखी धागधुग वाटत होती. पण थोड्याच वेळांत आम्ही धक्याला लागलों व सुरक्षितपणें किनाऱ्यावर उतरलों.

बडोदा संस्थानांत मोठ्या हुद्यावर असलेल्या आमच्या एका नातेवाईकामार्फत आम्हीं **ओखा** बंदरास व **द्वारकेस** राहण्याची आगाऊ तजवीज केली असल्यामुळें, आम्हांला कांहीं एक त्रास पडला नाहीं. **ओखा** बंदरावर आम्ही **बंदर एंजिनीयर** मिस्तर **मेहता** यांचेच पाहुणे होतों. त्यांनीं आपल्या हाताखालच्या रा. भावे नांवाच्या रजेवर गेलेल्या एंजिनीयरांचे रिकाम्या बंगल्यांत ( मेहता साहेबांच्या बंगल्याला लागूनच हा बंगला होता ) आमची रहाण्याची सोय केली होती. रा. भावे यांचा छोटासा बंगला पण फार सुबक व सोयीचा होता. त्या बंगल्यांतील स्वच्छता, टापटीप व विशेषतः गायन-वादनाचीं उपकरणें,सतार, दिलरुबा, एकतारी इत्यादि संगीत सामुग्री या सर्वांवरून रा.भावे यांच्या " **शीलव्यसनां** " ची त्यांना न पाहतांच उत्तम कल्पना आली. चहापाणी झाल्यावर आम्ही एंजीनीयरसाहेबांबरोबर ओखा बंदर पहाण्यास व सहल करण्यास निघालों. रा. मेहता साहेब हे बंदर बांधण्यापासूनचे येथले अधिकारी असल्यामुळें आम्हांला बंदराची पूर्वपीठिका व सद्यःस्थितिही एकदमच कळली. ओखा बंदर बांधण्यास सन १९२२ मध्यें सुरवात झाली. ज्या जागीं पूर्वी निवडुंगाखेरीज झाड नव्हतें व जेथें पूर्वी चिटपाखरूंही रहात नव्हतें त्या ठिकाणीं अवघ्या बारा तेरा वर्षांत नळाचें पाणी, विजेचे दिवे,आगगाडी, आगबोट,तारायंत्र,शाळा, दवाखाना इत्यादि सुखसोयींच्या साधनांनीं युक्त असें हजारदीडहजार वस्तीचें

हवाशीर टुमदार सुबक बंगल्यांनीं व सरकारी इमारतींनीं अलंकृत असें नवें गांव व बंदर बनविण्यांत आलें. तेव्हां बडोद्याच्या सयाजीराव महाराजांनीं विश्वकर्म्याचीच कृति करून दाखविली असें कोण म्हणणार नाहीं? या बंदरासाठीं बडोदा सरकारला एक कोट रुपये खर्च करावे लागले. आधीं द्वारका व ओखा बंदरापर्यंत रेल्वे रस्ता करून घेण्याकरितां जामनगर दरबारला २९ लाख रुपये कर्जाऊ दिले व एकंदर १०० मैल रेल्वे बांधून ओखा बंदर दिल्ली-आग्रा व सर्व उत्तर हिंदुस्थान यांच्याशीं जलद दळणवळणाच्या साधनानें जोडलें गेलें. ओखा बंदराचे ठिकाणीं अगदीं अर्वाचीन पद्धतीचा क्रॉंक्रीटचा मजबूत धक्का बांधला व बंदरामध्यें ओहोटीचे वेळींसुद्धां तीस फूट पाणी लागणाऱ्या मोठमोठ्या मालाच्या व माणसांच्या आगबोटी धक्याला लागण्याची व्यवस्था केली. यामुळें परदेशच्या आगबोटी बारमहा ओखा बंदरास नियमितपणें येऊं लागल्या व ओखा बंदरास आयात-निर्यात मालाची नेआण वाढत्या प्रमाणावर सुरू झाली. याप्रमाणें माहिती देऊन एंजिनियरसाहेबांनीं आम्हांला धक्याचे बाजूनें बंदराच्या दूरच्या टोकापर्यंत नेलें. ओखा बंदराच्या तीन्ही बाजूस समुद्राचें पाणी आहे. पश्चिमेस आरबी समुद्र आहे. जमिनीचें एक टोंक वायव्य दिशेस समुद्रामध्यें आंत घुसलें आहे व त्याचें जरा पुढें एक छोटें खडकाचें लांबट बेट आहे. या **समयानी** बेटावरच दीपगृह बांधलेलें आहे. हें बेट व मुख्य जमिनीचें समुद्रामध्यें घुसलेलें टोंक ( land's end ) या योगानें आरबी समुद्राच्या लाटा व वारा सहज आडला जातो. सारांश, येथें जमिनीच्या टोंकाची व बेटाची स्वाभाविक **लाटमोडी** भिंत ( breakwater ) बनली आहे. व म्हणूनच पूर्व बाजूला खोल, व संथ पाण्याचें सुरक्षित ओखा बंदर व धक्का बनवितां आला आहे. ओखा बंदराची सर्व जमीन तांबूस खडकाची असल्यामुळें या ठिकाणीं कोठेंही माती व गाळ नाहीं. यामुळें समुद्राचें पाणी स्वच्छ, निळसर, हिरवट अशा मिश्र रंगाचें दिसतें. तें मिश्ररंगी अफाट पाणी, त्या पाण्या-

वर येणाऱ्या त्या शुभ्ररंगी फेसाळ लाटा, आकाशाचा तो अस्मानी रंग, सभोंवारचा तो तांबडा-पांढरा वाळवंटी भूमिभाग हा सर्व देखावा एकसमयावच्छेदेंकरून आमच्या दृष्टीस पडला व आम्ही हें बंदर पाहून आश्चर्य चकित झालों. आपल्या पायानजीक येणाऱ्या त्या प्रचंड लाटा व दूरवर दिसणारें तें पांढरें शुभ्र दीपगृह आम्हीं कितीतरी वेळ प्रमुदित मनानें पहात उभे होतों. तोंच सूर्यास्ताची वेळ झाली व पश्चिम दिशा आरक्त होऊन सूर्यबिंबाचा तो लाल गोळा पाण्यांत बुडूं लागला. सूर्यास्ताचा येथून दिसणारा देखावाही फार चित्ताकर्षक आहे. याप्रमाणें अगदीं काळोख पडेपर्यंत आम्ही तेथला निसर्ग रमणीय देखावा पहात पहात बंगल्यावर परत आलों व भोजनानंतर झोंपीं गेलों.

ता. १५ मे सन १९३५ रोजीं आम्हीं सकाळीं साहा वाजतां उठलों व लगेच शेजारीं असलेलें **बेट** पाहून जेवणाचे वेळीं परत येण्याचें ठरविलें. या बेटाचें नांव शंखोद्र असें आहे. हें बेट शंखाच्या आकृतीचें—मध्यें जाड पोट व दोन बाजूस बारिक टोकें—असल्यामुळें त्याला हें नांव पडलें कीं काय हें कळत नाहीं.पण सध्यां दूरस्थ लोक त्याला **द्वारका बेट** किंवा नुसतें बेटच म्हणतात. हें बेट सुमारें आठ मैल लांब व मैल दीड मैल रुंद आहे. बेटाचे मध्येंच जास्त रुंद भाग असून तो बऱ्याच उंचवट्याचा आहे. येथेंच बेट गांव आहे. हें गांव बरेंच जुनें असून तेथली वस्ती सुमारें तीन हजार आहे. ओखा बंदरापासून बेट फारसें दूर नाहीं. चांगला वारा असल्यास गलबत वीस पंचवीस मिनिटांत बेटाच्या किनाऱ्याला जातें. त्या दिवशीं वारा चांगला असल्यामुळें आम्ही आठ वाजतां निघालों ते थोड्याच वेळानें धक्क्याला जाऊन पोहोंचलों. बेटाच्या कांठापर्यंत वस्ती असून घरें अगदीं दाट दाट आहेत. आम्हीं धक्क्यावरून चालत प्रथम तेथल्या ( मामलेदार ) वहिवाटदाराकडे गेलों. तेथें आम्हांला **ओखा** मंडळाचा ( काठेवाडच्या टोंकाच्या बडोदा राज्यांत असलेल्या भागाचें नांव ) व **बेटाचा** नकाशा पाहण्यास सांपडला व बेटाचा तो विचित्र आकार पाहून मला मोठें नवल वाटलें. माम-

लेदार कचेरीशेजारींच बेटावरील मुख्य द्वारकाधीशाचें देऊळ आहे. हें देऊळ बाहेरून एखाद्या चौसोपी मोठ्या वाड्यासारखें दिसतें. येथें दर माणशीं १८२ यात्रेकरू फी आहे. यापैकीं दोन आणे म्युनिसिपालिटीला जातात व १ रुपया देवस्थानाकडे जातो. येथल्या काय किंवा द्वारका शहरांतील काय दोन्ही ठिकाणची व्यवस्था बडोदा सरकारकडेच आहे. दोन्ही देवळांचें मिळून सुमारें पंचवीस हजार उत्पन्न होतें असें आम्हांला कळलें. बेटावरील द्वारकाधीशाच्या देवळाचे पुजारी ब्रह्मचारी असले पाहिजेत असा नियम आहे. यांची नेमणूक बडोदा दरबारकडून होते.

सवादोन रुपये फी भरून आम्ही देवळांत गेलों. येथें किती तरी छोटीं छोटीं देवळें दिसलीं. मुख्य देवालय बरेंच आंत असून, कृष्णाची काळ्या रंगाची मूर्ति मखरांत बसविलेली आहे. येथें काय किंवा द्वारका शहरांत काय मुख्य देवळांत कृष्णाची एकटी मूर्ति आहे, याचा मला जरा चमत्कारच वाटला. महाराष्ट्रामध्यें कृष्णाच्या देवळांत नेहेमीं **राधा** व **कृष्ण** अशा दोन मूर्ती असतात, पण येथें एकटीच कृष्णाची मूर्ति आहे हें खरें. देवळामध्यें कृष्णाच्या दुसऱ्या मूर्ती पुष्कळ आहेत; तसेंच कृष्णाच्या मुख्य बायकांच्याही स्वतंत्र मूर्ती पुष्कळ आहेत.

बेटांतील द्वारकाधीशाचें देऊळ बरेंच जुनें दिसतें. पण बांधकला किंवा शिल्पकला या दृष्टीनें त्यांत विशेष कांहीं एक नाहीं असें मला वाटलें.

हें मुख्य देऊळ पाहून झाल्यावर आम्हीं त्या बेटाच्या पलीकडच्या बाजूला **शंखशंकर** नांवाचें महादेवाचें देवालय पहाण्यास गेलों. जातांना गांवांतील आळीच्या बोळकांडीच्या रस्त्यानें गेलों. या गांवांतील घरें गलिच्छ, गर्दीगर्दीनें बांधलेलीं व अगदीं सामान्य प्रतीच्या बांधणीचीं दिसलीं. येथलीं घरें चांगलीं असणार कशीं ? यात्रेकरूंनीं दिलेल्या दक्षिणेवर दिनचर्या चालविणाऱ्या भट्टाभिक्षुकांचीं घरें तीं ! घरांची आळी टाकल्यावर एक दोन अर्धवट कोरडीं व तळाशीं गलिच्छ गाळाचें पाणी अस

लेलीं तळीं लागलीं. यांना यात्रेकरू पवित्र कुंडें मानतात व त्यांत स्नानें करतात असें कळून मला यात्रेकरूंच्या अंध व भोळ्या भक्तिभावाची कींव आली ! नंतर दोन्ही बाजूस दोनचार शेतें लागलीं. पण तीं फारशीं सुपीक असतील असें वाटलें नाहीं. बाकी भूमिभाग उजाड व ओसाड दिसला. शेवटीं एकदांचे आम्ही देवळानजीक आलों; येथेंही एक छोटी गलिच्छ घरांची आळी लागली व मग बऱ्या बांधणीचें शंकराचें देऊळ लागलें. देवदर्शन घेऊन नंतर आम्हीं बेटाच्या उत्तरेकडील खडकाळ किनाऱ्याकडे व कच्छच्या आखाताकडें नजर टाकली व मग उशीर झाला म्हणून माघारीं फिरलों व तडक धक्याशीं आलों. लागलींच आम्हांला ओखाला जाणारी तर मिळाली व आम्हीं बारा वाजतांच्या सुमारास रा. मेहता साहेबांच्या बंगल्याला आलों.


दोन प्रहरीं अडीच वाजतां आम्हीं द्वारका शहरीं जाण्याकरितां **मोटार रेल** मध्यें बसलों. ओखापासून द्वारका शहर आदमासें आठरावीस मैल दूर आहे. तिसरे क्लासचें भाडें दहा आणे पडलें. येथलीही लोकल ट्रेन म्हणजे मोटार लॉरीसारखी छोटी गाडी असते. तिला **दोन** तिसऱ्या वर्गाचे कंपार्टमेंट व एक दुसऱ्या वर्गाचा कंपार्टमेंट असतो. थोड्या लोकांच्या जायेकरितां ही मोठी सोयीची व स्वस्ताईची व्यवस्था केलेली आहे पण ही आगगाडी खेळांतल्या आगगाडीसारखी वाटते यांत शंका नाहीं. हा सर्व भूमिभाग अगदीं सपाट पण नापीक आहे असें वाटतें. जिकडे तिकडे ओसाड निर्वृक्ष जमीनच जमीन दिसते. आपल्या डाव्या हातास आरबी समुद्र दृष्टीस पडतो. निवडुंगाचीं झुडपें हीं काय ती येथली वृक्षसंपत्ति ! रेल्वे रस्त्याच्या बाजूनें बैलगाडीचा रस्ता गेलेला आहे. त्याच्याकडेला तुरळक तुरळक एखादें एकाकी झाड दृष्टीस पडे. हा भूमिभाग असा ओसाड, नापीक व निर्वृक्ष असण्याचें कारण इकडे पाण्याचें व पावसाचें दुर्भिक्ष हेंच होय. पण पूर्वकाळीं अशा या ओसाड व भयाण भागांतून द्वारकेला येणारे भाविक यात्रेकरू पायीं व बैलगाडीनें द्वारका शहराकडून द्वारका बेटाला येत असत !

भक्तिभावानें मनुष्य किती त्रास व हाल सोसण्यास तयार होतो! या वीस एकवीस मैलांच्या रेल्वे रस्त्यावर तीन चार खेडीं लागतात. पण द्वारकेच्या अलीकडचें **वरवाला** नांवाचें खेडें मात्र नवलाईचें वाटलें. **वरवाला** स्टेशन जवळ येत चाललें तसतशा जिकडे तिकडे हिरव्या हिरव्यागार बागाच बागा दिसूं लागल्या. त्या पाहून मनाला फार आनंद वाटला तोंच सुंदर वृक्षांनीं अलंकृत असा स्टेशन प्लॅटफार्म आला व तेथें गाडी थोडा वेळ थांबली. **वरवाला** हें **वाळवंटांतील वनश्रीनें मंडित गांव** ( oasis in a desert ) या कोटींतील गांव आहे यांत शंका नाहीं. येथें विहीरींना विपुल पाणी लागल्यामुळें पुष्कळ बागाईत करण्यांत आली आहे व हें गांव जरा थंड असल्यामुळें द्वारकेच्या आसपासच्या पुष्कळ श्रीमंत लोकांनीं या गांवीं बंगले व बागा केल्या आहेत असें कळलें. या वीस एकवीस मैलांच्या रुक्ष प्रदेशांत येवढाच भाग सुपीक गर्दच्छाय व हिरवागार पाहून माझें मन आश्चर्यानें थक्क होऊन गेलें व परमेश्वराच्या अगाध करणीची द्योतक म्हण "**देवाची करणी नारळांत पाणी**" माझ्या तोंडून सहज बाहेर पडली. थोड्याच वेळानें आम्हांला द्वारका शहर व त्या शहराचा अलंकार–'**जगन्मंदिराचें**' शिखर स्पष्टपणें दिसूं लागलें व लागलींच **द्वारका सीमेंट**च्या कारखान्याची चिमणी व कारखान्याची इमारत ही डाव्या हातास लागली. लवकरच गाडी-नव्हे मोटारकार–स्टेशनवर थांबली. आम्हीं डब्यांतून बाहेर येतों तोंच **ओखा** मंडळाच्या कमिशनरकडून आलेल्या माणसानें आमची चवकशी केली व सरकारी डाक बंगल्यामध्यें आमची उतरण्याची सोय केली आहे व कमिशनर साहेबांनीं रात्रीं साडे आठ वाजतां डाकबंगल्यानजीकच असलेल्या आपल्या बंगल्यामध्यें आपणांस भोजनास बोलाविलें आहे असा कमिशनर साहेबांचा निरोप व निमंत्रण एकदमच सांगितलें. आमचेजवळ सामान फारसें नव्हतेंच तेव्हां आम्हीं लागलीच आलेल्या माणसासकट टांग्यांत बसलों व तडक डाकबंगल्यावर आलों. डाक


बंगल्याच्या दुरुस्तीचें काम चालू होतें व एका खोलीमध्यें सरकारी अमलदार उतरले होते तरी पण एक खोली रिकामी होती त्यांत दोन खाटा टाकून आमची राहण्याची व्यवस्था करण्यांत आली. इतकें होत आहे तों चहा आला व तो घेऊन आम्हीं आलेल्या माणसाबरोबर द्वारका शहर पाहण्यास निघालों. आम्हांला धार्मिक यात्रेकरूप्रमाणें स्नान-पूजादि धार्मिक विधी करावयाचे नव्हते. आम्हीं द्वारकेच्या डाकबंग-ल्यांत आलों तों फक्त साडे चार वाजले होते व काळोख पडण्यास तीन तास अवधि होता. तेवढ्या अवकाशांत पायींसुद्धां द्वारकेचें दृश्य दर्शन सहज संपेल असें बरोबर आलेल्या माणसानें सांगितलें म्हणून आम्ही पायींच द्वारका शहराकडे चालत चाललों.

द्वारकेचा सरकारी डाक बंगला व कमिशनरचा बंगला व दुसऱ्या सर-कारी इमारती या समुद्रकिनाऱ्यावरच्च बांधलेल्या असल्यामुळें खुलास व हवाशीर आहेत असें दिसून आलें हा भूमिभाग तांबड्या लाल दगडाचा व मातीचा बनलेला आहे. या सरकारी इमारती डाव्या हातास टाकून आम्हीं पायवाटेनें शहराच्या पूर्व पश्चिम जाण्याच्या मुख्य रस्त्याला लागलों. या शहराच्या दोन्हीं बाजूंस सरकारी शाळा, दवाखाना, पोस्ट व तार कचेरी, कोतवाली कचेरी इत्यादि इमारती लागल्या. या इमारती नव्याच व नीटनेटक्या दिसत होत्या. तसेंच शहरांतील खासगी घरेंही चांगल्या बांधणीचीं दिसलीं. द्वारका बेटापेक्षां हें द्वारका शहर पुष्कळ संपन्न व सुधारलेलें दिसलें. या रस्त्यानें बराच वेळ चालल्यावर आम्हीं श्रीकृष्णाच्या सात मजली शिखराच्या देवळाशीं आलों. येथें प्रवेश दरवाजाला लागून दगडी जिना असून दुसऱ्या मजल्यावर लांबलचक दिवाणखाना होता. येथें संस्थानचे मामलेदार रहातात. त्यांना आम्ही भेटलों. त्यांचे येथेंच **द्वारका सीमेंट** कारखान्याचे व्यवस्थापक भेटले व त्यांचेजवळ सीमेंट फॅक्टरी पहण्याबद्दल गोष्ट काढली. तेव्हां ते गृहस्थ म्हणाले— ‘ मागें कारखाना पाहण्यास परवानगी मिळत असे पण कांहीं दिवसां-


पूर्वी एका प्रतिस्पर्धी कंपनींतील मनुष्य येऊन त्यानें कंपनीची नालस्ती केल्यापासून मुंबई मुख्य:कचेरीकडून लेखी परवानगी आल्याखेरीज कोणाही इसमास कारखाना दाखवूं नये असा येथें हुकूम झाला आहे. तेव्हां तुम्हांला कारखाना पाहतां येणार नाहीं.' हें कळल्यामुळें दुसरे दिवशीं सकाळीं ओखास जाण्यास आम्ही मोकळे झालों असें वाटून परवानगी न मिळाल्याबद्दल मला वाईट वाटलें नाहीं. नंतर आम्ही देवालय पाहण्यास आंत शिरलों. मामलेदारांच्याकडून आल्यामुळें आम्हांला यात्रेकरूची फी पडली नाहीं. श्रीकृष्णाचें हें देऊळ पोरबंदरी पांढऱ्या दगडाचें बांधलेलें आहे. देवळाचें नक्षीकाम व देवळावरील एकंदर कलाकुसरीचें काम आश्चर्यकारक आहे. देवळाच्या शिखराची कारागिरीही वाखाणण्यासारखी आहे. केवढें उंच व भव्य तें शिखर! तें सर्व नक्षी-कामानें व मूर्तिकामानें अगदीं शेवटापर्यंत सजलेलें दिसलें. मात्र ह पोरबंदरी पांढरा दगड ठिसूळ असल्यामुळें व हवापाण्याचा व ऊन वाऱ्याचा त्या दगडावर लवकर परिणाम होत असल्यामुळें या देवळाचें काम संगमरवरी पांढऱ्या दगडाप्रमाणें किंवा कुरंदी तांबड्या दगडाप्रमाणें कोऱ्यासारखें दिसत नाहीं तर तें मोडतोड झालेल्या इमारतीसारखें दिसतें. याप्रमाणें देवळाचा बाह्य देखावा पाहून आम्ही श्रीकृष्णाची मूर्ति असलेल्या मुख्य गाभाऱ्याशीं गेलों. बेट द्वारकेंतील देवळांतल्या-प्रमाणें येथें सुद्धां श्रीकृष्णाची काळ्या दगडाची मूर्ति सिंहासनावर एकाकीच बसविलेली पाहिली! दुसरीं नवींजुनीं पुष्कळ छोटींछोटीं देवळें—नव्हे देवांचीं दालनें पाहिलीं. तेथें कृष्णाच्या निरनिराळ्या नांवाच्या पुष्कळ मूर्ती होत्या व कृष्णाच्या कुटुंबीयांच्या व त्यांच्या मुख्य बायकांच्या पुष्कळ मूर्ति होत्या. या सर्व मूर्ति मामुली पद्धतीच्या व कारागिरीच्याच होत्या. तेव्हां त्यांवर ओझरती नजर टाकून आम्ही देवळाच्या मागल्या दरवाज्याशीं आलों तोंच नदीच्या घाटापर्यंत पोहोंचलेल्या दगडी पायऱ्यांचा प्रचंड जिना आमच्या दृष्टीस पडला व आम्हीं आश्चर्यानें तोंडांत बोट घातलें. येथून श्रीकृष्णाचें हें



नं. ४४ ]   द्वारका : द्वारकाधीशाचें देऊळ.   [ पान १७४



नं. ४२ ] वेट (शंखोदर) श्रीकृष्णाचें देऊळ. [ पान १७०



नं. ४३ ] द्वारका : गोमती कांठचे घाट व देवळें. [ पान १७५

देऊळ केवढ्या उंच टेकडीवर बांधलेलें आहे याची बरोबर कल्पना आली. येथून द्वारकेचा, गोमती नदीचा व तिच्यावरील लांबच लांब पसरलेल्या घाटांचा अद्वितीय देखावा दिसला. द्वारकेच्या यात्रेमधील स्नानपूजादि विधींपेक्षां हें दृश्यदर्शन माझ्यासारख्या सौंदर्यप्रिय प्रवाशाला जास्त महत्त्वाचें वाटलें व हें अद्वितीय दृश्य-दर्शन घडल्यानें द्वारकायात्रेचें साफल्य व ध्येय मला मिळालें असें माझ्या मनाला वाटलें. हा सुंदर देखावा पहात आम्हीं कितीतरी वेळ या पायऱ्यांवर उभे होतों. पायऱ्या उतरून जरा खालीं आलों तों पायऱ्यांचे दोन्ही बाजूस मठवजा नव्या इमारती लागल्या. द्वारकेच्या शंकराचार्यांनीं या अलीकडे बांधल्या आहेत असें कळलें. नंतर आम्ही सबंद पायऱ्या उतरून घाटावर आलों. येथून समुद्रापर्यंत सारखे घाटचघाट व त्यांवरील छोटीं छोटीं देवळें व समाधी लागतात. गोमती नदी फार खोल किंवा फार रुंदही नाहीं. यामुळें घाटावर चारपांच पायऱ्या पलीकडे बांधकाम करावें लागलेलें नाहीं. नदीमध्यें बारिक वाळूच होती व ती भरतीची वेळ असल्यामुळें पाणी वाढत होतें. येथला देखावा कांहींसा नाशीकनजीकच्या **त्र्यंबकेश्वराच्या** सारखा दिसतो असें मला वाटलें. या घाटावरून चालत व नदीची शोभा पहात आम्ही थेट समुद्र-कांठाशीं आलों. येथें एक छोटेसें दगडी देऊळ आहे. त्याचे पायऱ्यांवर आम्हीं कांहीं वेळ विश्रांति घेतली. येथून समुद्राच्या धाडधाड करून खडकावर आपटणाऱ्या लाटांची मोठी मौज दिसत होती. तसेंच गोमती नदीच्या पात्रांत भराभर भरतीचें पाणी चढत चाललेलें दिसत होतें त्याचेंही मोठें नवल वाटलें. याप्रमाणें श्रीकृष्णाचें देऊळ व गोमती नदीचा घाट पाहून आम्हीं आल्या वाटेनें गांवांतून परत न येतां समुद्रकिनाऱ्याच्या पाऊलवाटेनें डाक बंगल्यावर आलों तों साडेसात वाजून गेले होते. आठ सव्वाआठाचे सुमारास कामिशनर-साहेबांचा शिपायी आम्हांस नेण्यास आला. आम्हीं लागलीच कमिशनर साहेबांचे बंगल्यावर गेलों. हा बंगला फार प्रशस्त होता व बंगल्याचा

भोजनदिवाणखाना तर केवढा मोठा होता. या बंगल्याचे मोठ्या आवारामध्यें एक विजय-स्तंभ दृष्टीस पडला. निवळ कलेक्टरच्या हुद्याच्या अधिकाऱ्यांचा असा मोठा भव्य बंगला व त्यांतील उंची सामान पाहून आम्ही आश्चर्यचकित झालों. पण मग चवकशी करितां असें कळलें कीं, पूर्वी गव्हरनर जनरलचा एजंट व रीजंट काठेवाड हा मोठा युरोपियन अंमलदार येथें रहात असे. पुढें ओखामंडल हा काठेवाडांतील प्रांत बडोदे सरकारच्या अंमलाखालीं आला तेव्हां रेसिडेंटाची जागा नाहींशी झाली व म्हणून असें सुंदर ठिकाण ओखामंडलाच्य कलेक्टरास राहण्यास मिळूं शकलें. हा बंगला व डाक बंगला हे दोन्ही समुद्रकांठावर असून बंगल्याच्या मागें सपाट खुले लाल रंगाचें सुंदर मैदान आहे. यामुळें समुद्रावरून बाराहि महिने सारखा मंद मंद वारा पुढें पावसाळ्याचे तोंडीं तर सोसायट्याचा वारा सारखा वाहत राहतो. यामुळें हे दोन्ही बंगले द्वारकेमधील अत्यंत हवाशीर ठिकाणें म्हणून प्रसिद्ध आहेत असें कळलें. जयस्तंभ या भागांतील वाघेर लोकांचें बंड मोडणाऱ्या पलटणींतील शिपायांचें स्मारक म्हणून बांधण्यांत आलेला आहे असें समजलें. ओखा मंडळाचे कमिशनर साहेब पुष्कळ बहुश्रुत दिसले. जेवतांना व जेवणानंतर कितीतरी वेळ आमचें नानाविध विषयांवर संभाषण झालें व मग बरीच रात्र झाली म्हणून आम्ही कमिशनरसाहेबांचा निरोप घेऊन व त्यांना शिवरात्र करून डाक बंगल्यावर आलों व लागलीच निद्रादेवीची आराधना केली; सबंद दिवसाच्या दृश्यदर्शनश्रमाच्या तपश्चर्येनें संतुष्ट होऊन निद्रादेवीनें आमच्यावर ताबडतोब अनुग्रह केला व आम्हीं पांच सहा तास गाढ निद्रासुख अनुभवलें.

ता. १६ मे सन १९३५:-आम्हीं सकाळीं समुद्रकिनाऱ्यावर थोडेसे सहल करण्यास गेलों. ओखा बंदराप्रमाणें द्वारकेचा किनारा खडकाळ असल्यामुळें येथें सुद्धां समुद्राचें पाणी स्वच्छ व हिरवट, नीळसर रंगाचें दिसतें. सभोंवारचा तांबडा लाल भूमिभाग, वर अस्मानी

रंगाचें तें आकाश, समुद्राचें तें हिरवट पाणी व उगवत्या सूर्याचे ते केशरी रंगी किरण हा देखावा एकसमयावच्छेदेंकरून दृष्टीस पडल्यामुळें आमचीं मनें प्रसन्न झालीं व आम्हीं सहल संपवून परत आलों व मग तडक टांग्यानें स्टेशनावर आलों व बरोबर साडेनऊ वाजतां आमची आगगाडी चालू झाली. आम्हीं सव्वादहा वाजतां **मिठापूर** स्टेशनला आलों. तेथें आदल्या दिवशीं ठरल्याप्रमाणें मेहेता एंजिनीयरसाहेब आले होते. त्यांच्या मोटारींत बसून आम्हीं **ओखा मिठागर** नांवाचा पांढरें शुभ्र मीठ तयार करण्याचा कारखाना पाहण्यास गेलों. कारखाना स्टेशनपासून फारसा दूर नाहीं. तेव्हां आम्ही तेव्हांच कारखान्यांत आलों. एंजिनीयर मेहता यांनीं आम्हांला रा. **कापिलराम वकील**–मिठाच्या कारखान्याचे म्यानेजिंग डायरेक्टर–यांचे कचेरींत नेलें व तेथें वकीलसाहेबांचा परिचय करून दिला. त्यांचा रसायन शास्त्राचा व विशेषतः मीठ तयार करण्यासंबंधाचा ग्रंथसंग्रह पाहून आम्ही आश्चर्यानें थक्क झालों. आपले नवे कारखाने जर यशस्वी व्हावयाचे असतील तर अशा तऱ्हेच्या त्या त्या कामांतील तज्ञांच्या व्यवस्थेखालीं ते चालले पाहिजेत असें माझ्या मनांत आलें. रा. वकील हे जगभर प्रवास करून आलेले गृहस्थ असून त्यांनीं जगांतील मीठ तयार करण्याचे सर्व कारखाने पाहिलेले असून त्यांनीं "मीठ" या विषयावर एक विस्तृत ग्रंथ लिहिला असून त्या ग्रंथाची दुसरी सुधारलेली व वाढविलेली आवृत्ति तयार करण्यांत ते सध्यां गुंतलेले आहेत असें कळलें. रा. **वकील** यांनीं मीठ तयार करण्याच्या व शास्त्रीय पद्धतींनें व यंत्राच्या साहाय्यानें मीठ पांढरें शुभ्र करण्याच्या सर्व कृति आम्हांला दाखविल्या. वरायेवढाले पांढऱ्या शुभ्र मीठाचे ढीगचे ढीग आम्हीं या कारखान्यांत पाहिले. येथें नुकताच **एपसमसाल्ट** तयार करण्याचा कारखाना काढण्यांत आला आहे तोही कारखाना आम्हीं पाहिला. येथलें बहुतेक मीठ बंगाल्यांत खपतें व बोटी भरभरून ओखा-बंदराहून थेट कलकत्त्यास मीठ जलमार्गानें पाठविण्यांत येतें असें

कळलें. कारखाना पाहून झाल्यावर आम्हीं रा. **वकीलांचे** आभार मानून मोटारीनें **ओखाबंदरास** परत आलों व त्याच दिवशीं सायं-काळीं पुढच्या प्रवासाकरितां मार्गस्थ झालों.

द्वारकेची पूर्वपीठिका फार पुरातन काळपासून चालत आली आहे. काशी, कांची, हरिद्वार, अयोध्या, द्वारका, मथुरा व उज्जयनी या प्रख्यात सात शहरांपैकीं द्वारका आहे यांत शंका नाहीं.

श्रीकृष्णाचें बालपण व तरुणपण मथुरावृंदावन, गोकुळ, या ठिकाणीं यमुनेच्या कांठच्या प्रदेशांत गेलें. **कंसाला** मारून मथुरेचें राज्य श्री-कृष्णानें **उग्रसेनासच** दिलें. **श्रीकृष्ण** व **बलराम** यांचें गोकुळीं राहिल्या-मुळें राहून गेलेलें मौंजीबंधन प्रौढपणीं करण्यांत आलें व ते दोघेजण **उज्जयनीस सांदीपनी** गुरूच्या गृहीं विद्याभ्यासाकरितां गेले. विद्यार्जन करून ते परत येतात तों कंसाचा सासरा **जरासंध** मथुरेवर चाल करून आला. श्रीकृष्ण व बलराम यांनीं यादवांच्या साहाय्यानें **मथुरेचें** उत्तम संरक्षण केलें व म्हणून **जरासंधास** वेढा उठवून परत देशीं जावें लागलें. पण तो अधिक तयारी करून पुन्हा मथुरेवर चाल करून येत आहे असें पाहून व **जरासंधाचा** मथुरेपेक्षां आपल्यावर जास्त रोष आहे हें जाणून **श्रीकृष्ण** व **बलराम** हे मथुरा सोडून कांहीं काळ दाक्षिणेंत जाऊन राहिले. रुक्मिणीच्या स्वयंवराचें प्रसंगीं पुन्हां **जरा-संधाचा** हिरमोड झाला म्हणून या वेळीं कालयवनाची मदत घेऊन मथुरेचा कायमचा नायनाट करण्याच्या इराद्यानें **जरासंध** तिसऱ्यांदा मथुरेवर चाल करून आला. यादवांना नेहमीं होणारा त्रास मनांत आणून श्रीकृष्णानें गुजरात देशाच्या वायव्येस समुद्रवलयांकित असें बेट पाहिलें व तेथें **द्वारका** नगरी स्थापन केली व सर्व यादवांना घेऊन श्रीकृष्ण व बलराम हे द्वारकेंत येऊन तेथें राहूं लागले. श्रीकृष्णाचें पुढील आयुष्य बहुतेक द्वारकेंतच गेलें. अर्थात् पांडवांच्या करितां तो कधीं कधीं हस्तिनापुरास जाई. भारतीय युद्ध झाल्यानंतर

*कांहीं वर्षांनीं यादवांमध्यें आपआपसांत मारामारी होऊन बहुतेक यादव मेले.* या दुःखामुळें **बलराम व श्रीकृष्ण** ही निजधामास गेले. श्रीकृष्णाच्या मरणानंतर द्वारकानगरी समुद्रांत बुडाली. अशी पुराणांत द्वारकेच्या निर्मितीची व तिच्या समुद्र-बुडीची दंतकथा आहे.

हल्लींचीं बेट द्वारका व द्वारका शहर हीं दोन ठिकाणें कधींपासून व कशीं स्थापन झालीं व तेथलीं देवळें हीं किती जुनीं आहेत याबद्दल विश्वसनीय माहिती मिळत नाहीं. हल्लींचीं देवळें फार तर सात आठशें वर्षांचीं असतील असें दिसतें. पण मथुरा व द्वारका यांचीं स्थित्यंतरें कितीही व कशींही झालेलीं असोत, हीं हिंदुस्थानांतील फार पुरातन कालापासून आलेलीं शहरें होत यांत शंका नाहीं.

आतां शेवटच्या प्रकरणांत या शहरांत व या प्रांतांत प्रचलित असलेली कृष्णभक्ति व वैष्णव पंथ यांच्या ऐतिहासिक हकीकतीकडे वळणें बरें.

# प्रकरण १० वें

## कृष्णकथा व वैष्णवपंथ.

मागल्या लेखांत मथुरेंतील व द्वारकेंतील प्रेक्षणीय स्थळांचें वर्णन दिलें. दोनचार दिवस येथें येणारास व वरवर पाहणारास मथुरेची हल्लींची वस्ती, मथुरेंतील देवळें, व इतर प्रेक्षणीय स्थळें जरी अर्वाचीन दिसलीं—व तीं तशीं आहेत—तरी पण पुराणवस्तुसंशोधकांच्या दृष्टीनें मथुरेचें फारच महत्त्व आहे. कारण येथेंच कित्येक फार जुनीं जुनीं नाणीं सांपडलेलीं आहेत. येथेंच खुद्द बुद्धाच्या वेळच्या वस्तु व मूर्ति सांपडलेल्या आहेत, आणि मथुरेंत सांपडलेल्या शिलालेखांनीं व नाण्यांनीं हिंदुस्थानांतील पुरातन इतिहासांतील कांहीं कांहीं दुवे जुळवून आणलेले आहेत. शिवाय फार प्राचीनकाळीं आलेले चिनी प्रवासी फेहेअन व ह्यूएनत्संग हे दोघेही या शहरीं येऊन बरेच दिवस तेथें राहिले होते. व त्यांनीं या शहराचें आपल्या ग्रंथांत वर्णन करून ठेवलेलें आहे यावरून मथुरा हें शहर जरी हिंदुस्थानांतल्या अत्यंत प्राचीन शहरांपैकीं नसलें, तरी त्याचा पुराणत्वांत दुसरा नंबर लागेल, यांत शंका नाहीं. या शहराचा दुसरा एक विशेष हा आहे कीं, काशी व गया या क्षेत्रांप्रमाणेंच हिंदुधर्माच्या लोकांना हें जितकें पवित्रस्थान वाटतें, तितकेंच तें बुद्ध धर्माच्या लोकांनाही पवित्र वाटतें. कारण, स्वतः बुद्ध या नगरींत पुष्कळ दिवस राहिले होते, असा दाखला सांपडतो. ऐतिहासिक काळाच्या मागें जाऊन जर पुराणांकडे पाहिलें तर मात्र एक चमत्काराची गोष्ट दृष्टोत्पत्तीस येते. ती अशी कीं, मथुरा व तिच्याशीं संलग्न अशी कृष्णकथा यांचा मागमूसही महाभारतांत लागत नाहीं. पण मथुरा स्थापनेची कथा रामायणांत मात्र सांपडते.

यमुनेच्या कांठीं ‘ मधुवन ’ म्हणून एक मोठें वन होतें व त्या वनांत ‘ मधुराक्षस ’ राहत असे. त्यानें शंकराला प्रसन्न करून एक यशस्वी शूल मिळविला होता. त्याच्या पश्चात् तो लवण नांवाच्या मधुराक्षसाच्या मुलाच्या ताब्यांत आला. हा लवण राक्षस यमुनातीरवासी तपस्व्यांना फार त्रास देऊं लागला, म्हणून ते श्रीरामचन्द्राकडे अयोध्येस दाद मागण्याकरितां गेले. रामानें शत्रुघ्नास लवणाचें पारिपत्य करण्यास व तेथें राज्य स्थापन करण्यास धाडलें. त्याप्रमाणें शत्रुघ्न तेथें आला व लवणास शूलाखेरीज गांठून त्यानें त्याचा वध केला; व सर्व मधुवन तोडून टाकून यमुनेच्या कांठीं मधुपुर, मधुरा किंवा **मथुरा** म्हणून शहर वसविलें. तेथेंच त्यानें राज्य स्थापन केलें व बारा वर्षांनंतर तो अयोध्येस रामास भेटावयास गेला. कालिदासानें रघुवंशांत इंदुमतीच्या स्वयंवराच्या सहाव्या अध्यायांत ज्याची राजधानी मथुरा यमुनाकांठीं आहे, असा शूरसेनाधिपति सुषेण याला स्वयंवरसभेंत राजांच्या मालिकेंत आणिलें आहे, व त्याच्या वैभवाचें व यमुनानदीच्या प्रदेशाच्या सौंदर्याचें वर्णन केलें आहे. रामायणांतील वरील गोष्टीचा व कालिदासानें दिलेल्या वरील गोष्टीचा मेळ बसत नाहीं. पण कालिदासाच्या कविवर्णनास इतकें महत्त्व देतां येत नाहीं.

इतकें खास कीं, बुद्धाच्या वेळीं हें शहर फारच भरभराटींत होतें; व त्याच्या काळापासूनच तेथें बुद्धधर्माचें प्राबल्य झालें व तें सुमारें सन ७०० वर्षेंपर्यंत कायम राहिलें. खिस्ती शकाच्या सुमारें ५०० व्या वर्षीं फेहेअन हा चिनी प्रवासी मथुरेस आला होता; तेथपर्यंत मथुरेस बुद्धधर्म बराच जोरांत होता. परंतु सन ४०० पासून ७०० पर्यंत त्याचा पूर्ण बींमोड झाला व मथुरा पुनः हिंदु लोकांचें पवित्र स्थान होऊं लागली.

मथुरेंतील सर्वांत जुन्या इमारती म्हणजे बुद्धधर्मीयांचा एक विहार व एक स्तूप या आहेत. या स्तूपांत बुद्धाचीं नखें होतीं. उपगुप्त या नांवाच्या मथुरेच्या राहणाऱ्या अत्यंत पूज्य अशा बुद्धभिक्षूनें हा विहार बांधला व

त्यानेंच अशोक मौर्याला बुद्धधर्माची दीक्षा दिली. याप्रमाणें मौर्य राजांच्या काळीं मथुरा ही फार प्रख्यात नगरी होती असें दिसतें. बुद्धधर्माचा प्रसार-कर्ता अशोक हा बहुधा इसवी शकापूर्वी २३२ च्या सुमारास निवर्तलेला असावा. अशोकानंतर मौर्यवंश आणखी शंभरदीडशें वर्षे चालला. परंतु बृहद्रथ मौर्याचा सेनापति पुष्पमित्र यानें मगधदेशाचें राज्य बळकावलें. इसवी सनापूर्वी १८४ या वर्षापासून संग वंश राज्यपदारूढ झाला. तेव्हां मथुराप्रांत व हें शहर संगवंशाच्या ताब्यांत गेलें. इकडे काबूल व पंजाब येथें ग्रीक राजे राज्य करीत होते. त्यांपैकीं मिलिंद किंवा ग्रीक भाषेंत ज्याला मिनांडर म्हणतात हा फार पराक्रमी निघाला. त्यानें बुद्धधर्माचा स्वीकार केला होता, असें दिसतें. कारण ‘ मिलिंदाचे प्रश्न ’ या नांवाचा बुद्धधर्मातील एक प्रख्यात ग्रंथ आहे. या मिलिंदानें हिंदुस्थानावर स्वारी करून काठेवाड व मथुराप्रांत काबीज केले व तो यमुनाकांठच्या मथुरेंत राहिला होता, असा दाखला सांपडतो. तेव्हांपासून मथुरेच्या आसपासचा मुलूख व तें शहर ग्रीक राजांच्या ताब्यांत गेलें व मथुरेस त्यांच्या वतीनें सेट्रप किंवा क्षत्रप राज्य करूं लागले. हे क्षत्रप पुढें पुढें स्वतंत्र राजे बनले असावे. क्षत्रपांपैकीं सोदास याची थोडीशी माहिती मिळते. हा रजुवलाचा पुत्र होता. हा इसवी सनापूर्वी ७२ च्या सुमारास क्षत्रप झाला. मथुरेंत याच्या नांवाचा व याच्या काळचा एक शिलालेख सांपडलेला आहे. पुढील वर्षासंबंधीं कांहीं माहिती मिळत नाहीं. परंतु काबूल, काश्मीर व पंजाब येथील हिंदुग्रीक राज्य नाहींसें होऊन तेथें दुसऱ्या राष्ट्राचें राज्य झालें, व त्यामध्यें कुशन घराण्यास वर्चस्व आलें. या घराण्यांतील राजांनीं प्रचंड राज्य स्थापून हिंदुस्थानाकडे आपला मोर्चा फिरविला, व उत्तरेकडील बराच भाग आपल्या ताब्यांत आणला. या घराण्यांपैकीं कनिष्क राजाची दिगंत कीर्ति झाली. यानें सुमारें पंचेचाळीस वर्षें राज्य केलें. याच्या वेळचीं नाणीं मथुरेस व उत्तरहिंदुस्थानांत अतोनात सांपडलीं आहेत, व त्या नाण्यांवरून त्याच्या राज्याचा विस्तार व वाढ यांची कल्पना होते. तसेंच कनिष्काची राज-

धानी पुरुषपुर—अर्वाचीन पेशावर—ही होती. परंतु त्यानें खुद्द पाटली-पुत्रावर हल्ला केला. याच्या पहिल्या पहिल्या नाण्यांत ग्रीक देवता व विशेषत: सूर्य व चंद्र यांचीं चित्रें आहेत, व भाषा ग्रीक आहे. पुढील नाण्यामध्यें ग्रीक अक्षरें मात्र आहेत. भाषा परशियन आहे. ग्रीक, हिंदु व परशियन देवतांच्या मूर्ति आहेत. शेवटच्या नाण्यांवर बुद्ध शाक्य-मुनीची मूर्ति आहे. यावरून कनिष्कानें शेवटीं बुद्ध धर्म स्वीकारला होता असें दिसतें. कनिष्कानें इसवी सन ७८ ते १२३ पर्यंत राज्य केलें असावें. त्याचा मुलगा हुविष्क अगर हुष्क हा त्याच्यामागून गादीवर आला. यानें मथुरेस फार मोठ्या विहाराची स्थापना केली व त्याला आपलें नांव दिलें. याच्यानंतर वसुष्क अगर जष्क हा गादीवर आला. यालाच वासुदेव म्हणत असत. या नांवावरून या राजावर हिंदुधर्माचा पगडा बसत चालला असें दिसतें. याच्या नाण्यावर त्रिशूलधारी नंदीवर बसलेल्या शिवाचें चित्र आहे. या राजाच्या वेळचे कांहीं शिलालेख मथु-रेस सांपडले आहेत. या राजानेंही पंचवीस वर्षे राज्य केलें, असें नाण्यां-वरून दिसतें. मथुरेसंबंधीं विचार करतां या कुशन घराण्याच्या कार-कीर्दीत मथुरा हें शहर फार भरभराटींत होतें यांत शंका नाहीं. येथें बुद्ध व जैनधर्मी व्यापारी फार होते, व त्यांनीं दिलेल्या देणग्यांचे शिलालेख येथें पुष्कळ सांपडले आहेत. संस्कृतांतील प्रसिद्ध ग्रंथ **पंचतंत्र** याच्या प्रारंभींच दाक्षिणेंतील महिलरोप्य या शहरांतून आपल्या बैलगाडींत माल भरून मथुरेस जाणाऱ्या गाड्यांच्या तांड्याला जाऊन मिळणाऱ्या वर्ध-मानक नांवाच्या वाण्याच्या मुलाची गोष्ट आहे. मथुरेस पोंचल्यावर त्याचा एक बैल यमुनेंत नदीच्या तीराला गेला व चिखलांत बुडून मेला, अशा प्रकारचें वर्णन आहे. यावरूनही मथुरेची व्यापाराकरितां त्या वेळीं प्रख्याति होती असें दिसतें. कनिष्क राजाच्या वेळचे ७१ शिलालेख सांपडले आहेत. त्यांतले खुद्द मथुरेंत ४२ सांपडले आहेत. या शिलालेखां-वरून व मथुरेंत सांपडलेल्या दुसऱ्या इमारतींच्या भागांवरून, तसेंच कठडे, मूर्ति वगैरे गोष्टींवरून कुशन कारकीर्दीत व त्याच्यापुढें बरींच

शतकें मथुरा शिल्पकलेकरितां प्रसिद्ध होतें, व मथुरेची शिल्पपद्धति म्हणून एक शिल्पपद्धति होती असें दिसतें. तिच्यावर ग्रीक शिल्पाचा परिणाम झाला होता. तरी पद्धति पूर्णपणें हिंदू होती. या कलेचा ऱ्हास सहाव्या शतकांत झाला.

इसवी सनाच्या ३२० च्या सुमारास पाटलीपुत्रास प्रसिद्ध गुप्त घराणें उदयास आलें. चंद्रगुप्त हा पहिला राजा झाला. त्याचा मुलगा समुद्रगुप्त हा फारच पराक्रमी निघाला, व त्यानें सर्व गंगेच्या कांठचा मुलूख आपल्या ताब्यांत आणला व दक्षिणेपर्यंत राजांना मांडलिक केलें. या गुप्तघराण्याचें साम्राज्य बंगालच्या उपसागरापासून तों थेट सिंधूनद व काठेवाड येथपर्यंत सर्व उत्तरहिंदुस्थानभर झालें. अर्थात् मथुरा व मथुराप्रांत गुप्त राजांच्या ताब्यांत आला. याच काळीं चिनी प्रवासी **फहेहन** हा हिंदुस्थानांत आला होता. तो तिबेटांतून निघून काश्मीर, काबूल कंदाहार व पंजाबमधून मध्य-हिंदुस्थानांत आला, व मथुरेंत एक महिना राहिला, मथुरा शहरांत व त्याच्या आसपास एकंदर वीस विहार होते, व त्यांत तीन तीन हजार बुद्ध भिक्षु रहात असत; तसेंच येथें सहा स्तूप होते, असें त्यानें लिहून ठेविलें आहे. यावरून मथुरेस अजून बुद्धधर्माचें पुष्कळ प्राबल्य होतें असें दिसतें. परंतु इसवी सनाच्या ५०० च्या सुमारास हूण लोकांच्या स्वाऱ्या हिंदुस्थानावर होऊं लागल्या, व त्यांनीं गुप्तघराण्याचें साम्राज्य मोडून टाकलें. परंतु पुढें हूणांची सत्ता फार दिवस टिकली नाहीं. ठाणेश्वराच्या हर्षवर्धनानें मोठें साम्राज्य स्थापिलें, परंतु त्याच्या पश्चात् त्याचाही नायनाट झाला, व सन ७०० पासून १०२४ पर्यंत कनोजच्या घराण्याचें साम्राज्य चालू झालें. सुमारें ७०० पासून मथुरेंतून बुद्ध व जैनधर्म पार नाहींसा झाला व मथुरा हें कृष्णाच्या भक्तीचें मोठें स्थान झालें, व तेव्हांपासून तें हिंदु लोकांचें काशीप्रमाणेंच फार मोठें पवित्र स्थान बनलें; व म्हणून मुसलमानी स्वाऱ्या येऊं लागल्यापासून सोमनाथाप्रमाणें मथुरा हेंही एक मुसलमानांचें मोठें छलस्थान

चनलें. सर्व मुसलमानी अंमलांत मथुरेची अवस्था मोठी कठीण होती. कारण, आग्रा व दिल्ली या दोन मुसलमानी राजधान्या बनल्यामुळें मथुरा या हिंदु पवित्र स्थानाची स्थिति कात्रीच्या दोन पातींत सांपडल्याप्रमाणें हुबेहुब झाली.

गिझनीच्या महमदानें हिंदुस्थानावर पहिली स्वारी १००१ मध्यें केली. त्यानें एकंदर बारा स्वाऱ्या केल्या, हें इतिहासज्ञांस महशूरच आहे. त्यांपैकीं नववी स्वारी त्यानें १०१७ मध्यें केली. या स्वारींत त्यानें मथुरा शहर लुटलें व तेथलीं हिंदु देवळें उध्वस्थ केलीं. या लुटीमुळें शहराची फारच नासाडी झाली. पुढें अकबराच्या काळापर्यंत या शहराची फारशी माहिती मिळत नाहीं. परंतु मुसलमानी धर्मवेड्या राजांचा हिंदुधर्माचें एक ठिकाण म्हणून या शहरावर नेहमीं डोळा असे; यामुळें शहराची भरभराट होऊं शकली नाहीं. परंतु अकबराच्या कारकीर्दींतिल सहिष्णुतेच्या धोरणानें मथुरा व वृंदावन या शहरांना पुन्हां धार्मिक महत्त्व आलें व त्या शहराची व तेथील गोसाव्यांची कीर्ति इतकी वाढली कीं, अकबराला त्यांना भेटण्याची इच्छा झाली. व अकबराचे डोळे बांधून त्याला वृंदावनांतील अत्यंत पवित्र अशा तुळशीवृंदावनाच्या राजीमध्यें आणिलें, व तेथील आश्चर्यकारक देखावा पाहून त्या स्थानाच्या पवित्रपणाबद्दल अकबराची खात्री झाली. या गोष्टींचें स्मारक म्हणून तेथील लोकांनीं बादशहाच्या परवानगीनें गोविंददेव, गोपीनाथ, युगलकिशोर व मदनमोहन या नांवानें प्रसिद्ध असणारीं देवळें बांधलीं. जरी हीं शहरें व हा प्रांत मोंगलांच्या ताब्यांत होता, तरी औरंगझेबापर्यंत या शहराला त्रास पोंचला नाहीं. परंतु औरंगझेबाच्या कारकीर्दींत मात्र या पवित्र स्थानाचा फार छळ झाला. औरंगझेबाचा थोरला मुलगा मथुरा शहरांत जन्मला व त्यानें राज्यावरील आपला हक्क मथुरेमध्यें प्रथमतः जाहीर केला. मथुरेस एक मुसलमान अधिकारी नेमला गेला. यानें हल्लीं मथुरेंत असलेली प्रसिद्ध मशीद बांधली. येथें जाट लोकांचें

बंड झालें. औरंगझेबाला आपल्या हिंदुधर्माविरुद्ध मोहिमेस ही एक आणखी बरी सबब झाली असें वाटलें. त्यानें स्वतः मोठ्या सैन्यानिशीं मथुरेस येऊन मथुरा व वृंदावन येथील उत्तम उत्तम देवळें पाडलीं. विशेषतः त्याचा डोळा केशवदेव या फार पवित्र मानलेल्या देवळावर होता. तें देऊळ पार पाडून त्याच्याच पायावर औरंगझेबानें मोठी मशीद बांधविली. औरंगझेबाचें धर्मवेड इतकें वाढलें कीं, त्यानें मथुरा-वृंदावन हीं नांवेंच इतिहासांतून नाहींशीं करण्याचा बेत केला. मथुरेला कागदोपत्रीं इसलामाबाद व वृंदावनास मुमीनाबाद अशीं नांवें ठेवलीं. परंतु ज्याप्रमाणें औरंगझेबाच्या पश्चात् मोंगलांचा अंमल नामशेष झाला, त्याप्रमाणें या शहरांचीं हीं नांवेंही कागदोपत्रींच राहिलीं. औरंगझेबाच्या पश्चात् जाट व मराठे यांनीं आग्र्यादिल्लीपर्यंतच्या मुलखावर आपलें वर्चस्व स्थापलें व त्यामुळें कांहीं दिवस मथुराप्रांत जाटांच्या ताब्यांत होता, तर कांहीं दिवस मराठ्यांच्या ताब्यांत होता. पुढें इंग्रजांचीं व मराठ्यांचीं उत्तर हिंदुस्थानांत पुष्कळ वेळां युद्धें झालीं व मथुराप्रांत १८५० मध्यें इंग्रजांच्या ताब्यांत आला. १८५७ सालच्या बंडाच्या वेळीं मथुरेसही या बंडाचा थोडाफार प्रादुर्भाव झाला होता. परंतु तथल्या मुख्य शेटजीच्या घराण्याच्या राजनिष्ठेमुळें मथुरेचा बराच बचाव झाला, व मथुरा शहराला फारसें कडक प्रायश्चित्त भोगावें लागलें नाहीं. तेव्हांपासून या शहराची भरभराट होत आहे.

आतां मथुरावृंदावनासंबंधीं एका गोष्टीचा विचार करावयाचा राहिला. तो हा कीं, मथुरावृंदावन आणि कृष्णजन्म व कृष्णलीला यांचा आपल्या पुराणाप्रमाणें जो फार निकट संबंध मानिला आहे, व म्हणून मथुरा हें राधाकृष्णाच्या भक्तिपंथाचें जें फार मोठें पवित्र स्थान मानिलें आहे, या गोष्टी कितपत खऱ्या आहेत ? माझ्या बाळपणापासून कृष्ण-जन्माच्या व कृष्णलीलांच्या कथा मला चिरश्रुत असल्यामुळें मला मथुरावृंदावन पाहण्याची विलक्षण जिज्ञासा होती. परंतु प्रत्यक्ष मथुरेंतील पवित्र स्थानें पाहून, तसेंच त्यांचें व तेथील देवळांचें अर्वा-

चीनत्व पाहून, माझी फार निराशा झाली, व हल्लींचें मथुरा शहर व हल्लींची कृष्णभक्ति हीं बरींच अर्वाचीन असावीं अशी माझी कल्पना झाली. म्हणून यासंबंधानें मी चवकशी करूं लागलों. तों मला समजलें, कीं, माझे पूज्य गुरुवर्य डॉ० सर रामकृष्ण भांडारकर यांनीं वैष्णव पंथाच्या उदयाबद्दल एक ग्रंथ लिहिला असून तो जर्मनीमध्यें छापला जात आहे.* त्यांत कृष्णाची कथा व कृष्णभक्ति यांची उत्पत्ति व वाढ यांचा इतिहास सांगितला आहे; म्हणून मीं डॉक्टरसाहेबांकडे जाऊन त्या ग्रंथाची एक हस्तलिखित प्रत मागून घेतली. डॉक्टरसाहेबांनीं ती मोठ्या आनंदानें मला दिली व त्यांतील माहितीचा उपयोग करण्याची परवानगी दिली. याबद्दल मी डॉक्टरसाहेबांचा फार ऋणी आहें. या पुढील मजकुरांत त्यांच्या ग्रंथांतील पुष्कळ माहितीचा उपयोग केलेला आहे, हें निराळें सांगावयास नकोच.

कृष्णचरित्राबद्दल आपण विचार करूं लागलों, म्हणजे कितीतरी गोष्टींबद्दल शंका उत्पन्न होतात. प्रथमतः ही चमत्काराची गोष्ट वाटते, कीं, महाभारतामध्यें जो सूत्रधार वाटतो, महाभारतांतील प्रचंड युद्धामध्यें ज्याच्या कारस्थानाला एक प्रकारें प्रमुख स्थान मिळालें आहे, त्या कृष्णाची जन्मकथा व त्याच्या बालपणाच्या आयुष्याची हकीकत महाभारतांत कोठेंही दिसत नाहीं. शांतिपर्वाच्या नारायणीय प्रकरणांत कृष्णाच्या अवताराचा व कंसवधाचा भविष्यकाळीं होणाऱ्या गोष्टींप्रमाणें मात्र उल्लेख आहे. कृष्णजन्म व त्याचा बालपणाचा गोकुळांतील वास व तेथील गोपींशीं त्याची क्रीडा, वगैरे भाग सविस्तरपणें हरिवंशांत व भागवतांत मात्र दिसून येतात. परंतु हे ग्रंथ महाभारतापेक्षां बरेच अर्वाचीन आहेत. तसेंच भगवद्गीतेंतील उदात्त तत्त्वज्ञान शिकविणारा, महाभारतांतील राजकारस्थानांत गुंतलेला, व केव्हां केव्हां कुटिल नीतीनें कां होईना, परंतु सत्पक्षाच्या बाजूनें भांडणारा कृष्ण, व सोळा सहस्र बायका अस-

---

* हा ग्रंथ वैष्णव, शैव व इतर धार्मिक पंथ यांचा इतिहास म्हणून आतां प्रसिद्ध झाला आहे.

णारा, गोपींशीं अनिर्बंध व्यवहार करणारा, अत्यंत विलासी व विषयलंपट असा गोकुळींचा कृष्ण हे एकच असावे कीं नाहीं याबद्दल शंका येते. थिऑसॉफिकपंथी लोकांनीं गोपींच्या व्यवहाराला कितीही आध्यात्मिक स्वरूप दिलें असलें तरी हा मागूनचा विचार आहे, यांत शंका नाहीं.या सर्व शंकांचें निरसन डॉ. सर भांडारकरांनीं काढलेल्या कल्पनेनें उत्तम तऱ्हेनें होतें. डॉक्टर भांडारकरांचें म्हणणें असें आहे कीं, हल्लीं जी कृष्णाच्या आयुष्याची गोष्ट हरिवंशांत व भागवतांत दिसते, ती दोन गोष्टींच्या भेसळीनें झालेली आहे. विशेषतः भगवद्गीतेचा कृष्ण व गोकुळींचा कृष्ण या दोन निरनिराळ्या व्यक्ति असाव्या. पहिलीला त्यांनीं वासुदेवकृष्ण व दुसरीला गोपालकृष्ण म्हटलें आहे. कृष्णाला कृष्ण हें नांवही मागाहून मिळालेलें दिसतें. मूळचें नांव वासुदेव हेंच असावें. या यादवकुळांतील वृष्णिवंशांत उत्पन्न झालेले वासुदेव व बलदेव या नांवानें प्रसिद्धीस आलेले दोन क्षत्रियकुमार असावे, त्यांनीं आपल्या मामाला मारून मथुरेचें राज्य मिळविलें असावें, व पुढें कालयवन या नांवाच्या म्लेंच्छ राजानें मथुरेवर स्वारी केली असावी, व म्हणून त्यांना मथुरा सोडून द्वारकेस जावें लागलें असावें. अशा प्रकारची ऐतिहासिक पुरुषांची मूळची गोष्ट असावी, व पुढें या पुरुषांना देवाचे अवतार असें मानण्यांत आलें असावें, व मग **वासुदेवभक्ति** सुरू झाली असावी. कृष्णाच्या जन्माची कथा व त्याचा गोकुळांतील वास या गोष्टी आबालवृद्धांना ठाऊकच आहेत. तेव्हां त्यांची तेथें पुनरुक्ति करण्याची गरज नाहीं. परंतु ही एक ऐतिहासिक घडलेली गोष्ट असावी, अशाबद्दल पालीभाषेंतही दाखला सांपडतो. ऐकीव गोष्टीमध्यें ज्याप्रमाणें थोडाफार फरक होत जातो, तेवढाच फरक या दोन गोष्टींत दिसून येतो. पालींतील या गोष्टीला **घटजातक** म्हणतात. ती गोष्ट थोडक्यांत अशी आहे:—

पूर्वीं एकदां उत्तरापथ देशांत कंस प्रांतांत असितंजना नांवाचें शहर होतें. तेथें महाकंस नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याला कंस आणि उपकंस या नांवाचे दोन मुलगे व देवगब्भा नांवाची एक मुलगी झाली.

मुलीच्या जन्मकालीं ब्राह्मणांनीं ' या मुलीच्या पोटीं झालेल्या पुत्रांपासून कंसकुलाचा नाश होईल. ' असें भविष्य वर्तविलें. राजाला मुलगी प्रिय असल्यामुळें त्याच्यानें तिला मारवलें नाहीं. आपले मुलगे काय पाहिजे तें करोत, असें म्हणून तो मेला. त्याच्यानंतर कंस राज्यावर आला व उपकंस एका प्रांताचा अधिकारी झाला. आपल्या बहिणीस ठार मारल्यास आपल्याबद्दल फार गवगवा होईल, असें जाणून त्यानें तिला अविवाहित ठेवण्याचा विचार करून व तिच्याकरितां एक वाटोळा मनोरा तयार करून त्यांत तिला कोंडून ठेविलें. नंदगोपा व तिचा पति अंधकवेणू हीं देवगर्भेच्या तैनातीस होतीं. उत्तरमथुरेंत महासागर या नांवाचा राजा होता. त्याला सागर व उपसागर नांवाचे दोन मुलगे होते. महासागराच्या पश्चात् सागर राज्यावर आला व उपसागर एका प्रांताचा अधिकारी झाला. उपकंस व उपसागर यांची फार मैत्री होती. उपसागरानें सागराच्या राणीमहालांत कांहीं खटपट केली, व ती उघडकीस आल्यावरून उपसागरास तेथून हांकलून देण्यांत आलें. तो उपकंसाच्या प्रांतांत आला. उपकंसानें आपल्या मित्राची राजाशीं ओळख करून दिली. राजाच्या भेटीला जात असतां त्यानें तो मनोरा पाहिला, व त्याबद्दल हकीकत विचारली; आणि देवगर्भेबद्दल हकीकत कळल्यावर तिच्यावर त्याचें प्रेम जडलें. एके दिवशीं देवगर्भेनें राजाकडे जातांना उपसागरास पाहिलें व तिनें त्याच्याबद्दल नंदगोपेजवळ चवकशी केली; व हा महासागराचा मुलगा आहे असें समजल्यावर तिचेंही त्याच्यावर प्रेम जडलें. उपसागरानें नंदगोपेजवळ देवगर्भेला भेटण्याबद्दल गोष्ट काढली, व तिनें दोघांची मनोऱ्यांत एकांतांत गांठ घालून दिली. पुढें देवगर्भेला गर्भ राहिला, ही गोष्ट कंसाच्या कानांवर गेली. देवगर्भेला क्षमा करण्याचें वचन घेऊन नंदगोपेनें खरा प्रकार त्या दोघां भावांना सांगितला. तो ऐकिल्यावर भावांनीं विचार केला कीं, आपल्या बहिणीला आपल्याला मारतां येत नाहीं; हिला मुलगी झाली तर बरेंच; मुलगा झाला तर मारूं असें म्हणून त्यांनीं देवगर्भेचा उपसागराशीं विवाह करून दिला. पूर्ण

दिवस झाल्यावर देवगम्भा कन्यारत्न प्रसवली. त्या भावांना आनंद झाला. मुलीचें नांव अंजना ठेऊन त्यांनीं देवगम्भा व उपसागर यांना गोवर्द्धमान नांवाचें खेडें रहाण्यास दिलें, व तेथें तीं आनंदानें राहूं लागलीं. देवगम्भा पुन्हां गरभार राहिली व त्याच वेळीं नंदगोपाही गरभार राहिली. पूर्ण मास झाल्यावर एके दिवशीं देवगम्भेला मुलगा व नंदगोपेला मुलगी झाली. आपल्या मुलाला आपले भाऊ मारतील या भीतीनें देवगम्भेनें गुप्तपणें आपला मुलगा नंदगोपेकडे पाठविला, व तिची मुलगी आपल्याकडे आणविली. याचा त्या भावांना मागमूसही लागला नाहीं. याप्रमाणें देवगम्भेस दहा मुलगे झाले व नंदगोपेस दहा मुली झाल्या. देवगम्भेचे मुलगे अंधकवेणूच्या घरीं वाढत चालले. हे मुलगे मोठे बलवान निपजले. त्यांच्यापैकीं पहिल्या दोघांचीं नांवें वासुदेव व बलदेव अशीं होतीं. हे मुलगे मोठे झाल्यावर खेड्यांतील लोकांशीं दांडगाईनें वागूं लागले. आणि त्यांच्या मालमत्तेची लुटालूट करूं लागले. याबद्दल कंसाकडे तक्रार नेण्यांत आली. राजानें अंधकवेणूस बोलावून मुलांच्या अत्याचाराबद्दल त्याची कानउघाडणी केली. आणखी एकदोनदां तक्रार आल्यामुळें राजानें अंधकवेणूस मरणाची भीति घातली. अंधकवेणूनें राजाकडून अभयवचन घेऊन हे मुलगे आपले नव्हेत, हे देवगम्भेचे मुलगे आहेत, असें सांगितलें. राजानें आपल्या मंत्र्यांना विचारलें, “ आतां यांना कसें धरावें ? ” मंत्र्यांनीं सांगितलें, “ ते मोठे मल्लयोद्धे आहेत, तेव्हां शहरांत मल्लयुद्धाचा आखाडा तयार करावा व ते आले म्हणजे त्यांना पकडून ठार करावें. ” राजानें त्यांच्या सांगण्याप्रमाणें शहरांतील चाणूर व मुष्टिक या दोघां मल्लयोध्यांना आपला बेत कळविला व “ आजपासून सात दिवसांनीं मल्लयुद्धाचा खेळ होईल,” म्हणून सर्व शहरांत द्वाही फिरविली, व आपल्या राजवाड्यासमोर प्रचंड आखाडा तयार करविला. लोकांच्या झुंडीच्या झुंडी पाहण्यास जमल्या. वासुदेवबलदेवप्रभृति सर्व बंधु त्या खेळाला आले. वाटेंत त्यांनीं शहरांतील शिंप्यांपासून, माळ्यांपासून, गंध्यांपासून कपडे, माळा व सुगंधी सामान हिसकावून घेऊन तें अंगावर घालून ते आखा-

ड्यांत येऊन सज्ज झाले. चाणूर व मुष्टिक हे मल्लयोद्धेही आखाड्यांत आले इतक्यांत बलदेवानें एक दोरी घेऊन ती चाणूराच्या कमरेभोंवतीं गुंडाळून ती दोरी घट्ट आवळून त्यानें चाणूरास पटकन् उचलून गरगर फिरविलें व त्याला जमिनीवर आपटलें व मग आखाड्याच्या बाहेर फेंकून दिलें. नंतर मुष्टिक आला. त्यालाही बलदेवानें मुष्टिप्रहार केला. "मी मल्ल-योद्धा नाहीं!" असें तो ओरडूं लागला. "मल्लयोद्धा अस अथवा नस मला सारखेंच आहे!" असें म्हणून बलदेवानें त्यालाही जमिनीवर आपटून त्याचा प्राण घेतला. मुष्टिक मरतां मरतां म्हणाला, "मी भूत होऊन यांचा घात करीन." इतकें झाल्यावर राजा म्हणाला, "या दहा जणांना येथून घेऊन जा." इतक्यांत वासुदेवानें त्या दोघां भावांवर एक चक्र फेंकलें व त्याच्या योगेंकरून त्यानें दोघां भावांचीं डोकीं उडविलीं.

याप्रमाणें आपल्या मामांना मारून त्या भावांनीं तेथलें राज्य मिळविलें व आपल्या मातापितरांना असितंजना शहरीं आणिलें. पुढें त्यांनीं सर्व हिंदुस्थान जिंकण्याचा बेत केला. ते कालसेन राजाच्या अयोध्या शहरीं आले व राजाचा पराभव करून त्यांनीं तें राज्य मिळविलें. पुढें ते द्वारावतीस आले. त्या शहराच्या एका बाजूस समुद्र व दुसऱ्या बाजूस पर्वत होता व त्या शहरांत एक भूत होतें; कोणी शत्रु आल्यास तें भूत गाढवाचें रूप घेऊन ओरडत असे, आणि असें झालें म्हणजे ती द्वारा-वती हवेंत उडून जाऊन समुद्रांतील एका बेटावर जाई, व शत्रु परत गेल्यावर परत आपल्या जागेवर येई. यामुळें तें शहर काबीज करणें अशक्य होतें; म्हणून ते बंधु कण्हदीपायनाकडे गेले. त्यानें त्यांना त्या गाढवाला प्रसन्न करण्याची युक्ति सांगितली, व गाढवानेंही शहराच्या चार द्वारांजवळ चार लोखंडी खांब पुरून त्यांना चार लोखंडी नांगर साखळदंडांनीं बांधाल, तर मी ओरडलों तरी शहर उडणार नाहीं, असें सांगितलें." बंधूनीं सांगितल्याप्रमाणें केलें व म्हणून शहर त्यांच्या ताब्यांत आलें.

क्रमाक्रमानें त्यांनीं सर्व हिंदुस्थान जिंकलें व सर्व राज्याचे दहा भाग करून त्यांनीं आपसांत वांटून घेतले. ते बहिणीला विसरले होते, परंतु शेवटच्या भावानें आपला वांटा त्या बहिणीस देऊन तो व्यापार करून आपलें पोट भरूं लागला. या सर्व भावांना पुढें पुत्रपौत्र झाले. एकदां वासुदेवाचा पुत्र वारला. त्यामुळें त्याला अत्यंत दुःख झालें व तें आवरेना, परंतु घटपंडित म्हणून त्या भावांपैकीं जो शहाणा भाऊ होता, त्यानें अशक्य गोष्टींबद्दल शोक करणें बरें नव्हे, असें आपल्या भावाच्या मनांत बिंबवून त्याचें दुःख नाहींसें केलें.

पुष्कळ काळानंतर एकदां या भावांच्या पुत्रांना वाटलें, "कण्हदीपायन ( कृष्णद्वैपायन ) यांना दिव्यदृष्टि आहे असें म्हणतात. तर त्यांची आपण परीक्षा करूं या." तेव्हां त्यांनीं एका तरुण मुलास बायकोचा वेष देऊन त्याच्या पोटावर उशी बांधून त्याला गरभार बाई बनविलें, व कण्हदीपायनापुढें त्याला उभें करून "ही बाई बाळंत केव्हां होईल ?" म्हणून विचारलें. कण्हदीपायनानें अन्तर्दृष्टीनें पाहिलें, कीं, दहा भावांचा नाश समीप आला आहे, व आपणही आजच मरणार. तेव्हां तो म्हणाला, "आजपासून सातवे दिवशीं या मनुष्याला एक खदीर झाडाची गांठ मूल होईल. व ती गांठ जरी तुम्ही जाळून तिची राखरांगोळी केलीत, तरी ती वासुदेवाच्या कुळाचा नाश करील."

या म्हणण्याबद्दल त्या साधूची थट्टा करून त्या मुलांनीं कण्हदीपायनास फांस घालून ठार केलें. भावांना जेव्हां हें वर्तमान कळलें तेव्हां ते घाबरले व त्यांनीं त्या बायकोचें सोंग दिलेल्या पुरुषावर पहारा ठेवून जेव्हां तो ती खदीराची गांठ प्रसवला, तेव्हां ती गांठ त्यांनीं जाळून त्याची राख नदींत फेंकून दिली; पण ती राख मागच्या एका फाटकाजवळ अडकून राहिली व तेथें लव्हाळे उगवले.

एके दिवशीं सर्व, भावांना जलक्रीडा करण्याची इच्छा झाली म्हणून त्यांनीं मोठा मंडप तयार करून ते मागच्या फाटकाला आले. तेथें ते

यथेच्छ खाल्ले—प्याले व आपआपसांत दोन टोळया करून धिंगामस्ती करूं लागले व हातघाईवर आले. एकानें एक लव्हाळा मोडला. परंतु त्या लव्हाळयाचें लागलेंच एक मुद्गल बनलें व याप्रमाणें सर्वांच्या हातांत मुद्गल झाले व ते एकमेकांना ठार करूं लागले. शेवटीं वासुदेव, बलदेव, त्यांची बहीण अंजना व एक उपाध्याय इतकी मंडळी राहिली. ते एका रथांत बसून पळून गेले. ते कालमरीका या वनांत गेले. तेथें मुष्टिक भूत होऊन राहिला होता. त्यांना पाहण्याबरोबर त्या भुतानें तेथें एक खेडें बनवून आपण मल्लयोद्धा होऊन पुढें आला. बलदेवानें त्याच्याशीं युद्ध खेळण्याकरितां रथाखालीं उडी टाकली. त्या भुतानें बलदेवास आपल्या मुठींत धरून त्याचा प्राण घेतला. बलदेवाचा मृत्यु पाहून, वासुदेव बाकी दोघांसह रथांत बसून, तसाच पुढें गेला व एका खेडेगांवीं आला. तेथें तो एका झुडुपांत विश्रांतीकरितां थांबला. त्यानें आपल्या बहिणीला व उपाध्यायाला अन्न आणण्यास गांवांत पाठविलें. इकडे झुडुपांत हालचाल पाहून जरा या नांवाच्या शिकाऱ्यानें एक बाण मारिला. तो वासुदेवाच्या पायाला लागला. जरेनें जखम केली म्हणजे मनुष्य जगत नाहीं. या म्हणीप्रमाणें आपण आतां मरणार असें वासुदेवास वाटलें, व त्यानें मी आतां मरणार असें आपल्या बहिणीस सांगून व तिच्या व उपाध्यायाच्या उपजीविकेकरितां त्यांना एक विद्या शिकवून वासुदेवानें प्राण सोडला.

ही गोष्ट हरिवंश व भागवत यांतील गोष्टीशीं पुष्कळ तऱ्हेनें जमते, हें वाचकांच्या तेव्हांच लक्षांत येईल. या गोष्टींत जरी नंदगोपा हें नांव आलेलें आहे, तरी गोकुळांतील गोष्टीचा यांत फारसा संबंध नाहीं, असें दिसून येईल. या गोष्टींत कृष्ण हें नांवही नाहीं. वासुदेव व बलदेव किंवा त्याचें दुसरें नांव संकर्षण हीं नांवें मात्र फार जुनीं आहेत.

वासुदेव या शब्दाचा पाणिनीनें व पतंजलीनें पूजार्ह असा अर्थ दिला आहे. यावरून वासुदेवाची भक्ति फार जुनी दिसत आहे. यदुवंशांतील वासुदेव व बलदेव यांना त्यांच्या पश्चात् लवकरच अवतार मानूं लागले असावेत. वासुदेव व संकर्षण व त्यांनीं स्थापिलेला भागवतधर्म यांचा

उल्लेख ख्रिस्ती शकापूर्वी २०० वर्षांपूर्वीच्या शिलालेखांत आहे. तसेंच मौर्य घराण्याचा पहिला राजा चंद्रगुप्त याच्या कारकिर्दींत मेगास्थेनीस म्हणून एक मॅसिडोनियाचा वकील चंद्रगुप्ताच्या दरबारीं आला होता. त्यानें मथुरा व यमुना यांचा व भागवतधर्माचा आपल्या ग्रंथांत उल्लेख केला आहे. भागवत हा धर्म सातवत या लोकांमध्यें प्रचलित होता. हा एकेश्वरी धर्म असून भक्ति किंवा देवावर अनन्यभावेंकरून प्रेम करणें, हें या धर्माचें मुख्य अंग होतें. या धर्माला यज्ञ करणें व यज्ञामध्यें पशु मारणें पसंत नव्हतें. हाच धर्म शांतिपर्वांत नारायणीय प्रकरणांत नारायणानें वसुउपचार या राजाला प्रथम सांगितला असें म्हटलें आहे. पुढें वासुदेव व नारायण हे एकच आहेत व ते देवाधिदेव आहेत, असा समज झाला. वासुदेव हा विष्णूचा अवतार होय, असें लोक मानावयास लागले. यावरून ख्रिस्ती शकाच्या ४०० वर्षांपूर्वींपासूनचा हा भागवत-धर्म आहे, असें दिसतें. वासुदेवाला कृष्ण हें नांव पुढें मिळालें. कृष्ण हें गोत्राचें नांव असतें, व त्यावरून काष्र्यायन असा त्या गोत्रांतला अशा अर्थी शब्द झाला. कृष्ण हें ऋग्वेदांतील मंत्रद्रष्ट्या ऋषीचें नांव आहे. तो अंगिरस गोत्रापैकीं होता. पुढें वासुदेवाला कृष्ण म्हणूं लागले असावे. तेव्हां या देवाचें नांव वासुदेव-कृष्ण असें झालें. हा धर्म बौद्धधर्माइतकाच जुना आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. ख्रिस्ती शकानंतर अभीर म्हणून एक जातीचे लोक हिंदुस्थानांत आले*. हे गोपाळवृत्ति लोक होते. हे गुरेंढोरें ठेवून नेहमीं चारा मिळेल तिकडे फिरत असत अजूनही

*अभीर हे ख्रिस्ती शकापूर्वींच हिंदुस्थानांत आले असावेत, असें नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या ' इंडियन अँटिक्वेरी ' च्या अंकांतील एका लेखांत दाखविण्यांत आलें आहे व मनुस्मृतींतही अभीरांचा उल्लेख आहे. त्यावरून हें विधान खरें ठरतें. तरी पण या दाखल्यानें डॉ० भांडारकर यांचा मुख्य मुद्दा जो कृष्ण-कथेंत दोन कथांची भेसळ आहे हा खोटा ठरत नाहीं. त्याचा काळ ख्रिस्ती शकाच्या पूर्वी येतो इतकेंच.

उत्तर हिंदुस्थानांत अहीर नांवानें हे प्रसिद्ध आहेत. या लोकांनीं गवळ्याच्या लहान बालदेवाच्या दैवी पराक्रमाची एकादी गोष्ट आपल्या बरोबर आणली असावी, व अभीर लोकांचा मथुरेस व इतरत्र प्रसार झाल्यावर व त्यांना राजकीय वर्चस्व आल्यावर मूळचा वासुदेवकृष्ण व हा अभीरांचा गोपालकृष्ण व त्याचा गोपींशीं झालेला व्यवहार, या गोष्टींची भेसळ होऊन हल्लींचें उपलब्ध कृष्णचरित्र बनलेलें असावें, असें डॉक्टर भांडरकरांचें म्हणणें आहे.

ही कल्पना युक्तीला पुष्कळ पटते, असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. दोन निरनिराळ्या रंगांच्या नदीच्या ओघांचा एक जीव झाला, तरी ज्याप्रमाणें सूक्ष्म दृष्टीनें पाहणारास प्रवाहांतील रंगभेद दिसून येतो त्याप्रमाणें श्रीकृष्णाची गोष्ट आतां एक जीव झालेली दिसते, तरी त्या गोष्टीमध्यें सूक्ष्म तऱ्हेनें पाहिल्यास दोन परस्पर भिन्न गोष्टींचा मिलाफ दिसल्याखेरीज रहात नाहीं. डॉ. भांडारकरांची ही कल्पना जरी पूर्णपणें सिद्ध झाली आहे असें म्हणतां येणार नाहीं तरी तिचा शांतपणें विचार करण्यासारखी तरी ती आहे, यांत शंका नाहीं. निदान माझ्या मनाला तरी ती पटली, असें मला कबूल करणें भाग आहे. जरी याप्रमाणें भागवतधर्म बुद्धकालीन असला, तरी गोपालकृष्णाची गोष्ट त्यांत मागून शिरली असावी. बौद्धधर्माला राजाश्रय मिळून त्याचा झपाट्यानें सर्व हिंदुस्थानभर प्रसार झाला. परंतु हा राजाश्रय कमी होतांच हिंदुधर्मानें पुन्हां डोकें वर काढलें, परंतु तो हिंदुधर्म यज्ञयागादिकांचा वैदिक धर्म नव्हे, तर भगवद्गीतेंत सांगितलेला **भागवत** धर्म होय. याचा उत्तरेकडून हळू हळू दक्षिणेंत प्रवेश होत गेला, व बौद्धधर्मास उतरती कळा लागल्यानंतर दक्षिणेंत जे मोठमोठे धर्मप्रवर्तक झाले, त्यांनीं या भागवताचा पुन्हां सर्व हिंदुस्थानभर प्रसार केला. या धर्मप्रसारकांपैकीं शंकराचार्य हे पहिले होत. परंतु हे विशेषतः ज्ञानमार्गी होते. त्यांनीं मायावाद व अद्वैतमत प्रतिपादिल्यामुळें भक्तीच्या भागवतधर्माला त्यांच्याकडून फारसें प्रोत्साहन मिळालें नाहीं. असें प्रोत्साहन **रामानुजाचार्यां**कडून मिळालें. यांचा जन्म

१०१७ मध्यें झाला व त्यांनीं भक्तिमार्ग अथवा भागवतधर्माचा प्रसार केला. परंतु यांच्या धर्मामध्यें विष्णु या नांवानेंच परमेश्वराचा उल्लेख येतो. कृष्ण व विष्णु हे एकच असेंही ते म्हणत. परंतु यांच्या उपदेशांत अजून राधाकृष्णाचें नांवही दिसून येत नाहीं. मथुरेंतील दोघां श्रीमान् शेटजींनीं या पंथाचा स्वीकार करून वृंदावनास छत्तीस लाख रुपये खर्चून श्रीरंगजीचें देऊळ बांधल्यापासून या पंथाचे कांहीं लोक मथुरेंत झाले; व हा एक कृष्णभक्तीचाच पंथ आहे, असें मानण्यांत येऊं लागलें. मध्वाचार्य हे ११९९ मध्यें जन्मले. यांनीं द्वैतमताचा प्रसार करून कृष्ण व विष्णूची भक्ति करणं हेंच खरें मोक्षाचें साधन आहे असें प्रतिपादन केलें, व त्यांनीं मथुरा व वृंदावन या ठिकाणांस जास्त पावित्र्य व महत्त्व आणलें; तरी पण गोकुळांतील राधाकृष्णाच्या कथेवर त्यांचा भर नसे.

गोकुळांतील राधाकृष्ण व विशेषतः राधेची व गोपींची भक्ति करणें व कृष्णाप्रमाणें गोपींशीं लीला करणें हेंच मोक्षाचें साधन आहे अशा प्रकारच्या धर्माचा प्रसार निंबार्क, वल्लभाचार्य व चैतन्य या अर्वाचीन धर्मप्रवर्तकांनीं केला व हल्लीं मथुरेंत व वृंदावनांत याच पंथाच्या लोकांचा फार भरणा आहे.

निंबार्काचें मूळचें नांव भास्कराचार्य असें होतें. यानें एकदां एका साधुपुरुषाला सायंकाळीं भोजनास बोलाविलें. परंतु त्या पुरुषास सूर्य मावळल्यावर भोजन करावयाचें नाहीं हें विसरून त्यानें त्याला बोलावण्यास उशीर केला. परंतु सूर्यनारायण भास्कराचार्यांवर उपकार करण्याकारितां निंब झाडावर उतरला व भोजन आटोपेपर्यंत तेथें थांबला. म्हणून त्याला **निंबार्क** म्हणूं लागले, अशी एक दंतकथा या पंथाच्या उत्पादकांविषयीं सांगतात! हा निंबार्क मथुरावृंदावनास पुष्कळ दिवस होता. राधाकृष्णाची भक्ति करणें, नंद व यशोदा यांप्रमाणें त्यावर प्रेम करणें, गोपालकृष्णाची सेवा करणें, व त्याला आपलें सर्वस्व अर्पण करणें हेंच मोक्षाचें खरें साधन असें त्यानें शिकविलें.

**वल्लभाचार्य** यांचा पंथ फारच मोठा आहे. वल्लभ हा लक्ष्मण भट्ट या नांवाच्या तेलगू ब्राह्मणाचा मुलगा होता. याचा जन्म १४७९ मध्यें झाला. हा वृंदावनांत रहात असतां श्रीनाथजीनें त्याच्या स्वप्नांत येऊन असें सांगितलें कीं, " माझें देऊळ तूं बांध व माझ्या भक्तीच्या धर्माचा प्रसार कर. " त्याप्रमाणें वल्लभानें वृंदावनास श्रीनाथजीचें देऊळ बांधून वल्लभपंथाचा प्रसार केला. या पंथाच्या मताप्रमाणें कृष्ण हाच खरोखरी परमात्मा आहे व या कृष्णपरमात्म्याबरोबर क्रीडा करण्यास मिळणें हाच खरा मोक्ष आहे. जे कृष्णाची भक्ति करतात त्यांनाच कृष्ण आपल्या सहवासांत व आपल्या खेळांत घेतो. ही भक्ति ईश्वरच मनुष्याच्या मनांत उत्पन्न करतो. प्रथमतः मनुष्याच्या मनांत ईश्वराविषयीं आवड उत्पन्न होते यामुळें मनुष्य ईश्वराविषयीं ज्ञान मिळवूं लागतो. यालाच प्रेमभक्ति म्हणतात. हिची पहिली पायरी प्रेम होय. दुसरी पायरी आसक्ति होय. तिसरी पायरी व्यसन होय. या व्यसनानें मनुष्याला जिकडे तिकडे परमेश्वर दिसूं लागतो. अशी अवस्था प्राप्त झाली म्हणजे कृष्णपरमात्मा या भक्ताला आपल्या खेळांत निरनिराळ्या स्वरूपांत घेतो व ही स्थिति धर्मार्थकाममोक्ष या चाऱ्ही अर्थांपेक्षां श्रेष्ठतर आहे. कृष्णानें गोपींशीं ज्याप्रकारें क्रीडा केली, त्याच तऱ्हेची या भक्तांशीं त्याची क्रीडा होते व या क्रीडेमध्यें सामील होणें हेंच प्राण्याचें इतिकर्तव्य आहे. ही भक्ति उत्पन्न होण्यास वल्लभानें सांगितलेला मार्ग म्हणजे श्रीकृष्णाची व वल्लभाचार्यांची पूजाअर्चा करणें हा होय. मनुष्यानें प्रातःकाळीं उठावें, भागवत हें नांव उच्चारावें, व प्रातर्विधि करून देवाच्या पायांचें थोडें पाणी प्यावें, मग पूर्वेस तोंड करून गुरूचें नांव घ्यावें; नंतर कृष्णाला नमस्कार करावा, नंतर यमुना व गोपी यांना वंदन करावें, कृष्णानें खाल्लेल्या तांदुळांचें सेवन करावें व स्नान वगैरे करून व चंदन अंगाला लावून मग देवळाचें दार उघडून देवाच्या शय्येवरील माला वगैरे बाहेर आणून त्याची निजावयाची खोली साफ करावी, मग एक गाणें म्हणून कृष्णाला उठवावें, नंतर राधाकृष्णाला नमस्कार करून

त्यांना स्नान वगैरे घालून त्यांना नैवेद्य दाखवावा, मग पुन्हां कृष्णाल पाळण्यांत घालून निजवावा, नंतर दोन प्रहरचें जेवण आणावें. याप्रमा देवाचे सर्व विधि लहान मुलाप्रमाणें करावयाचे, हीच देवांची पूजा भक्ति. या पंथामध्यें विषयनिरोधाचा उपदेश कमीच आहे. उलट वि सांतच मोक्ष आहे; अशा प्रकारची कल्पना या पंथाच्या उपासनाक्र आहे, व आम्ही मागें मथुरेच्या वर्णनांत देवाची याचप्रमाणें पूजाउ चालते,: व भाविक लोक हे सर्व विधि अंधश्रद्धेनें अजूनही करत दिसतात याचें वर्णन दिलेंच आहे.

वल्लभाच्याच सुमारास बंगाल्यांत **चैतन्य** उदयास आला. याचा जन १४८७ मध्यें झाला. याचा लहानपणींच विवाह झाला होता. पुढें मोठे पणीं यानें संन्यासाश्रम स्वीकारला व आपल्या पंथाचा प्रसार केल वल्लभानें कृष्णभक्तीमध्यें विधि व बाह्य पूजा यांचें बंड माजविलें; चैत न्यानें भक्ति अंतरंग पाहिजे व ती भजनानें व कीर्तनानें उत्पन्न होते असें प्रतिपादन केलें. दोघांचीही मोक्षाची कल्पना सारखीच होती. ग लोकामध्यें श्रीकृष्णपरमात्म्याबरोबर खेळावयास मिळणें हाच खरा मो होय असें दोन्ही पंथांचें मत आहे. चैतन्य पंथांत कृष्णाइतकाच किंबहु एक कांकणभर मात्र जास्त मान राधेला आला. राधेची भक्ति कृ हेंच मोक्षांचें साधन बनलें.

या पंथाच्या वरील हकीकतीवरून गोपालकृष्णाची भक्ति ही गे चार पांचशें वर्षांच्या आंतील आहे, हें स्पष्टपणें दिसून येईल. मथुरावृं वन पाहणाराच्या हीच गोष्ट प्रथमतः मनांत येते. येथील सर्व प्रकार फ जुने भासत नाहींत. देवळें तर अगदीं नव्यासारखीं दिसतात. मथुरावृं वनांत या चारी प्रकारच्या वैष्णवपंथाचे पुष्कळ लोक आहेत. इतर जात व सामान्य हिंदुधर्मावर भरंवसा ठेवणारेही पुष्कळ हिंदु आहेत.

हें मथुरावृंदावन वर्णन फारच वाढलें. परंतु वाचकांना ही हकी वाचून कांहीं तरी करमणूक होईल, व आपल्या हिंदुधर्माच्या कित

नां थांचा किती लांबवर इतिहास पोंचतो हें ध्यानांत येईल, म्हणून ही
कीकत थोड्या विस्तारानें दिली आहे.

असें संकल्प केल्याप्रमाणें माझ्या उत्तरहिंदुस्थानच्या प्रवासाच्या दशाध्यायी
पुराणाचा शेवट झाला. या पुराणश्रवणानें वाचकांना प्रवासाची प्रबल
इच्छा होऊन त्यांना आपल्या देशांतील निसर्गरमणीय व धर्म-पुनीत
स्थानांचें दर्शन घडो, अशी इच्छा करून वाचकांची रजा घेतों.

IRBK-0102795
IRBK-0102795